# ख्रिस्तायन

नाताळ ई - अंक ♦ वर्ष तेरावे ♦ २५ डिसेंबर २०२३ ♦ संपादक ख्रिस्तोफर रिबेलो




MERRY
Christmas
HAPPY NEW YEAR
Wishing you a season that's merry and bright with the light of God's love.
BASSEIN CATHOLIC CO-OPERATIVE BANK LTD
ESTD.1918
(SCHEDULED BANK)
Board Of Directors
Benauld Dias Chairman
Simon Soares Vice-chairman
Sandeep Seth CEO
Roshan Pereira General Manager
Catholic Bank Building, Papdy Naka, Papdy, Vasai West, Dist. Palghar - 401 207, Maharashtra.
Toll Free Number : 080 6942 0000 | www.bccb.co.in

# ख्रिस्तायन

नाताळ ई-अंक वर्ष तेरावे २५ डिसेंबर २०२३

**संपादक : ख्रिस्तोफर रिबेलो**

**सहसंपादक : एडवर्ड डिसोजा** **तांत्रिक सहकार्य : स्वप्निल रिबेलो**

**विशेष साहाय्य : स्मिता ख्रि. रिबेलो, नेल्सन दोडती**

**मुखपृष्ठ : पॉल डिमेलो, गास** **मोबाईल ॲप – चार्ल्स क्लेमेंट गोम्स**

**संपर्क / अभिप्राय :** आमच्याशी संपर्क साधावयाचा असल्यास आणि आपल्याला काय आवडलं, काय नाही ते आम्हाला कळवण्यासाठी खालील पत्त्यांवर ई-मेल करा वा फोन करा.

chrisrtayan25online@gmail.com (9819436078)

**आभार : आमचे सर्व लेखक, कवी, हितचिंतक व प्रसिद्धी देणारे सर्व प्रसार माध्यमे यांचे “ ख्रिस्तायन” तर्फे मन:पूर्वक आभार व नाताळ आणि नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.**

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही

**© सर्व हक्क लेखक व कवींच्या स्वाधीन**

# जीवन विकास नागरी सहकारी पतपेढी (मर्यादित), वाघोली.

रजि.नं.टीएनए /व्हीएस्आय /आरएस्आर / सीआर / ४२९ / ८८-८९ दिनांक ९-१२-१९८८

*कोकण विभागातील अग्रेसर पतपेढी*

आपल्या व्यावसायीक व कौटुंबिक विकास योजनेसाठी पतपेढीच्या सेवा

*१३ महिन्यापेक्षा जास्त ते १८ महिन्यापर्यंत*

**जीवन विकास दिर्घ मुदत ठेव योजना** ७.६० % (सरळव्याज)

ज्येष्ठ नागरीकांच्या ठेवीवर - द.सा.द.शे. ७.५५% व्याजदर

सर्वसाधारण सभासदांस द.सा.द.शे. ७.३० % व्याजदर

८.५०% ते ११.७५% व्याजदराच्या विविध सुलभ कर्ज योजना.

**शैक्षणिक कर्ज किफायतशीर व्याजदरात - ८.९५%**

(उच्च शैक्षणिक खर्चाच्या १००% शैक्षणिक कर्ज देणारी एकमेव पतसंस्था)

**घरबांधणी कर्ज द.सा.द.शे. ९% व्याजदर**

**फ्लॅट खरेदी द.सा.द.शे. ८.५०% व्याजदर**

**शॉप, गाळे, मशिनरी खरेदीसाठी द.सा.द.शे. ९.५०% व्याजदर**

(१ कोटीपर्यंत कर्ज वितरण करणारी एकमेव पतसंस्था)

**रू. ५ लक्ष पतकर्जाचे त्वरीत वितरण**

नियमित कर्ज भरणा करणा-यांना व्याजात २% रिबेट

**३० नोव्हेंबर २०२३ अखेर आर्थिक प्रगतीचे बोलके आकडे**

* भागभांडवल रू. १३.६१ कोटी
* कर्जे रू. २०१.६६ कोटी
* ठेवी रू. ३३४.०२ कोटी
* गुंतवणूक रू. २१०.८४ कोटी
* एकूण व्यवसाय रू. ५३५.६८ कोटी
* सभासद संख्या १६९०२
* निव्वळ एन. पी. ए. ०%

* दि. ३१/०३/२०२३ अखेर नफा रू. ६.४२ कोटी

शाखा -

| निर्मळ | सत्पाळा | उमराळे | नानभाट | आगाशी | नालासोपारा (प.) |
|---|---|---|---|---|---|
| फोन :८००७९५५४३० | मो. ७२६१९१९०१२ | मो. ०८५५०९१०२६४ | मो. ७२६१९१९०१३ | मो. ०८५५०९१०६४३ | मो. ७८७५८९५५०८ |

लता जे.फोस — मुख्य कार्यकारी अधिकारी

संज्याव जे.रोझारियो — उपाध्यक्ष

नेल्सन पी. दोडती — अध्यक्ष

व संचालक मंडळ

# या अंकात ...

## संपादकीय...

## कथा / ललित लेख :-

मिन्याचा बंगला - डॉ. अनुपमा उजगरे

"ख्रिस्तायन ८५ वर्षांचे झाले!" - मुक्ता अशोक टिळक

गिधाडे - जोसेफ तुस्कानो

भारतीय मातीतला ख्रिस्ती धर्म - सायमन मार्टिन

गारूड - डॉ. नेहा किशोर सावंत

माजी आमदार डॉमनिक ... - अनिलराज रोकडे

कंबारडा पार मोडला - फ्रान्सिस डिमेलो सर

अनंत ध्येयासक्ती...!! - जॉन कोलासो

मराठी साहित्य संमेलने - रेमंड मच्याडो

पेडोफिलिया - प्रा. स्टीफन आय परेरा

पवित्र भूमी दर्शन - पौलस वाघमारे

देवाचं देणं! - स्टॅन्ली गोन्सालविस

देवाचा शब्द - फ्रान्सिस आल्मेडा सर

समाजाचे मेंढपाळ - फादर मायकल जी

इजिप्तचे पिरॅमिड्स – ज्युलियस (दीपक) मच्याडो

स्कॉटिश मिशनरींच्या शाळेत जोतिबा - कामिल पारखे

सरस्वती वैद्य हत्याकांड - सुहास बिऱ्हाडे

आगरातली आषाढी एकादशी - अतुल काटदरे

१८ डिसेंबर पालीचा फेस्ता - सिडनी मोरायस

घर - लेस्ली से. डायस

अर्ध्यावरती डाव - डॅनिअल मस्करणीस

जनरेटिव्ह एआय (चॅट जीपीटी) - चिन्मय गवाणकर

ब्लेसिंगस ओन्ली ! - सचिन मेंडीस

तरीही वसंत फुलतो.... - मॅक्सवेल लोपीस

जगावे का मरावे? - अतुल आल्मेडा

आम्ही अल्पसंख्यांक !! - वेन्सी डिमेलो

सुखी वैवाहिक जीवनाचे मर्म ! - ॲड. जॉन रॉड्रिग्ज

एकच आस आणि ध्यास... - जॉन गोन्सालविस

आयज - बेर्नादेत रूमाव     कॉलगर्ल - सुनिता बर्नड परेरा

साहिब, बीबी और गुलाम - क्लेमेंट डिमेलो

निर्भेळ... - ॲलेक्स मच्याडो     विस्थापित - अशोक बाप्टीस्टा डिब्रिटो

निर्णय - बॅप्टिस्ट एम वाझ     पाने आठवणीची - बावतीस पेडीकर

रंजलेल्यांचा रंजक नाताळ - बर्नड लोपीस

लेखकाचा जन्म - दुर्गाप्रसाद खांडाळेकर

जगाला कवेत घेणारा ख्रिस्त - फा. असिस रॉड्रिग्ज

गोर गरिबांची परिचारिका - मेल्सीना तुस्कानो परेरा

मी मुग्धा : बन्याची आई - भरत काशिनाथ वाळिंजकर

## कविता / चारोळया :-

अक्षय शिंपी, संगीता अरबुने, महेश लिलापंडित,

अमोल वि. देशमुख, शकुंतला ना. पाटील, संगीता वाझ,

मेलविन डाबरे, ब्रिनल क्रास्टो, बाबू डिसोझा

## कलाकुसर :-

रॉबर्ट परेरा, रॉयल बॅप्तिस्ट रॉड्रिग्ज, डॉ. रेबेका दोडती

# संपादकीय ...

प्रिय वाचक मित्र-मैत्रिणींनो, सर्वप्रथम नाताळ सणाच्या हार्दिक शुभेच्छा.

ख्रिस्ती धर्मीयांचा हर्षोल्लासाने भरलेला एकमेव सण म्हणजे नाताळचा सण. मी प्रत्येक वर्षी संपादकीयमध्ये या गोष्टीचा आवर्जून उल्लेख करतो आणि करत राहीन की दिवाळी सण आणि दिवाळी अंक हे जसे अतूट नाते आहे तसेच नाताळ सण व नाताळ अंक यांचे नाते व्हावे असे आमचे स्वप्न आहे आणि ते आम्ही २१ वर्षाअगोदर प्रथम छापील स्वरुपात अंक प्रकाशित करून प्रत्यक्षात आणि गेली तेरा वर्षे हा अंक ऑनलाइन प्रकाशित करून ते पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहोत.

मंडळी, आज हे संपादकीय लिहित असताना विशेष आठवण येतेय ती म्हणजे फा. (डॉ.) एलायस रॉड्रिग्ज ह्यांची. मला संपादन क्षेत्रातले खाच-खळगे अगदी बारकाईने शिकविणाऱ्या फादरांचे ०७ नोव्हेंबर २०२३ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. एक दिवस अगोदर म्हणजेच ०६ नोव्हेंबर रोजी त्यांचा ७९वा वाढदिवस होता. मी त्यांना दरवर्षीप्रमाणे व्हॉटसअप शुभेच्छा देणारा मेसेज केला. त्यांचा अर्ध्या तासातच मला कॉल आला आणि त्यांनी आस्थेने “ख्रिस्तायन’ अंकाच्या तयारीविषयी विचारणा केली. या वर्षी मुंबईचे आर्चबिशप कार्डिनल ऑस्वल्ड ग्रेशस ह्यांनी त्यांच्या "पण हा आहे तरी कोण?" ह्या पुस्तकाचे मूल्यांकन केले होते ते आणि आणखी माहितीपर लेख आठवड्याभरात तुला मेल करतो असे सांगून त्यांनी फोन ठेवला. तो त्यांचा शेवटचा फोन. २४ तास उलटायच्या आत त्यांच्या निधनाची बातमी आली.

ते निर्मळ चर्चचे प्रमुख धर्मगुरु असताना आमच्या गोम्स आळी विभागासाठी नवीन चर्चचे त्यांनी जोमाने हाती घेतले होते आणि ते पूर्णत्वास जाताना म्हणजेच उदघाटनाच्या स्मरणिकेचे ते प्रमुख संपादक होते आणि मी कार्यकारी संपादक होतो. एका व्यक्तीने भला मोठा बारा पानाचा लेख दिला होता. त्याची साहित्यिक मूल्ये यथातथाच होती. तो गाळावा असे स्मरणिका समितीचे मत पडले होते, मी जेव्हा इतर लेखासह तो लेख फादरांना दाखवला आणि त्यांचे मत विचारले, त्यांनी आपण तो घेऊया असे सांगितले आणि तो लेख मागितला. पहिले पान उलटले, दुसऱ्या-तिसऱ्या

पानावर पूर्णपणे काट मारला तसेच पुढेही आणखी काही पाने वगळली आणि जेमतेम साडेतीन पानाचे मॅटर माला प्रेसला पाठवायला सांगितले. तो लेख जेव्हा प्रूफ रीडिंगसाठी आला. तेव्हा आश्चर्य म्हणजे तो कुठेही तुटक लेख आहे असे वाटत नव्हते, ते किती उत्तम संपादक ह्याचे हे उदाहरण होते. त्यांना तल्लख बुद्धीचे वरदान होते, त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. एक उत्तम प्रवचनकार होते, ओघवत्या भाषेत ते भाविकांच्या मनाचा ठाव घेत असत. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

या अंकासाठी प्रत्येक वर्षी ९३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष फादर फ्रान्सिस दिब्रिटो ह्यांचे फक्त लेखच मिळत नाही तर मार्गदर्शनपर आशीर्वाद मिळतात. असेच कायम प्रोत्साहन मिळत असते ते म्हणजे ज्येष्ठ विज्ञान लेखक जोसेफ तुस्कानो, ज्येष्ठ कवी सायमन मार्टिन, फा. (डॉ.) रॉबर्ट डिसोझा, प्रथितयश कवी वर्जेश सोलंकी, महेश लीलापंडित, म. टा. चे माजी उपसंपादक जॉन कोलासो, कवियत्री सबिना थॉमस फोस, वसई ख्रिस्ती साहित्य मंडळाचे अध्यक्ष रेमंड मच्याडो, ज्येष्ठ पत्रकार अनिलराज रोकडे, ज्येष्ठ लेखक-संपादक प्रा. स्टीफन आय परेरा, गुरुवर्य फ्रान्सिस आल्मेडासर, ज्येष्ठ विचारवंत फा. मायकल जी, माझ्या मोठ्या बहिणीप्रमाणे मार्गदर्शन आणि प्रेम करणाऱ्या डॉ. नेहा सावंत, ज्येष्ठ लेखक स्टॅन्ली गोन्सालवीस, मी ज्यांना कुपारी पू. लं. म्हणतो ते मित्रवर्य सॅबी परेरा, प्रथितयश तरुण कविद्वय व जवळचे मित्र झालेले डॉ. फेलीक्स डिसोझा व इग्नेशियस डायस, ज्येष्ठ लेखक संपादक संदीप राऊत, गेल्याच वर्षी मित्र यादीत समाविष्ट झालेले पुणे येथील ज्येष्ठ पत्रकार कामिल पारखे, पत्रकार सुहास बिऱ्हाडे, वैष्णवी राऊत ह्या सर्वांचे सतत मार्गदर्शन आणि मोलाच्या सूचना मिळत असतात, त्यांच्या व्यस्त शेड्यूलमधून ते नेहमी माझ्यासाठी वेळ काढतात, त्यामुळे मी सतत त्यांच्या ऋणात राहू इच्छितो.

ज्येष्ठ लेखिका डॉ.अनुपमा निरंजन उजगरे, ज्येष्ठ लेखक दीपक मच्याडो, अतुल काटदरे, ज्येष्ठ विचारवंत फा. वेन्सी डिमेलो, ज्येष्ठ लेखक सिडनी मोरायस, प्रथितयश वकील ॲड. अतुल आल्मेडा, ज्येष्ठ लेखक जॉन गोन्सालवीस, ज्येष्ठ लेखक अँथनी परेरा, ज्येष्ठ नाटयकर्मी विलास पागार, ॲलेक्स मचाडो, बर्नर्ड लोपीस, आयवन क्रास्टो, संगीततज्ञ मेल्वीन डाबरे, डॉ. नेन्सी वि. डिमेलो, सुनिता ब. परेरा, आशा गोन्सालवीस, अमर म्हात्रे, करियर गुरु प्रकाश आल्मेडा, बॅप्टिस्ट वाझ, मॅक्सवेल लोपीस. जवळचे

स्नेही एमेल आल्मेडा, मॅकेन्झी डाबरे, फा. असिस रॉड्रिग्ज, पौलस वाघमारे, पत्रकार रविंद्र माने, जॅक गोम्स, क्लेमेंट डिमेलो, शकुंतला नारायण पाटील, ॲड. जॉन रॉड्रिग्ज, अशोक बा. डिब्रिटो, कल्पना रॉड्रिग्ज, विजू वाझ, बॅन्सन कोरीया, जिम (फिलीप) रॉड्रीग्ज, मेल्सीना तुस्कानो परेरा, ब्रिनल कुडेल, ब्रायन मेंडिस तसेच चित्रकार पॉल डिमेलो, ऑस्टिन डाबरे, रॉयल बी. रॉड्रिग्ज, ऑल्विन कोरिया, ऑल्विन परेरा तसेच फोटोग्राफीमध्ये रुची असलेले लिओनार्ड रिबेलो आदी मान्यवर लेखक-कवी आणि चित्रकारांना मी दरवर्षी लिहायला सांगून त्रास देत असतो, पण आजपर्यंत एकाही व्यक्तीने नकार दर्शविला नाही. मानधनाची अपेक्षा न करता फक्त या उपक्रमाला साथ म्हणून माझ्या विनंतीला मान देऊन या प्रवासात मला सोबत करतात, म्हणूनच हे सर्व सुहृद मला माझे कुटुंबियच वाटतात. मी हक्काने मागतो आणि ते देतात. मी या सर्वांना मनापासून धन्यवाद देतो.

आम्ही हा अंक 'पीडीएफ' स्वरुपात देत आहोत, त्यामुळे आपणास अंक वाचण्यासाठी पूर्ण वेळ ऑनलाइन असण्याची गरज नाही. त्याचबरोबर या अंकाचे अँड्रॉईड ॲपही आहे. प्ले स्टोअर वरुन आपण हा अंक डाऊनलोड करून नंतर आपल्या सोयीप्रमाणे अगदी मोबाईलवरही वाचू शकता. आपण हा अंक वाचल्यानंतर इतरांनाही कळवा.. आणि आपल्या सूचना आणि अभिप्रायांची देखील आम्ही वाट पाहत आहोत.

**नाताळ सणाच्या व नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!!!**
**Merry Christmas & Happy New Year**

प्रिय वाचकहो, संपादकीय पूर्ण होत आले असताना नुकताच एक दुख:द बातमी आली आहे, ती म्हणजे माझा जवळचा मित्र झालेला 'विजा दा' (विजय मचाडो) ह्यांचे निधन झाले आहे. महिन्याभराअगोदर मला मेसेज करून तुझ्या अंकासाठी 'संगीत' विषयावर लेख पाठवत आहे, जरा रफ आहे, तू पॉलिश कर आणि मग टाक असे म्हणणारा 'विजा दा' दहा दिवसाअगोदर  मी हॉस्पिटलाइज्ड आहे, पण लेख जरूर पाठवणार सांगतो आणि आज अचानक निघून जातो.

२००९ साली वसई-विरार महानगर पालिकेच्या विरोधात आंदोलन करताना वसईच्या तरुणांची 'स्वाभिमानी वसईकर संघटना' स्थापन झाली, विजा दा त्याचा

संस्थापक अध्यक्ष, त्याने दिलेल्या एका हाकेवर तेव्हा शेकडोने तरुण जमा होत होते, पण बाइक रॅली, रास्ता रोको आणि तसेच इतर प्रकारचे आंदोलन करण्यासाठी तरुण मंडळी पुढे सरसावत होती. ह्या संघटनेच्या माध्यमातूनच विजा दा एक चांगला मित्र बनला. तो एक उत्तम गायक, त्याने गाईलेली 'वसना तू मन मंदिरी माझ्या' आणि 'घ्या नि खा' ही दोन चर्च गीते माझ्या विशेष आवडीची आहेत आणि त्याला प्रत्यक्ष भेटीत सांगितले की पटकन दोन ओळी गाऊन दाखवणार. विजा दा, तुझी पोकळी समाजात भरली जाणार नाही. तू खरा 'विजय' होता, पण एवढ्यात तू जायला नको होते. आपण वसईतील आपले पारंपारिक संगीतावर एक अभ्यासू आर्टिकल बनवणार होतो, ते ते तू तसेच ठेवून गेलास. 'विजा दा', आजूबाजूला नाताळची गाणी कानी पडताहेत आणि त्यात तुझा स्वर ऐकू येतोय आणि डोळ्यात पाणी येतेय. तुझी आठवण त्या प्रत्येक स्वरासोबत येत राहील, तुला भावपूर्ण श्रद्धांजली.

# भावपूर्ण श्रद्धांजली




**स्व. फा. (डॉ.) एलायस रॉड्रिग्ज**



**स्व. व्हिक्टर (विजय) मच्याडो**

# मिन्याचा बंगला

■ डॉ. अनुपमा उजगरे, ठाणे

तब्बल अठरा वर्षांनी नगरला जायला मिळतंय यावर खरं म्हणजे सुमाचा विश्वासच बसला नव्हता. 'ऑफिसचं काम निघतंय, चल तू पण' असं त्यानं म्हटल्यावर तिच्या डोळ्यांपुढे पहिला प्रश्न उभा राहिला. "मुलांची शाळा ?"

“त्याचं काय विशेष ? राहतील मामाकडे. दोन चार दिवसांचा तर प्रश्न आहे."

सुमाला ते एकदम पटलं. उत्साहानं ती नगरला जायच्या तयारीला लागली. भावाला बेत सांगितला तर तो गपगारच झाला. मग जराशानं उसासत म्हणाला,

"आज आजी आणि आबा असते तर त्यांना किती बरं वाटलं असतं, नाही ? नातजावयाची आवभगत करताना काही कमी पडू दिलं नसतं त्यांनी."

वहिनीनं मुलांची जबाबदारी घेतली आणि मग सुमा नवऱ्याबरोबर तरंगतच नगरला निघाली.

आबांच्या मळ्यात सुट्टी घालवायची म्हणजे तिला अन् तिच्या मामेभावंडांना काय आनंद व्हायचा ! आई बाबांच्या धाकाच्या कचाट्यातून सगळी कशी मोकाट सुटलेली असत. सगळ्यांचे लाड भरपूर होत पण त्यातल्या त्यात थोरल्या मामांच्या आक्कीवर आजीचा भारी लोभ.

आक्की रूपानं बेताची अन डोक्यानंही कमीच. आक्कीला एक गोष्ट मात्र चांगली जमायची. तिच्या ज्वारीच्या भाकरी कशा चंद्रासारख्या वाटोळ्या असायच्या. भाकर टरारून फुगली की आक्कीचा चेहरा समाधानानं फुलून जायचा. एरव्ही आक्कीचा चेहरा नेहमीच त्रासिक अन् रागीट असायचा. सगळं जग आपल्याविरुद्ध आहे असा संशय तिच्या नजरेत स्पष्ट दिसायचा. आपल्याच नादात भिवया उंचावणारी आक्की आठवली अन् सुमाला हसू आलं. आता हसणं ठीक होतं. पण तेव्हा आक्कीच्या वाटेला

फारसं कुणी जात नसे. गेलंच तर आजी त्यांच्यावर ' अरे चिळश्यांनो....' म्हणत धावून जायची.

आक्कीला लहानपणापासून आजीनं स्वत:जवळ ठेवून घेतलं होतं. त्यामुळे आक्कीबद्दल

कुणालाच विशेष जिव्हाळा वाटत नव्हता. प्रत्यक्ष तिच्या सख्ख्या भावंडांनाही तिच्याबद्दल फारशी आपुलकी वाटत नसे, मात्र तिच्या अर्धवटपणामुळे पुढं तिचं कसं होणार या विचारानं आजीनं डोळ्याला पदर लावला की सगळ्या मुलांना आपल्यालाही रडू फुटणार असं वाटायचं. पण तेही तेवढ्यापुरतंच. परत सर्व आपापल्या खेळात रमत.

आजीच्या आठवणीनं सुमाच्या मनात खूप कालवाकालव झाली. सोनईच्या आणि श्रीरामपूरच्या मामांची मुलं आणि तिची भावंडं अशी नऊ-दहा जणांची पलटण आबांच्या मळ्यात दाखल झाली की आजी लगबगीनं नातवांचे मुके घ्यायला यायची. सगळ्यांच्या तोंडावरून आपले खरखरीत हात मायेनं फिरवत म्हणायची,

"आली बाई, चिळशी माकडांची टोळी !"

हीच माकडांची टोळी जेव्हा तिच्या नाकी नऊ आणी, तेव्हा मात्र ती वैतागून म्हणायची, "मेल्यांनो, थांबा जरा, आता पुढच्या सुट्टीत एक्काला जरी पाऊल टाकू दिलं इथं, तर माझं नाव ते !"

"ते कोणतं ग आजी ?" एखादं टारगट नातवंडं तिला चिडवायचं. मग लटक्या रागानं त्याला आजी म्हणायची,

"तू रे टग्या ऽऽ तुला तर नाहीच कधी मी बोलावणार. तोंड करी बाता न ढुंग खाई लाथा. चिळसा कुठला !"

आक्कीला मात्र कुणी आल्या गेल्याचं काही सोयरसूतक नसायचं. बाकी भावंडं एकत्र जमली की त्यांच्या आपोआप जोड्या पडत. धाकट्या मामांची शुभी सुमाची जोडीदारीण असायची. जशा दोघी वयानं सारख्या तशा त्यांच्या आवडी निवडीही सारख्याच. एका ताटात जेवल्याशिवाय त्यांचं पोट भरायचं नाही. चिंचा, पेरू, दुधावरची साय असलं चोरटं खाणं जोडीनं खाण्यात त्यांना भारी मौज वाटायची.

सगळ्या मुलांवर लक्ष ठेवायला मग आबा मिन्याला स्वत:च्या तैनातीतून मोकळा करीत. त्यानं मग मुलांचं हवं-नको बघायचं. मुलांना फिरायला न्यायचं. कणसं भाजून त्यांना लिंबाचा रस, मीठ चोळून द्यायचं. हुरडा भाजून सोबत घट्ट दही द्यायचं. पिकलेल्या कवठात गूळ-मीठ घालून कवठाच्या वाट्या प्रत्येकासाठी सारख्या प्रमाणात तयार ठेवायच्या हे कौशल्याचं काम मिन्याचंच ! वर पक्षपात केल्यावरून मुलांचा आरडाओरडा मुकाट्यानं सोसायचा तोही मिन्यानंच !

मिन्या सगळ्या मुलांचं सगळं ऐकायचा. त्यामुळे तो मुलांना फार आवडायचा. त्यांना नको असेल तेव्हा मिन्या निमूटपणे आक्कीकडे जाऊन तिला स्वयंपाकात मदत करायचा.

मिन्या एका डोळ्यानं आंधळा होता. डोळा कशानं गेला म्हणून कुणी विचारलं तर उरलेला एक डोळा मिचकावत खुशाल हसत हसत सांगायचा, "तुमच्या पक्षा ल्हान व्हतो, तवाची गोस्ट. यकदा बोरं तोडाया गेल्तो त फांदीचा काटाच घुसलान् काय !"

मिन्या रंगानं काळाकुट्ट होता. त्याचे केसही तसेच काळेभोर अन् कुरळे होते. मिन्या कुणाचा कोण ते आबांना तरी ठाऊक होते की नाही आबाच जाणोत ! आक्कीच्या बरोबरच तोही आबांच्या घरात वाढला, एवढंच आम्हाला ठाऊक. मिन्या गोष्टी खूप छान सांगायचा. आक्की कामं आवरून आल्याशिवाय मात्र त्याची गोष्ट सुरूच होत नसे. मिन्याची गोष्ट सुरू झाली की मुलं रमून जात. छान छान गोष्टी सांगणाऱ्या मिन्याचं दिवसभरातलं अजागळ न् भेसूर रूप मुलं विसरून जात. तेव्हा त्यांना मिन्या म्हणजे त्याच्याच गोष्टीतला एक देखणा राजपुत्र वाटायचा. आक्की झोपली की मिन्याची गोष्ट संपत यायची. मुलांच्या ते लक्षात यायचं पण झोपेनं घेरल्यामुळे मिन्याशी भांडायला दम नसायचा.

सुमा आठवू लागली. मिन्यानं खरंच इतक्या गोष्टी सांगितल्या पण त्यातली एक तरी आठवतेय का ? तिनं स्वत:च्याच नादात मान हलवली. मिन्याच्या गोष्टीमधली एक जागा मात्र तिला आठवली. त्याच्या गोष्टीत एका बंगल्याचा नेहमी उल्लेख व्हायचा. त्यावेळी खेड्यात राहणाऱ्या त्या बाळगोपाळांपैकी कोणालाच बंगला म्हणजे नक्की

काय ते ठाऊक नव्हतं. त्या बंगल्यात सगळ्या वस्तू मिळायच्या आणि गंमत म्हणजे त्या सगळ्या फुक्कट मिळायच्या म्हणे ! कारण त्या बंगल्यातले मड्डम साहेब जगभर फिरायला गेले होते. मिन्याला त्या बंगल्याची चावी देऊन गेले होते. जाताना मिन्याला त्यांनी सांगितलं होतं की, "आम्ही जगून-वाचून परत आलो तर ठीक. नाहीतर तूच त्या बंगल्याचा मालक."

तो लाकडी बंगला खूप मोठा होता म्हणजे. त्याच्या मोठमोठ्या खोल्यांमध्ये हेऽऽ मोठमोठे नक्षीचे पलंग होते. भिंतींना लांबरुंद आरसे लावलेले होते. एक खोली तर नुसती खेळण्यांनी भरलेली होती. मिन्याचं लग्न होऊन त्याला मूलबाळ झालं की सगळी खेळणी त्यालाच मिळणार होती. कारण मिन्याच्या त्या मड्डम-साहेबांना मूलच नव्हतं. मिन्या त्या बंगल्याचं असं वर्णन करून सांगू लागला की मुलांना मिन्याच्या अजून नसलेल्या मुलांचा हेवा वाटायचा. मिन्या सांगायचा, "तिथं अत्तराच्या कुप्या हैतीऽऽ"

आक्कीचे डोळे चमकायचे.

"कमर बारीक करायचे पट्टे बी हैती."

शुभी-सुमीची नजरानजर व्हायची. त्यांच्या खाण्याला काही धरबंद म्हणून नसायचा. दोघींनाही त्यांच्या लठ्ठपणामुळे 'चुरमुऱ्याच्या गोण्या' म्हणून सगळे चिडवीत. बारीक कंबर

हे सौदयांच लक्षण आहे अस नुकतंच कुठतरी वाचनात आल्यानं आपली कंबर बारीक करण्यासाठी वाट्टेल ते करायला त्या दोघी एका पायावर तयार होत्या. झालं ! कंबर बारीक करायचा पट्टा आणून दे म्हणून त्यांनी मिन्याच्या मागे टूमणं लावलं. त्या जितक्या उतावीळ झाल्या होत्या तितकाच मिन्या बेफिकीर होता. आज आणतो, उद्या आणतो, त्यात काय मोठं कठीण आहे किंवा मग विसरलो, उद्या नक्की असं म्हणून तो त्यांची समजूत घालायचा. शेवटी सुमी आणि शुभी दोघी हट्टाला पेटल्या.

“तुझा बंगला तरी दाखव, खरचं आहे की नाही तो, तेवढं तरी बघू दे."

तसा काहीसा वैतागून मिन्या म्हणाला,

"ए भिंगऱ्यांनो, माजं बोलनं खोटं वाटतंय व्हय? मंग इच्यारा त्या आक्कीला. तिनं बघितलाय बंगला बी आन् आत्तराच्या कुप्या बी."

सुमी आणि शुभी मग लगेच आक्कीकडे गेल्या. आक्की हातावर भाकर थापण्यात गुंतली होती. त्या दोघींच्या येण्याकडे तिनं लक्षच दिलं नाही.

“आक्के...." सुमी

“.........”

"ए आक्के......" शुभी

आक्कीनं तव्यावर भाकर टाकली. वरून तिला पाण्याचा हात लावत तिनं दोघींकडे कपाळावर आठ्या घालून पाहिलं. त्याबरोबर दोघींनी तिच्याकडे बघून प्रेमळ हसण्याचा प्रयत्न केला. पण त्यामुळे आक्की आणखीनच बिथरली. तिच्या डोळ्यात आणखीनच संशय दाटला. काही न बोलता तिनं दुसऱ्या भाकरीच पीठ मळायला घेतलं.

"आक्के, मिन्याच्या बंगल्यात गेली होतीस ?" शुभीला गप्प बसवेना.

"काय कायै ग तिथं ?" सुमीपण ऐकायला उत्सुक होती.

आक्कीनं दोघींकडे आळीपाळीनं रोखून पाहिलं.

"आक्के तू काय केलंस गं तिथं जावून ? अत्तराच्या कुप्या आणल्या असशील ना? अं?"

"आणल्या ! मग ?" आक्की.

दोघींनीही तिला खूपच गोडीत घेतलं. कारण त्यांना माहीत होतं, मिन्याचा बंगला बघायला मिळाला तर तो फक्त आक्कीमुळेच मिळणार होता आणि दोघींना बंगला दाखवायला म्हणून आक्की तिथे गेली तर तिला परत अत्तराची कुपी मिळेल हे त्यांनी आक्कीला खूपच गोडीत पटवून दिलं. अत्तराच्या कुपीचं आमीष ऐकून आक्की हुरळली. तिला अत्तराचं वेड मिन्यानच

लावलं होत. सुमी-शुभीला उदबत्तीचा वास हा एकच चांगला वास म्हणून माहीत होतं. अत्तर बित्तर वापरायला त्या बऱ्याच उशिरा शिकल्या. त्यांना कंबर बारीक

करायच्या पट्ट्याचं आकर्षण होतं तर आक्कीला अत्तराचं. आक्कीची आवड त्यांच्यापेक्षा वेगळी असणं साहजिकच होतं. त्यांच्यापेक्षा आक्की मोठी होती. एव्हाना तिला पदर आला होता.

त्याच दिवशी दुपारी आक्कीनं दोघींना हाक मारली. कधी नव्हे ते त्या दोघी आक्कीच्या पहिल्या हाकेला धावून गेल्या. आक्की बऱ्यापैकी तयार झाली होती.

स्वयंपाकघराच्या मागच्या बाजूने येऊन मिन्या पण त्यांच्या बरोबरीने चालू लागला. आबांच्या मळ्याची हद्द संपली की रामभाऊंचं शेत लागत होतं. तिथं ज्वारीची उंच ताटं उभी होती.

"पोरी व्हो. त्या शेताच्या पल्याड त्यो बंगला दिसतूय नव्हं ? त्योच त्यो. तुमी जवारीची ताटं खावा तवर मी आन आक्की बंगल्यापोत्तर जातो, बंगला उघिडतो न मंग तुमास्नी हाळी घालतो. हाळी ऐकल्याबिगर इऊ नका काय ? नै त कमरपट्टा मिळायचा नै..... हां !" मिन्यानं दम दिला.

"पण आपण सगळेच जाऊ या की...." शुभी.

"आन् येवढ्यानला जाताना कुनी बघितलं मंग ?"

"मग आक्की राहू दे की आमच्याबरोबर." परत शुभीचा आग्रह.

"नगं, नगं, तीन तिघाडा न काम बिघाडा हुईल.”

"बरं बरं."

दोघी चटकन म्हणाल्या, कंबरपट्टा असा हाताशी नव्हे कमरेशी आलेला होता. तो दोघींपैकी कुणालाच कुठल्याच अडथळ्यामुळे गमवायचा नव्हता. दोघी मग उत्सुकतेने त्या पट्ट्याविषयी बोलत राहिल्या. पण किती वेळ बोलणार तेच ते.

भोवती ज्वारीची रसरशीत ताटं पाहून त्यांना स्वस्थ बसवेना. एकीकडे ताट उपटून चोखत असताना कान मात्र मिन्याच्या हाकेकडे होते. एव्हाना तो पोहचला असेल. रामभाऊंचं शेत कुठे संपतं हे दोघींनाही माहीत नव्हतं. पण कुठेही संपत असलं तरी आंधळ्या मिन्याला तेवढे अंतर कापायला एवढा वेळ लागायला नको होता. मिन्यानं

दुरून दाखवलेला तो लाकडी बंगला अगदीच काही दूर नव्हता. दोघी बेचैन झाल्या. शुभी आधीच उतावीळ. म्हणाली, "चल गं, आपण जाऊ शेतातून वाट काढत, मिन्याची हाक आली की आणखी लवकर पोहचता येईल. उगीच उशीर व्हायला नको."

सुमीला पटलं. दोघी एकमेकींचे हात धरून शेतातून लपत छपत वाट काढत हलक्या पावलांनी जाऊ लागल्या. भर दुपारी त्यांना असं दुसऱ्यांच्या शेतात भटकताना पाहून कुणी आबांना सांगितलं असतं तर आपली धडगत नाही म्हणून दोघींच्याही मनात धाकधूक होती.

तेवढ्यात डावीकडे सळसळ झाली. दोघींनी दचकून पाहिलं.

मिन्या आणि आक्की ?

इथेच ?

मघाशी तर आक्की नीटनेटक्या कपड्यात होती. आता अशी कशी ?

मिन्याचा उरलेला एक डोळा आणखीनच केविलवाणा झाला होता. आक्कीचे डोळे घाबरले होते. सुमी शुभीनं एकमेकींकडे पाहिलं. दुसऱ्याच क्षणी अत्तराच्या कुपीचा अर्थ त्यांना कळला आणि म्हटलं तर नीटसा कळलाही नाही. दोघींची छाती धडधडू लागली. भूत पाठीमागे लागल्यासारख्या त्या वाट मिळेल तिथून घराकडे धावल्या.

"काय ग पोरींनो, कुठं हुंदडता भर दुपारी ?"

हातात काठी घेऊन मागच्या दारातच उभ्या असलेल्या आबांना बघून तर दोघींचीही वाचाच गेली !

"बोलत का नाही ?" आबा गरजले.

"आबा... मिन्या... आक्की..."

"कुठे आहेत ?"

"रामभाऊंच्या शेतात..."

आबा पुढे काय करणार आहेत याची वाट न बघता धापा टाकत दोघी जीव मुठीत घेऊन आत पळाल्या.

मग दोनेक दिवसातच सगळ्या नातवंडांची रवानगी आपापल्या घरी झाली. खरं म्हणजे सुट्टी संपेपर्यंत दरवेळी सगळी इथे राहत. यंदा एवढ्या लवकर आबा आपल्याला का पाठवताहेत हे कुणालाच कळेना. आजी आणि आबांना विचारावं तर त्यांचे गंभीर चेहरे पाहून कुणाची हिंमतच झाली नाही. आक्कीला थोरले मामा स्वतः येऊन घेऊन गेले. त्यानंतर सगळी भावंडं आजी आबांकडे एकत्र अशी भेटलीच नाहीत. ती सगळी मजाच संपली. सुमीला तर कितीदा नगरला जावसं वाटे पण या ना त्या कारणानं बाबा जाऊ द्यायचे नाहीत. पुढे आजी आणि आबा वारल्यानंतर मामांनी तो मळा विकून टाकला. किती रडली होती सुमा तेव्हा !

आज अठरा वर्षांनी परत नगरमध्ये येऊन बालपणाच्या खुणा शोधायला सुमा अधीर झालीय. पहाटे मोकळ्या हवेत फिरायला म्हणून आबा सर्वांना घेऊन जायचे. रस्त्याच्या दोन्ही कडेला असलेल्या दगडी पुलांवर धावत जाऊन मुलं बूड टेकायचा प्रयत्न करीत. आता किती ठेंगणे वाटताहेत हे पूल. आणखी थोडं पुढे गेलं की टेकडी लागायची. तिच्यावर चढताना काय दमछाम व्हायची. पण चढण्याशिवाय गत्यंतर नसायचं. टेकडीच्या एका बाजूला मुलं आणि दुसऱ्या बाजूला मुली अशा थाटात त्या टेकडीवर प्रात:र्विधी पार पडे. सुमाला ती टेकडी कुठेच दिसली नाही. तिच्या जागी आता टुमदार घरं तयार झाली होती. डावीकडून वळून पुढे गेलं की आलं गोपाळकाकांचं दुकान. गोपाळकाका आबांचे जवळचे मित्र. त्यांच्या मुलांनी दुकान चांगलं वाढवलेलं सुमाला दिसलं. दुकानाबाहेर धान्याच्या गोण्यांशेजारी आरामखुर्चीत बसलेले गोपाळकाका बरेच म्हातारे दिसत होते. सुमानं त्यांना नमस्कार केला. "मी सुमी, आबांची नात."

गोपाळकाकांच्या सुरकुतल्या चेहऱ्यावरचं प्रश्नचिन्ह अजून पुरं मिटलं नसल्याचं पाहून सुमानं मोठ्यानं आपण कोण ते पुन्हा एकदा सांगितलं. बहुधा त्यांना ऐकू गेलं असावं. मोठ्या आनंदाने ते म्हणाले, "या ऽ या ऽ बसा."

सुमी परकरात होती तेव्हाही गोपाळकाका तिला अहो-जाहो म्हणायचे. तिलाच नाही तर आबांच्या सगळ्या नातवंडांना.

"आबा म्हणजे देवमाणूस. खूप उपकार होते त्यांचे आमच्यावर.... आता आल्यासारखी रहा चाराठ दिवस. आबा नाहीत पण आम्ही आहोत. जावई कुठे आहेत? अन मुलंबाळंही दिसत नाहीत बरोबर ? सामान... ?

"हे ऑफिसच्या कामासाठी आलेत. मुलांना मामाकडे ठेवलंय. मला तुम्हा सगळ्यांना भेटायची आणि आजोळ पुन्हा एकदा बघायची इच्छा होती म्हणून मी मुद्दाम आले.."

"झालं पाहून ? भेटले का सगळे ?"

“हो. पाहून झालं सगळं. पण भेटायला फारसे कुणी उरलेच नाहीत ओळखीचे."

बोलता बोलता अचानक सुमीला मिन्याची आठवण झाली.

"गोपाळकाका, तो मिन्या आठवतो तुम्हाला ? तो आंधळा मिन्या ? आबांकडे असायचा?"

"तो......? तो काय त्या पारावर बसून भीक मागतोय."


सुमीच्या डोळ्यांपुढे छान छान गोष्टी सांगणारा मिन्या येतो. ज्याचा हेवा वाटावा असा खोलीभर खेळणी असलेला, हवी ती वस्तू फुक्कट देणारा. कधी न पाहिलेला मिन्याचा बंगला येतो..... कंबर बारीक करायचा पट्टा आठवतो.. आणि.. आणि.. रामभाऊंच्या शेतातून वाऱ्याच्या झुळकेसरशी अठरा वर्षांपूर्वीचा अत्तराचा घमघमाट दरवळतो.... पारावरच्या, पाठमोऱ्या मिन्याचा लाकडी बंगला वाळवीनं कधीच पोखरलेला असतो...

# "ख्रिस्तायन ८५ वर्षांचे झाले!"

**■ मुक्ता अशोक टिळक, नाशिक.**

रविवार दिनांक १० फेब्रुवारी १८९५ रोजी मुंबईच्या भायखळा येथील चर्चमध्ये नारायण वामन टिळक (माझे पणजोबा) यांनी बाप्तिस्मा घेतला. याला ते 'ख्रिस्तांगीकार' म्हणत. ते पुढे म्हणतात, "कोणतेही कार्य एकदम होत नाही. ईश्वर आपल्या विशिष्ट कार्यार्थ मूर्तीपूजकासही सद्गुण देऊन साधनीभूत करून घेतो. देवाने मला आपणाजवळ ओढून घेतले. आज मी देवापुढे ख्रिस्ताचा हात धरून लहान बाळाप्रमाणे उभा आहे."





ॲड.देवदत्त नारायण टिळक.

पणजोबांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला. पण त्यांची भक्तीशैली अभंग-गायन, भजन-कीर्तन सारे काही टाळ, चिपळ्या, मृदंग घेऊन पौर्वात्यच राहिली. ते उत्तम कीर्तनकार होते. त्यांनी आपल्या कित्येक विद्यार्थ्यांना कीर्तनाचे धडे दिले होते. लक्ष्मीबाई (माझ्या पणजीबाई) गावोगाव कीर्तनाचे दौरे करीत असत. रामायणाच्या धर्तीवर 'ख्रिस्तायन' लिहावे असा त्यांचा मनोदय १९०९ पासून होता.

जसे रामायणाचे निरूपण होते, कथा-प्रवचने होतात, पठण-पारायण होते तसेच 'ख्रिस्तायन' महाकाव्याचे केले जावे असा त्यांचा उद्देश होता. प्रवाही ओवीबद्ध कथा-कहाण्या एकाने वाचायच्या आणि इतरांनी श्रद्धेने त्या ऐकायच्या. ही पध्दती सामुदायिक भक्तीला अनुरूप आहे. ख्रिस्ती उपासनेला पौर्वात्य रूप देण्याच्या पणजोबांच्या अनेकविध प्रयत्नातील 'ख्रिस्तायन महाकाव्य' हा एक मोठा प्रयोग म्हणता येईल.

राहुरीसारख्या शांत आणि निर्वेध वातावरणात हे लिखाण नक्की पूर्ण होईल अशी त्यांना खात्री होती. पण तसे घडले नाही ! डॉ. ह्यूम यांच्या सूचनेवरून ते या कामासाठी साताऱ्याला गेले. त्यांच्या घरावर 'ख्रिस्तायनाश्रम' अशी पाटी झळकू लागली. लेखनिकही मिळाला. पण 'देवाचा दरबार' आणि 'डेक्कन रयत संस्था' यांच्या रगाड्यात 'ख्रिस्तायना'ची ओढाताण होऊ लागली.

पणजीबाई म्हणत, “ज्या कामासाठी आपण इथे आलोत, ते काही होतच नाहीये!” त्यांचे लिखाण मंद गतीने चालू होते. ११व्या अध्यायाच्या सुमारे १४६० ओव्या लिहून झाल्या होत्या. ते म्हणत, "माझ्या मागे हे काम माझी मुलगी पूर्ण करेल." दुर्दैवाने पणजोबांचा पोटदुखीचा जुना आजार बळावला आणि ९ मे १९१९ रोजी त्यांना देवाज्ञा झाली. त्यांच्या हयातीत अपुरे 'ख्रिस्तायन' पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाले होते.

१९३० साली मुलीचे लग्न झाले. त्यावेळी पणजीबाईंचे लक्ष 'ख्रिस्तायना'कडे गेले. त्या म्हणतात, "मनाचा धडा केला. आता जीव जावो अथवा राहो. 'ख्रिस्तायन' पुरे करायचे. गुडघे टेकले, प्रार्थना केली. देवाला वचन दिले, "जे होईल ते होवो. मी आजपासून कविता करणे, पत्रे लिहिणे, इतर वाचन, भेटी-गाठी, शरीराचे आजारपण, मुलांची काळजी, वायफळ गोष्टी किंवा स्मृतिचित्रे लेखन काही काही करणार नाही.

देवा, हा बघ टाक हाती घेत आहे. तुला हवे तर तू आपल्या गौरवाकरिता करून घे. नाही तर माझा अंत ह्यातच होऊ दे." मी प्रार्थना करून टिळकांनी जे 'ख्रिस्तायन' लिहिले होते व त्यांच्या मागे दत्तूने जे साडेदहा अध्याय छापले होते ते वाचण्यास घेतले. त्यांचा राहिलेला ११वा अध्याय मी पुरा केला."

त्या दिवसापासून पणजीबाई स्वतःला खोलीत बंद करून घेत. दुपारी बाहेर पडत. मग पुन्हा अंधार पडेपर्यंत खोलीत बंद !

सुमारे शतकापूर्वी 'ख्रिस्तायन' लेखनाची सुरुवात झाली. तेव्हाची मराठी भाषा - लेखन, जोडाक्षरे, उच्चारण हे सारे आज आपल्याला एक अनुभव देऊन जातात. पणजोबा मुळातच तैलबुद्धीचे ज्ञानवंत कवी होते. त्यांची भाषा संस्कृतप्रचुर अलंकारिक असूनही ओघवती-सरल. पणजीबाई जाणत्या वयात लिहा-वाचायला शिकल्या. साधी-सोपी, घरगुती अशी त्यांची प्रवाही भाषा. दोघांची दोन टोके. भावना मात्र एकच - ख्रिस्तावर अनिवार भक्ती आणि प्रेम.

ख्रिस्ताच्या अद्भुत जीवन चरित्राचे लेखन पणजीबाईंनी आपले जीवित कार्य मानले. त्यांना आपल्या धर्मांतराचे प्रयोजन कळाले. त्या म्हणतात, "देवाने मला आपल्या जवळ घेतले कारण त्याला माझ्याकडून 'ख्रिस्तायना'ची पूर्तता करून घ्यायची होती. पणजीबाईंच्या लेखनात भावनेचा ओलावा आहे. त्यांनी स्वतः स्वयंस्फूर्तीने ख्रिस्तचरित्राचा आणि त्याच्या तत्त्वज्ञानाचा कसून अभ्यास केला होता. धर्मांतर करताना त्यांच्या मनाची जी तळमळ झाली होती ती त्या त्या क्षणाला नीट पारखून घेतली होती. त्यामुळे आपण ज्या गोष्टी करीत आहोत त्या एका विशिष्ट ध्येयानुरूप करीत आहोत असा त्यांचा आत्मविश्वास होता.

पणजोबांनी लिहिलेल्या 'मंगल', 'आत्मनिवेदन' आणि 'आश्वासन' या प्रारंभीच्या तीन अध्यायांमधे कविचे परमेश्वराला वंदन, स्वतःची दुर्बलता आणि परमेश्वर पित्याने भक्ताला दिलेली आश्वासने या गोष्टी आहेत. ४थ्या 'जन्म' या अध्यायात येशूजन्माचा इतिहास, ६०० वर्षांपूर्वी त्याविषयी संदेष्ट्यांनी केलेली भाकिते, भविष्यकथन इथपासून प्रारंभ होतो.

११व्या अध्यायाच्या १०६ ओव्या पणजोबांनी लिहिल्या. नंतरच्या ७५व्या अध्यायातील येशूच्या पुनरुत्थानापर्यंतचे लेखन पणजीबाईंनी केले. हेरोद, बारा शिष्य, योहानाचा शिरच्छेद, शिष्यांचे गर्वहरण, लाजार, यहुदा विश्वासघात, पिलात न्यायसभा, शासन, क्रूसखांबभार, सात उद्गार, प्राणोत्क्रमण व पुनरुत्थान हे अध्याय डोळ्यात पाणी आणतात. त्यांनी मानवी स्वभावाचे बारकाईने केलेले निरीक्षण आणि अभ्यास स्पष्ट जाणवतो. आपल्याकडे पित्याने सोपविलेले कार्य आपण पूर्ण केले आहे, याचे समाधान त्यांना मिळाले. आणि अवघ्या दोन महिन्यातच त्यांना पित्याचे बोलावणे आले. फक्त पाच वर्षांत साठी उलटून गेलेल्या पणजीबाईंनी ८३७६ ओव्या लिहिल्या त्या देवाच्या गौरवासाठीच !

पुनरुत्थानानंतर ख्रिस्ताने शिष्यांना आणि इतर लोकांना दर्शन दिले. या महान घटनेचे वर्णन शेवटच्या ७६व्या अध्यायात देवदत्त नारायण टिळकांनी (माझे आजोबा) केले आहे. प्रसिद्ध साहित्यिक कवी गिरीश - शंकर केशव कानेटकर (नाटककार वसंत कानेटकर यांचे वडील) यांच्या सूचनेवरून 'प्रभूदर्शन' या समारोपात्मक अध्यायाचे लेखन झाले आणि १५ डिसेंबर १९३८ रोजी 'संपूर्ण ख्रिस्तायन खंडकाव्य' ग्रंथ रूपाने प्रकाशित झाले.

देवदत्त टिळकांनी आपल्या माता-पित्याच्या कार्याला पूर्णत्व दिले. त्यांच्या कथनाचा ओघ, भाषा सौष्ठव, धार्मिक भावनेचा ओलावा आणि माता-पित्यांबद्दलचा आदर लेखनात स्पष्ट दिसतो. 'ख्रिस्तायन' तीन कवींनी लिहिले आहे. म्हणून कवी गिरीश याला 'त्रिवेणी संगम' म्हणतात.

'ख्रिस्तायना'तील ९वा अध्याय 'समीक्षक' हा विशेष महत्त्वाचा मानला जातो. कारण समीक्षकाच्या निमित्ताने पणजोबांनी ख्रिस्ताकडे जाणारी आपली स्वतःची वाटचाल अतिशय प्रभावीपणे वर्णन केली आहे. अशोक देवदत्त टिळक (माझे वडील) यांनी हा अध्याय विशेष स्पष्टीकरण देऊन प्रसिद्ध केला आहे. अयन म्हणजे जाणे, प्रवास. ख्रिस्तायन म्हणजे ख्रिस्ताकडे जाणे!!



खिस्ताने अलौकिक प्रेम आणि स्वार्थत्यागाने जगाचे कल्याण केले. अशा एका श्रेष्ठ प्रेषिताचे चरित्र रेखाटताना भावनिक उदात्तता अबाधित रहावी म्हणून पणजोबांनी योजलेले 'ख्रिस्तायन' हे शीर्षक काव्यमय आहे!

पणजीबाईंच्या लेखनातील 'पुनरुत्थान' या ७५ व्या अध्यायातील शेवटची ओवी अशी.....

"पुनरुत्थान अध्याय ।
ख्रिस्त कृपे पूर्ण होय ।
ख्रिस्तचरणी तरणोपाय ।
करा जय जय घोष मुदा ॥१३१॥

आणि ख्रिस्तायनातील 'प्रभुदर्शन' या अंतिम अध्यायात देवदत्त टिळक लिहितात....

"ख्रिस्ताब्द एकोणीसशें आडतिस ।
जयंतीचा ये जवळ दिवस I
महाकाव्य यें तों पूर्णत्वास ।
करा जयघोष प्रभूचा ॥११६॥"

अर्धशतकापूर्वीची गोष्ट, अहमदनगर मधील एक शिक्षिका आपल्या गोड आवाजात येशूच्या पुनरुत्थानदिनी भल्या पहाटे उपासनेप्रसंगी ख्रिस्तायनातील 'पुनरुत्थान' हा अध्याय सर्व भक्तांसाठी वाचीत असत. काही वर्षांपूर्वी पुणे येथील रेव्ह. प्र. कों तेलोरे गावोगाव जाऊन संपूर्ण ख्रिस्तायनाचे निरूपण करीत असत.

आजही सोलापूर येथील एका कुटुंबामध्ये ख्रिस्तायनातील काही अध्यायांचे सामूहिक पठण होत असते. यामध्ये एकूण चार पिढ्यांचा सहभाग असतो.

अहमदनगर ही रेव्ह. नारायण वामन आणि लक्ष्मीबाई टिळकांची कर्मभूमी. येथील 'कोकऱ्याची मंडळी' या चर्चने ख्रिस्तायनाचे अखंड वाचन सलग चार दिवसांसाठी आयोजित केले होते. समारोप १० फेब्रुवारी २०१५ या दिवशी झाला.

दिनविशेष असा की यादिवशी पणजोबांच्या 'ख्रिस्तांगीकारा'ला १२० वर्षे पूर्ण झाली. या पठणात मुक्ता अशोक टिळक, विद्यागौरी नारायण टिळक या दोन पणतींसह अनेक ख्रिस्ती आणि ख्रिस्तीतर बंधू भगिनींचा सहभाग होता.

आपण असे उपक्रम हाती घेऊन 'ख्रिस्तायन' आणि त्याचे तीन कर्ते यांचे स्मरण करूया.



# गिधाडे

■ **जोसेफ तुस्कानो, बोरीवली**

तब्बल वीस दिवसांचा दौरा आटोपून न्यायेश परतला होता. 'मोबाईल लॅब'चा टूर म्हणजे मानसिक आणि शारीरिक थकवा ठरलेलाच. या दौऱ्यात दिलेले टार्गेट पुरे करताना खूप धावपळ व्हायची. दिवसाला चार ते पाच पेट्रोलपंपांना भेटी देऊन त्यांच्याकडील साठवलेल्या मालाचे नमुने काढून तपासावे लागत. वेगवेगळ्या प्रकारची कागदपत्रे पूर्ण करावी लागत. त्यातच कित्येकदा सॅम्पलमध्ये गडबड आढळली, तर 'रिपिट सॅम्पल' काढून पुन्हा त्याचे विश्लेषण करावे लागे. पेट्रोलपंपावरील लोकांनी असहकार केलाच, तर तणाव निर्माण होई. सगळी परिस्थिती कौशल्याने हाताळण्यास अधिकारपदाची कसोटी लागे. रात्री उशिरापर्यंत काम चालू ठेवावे लागे. त्यातच दिवसभर मोबाईल व्हॅनमधून प्रवास करावा लागायचा. त्यामुळे कमरेचा काटा पार ढिला होत असे. इतर कुणी अधिकारी असता, तर त्याने एक-दोन दिवस मस्तपैकी विश्रांती घेऊन तो कामावर हजर झाला असता.

पण न्यायेशचे वेगळे होते. आपल्या अधिकारपदाच्या जबाबदारीला तो खूप जपत असे. कामाचा बोजा तत्परतेने हातावेगळा करण्यात त्याची ख्याती होती. टूरचा रिपोर्ट त्याने आदल्या रात्री झोपण्याआधीच लिहून तयार ठेवला होता. तसा या वेळेचा दौरा जरा सनसनाटी झाला होता. टूरवरून परत येताना घाटाजवळील एका पेट्रोलपंपावर त्याने अचानक धाड घातली होती. 'लक्ष्मी ऑटो सर्व्हिस'ची कुख्याती त्याच्या कानावर केव्हापासूनच आलेली होती. तेल कंपनीच्या ऑफिसरला 'मोबाईल लॅब' घेऊन अचानक पंपावर आलेला पाहताच 'लक्ष्मी

ऑटो' पंपाचा मॅनेजर पार गडबडला. त्यातच न्यायेशने आपली ओळख दाखवताच त्याची पार बोबडीच वळली. कारण एव्हाना न्यायेशनामे कंपनीच्या कडक ऑफिसरचे नाव पंपवाल्यांमध्ये 'बदनाम' होऊन गेले होते. न्यायेशने आपली मोबाईल व्हॅन पेट्रोलपंपाच्या आत घेतली.

पेट्रोलपंपावर विकल्या जाणाऱ्या पेट्रोल व डिझेल या इंधनांमध्ये भेसळ होत नाही ना, यावर लक्ष ठेवण्यासाठी तपासणी उपकरणांनी युक्त अशा मोबाईल लॅबचे वाहन तयार करण्यात आले होते. पेट्रोलपंपांना सरप्राईज व्हिजिट देऊन तिथे साठविलेल्या मालाचा ऑन दी स्पॉट तपास करण्यात येई. कंपनीचा क्वालिटी कंट्रोल ऑफिसर म्हणून हा विज्ञानरथ घेऊन न्यायेशला अधूनमधून दौऱ्यावर जावे लागे. त्याच्या प्रवासाचा मार्ग गुप्त असे व दौऱ्यावरील कामाबाबत फारसं कुणाला माहिती होत नसे. 'लक्ष्मी ऑटो वरील टाक्यांतून पेट्रोल व डिझेलचे नमुने काढून त्यानं लॅबमध्ये आणले. घामाघूम झालेला मॅनेजर त्याच्या मागोमाग 'हांजी हांजी' करीत फिरत होता. पेट्रोल व डिझेलचे प्रत्येकी तीन नमुने काढून घेतले गेले होते. न्यायेशने प्रथम ते नमुने बाटल्यांत सीलबंद केले. बाटल्यांवर लेवले लावली. त्यावर स्वतः सही केली व मॅनेजरचीसुद्धा स्वाक्षरी घेतली. पेट्रोल व डिझेलचा एकेक नमुना पेट्रोलपंपाच्या मॅनेजरच्या हवाली केला. दुसरे दोन, मोबाईल लॅबमधील लॉकरमध्ये सुरक्षित ठेवले. उरलेली तिसरी नमुन्यांची जोडी तत्काळ लॅबमध्ये तपासणीसाठी घेतली.

त्या व्हॅनमधील उपकरणांवर ते पेट्रोल-डिझेलचे नमुने तपासले, तेव्हा त्याचा होरा खरा ठरला होता. दोहोंमध्ये केरोसिनची भेसळ असल्यामुळे ते नमुने प्रयोगशाळेच्या परीक्षणात फेल झाले होते. न्यायेशने भराभर टेस्ट रिपोर्ट्स तयार केले. त्यावरदेखील मॅनेजरची सही घेतली. रिपोर्टची एक प्रत मॅनेजरला दिली. त्यानंतर तपासणीसाठी काढलेल्या नमुन्याचे पैसे मॅनेजरला देऊ लागला. मॅनेजर त्याच्याकडून तीन लिटर पेट्रोल व तीन लिटर डिझेलचे पैसे घ्यायला तयार नव्हता.

"आप तो कंपनी के साहब है। आपल्याकडून कसले पैसे घ्यायचे?” तो अजिजीने म्हणाला.

“देखो भाय," न्यायेशने त्याला सुनावले, "हे पैसे मी माझ्या खिशातले भरत नाही. कंपनीच्या कामासाठी कंपनीनेच दिलेले हे पैसे आहेत. मुकाट्याने पैसे घ्या नि मला बिलाची पावती द्या." त्या मॅनेजरने खूप गयावया केले, बाबापुता करून बघितले, पण न्यायेशवर ढिम्म परिणाम झाला नाही.

पावती घेऊन झाल्यावर त्याने मॅनेजरला पेट्रोल-डिझेलची विक्री बंद करण्याची तोंडी ऑर्डर दिली. ऑफिसला पोचल्यावर पंपमालकाला पेट्रोलपंप बंद करण्याबाबत लेखी ऑर्डर देण्यात येणार होती. मग तो व्हॅनमध्ये बसला आणि ती मोबाईल लॅब शहराच्या दिशेने निघाली. शहर जवळ येत असताना गाडीत वाचनात मग्न असलेल्या न्यायेशला व्हॅनच्या ड्रायव्हरने खूण केली.

"साहेब, ती लाल मारुती बघा, गेली पाच-दहा मिनिटे एकसारखी आपल्या व्हॅनच्या समोर येतेय. आता तर त्यातला माणूस हात करतोय. आपली गाडी थांबवायला सांगतोय, काय करू?"

"गाडी बाजूला घे नि थांबव" न्यायेश म्हणाला. मोबाईल व्हॅन थांबताच, त्या लाल मारुतीतून परेशभाई बाहेर आला. 'लक्ष्मी ऑटो'चा हा मालक मागे एकदा एका 'डीलर्स मीटिंग’ मध्ये दिसला होता.

"साब, आप एकदम नाराज हो गये। आमचा मॅनेजर एकदम बेवकूफ आहे," तो आल्या आल्या म्हणाला. "मॅनेजरनं काय बेवकुफी केली?" न्यायेशने विचारले. "साब, तुम्ही इतके लांबून शहरातून आमच्याकडे आलात, तेव्हा त्यानं लगेच मला बोलावून घ्यायला पाहिजे होतं. तुमची सेवा करण्याची संधी आम्हाला कुठे मिळते?"

"पण परेशभाई, त्याची काही गरज नव्हती; नाही तर मीच तुम्हाला बोलावून घेतलं असतं," न्यायेशने स्पष्ट केले.

"असं कसं साब, आपण तर घुस्सा केलात नि पंप बंद ठेवण्याचा आदेश दिलात!" परेशभाय पाणी जोखत होता.

"हे बघा, मी माझं काम केलं. त्यासाठी कंपनी मला पगार देते." न्यायेशवर कुठलाच परिणाम होत नव्हता.

"पण साब, गेली तीस वर्ष कंपनीची एजन्सी आमच्या फॅमिलीकडे आहे. अन् तुम्ही पंप बंद करीत आहात. तशा माझ्या कंपनीत वरपर्यंत ओळखी आहेत; पण म्हटलं, आपली पण जानपहचान होईल. संबंध वाढतील." परेशभायने खड़ा टाकून बघितला. पण त्याचे हे बोलणे ऐकून न्यायेशचे डोके सणकले.

"मि. परेश, माझ्या वरिष्ठांचे संदर्भ देऊन तुम्ही माझ्यावर दबाव आणू शकणार नाही. दुसरे म्हणजे मला तुमची मैत्री मुळीच नकोय. मी काही वेळापूर्वी घाटावरून उतरलो. वाटेत अपघात झालेले ट्रक नि गाड्या पाहिल्या. तुम्ही लोक इंधनात भेसळ करून लोकांच्या जिवाशी खेळता. तुम्हाला भेसळ केलेला माल विकता येणार नाही व या गुन्ह्याची शिक्षा होणं आवश्यक आहे," न्यायेशच्या आवाजाला धार आली, तसा परेशभायचा धीर खचत गेला. त्याने गयावया करून पाहिले, पण न्यायेशने त्याला चक्क निघून जायला सांगितले.

"साब, असं नका करू. हे आता घ्या." त्याने नोटांची काही पुडकी काढून न्यायेशसमोर धरली. "बाकीचा हिशेब नंतर करू."

आता मात्र हद्द झाली.

"मि. परेश, गेट लॉस्ट फ्रॉम माय लॅब," न्यायेश जवळजवळ ओरडलाच व त्याने ड्रायव्हरला व्हॅन चालू करण्याचा इशारा दिला.

ऑफिसला पोचताच तो बॉसच्या केबिनमध्ये गेला. त्याचा बॉस त्या प्रचंड प्लान्टचा मॅनेजर होता. त्यांच्या तेल कंपनीचा तो एक स्टोरेज पॉइंट होता. रिफायनरीतून पाईपद्वारा येणारा माल तिथून वॅगनमधून नि टॅंक-लॉऱ्यांतून इतर

डेपोंना पुरविला जायचा. खूप मोठी उलाढाल चालायची. त्यामुळे कामकाजाशी निगडित असलेली निरनिराळी खाती त्या प्लान्टच्या कॅम्पसमध्येच उभारण्यात आली होती. अन् न्यायेशने आपला टूर रिपोर्ट बॉससमोर ठेवला, नि थोडक्यात 'लक्ष्मी ऑटो’ ची घटना कथन केली.

"वेल डन माय बॉय! धिस इज अ फेदर इन अवर कॅप' अशा शाबासकीची त्यांच्याकडून अपेक्षा होती. पण मॅनेजर आधीच काहीसे अपसेट झालेले दिसत होते; जणू त्यांना तो रिपोर्ट आधीच समजलेला होता.

"सर, हा रिपोर्ट आपण त्वरित जी. एम.कडे पाठवू या. त्या 'लक्ष्मी ऑटो' ची एजन्सी ताबडतोब रद्द केल्याची लेखी ऑर्डर इश्यू व्हायला हवी," न्यायेश म्हणाला.

“पण न्यायेश, हा परेशभाई खूप पोचलेला माणूस आहे. त्यातच तो आपल्या जी. एम. साहेबांचा खूप जुना मित्र आहे."

“सर, मी त्याला रंगेहाथ पकडलाय. तो राजरोसपणे भेसळीचा गुन्हा करतोय, तिथं दुर्लक्ष करून कसं चालेल? इथं मैत्रीचा संबंध येतो कुठं?" पण त्याचे मॅनेजर फारसं काही बोलले नाहीत. मला एक अर्जंट काम आहे, असं सांगून त्यांनी न्यायेशची बोळवण केली. मात्र दुपारी लंच टेबलवर मॅनेजरने त्याला जी. एम.चा निरोप दिला. जी. एम. नी न्यायेशला भेटायला बोलावले होते.

जी. एम.च्या भेटीसाठी त्याला हेड ऑफिसमध्ये जावे लागले. आपण त्यांना ही केस पटवून देऊ, असे न्यायेशला वाटत होते. पण जी. एम.च्या केबिनबाहेर प्रतीक्षा करीत बसलेला असताना त्याला 'लक्ष्मी ऑटो'चा मालक परेशभाई स्मित करीत बाहेर पडताना दिसला. त्याने सोफ्यावर वर्तमानपत्र चाळत बसलेल्या न्यायेशकडे ढुंकूनही पाहिले नाही. क्षणभर न्यायेशच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. आपल्या हातापाया पडायला निघालेला परेशभाई तो हाच ना?

"कम इन यंग मॅन" जी. एम. नी त्याचे स्वागत केले.

"सर, आपण मला बोलावलंत!"

"हो, त्या 'लक्ष्मी ऑटो' पेट्रोलपंपाविषयी बोलायचं होतं. तो आपला जुनापुराणा डीलर आहे. डीलर्स आर अवर ब्रेड-विनर्स, यू नो? तेव्हा या केसचा सहानुभूतीपूर्वक विचार केलेला बरा. काय म्हणतोय मी?" जी. एम. ने एका दमात सांगून टाकले.

"पण सर, हा परेशभाई चांगल्या मालात केरोसिनची भेसळ करून पैसा कमावतो. घाटावरून जाणाऱ्या येणाऱ्या गाड्यांना अपघात होतात, निष्पाप माणसं मरतात, त्याला हादेखील कारणीभूत ठरतो असं नाही वाटत तुम्हाला?" न्यायेशने आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केला.

"यंग मॅन, आप दिलसे जादा सोचते हो. जरा दिमागसे भी सोचो." जी. एम.ने त्याला पुढे बोलूच दिले नाही. निरुत्तर होऊन न्यायेश परतला होता. परेशभाईच्या ओठावरील स्मिताचा अर्थ त्याला कळून चुकला होता.

तसा न्यायेशला एक दाट संशय होताच. आपण मोबाईल लॅब घेऊन टूरवर जातो, तेव्हा पेट्रोलपंपवाल्यांना आगाऊ सूचना मिळत असाव्यात. कारण ग्राहकांकडून आलेल्या तक्रारीनुसार एखाद्या विभागाला भेट द्यावी, तर तिथे सर्व आलबेल आढळायचे. सॅम्पल पास झाले, तर कुठलीच ॲक्शन घेता येत नसे. अन् या डीलर्सना रंगेहाथ पकडून फायदा तरी काय? आपले वरिष्ठ तर नियम धाब्यावर बसवून त्यांची पाठराखण करीत असतात. स्वतःच्या व्यक्तिगत फायद्यासाठी. मग ज्युनियर लोकांना कोण आवरणार? विचार करता करता न्यायेशच्या डोक्याचा भुगा व्हायची वेळ आली होती.

त्याचा एक ज्युनियर सहकारी गिडवानी दोन वर्षांपूर्वी त्यांच्या क्वालिटी कंट्रोल खात्यात आला होता. खूप गोडगोड बोलायचा नि कुणालाही पटकन मदत करण्यास तत्पर असायचा. मात्र, हिशेबाचा पक्का! कंपनीकडून मिळणाऱ्या विविध सवलतीतून, कुठून चार पैसे जास्त कसे मिळतील, याबाबत टपलेला

असायचा. पण कामात खूप रस घ्यायचा. त्यामुळे सुरुवातीस त्याचे खूप कौतुक झाले. त्याने सगळ्यांचा विश्वास संपादन केला होता. वर्षा-दोन वर्षात त्याने स्वतःची खूप भरभराट केली होती. त्याचा छानछौक नि भरमसाट खर्च करण्याची सवय न्यायेशला संभ्रमात पाडायची. कंपनीने दिलेल्या कारचा तो भन्नाट वापर करायचा नि बिझिनेस पार्ट्यांत जाम झोकायचा... ड्रिंक पार्टीत जरा जास्त झाली, की दोघातिघांचे गट व्हायचे. व्यक्तिगत गोष्टी व्हायच्या. काही मनातले बरळायचे.

न्यायेश बिअरचा एक ग्लास भरून घेई व पार्टी संपेस्तोवर पुरवी. खरं म्हणजे त्याला हा पार्टीचा प्रकार पसंत नसे. पण कंपनीच्या बिझिनेस टॅक्टिसचा तो एक भाग होता. टेक्निकल परिषदा भरविणे, कस्टमरना तांत्रिक बोधामृत पाजणे आणि असल्या कार्यक्रमात त्यांना गिफ्ट देऊन नि पार्ट्या आयोजित करून खूश ठेवणे, हा व्यवसायवृद्धीचा एक नवा मार्ग बनून गेला होता. त्यामुळे या पार्ट्या टाळणे शक्य होत नसे.

"सोमू," तो गिडवानीला पहिल्या नावानेच हाक मारी. त्याच्या डिपार्टमेंटमध्ये तशी पद्धत होती व न्यायेशलादेखील ती आवडायची. कामाच्या व्यापात थोडेसे घरगुती वातावरण तयार व्हायचे.

"हे इतके थाटामाटात राहणं तुला परवडतं कसं?" सोमू गिडवानी दोन वर्षापूर्वी कंपनीत रुजू झाला होता. तो आला होता, तेव्हा त्याची स्थिती यथातथाच होती, हे सर्वांना माहिती होते. पण अगदी दीड-दोन वर्षांत त्याची परिस्थिती लक्षणीय बदलली होती.

"न्यायेशजी, आपण आठ वर्षे कंपनीत आहात. पण मी जे एक-दोन वर्षात करू शकलो, ते तुम्हाला इतक्या वर्षांत जमलं नाही."

"म्हणजे काय?"

"आपली एक साधी पद्धत आहे." गिडवानी सांगू लागला, "कंपनीनं दिलेली कार घेऊन एखाद्या पेट्रोलपंपावर जायचं. आपण क्वालिटी कंट्रोलवाले

असल्यामुळे पंपावरची माणसं आपल्याला ओळखतातच. पेट्रोल भरून झालं की डिकीत ठेवलेला सॅम्पल भरायचा डबा बाहेर काढायचा. त्यात पंपावरचं सॅम्पल भरायचं. ते सर्व पाहून तिथला मॅनेजर टरकून गेलेला असतो. एक तर कॅशियर आपल्याकडून पेट्रोलचे पैसे घेत नाही. उलट मॅनेजर बाबापुता करायला लागतो. दुसऱ्या दिवशी पंपाच्या मालकाला थेट फोन करायचा. तुमच्या पंपावर काल पेट्रोल भरले होते त्यात भेसळ होती. मी वरिष्ठांकडे रिपोर्ट करतोय, एवढं सांगायचं. तो घाबरलेला मालक संध्याकाळी भेट घेतो. नोटांचं एक पुडकं आपल्या खिशात पडतं. मामला खतम!" सोमू गिडवानीचे ते तंत्र ऐकून न्यायेशला बिअर पितापिता उसका लागला नि सोमू आपला तिसरा पेग भरण्यासाठी निघून गेला.

घरी आल्यावर न्यायेशला झोप आलीच नाही. ही आपल्या भोवतालची माणसे अशी का वागतात? जी कंपनी आपल्याला रोजीरोटी देते, औषधपाण्याचा खर्च करते, कारसारखे समाजात प्रतिष्ठा देणारे वाहन देते, भरघोस प्रवासभत्ता आणि इतर सवलती देते, तिच्याशी हे लोक बेइमानी का करतात? यांची पैशाची हाव तरी किती आहे? शिवाय, त्यांना सामाजिक बांधिलकीची काही जाण नाही का ? आपल्या सहकाऱ्याविषयी विचार करीत असताना, तो खूप अस्वस्थ झाला. त्यातच त्याला महिन्यापूर्वीचा प्रसंग आठवला.

त्यांच्या प्रयोगशाळेला लागणाऱ्या एका महत्त्वपूर्ण उपकरणासाठी 'सामग्री विभागा'तर्फे कोटेशन्स मागवली होती. पेट्रोल व डिझेलमुळे वाहनाच्या धुराड्यातून बाहेर पडणाऱ्या वायूमुळे वातावरण प्रदूषित होते. पेट्रोलमधील शिशाचे संयुग आणि डिझेलमधील गंधक, यांच्यामुळे अपायकारक वायू वातावरणात सोडले जातात. हे अत्याधुनिक उपकरण उच्च क्षमतेचे होते व ते पेट्रोलमधील शिशावर आणि डिझेलमधील गंधकाच्या प्रमाणावर नजर ठेवण्याचे काम करणारे होते. तेव्हा, दोन-तीन पार्ट्यांकडून आलेल्या कोटेशनमधून, ज्या पार्टीची ऑफर तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण असेल त्यांनाच ऑर्डर दिली जाणार होती.

अर्थात, 'टेक्निकल इव्हॅल्युएशन'साठी फाइल न्यायेशकडे आली, अन् 'सामग्री विभागा'चा मॅनेजर न्यायेशकडे फेऱ्या मारू लागला. एका विशिष्ट पार्टीच्या पारड्यात झुकते माप टाकावे, म्हणून कंपनीचा तो वरिष्ठ अधिकारी न्यायेशला सुचवत होता. पण न्यायेश आपल्या तत्त्वांशी ठाम राहिला; तेव्हा तो सामग्री विभागाचा मॅनेजर त्याच्यावर खूप नाराज झाला व जातायेता एकप्रकारे डूख धरल्यासारखे वागू लागला होता.

आताशा न्यायेशला वाटू लागले होते, की कंपनीचे डीलर्स, कच्चा माल नि साधनसामग्री पुरविणारे ठेकेदार, मालाची ने-आण करणारे वाहतूक कंत्राटदार यांना वाममार्गास लावण्यास आपलेच लोक कारणीभूत असतात. एखादी टैंकलॉरी माल भरण्यासाठी प्लान्टमध्ये घुसते, तेव्हा तिला गेटमधून जल्दी आत सोडण्यासाठी गेटकीपर पैसे घेतो. भरलेल्या गाडीतल्या मालाचे मोजमाप करणारा गेजर, चलान बनविणारा कारकून नि गाडी गेटबाहेर जाण्यास "ओ.के." देणारा अधिकारी, सगळे 'स्वकमाई'त गुंतलेले असतात. हे त्याला एका टॅकलॉरीच्या मालकाकडून समजले होते... आणि आता नुकताच त्याचा स्वतःच्या वरिष्ठांसंबंधी आलेला अनुभव कटू होता.

तो भलताच अस्वस्थ झाला. आपण एका दृष्ट चक्रव्यूहात सापडलो आहोत, असे त्याला वाटू लागले. विचार करता करता त्याला सोनूची आठवण झाली. त्याच्या मनात एक निर्णय रुजला होता व त्यावर त्याला तिची प्रतिक्रिया हवी होती.

सोनू! त्याची जीवनसर्वस्व होती ती! ती त्याला लाडिकपणे 'निश' म्हणायची. तिने केलेले त्याच्या नावाचे संक्षिप्त रूप त्यालादेखील खूप आवडायचे. विशेषतः तिच्या तोंडची "ए निश" अशी भावुकतेने भरलेली हाक त्याला खुलवायची. तिच्यासारख्या सुंदर मुलीने त्याच्यात काय पाहिले होते, याचा त्याला नेहमी संभ्रम पडत असे. तो रूपाने मुळीच उजवा नव्हता. वागणे अगदी साधे.

एक मोठी अधिकारपदाची जागा मिळूनसुद्धा त्याच्या वागण्याबोलण्यातला नि कपड्यालत्त्यातला साधेपणा तसाच टिकून राहिला होता. मात्र स्वभाव पूर्वीपासूनच जिद्दी नि कलंदर होता. एखादी गोष्ट करायची म्हटले तर तो कुणाची पर्वा करीत नसे. एकदा रोजच्याप्रमाणे तो स्टेशनवर लोकल ट्रेन पकडण्यासाठी आला, तेव्हा फलाटावर एक आदिवासी बाई उभी होती व ती तिच्या पायाशी ठेवलेली लाकडाची मोळी उचलण्यास कुणी हातभार लावील का, या प्रतीक्षेत होती. त्या म्हातारीची अस्वस्थता न्यायेशला जाणवली. लगेच त्याने ऑफिसची ब्रीफकेस जमिनीवर ठेवली व त्या बाईला मोळी उचलून डोक्यावर घेण्यास मदत केली.

नोकरीसाठी शहरात जायला निघालेले त्या प्लॅटफॉर्मवरील तमाम पांढरपेशे लोक चकित होऊन ते पाहत राहिले. ती बिचारी आदिवासी बाईसुद्धा पार अवाक होऊन त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे थोडा वेळ बघत राहिली. तो काही घडलं नाही, या आविर्भावात निघून गेला होता... तिचा स्वभाव अगदी वेगळा होता. तिला नट्टापट्टा करायची खूप हौस होती. रेखीव भुवया, लिपस्टिकने रंगलेले लालचुटूक ओठ, केसांचा उभा भांग नि कपाळावर नक्षीदार टिकली; यामुळे ती गर्द हिरवळीत फुललेल्या गुलाब पुष्पासारखी टवटवीत दिसायची. त्याला सौंदर्याची व संगीताची मनापासून आवड होती. सुंदर माणसाने आपले सौंदर्य आणखीन खुलवावे, असे त्याचे प्रांजळ मत होते. त्यातच तिच्या सौंदर्याला, तिच्या भोळ्या स्वभावाची जोड मिळत होती. ती खळखळत हसायची, तेव्हा एखाद्या निष्पाप बालकासारखी वाटायची. तिच्या स्वभावाचा हा पैलू त्याला सतत भुरळ घालायचा. तिलादेखील त्याचे कर्तृत्व साद घालीत राहायचे. दोघांचे छान जमले होते... त्याने तिला फोन करून चौपाटीवर बोलावून घेतले.

"हे बघ सोनू, मी नोकरी सोडतोय. मी खाजगी क्लास चालवीन, किंवा आणखी एखादी नोकरी बघेन. पण सध्याच्या ठिकाणी माझा जीव गुदमरतोय.

तुला माझा निर्णय आवडणार नाही, कदाचित; पण मी तुझ्यावर कसलंच बंधन घालणार नाही, एवढंच सांगू इच्छितो," तो भडाभडा बोलला.

"ए निश" त्याचा हात कुरवाळीत ती म्हणाली. "वेड्या, तुझी मनःशांती हेच माझं खरं सुख असेल. मी तुझ्या पाठीशी आहे. मीसुद्धा नोकरी करीन. आपण अर्धी भाकरी खाऊन राहू." तिच्या निरागस बोलण्याने त्याला खूप धीर आला. त्यांचे ते भावभरे नि समंजस स्नेहबंध बघून सूर्याने खुदकन स्मित केले नि तो क्षितिजाआड बुडाला.

दुसऱ्या दिवशी आपला राजीनामा घेऊन तो बॉसच्या केबिनमध्ये गेला. प्लान्ट मॅनेजरच्या त्या भव्य केबिनला असलेल्या काचेच्या तावदानातून दूरवर प्लान्टचा सारा पसारा नजरेस पडत होता. केबिनमध्ये बसल्याबसल्या प्लान्टच्या कामकाजाचे विहंगावलोकन करता यावे, म्हणून काचेच्या तावदानाची तजवीज होती. न्यायेशने त्या तावदानातून नजर टाकली. त्याच्या मनात मिश्र भावनांचा कल्लोळ उठला... एकदा स्टाफसोबत शहराबाहेरच्या गावाकडे तो पिकनिकला गेला होता. रस्त्याने त्यांची गाडी जाताना मोकळ्या रस्त्यालागतच्या प्रशस्त उघड्या जागेत एक मेलेले ढोर दिसले होते. आकाशातून एकेक करीत गिधाडे खाली उतरत होती. गिधाडांचा घोळका तिथे त्या मेलेल्या जनावराभोवती जमा झाला . भुकेने वखवखलेले एकेक गिधाड त्या मेलेल्या प्राण्याच्या अंगावर कुठेतरी चोच खुपसायचे नि मांसाचा लचका तोडून घ्यायचे... क्षणभर ते दृश्य न्यायेशच्या रेसमोर तरळले... मग बॉसच्या केबिनमधून बाहेर पडून पायऱ्या उतरत असताना, आपण एक राजहंस आहोत, असा त्याला भास होत गेला......

(कथासंग्रह – **बंध रेशमाचे,** प्रकाशन- जून 2000)

# भारतीय मातीतला ख्रिस्ती धर्म

■ **सायमन मार्टिन, वसई**

**simonmartinn@gmail.com**

**9421549666**

ख्रिस्ती धर्म पहिल्या शतकात भारतात आल्याचे पुरावे आहेत मात्र वसईत सोळाव्या शतकात पोर्तुगीजांनी ख्रिस्ती धर्म आणला. तशी वसई प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. भगवान परशुरामाने निर्माण केलेल्या अपरांत म्हणजे कोकण प्रांताची शुर्पारक म्हणजे सोपारा ही राजधानी होती. भारतामध्ये होऊन गेलेल्या मौर्य, चालुक्य, राष्ट्रकूट, सिलहार व देवगिरीचे यादव अशा प्रमुख राजघराण्यांनी वसईवर राज्य केलेले आहे .बायबल मध्ये सोपारा बंदराचा उल्लेख असून त्याला ओफीर म्हटलेले आहे.एकेकाळी हीच भूमी बौद्ध धर्माचे महत्त्वाचे केंद्र होते. इथल्या मूळ हिंदु असणाऱ्या सामवेदी ब्राह्मण व पानमाळी या दोन मोठ्या समाजाबरोबरच मूळ भूमिपुत्र असणारे विणकर, कोळी, कुंभार, परीट, सुतार, न्हावी, भंडारी, आगरी, कुणबी इत्यादी समाजातील लोकही ख्रिस्ती झाले.

एकदा येशूच्या नावाने प्रवेश घेतला की तुमची जात-पात संपून जाते असं बायबल सांगते मात्र जात हा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे त्यामुळे प्रत्येक जातींनी आपली सांस्कृतिक व धार्मिक परंपरा आपल्या नवीन धर्मात कायम ठेवल्या त्यामुळे वसईच्या ख्रिस्तीधर्मियांच्या सांस्कृतिक परंपरेला अनेक पदर आणि वैशिष्ट्य आहेत. तो तो समाज त्यांच्या जन्म ते मृत्यूपर्यंतच्या रीतीरीवाजात आपल्या प्रथा परंपरा नेटाने पाळत आलेला आहे.

आशिया खंडात जन्मलेला ख्रिस्ती धर्म युरोपातल्या राष्ट्रांनी येथे आणला. भारतात पोर्तुगीज प्रथम आले. त्यांनी धर्म दिल्यामुळे त्यांच्या संस्कृतीच्या खुणा येथल्या

समाजात आढळतात. १९६४ पर्यंत जगभर लॅटिन ही ख्रिस्ती धर्मियांची उपासनेची भाषा होती मात्र दुसऱ्या व्हॅटिकन विश्व परिषदेने सांस्कृतिकरण व देशीकरणाचा जो क्रांतीकारी निर्णय घेतला त्यामुळे स्थानिकांच्या भाषेत उपासना आली. त्याचबरोबर धर्म जरी बदलला तरीही इथल्या समाजाने आपली मूळ मराठी भाषा जतन करून ठेवली. धर्माच्या प्रभावामुळे संस्कृती जशी घडली तशीच मराठी भाषा व महाराष्ट्रीय संस्कृती या संज्ञाने ओळखल्या जाणाऱ्या रीतीरीवाजाचे धागेदोरे इतके घट्ट जोडले गेले आहेत की एक सुंदर इंद्रधनुष्य साकार झालेले आहे. जन्माने ब्रिटिश असलेल्या फादर थॉमस स्टिफन्स यांच्या क्रिस्त पुराणातील भाषा गौरव

जैसी पुस्पा माजि पुस्प मोगरी
की परिमळा माजि कस्तुरी
तैसी भासा माजि साजिरी मराठीया

हीच येथल्या समस्त ख्रिस्तीजनाची भावना असल्यामुळे हा समाज माती आणि संस्कृतीशी घट्ट जोडला गेला. आमचा साधना धर्म जरी ख्रिस्ती असला तरी समाजधर्म भारतीयच राहिला. इथल्या कुठल्याही ख्रिस्ती माणसाच्या मनात आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत अशी भावना कधीच निर्माण झाली नाही. नारायण वामन टिळक ते फादर हिलरी फर्नांडिस यांच्या भजन व भक्ती गीतांबरोबरच कवी श्रेष्ठ कुसुमाग्रज, वसंत बापट, साने गुरुजींच्या अजरामर गीतांमधून मराठमोळ्या चर्चने येशूला साद घातली ही खरं म्हणजे सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रातली अपूर्व अशी घटना होती. म्हणूनच हा समाज तुकाराम नावाच्या सेतूवरून येशू चरणी येऊ शकला. ऐंशीच्या दशकात जगभरात अलगतावादाचे व धार्मिक उन्मादाचे धुमारे फुटत असताना संत साहित्याचे अभ्यासक बिशप (डॉ.) थॉमस डाबरे व फादर दिब्रिटो सारख्यांनी सुवार्ता मासिक व इथल्या सांस्कृतिक, साहित्यिक चळवळी द्वारे हा समाज भारतीयत्वाने जोडण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यामुळे केवळ नावच ख्रिस्ती बाकी सारं शंभर टक्के भारतीयत्व जिवंत राहिले.

मुळामध्ये हा समाज कृषी संस्कृतीतून आलेला आहे. आता जरी शेती व्यवसाय मागे पडलेला असला तरीही कृषी संस्कृतीची सर्व वैशिष्ट्ये या समाजात आजही

आढळतात. काल परवा पर्यंत गावातल्या क्षेत्रपालाला नारळ फोडून कार्याचा शुभारंभ व्हायचा. गावातल्या हिंदू मंदिरामध्ये आजही ख्रिस्ती समाजाची वार्षिक उत्सवा निमित्ताने उपस्थिती असते कारण ते गाव दैवत असते. चर्चच्या उपासना पद्धतीमध्ये सुद्धा भारतीय चिन्ह आणि प्रतिकांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असतो. येथील धुरीणांनी धार्मिक व सामाजिक सख्य सलोख्याला महत्व दिल्यामुळे व त्यासाठी चर्चने खास प्रयत्न केल्यामुळे सामाजिक ऐक्य अबाधित राहिलं.

येथे सर्वच दिवाळी साजरी करतात व नाताळ सर्वांचाच असतो. सर्व धर्मस्नेहभाव ही वसईने संपूर्ण भारत वर्षाला दिलेली देणगी आहे. संत ज्ञानेश्वर ते तुकारामादी मराठी संत परंपरेवर ख्रिस्ती अभ्यासकांनी संशोधन केलं तर संत फ्रान्सिस आसिसी, इग्नेशस लोयोला, फ्रान्सिस झेविअर, संत अंतोनी, गोन्सालो गार्सिया या संtतांना ख्रिस्ती अभ्यासकांनी मराठमोळं रुपडं दिल. संस्कृती भाषेतून उजागर होते. आज वसईकर जगभरात गेलेले आहेत पण त्यांनी आपली बोली आणि मराठी भाषेला अंतर दिलं नाही. येथे संपन्न होत असलेले सामवेदी, वाडवळ, इस्ट इंडियन महोत्सव म्हणजे आपल्या संस्कृतिला दिलेली सलामीच असते. या महोत्सवात पारंपरिक वेशभूषा, लोककला व खाद्य संस्कृतिचं पुनरुज्जीवन केलेलं आहे. त्यासाठी तरुणाई पुढे आलेली आहे.

ब्रास बँड पथकं ही वसईच्या ख्रिस्ती समाजाची खास देन आहे. ताल आणि नादाचा इतका सुंदर मिलाफ अन्यत्र पहायला मिळणार नाही. इथला सामवेदी ब्राह्मण समाज सामवेदातील अनेक शाखापैकी एक आहे. सामवेदी हा शब्द संस्कृत शब्द शामनीद्रेश पासून घेतला गेला असला तरीही या शब्दाचा अर्थ पद्यबद्ध मंत्राच्या गान विद्येशी अनुप्रणीत केला गेल्याने सामवेद असा तो झाला. त्यामुळे या समाजातील लोकांना पूर्वी राज दरबारी गायक म्हणून नेमले जात असे त्या गायकांना शामेडी असेही म्हणत तर पानमाळी समाज अर्थात सोमवंशी क्षत्रिय समाज या समाजासंबंधी महिकावतीची बखर, बिंबाख्यान, शास्तीची बखर आदी ग्रंथातून माहिती मिळते. या समाजास पानमाळी समाज किंवा वाडवळ समाज असेही म्हटले जाते. वाडवळ हा जातीवाचक शब्द नसून तो फुला पानांच्या वाड्यांचा व्यवसाय करणाऱ्या माळी

समाजाशी जोडला गेलेला व्यवसाय वाचक शब्द आहे. सामवेदी व वाडवळी या इथल्या मुख्य बोलीभाषा असल्या तरीही वसईत थोड्या थोड्या अंतरावर बोलीभाषा व संस्कृतीत फरक जाणवतो. यातील सामवेदी ख्रिस्ती समाजाची भाषा सामवेदी किंवा कुपारी बोलीभाषा जी कादोडी नावाने देखील ओळखली जाते तर पानमाळी किंवा वाडवळ समाजाची बोलीभाषा वाडवळी नावाने ओळखली जाते. दोन्ही भाषेतील शब्दोच्चारांना विशिष्ट हेल आणि नाद आहे. खास वैशिष्ट्य म्हणजे कादोडी भाषेवर कोकणी, गुजराती, मारवाडी भाषांचा एकत्रित प्रभाव दिसून येतो तर वाडवळी बोली भाषेतील अनेक शब्द हे ज्ञानेश्वरी व एकनाथी वाङःमयात आढळतात.

ख्रिस्ती लेखकांनी आपल्या लेखनाद्वारे सांस्कृतिक धागा बळकट करण्याचं काम केलं त्यामुळे ख्रिस्ती समाज सांस्कृतिक दृष्ट्या वेगळा पडला नाही. फादर फ्रान्सिस दिब्रिटो, सिसिलिया कर्व्हालो, फादर कोरिया, मार्कुस डाबरे, रेमंड मच्याडो, स्टीफन परेरा, जोसेफ तुस्कानो, स्टॅन्ली गोन्सालविस, फादर अँण्ड्रयू रॉड्रिग्ज, फादर मायकल जी असे अनेक ख्रिस्ती साहित्यिक मराठी साहित्य क्षेत्रात आपल्या अनोख्या लिखाणाच्या शैलीमुळे आपला ठसा उमटवून आहेत. अनेक स्थानिक ख्रिस्ती संगीतकारांनी बोलीभाषेतील गीतं स्वरबद्ध करून संगीत क्षेत्रात नाव कमावलेले आहे. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अभिकल्पकार रॉबी डिसिल्वा तर सर्वांनाच परिचयाचे आहेत. याशिवाय फिलीप डिमेलो, जो डिसोजा यासारखे काही नामवंत चित्रकार राष्ट्रीय पातळीवर ओळखले जातात. येथील काष्ठ शिल्पकार सिक्वेरा बंधू तर देशभरात प्रसिद्ध आहेत. कित्येक दशके वसईतील शिक्षक मुंबईतल्या मराठी शाळांमध्ये मराठी शिकवत आहेत.

## ख्रिस्ती सणांना भारतीय साज

नाताळ सण म्हणजे येशू ख्रिस्ताचा जन्मदिवस ख्रिस्ती समाजासाठी हा दिवस अध्यात्म व उत्साहाच्या दृष्टीने मोलाचा दिवस. या सणात ख्रिसमस ट्री, मेणबत्त्यांचे अगणित प्रकार, चांदण्याच्या आकाराचे विविध रंगी आकाश दिवे, सांताक्लॉजचे मुखवटे हे इथल्या ख्रिस्ती समाजाच्या घराघरात दिसतील त्याखेरीज येथे नाताळ निमित्ताने नाताळ अंक प्रकाशित केले जातात. काही घराच्या ओट्यावर व अंगणात

पणत्यांची रोषणाई सुद्धा दिसते शिवाय चिवडा, चकली, करंजी, लाडू यासारखे पदार्थ करण्याची पद्धत देखील आहे. नाताळ बरोबरच गुड फ्रायडे, ईस्टर, फातिमा मातेचा सण, रमेदी मातेची यात्रा, आगेराचा सण, क्रुसाचा सण, राजपिठाचा सण आणि बायबलचा सण असे अनेक सण येथील ख्रिस्ती समाज आपापल्या संस्कृतीच्या थोड्याफार फरकाने उत्साहाने साजरे करीत असतो .

वसंत ऋतुच्या सुरुवातीस जगभरात ख्रिस्ती लोक उपवास करतात .या काळात रविवार वगळता सलग 40 दिवस म्हणजे सहा आठवडे उपवास पाळला जातो. वसईतील कॅथलिक व प्रॉटेस्टंट हे ख्रिस्ती धर्मातील दोन्ही पंथ या चाळीस दिवसाच्या उपवासाचे पालन करतात. या उपवासाचे स्वरूप थोड्याफार फरकाने हिंदू उपवास संकल्पनेशी मिळते जुळते आहे. या उपवास काळाचे खास वैशिष्ट्य म्हणजे येथील ख्रिस्ती समाजात उपवासकालीन व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. कारण पश्चाताप व आत्मसमर्पण याद्वारे अध्यात्मिक वाटचालीतून परमेश्वर प्राप्तीचा अवलंब करणे हाच उपवासा मागील हेतू असतो.

वसईतील ख्रिस्ती समाजातील विवाह विधीमध्येही खूपसे हिंदू धर्माशी साधर्म्य असणाऱ्या प्रथा पद्धती असतात. साधारण नोव्हेंबर ते मे या दरम्यान वसईत ख्रिस्ती विवाह संपन्न होतात. चर्चमधील मुख्य विधी समान असला तरीही गावागावात काही प्रथा आणि पद्धती वेगवेगळ्या पाहायला मिळतात. घराबाहेर शोभिवंत केलेला मांडव, प्रवेशद्वारावर केळीचे उंच खांब, लग्नाआधी वधूवरांना हळद लावणे, मंगळसूत्र, हिरवा चुडा हे स्त्री लेणेही असतेच. लग्नविधी तीन दिवस चालतो. तांदूळ, नारळ, सूप, आंब्याचा टाळ, केळी व इतर फळे झेंडूची फुले ही सामग्री दिसते.

चर्चमध्ये लग्नविधी पार पडण्याआधी दोन दिवस वधू-वरांना लग्नविषयक शिबिर करणे बंधनकारक असते. तसेच कन्फेशन पाप निवेदन संस्कार सारखे संस्कार आधी दिले जातात. लग्नाआधी चर्चमध्ये जाऊन विवाह विषयक अर्ज भरावा लागतो त्यावर नवरा नवरी बरोबरच त्यांच्या पालकांच्या सह्या अत्यावश्यक असतात. लग्नाच्या तीन आठवडे अगोदर चर्चमध्ये त्या लग्नाची घोषणा केली जाते त्यामध्ये कुठला अडथळा असल्यास ते लग्न रद्दबादल होऊ शकते. लग्नाच्या दिवशी वधू आणि वर चर्चमध्ये

मिस्सा विधीसाठी एकत्र येतात तेव्हा सुखदुःख, आजार व आरोग्यात साथ देण्याची आजन्म एकमेकांशी एकनिष्ठ राहण्याचं वचन दिलं घेतल्यावर अंगठी व मंगळसुत्रावर आशीर्वाद दिला जातो. चर्चमधील रजिस्टरवर नवरा नवरीबरोबरच दोन साक्षीदारांची सही घेतली जाते. त्यानंतर वाजत गाजत वरात वधूच्या घरी जाते. सून सासरी आल्यावर थट्टा मस्करी असलेले बोलीभाषेतील लोकगीते गायली जातात. लोकनृत्य केले जाते जेवणामध्ये खास महाराष्ट्रीयन आणि पाश्चात्त्य संगम असलेला विविध पदार्थाची रेलचेल असते. शेवटी विवाह सोहळ्यात मदत केलेल्या नातेवाईक व मित्र यांना कृतज्ञते पोटी मेजवानी दिली जाते.

अन्य  धार्मिक संस्कार देतेवेळी छोटे मोठे उत्सव साजरे केले जातात. मृत्यूनंतर गाव पातळीवर प्रार्थना सभेचं आयोजन केलं जाते. सात दिवसानंतर मृतात्म्यासाठी खास मिस्सा अर्पण केला जातो.

या समाजात वाचनाची फार मोठी परंपरा आहे. चर्च तेथे लायब्ररी असल्यामुळे घराघरात पुस्तकाबद्दल आदर आणि आस्था आहे. समाजवादी विचारसरणी बद्दल आस्था ही या समाजाची खास ओळख. चळवळ आणि आंदोलनातल्या सहभागाने या समाजाने आपली संवेदनशीलता व सहभागिता सिद्ध केलेली आहे. धर्मांतरामुळे इथल्या समाजाच्या जीवनशैलीत व राहणीमानात निश्चित फरक जरी पडला तरी वसईतील ख्रिस्ती समाजाने आपल्या मूळ भारतीय व खास करून मराठी संस्कृतीशी असणारी नाळ व मूळ बैठक कायम ठेवतच आपल्या समाजाची परंपरा जपली. आपल्या धर्माचं तत्त्वज्ञान माणूस निश्चितच जपतो, दैवते व उपासना मार्ग पाळतो धर्माने घालून दिलेले लोक व्यवस्थेचे नियम लक्षात ठेवून वागतो शिवाय धर्माने आपल्या अनुयायासाठी काही संस्काराची योजना केलेली असते तीही पाळतो तरीही वसईचा ख्रिस्ती समाज आपल्या मूळ परंपरेच्या मूल्याशी नैसर्गिकरीत्या जोडला गेला असल्याने त्याची नाळ कधीच तुटली नाही हेच येथल्या ख्रिस्ती समाजाचं वास्तव आहे.

# गारूड

■ डॉ. नेहा किशोर सावंत, दहिसर पूर्व, मुंबई
nehasawant603@gmail.com

दिवाळीची सुट्टी लागली होती. खूप दिवसानंतर आम्ही या घरी राहायला आलो होतो. हे घर आताशा विकेंड होम झालंय. मुंबईत राहायला गेल्यापासून, तिथल्या ध्वनिकल्लोळातून खरंतर मनाला शांतता हवी असली की मी इथे येते.  शांततेला ही एक हवाहवासा सूर असतो स्वर असतो हे इथे आल्यावर मला जाणवतं. इथली पहाट होते तीच कोकिळा, कावळा, चिमणी यांच्या कलरवाने. वातावरणामध्ये एक सुंदर अशी नादमयता निर्माण होते. त्यांच्या त्या कलरवामध्ये विलक्षण चैतन्य असते या आवाजाचं विलक्षण गारुड मनावर पडत असतं. खरंतर या गारुडाच्या ओढीनेच मी खेचली जाते आणि इथे येते.

जवळजवळ सतरा अठरा वर्ष या सगळ्या आवाजांची मोहिनी अनुभवलेली होती. दिवसाच्या सुरुवातीलाच पहाटेच्या नीरव वातावरणात दूरवरून अजानाची बांग ऐकू यायची 'आल्लाहू अल्ला, हू अकबर... या बांगेतच देवळातून रेकॉर्डवर लावलेल्या भक्तिगीताचे सूर मिसळले जायचे. हळुहळू आसमंताला पहाटजाग येऊ लागायची. या भक्तिमय स्वरांच्या सोबतीने स्वयंपाकघरात लगबगीने स्वयंपाक करणाऱ्या माझ्या डोळ्या-वरची झोप सहज विरून जायची. आणि कॉलेजला जाण्यासाठी निघताना बोळातल्या पायवाटेवर चर्चमधली घाट म्हणजेच आवेमारीची घंटा निनादायची.

तिच्या नादाची आवर्तनं सकाळच्या वातावरणाला ताजतवानं करायची. माणसांबरोबरच कोंबडे, कुत्रे यांचेही दूरवरून सूर ऐकू यायचे. बसस्टॉपच्या आसपास असलेल्या घरांमधून कोंबड्यांची बांग ऐकू यायची, त्या बांगेतूनही जणू ते बोलत

असायचे, "येत्ता का जाऊ?" माझ्या मनातल्या या खुळचट कल्पनांनी माझ्याच चेहऱ्यावर नकळत हसू उमटायचं. तो नाद मनात भरूनच माझा प्रवास सुरू व्हायचा, स्टेशनला पोहोचताच अनेकविध आवाजाच्या कोलाहलात मुंबईचा प्रवास सुरू व्हायचा. आता केवळ आठवणी राहिल्यायत मनात.

आताशा मुंबईत राहायला आल्यापासून या नादांना पारखे झालेले कान, त्या नादांच्या आठवणींनी व्याकूळ होऊ लागलेत. त्या आवाजांना साठवून घेण्यासाठी कान अधीर झालेत. क्वचितच सुट्ट्यांचे निवांत क्षण अनुभवायला मिळतात. सुखद पहाटेच्या गारव्यात पक्षांच्या मंजुळ नादाने जाग येते. कावळ्या-चिमण्यांचा हा कलरव विरतो न विरतो तोच सकाळच्या वेळी गुराखी आपल्या गाई बैलांना चरायला नेतात तेव्हा त्यांच्या गळ्यातील घुंगुरमाळांची किणकिण ऐकू येत असते.

त्यांच्या मागोमागच शेळ्या मेंढ्यांना चरायला नेणारे गुराखी असतात, जणूकाही एक ताल कदम ताल करत चालल्यासारखे हे कळप एकमेकांना अंग घाशीत पुढे सरकत असतात. त्यातली काही खट्याळ कोकरं घिसडघाई करत एकमेकांना ढुशी मारीत आनंद घेत असतात, त्यांच्या त्या अंगघुसळीचा अन् बे बे चा एक लयबद्ध असा विलक्षण नाद असतो, त्यांच्या त्या कदमतालातही कमालीचा सूर असतो.

सकाळचा नाश्तापाणी झाल्यानंतर थोडासा निवांत वेळ आळसात घालवायचा असतो म्हणून इथल्या झोपाळ्यावर बसून येणाऱ्या जाणाऱ्यांचा पदरव ऐकत असते आणि त्याच वेळेला एका फकिराचं गाणं कानावर ऐकू येतं. हा फकीर दर बुधवार आणि शुक्रवारी येतो. "अल्लाही देगा मौला ही देगा" असे एका लयीत गात दारावरून जात असतो, कधीतरी एखादी आर्त सुरावट आकाशाकडे बघून, मान उंचावून डोळे मिटून गातो, तेव्हा तो नादही आसमंतात घुमत राहतो.

एखाद्या बाईने "रुको बाबाजी" असं म्हटलं तरच तो थांबतो, त्याच्या हातातला एक चिमटा अधूनमधून तो वाजवत असतो आणि आकाशाकडे पाहून तो म्हणत असतो, "मेरे मोला मेरे अल्लाह, निगाह करम रखना". दिलेले पैसे आपल्या झोळीमध्ये टाकून आपल्या हातातल्या मोरपिसांचा पिसारा त्या बाईच्या किंवा तिच्या बाळाच्या

डोक्या-वरती अलगद फिरवून तो पुढच्या दारात जातो. सकाळ आळसवलेली असली तरी त्याच्या आवाजातला तो आर्त स्वर मनाला भिडत असतो. कोण असेल हा मुल्ला? कुठून येत असेल, कुठे जात असेल ?

अशा अनेक प्रश्नांचा भुंगा मनात भुणभुणू लागतो. क्वचित कधीतरी एखाद्या वारी एक जोगतीण दारावर येते, तिचीही वेळ सकाळचीच असते "यल्लम्माच्या नावाने दे ग बाई, जोगवा दे ग माय" असं म्हणत कडेवरचं पोरग सांभाळत दान मागत जाते. हे सगळे आवाज आता परिचयाचे, सवयीचे झालेत. या लोकांशी फारसं बोलणं होत नसलं तरी आठवड्यातून एकदा तरी त्यांना पाहण्याची, त्यांचा आवाज ऐकण्याची उत्कंठा मनाला लागून राहिलेली असते. हे सगळे आवाज खालच्या बोळात असणाऱ्या बैठ्या घरांच्या दारासमोरून जात असले तरी त्या मांगत्यांची नजर सवयीने इमारतीच्या गॅलरीत जाते आणि नकळत त्यांच्या आणि माझ्याही चेहऱ्यावर हास्याची हलकी लकेर उमटते.

साधारण सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास एक वेगळी लगबग खालच्या बैठ्या घरातल्या अंगणात जाणवते. चाळीतल्या बायका दुपारच्या स्वयंपाकासाठी 'तिची' वाट पाहत असतात. दुपारी जेवायला काय करायचं, हा यक्षप्रश्न घेऊन खलबतं सुरू असतात. इतक्यात तिची हाळी ऐकू येते, आणि या बायकांच्या चेहऱ्यावर समाधानाची लहर पसरते. "गो म्हावरा, बेनांसा मावरा" हे शब्द कानावर पडले की सगळ्या "आयली, आयली रेजिना आयली" म्हणत तिच्याभोवती झुंबड घालतात, म्हावऱ्याच्या किमतीत घासाघीस करतात, तेवहा एकेकीच्या आवाजाची पट्टी ऐकण्या-सारखी असते, पैसे देण्याघेण्यावरून, अधिकीचं म्हावरं वर टाकण्यावरून तारसप्तकात आवाजाची फिरत चालते, आणि त्यावरचा सा लावते ती रेजिना ते सारंच ध्वनिसंगीत ऐकण्यासारखं असतं, भरीसभर त्यांच्या कलकलाटात चारदोन मांजरीचे म्यावकार, गुर्गुरणे मिसळून गेलेलं असतं.

रेजीना आपल्यासोबत मासळीचा वास घेऊन आणि तारसप्तकातली हाळी देत पुढे निघून जाते. आणि काही काळासाठी शांततेचं मूकसंगीत आणि वेगवेगळे घमघमाट दरवळत राहतात. खालच्या बोळातून तळणीचे, फोडणीचे चुरचुर घमघमलेले आवाज

ऐकू येत राहतात, थोड्याच वेळात दुपार जणू वामकुक्षी घेत कलंडत असल्याचा भास होत राहतो. एक वेगळीच शांतता पसरली जाते.

बऱ्याच दिवसानंतर टळटळीत उन्हाच्या दुपारी एक आवाज आसमंतात घुमला, "कुल्फीयों कुल्फी" आणि मग त्या आवाजासरशी घराघरातून लहान मुलांचे उल्हसित करणारे मंजुळ नादनिनाद ऐकू आले, कलंडलेली दुपार जणू कूस बदलू लागली. आणि वातावरणातली उन्हाची दाहकता हळूहळू सौम्य वाटू लागली. खरंतर कुल्फीयो म्हणताना हातगाडीच्या खाली असलेली घंटी कुल्फीवाला वाजवत येतो त्या घंटीच्या मंजूळ आवाजाने वातावरणात एक प्रकारचा शीतल शिडकावा पडतो.कधी हातगाडीची घंटी वाजवत रणरणत्या दुपारी गोळेवाला येतो. त्या घंटीच्या आवाजाचा कानोसा बाळगोपाळ घेतच असतात. मी वरच्या मजल्यावर राहत असूनही खिडकीतून त्या बर्फाचे गोळे पाहत असताना त्यांच्या रंगाने डोळे सुखावतात तसाच त्या बर्फाच्या गोळ्याचा गारवा मनालाही सुखावून जातो . बर्फाचा गोळा गेला की पुन्हा थोड्या वेळाने सर्वत्र शांतता पसरते. जणू काही ही दुपारच  त्या गोळ्याचे चुपणे घेऊन, गारेगार होऊन पुन्हा कूस बदलते.

दुपारची उन्हं उतरणीला लागतात तेव्हा दारोदार सायकलच्या घंटीचे आवाज येऊ लागतात, बेकरीवाला जोर जोराने ओरडत असतो 'पाववाला,  पावलो नरम गरम कडक पाव, जीरा बटर खारी बटर टोस्ट' अशा आरोळ्या ठोकत दारावरून जात असतो. पुन्हा एकदा खालच्या चाळीतल्या बायका त्या सायकलवाल्यापाशी गोळा होतात त्यांचा काहीसा कलकलाट सुरू होतो आणि घेतलेल्या पाव बटर बिस्कुट बरोबर चहाची रंगत त्या घेत जातात.

साधारण तासाभरानंतर डोक्यावर मोठा ॲल्युमिनियमचां टोप घेऊन गुजराती हसमुखलाल "खमण लै लो खमण लै लो" अशी साद घालतो "खमणी लय लो ढोकळा लेलो" असा तो ओरडला की पुन्हा लहान मुलांचा घोळका आणि गलका ऐकू येतो खमणवाल्याची हाक विरते न विरते तोच हरिलाल भाजीवाल्याची गाडी येते त्याच्या गाडीचा भोपू वाजू लागतो "भाजीवाले ताजी भाजीवाले, कांदा बटाटा टमाटावाले" असं तो ओरडू लागला की तिन्हीसांजेची वेळ होत आल्याची जाणीव होते. आता

संध्याकाळच्या स्वयंपाकाला लागायला हवं याची जाणीव गृहिणींना होते आणि मग शिळोफ्याच्या गप्पा आवरून, घेतलेल्या ताज्या भाज्या अंगणातच फतकल मारून निवडायला सुरुवात होते. त्यावेळी चालणारी त्यांची थट्टा मस्करी, घरातल्या उखाळ्यापाखळ्या, याच्या त्याच्या कागाळ्या यांनाही काहीसा उत येतो आणि आवाजाची एक वेगळीच नजाकत पाहायला मिळते. कधी तार सप्तकातील हास्य कधी गडगडाटी हास्यस्फोट तर कधी कुजबुजीची खसखस किंवा आतल्या आवाजात केलेल्या कानगोष्टी, यातून आवाजाचे वेगळेच पैलू दिसून येतात. आणि मग संध्याकाळी दारातल्या क्रूसासमोर मंजुळ अशा लयीत आणि एका विशिष्ट सुरात रोजरी सुरू होते त्या रोजरीच्या मधुर सुरांनी नकळत वातावरणात एक विलक्षण गंभीर शांतता पसरते. ‘हो कृसा सलामी तुला’ हे गीत गुंजत राहतं. ‘नमो मारिया, आम्हावर दया कर' म्हणत मंद वाऱ्याच्या झुळकी बरोबर रात्रीची चाहूल  लागते.

चर्च बेल म्हणजे रात्रीची घाट वाजली की पुन्हा एक नीरव शांततेची जणू दुलईच पांघरली जाते गावावर. रात्रीचं विलक्षण मौन संगीत सुरू होतं, रातकिड्यांची किरकिर स्पष्टपणे जाणवत राहते. झोपेला शरण जात उबदार दुलईत शिरलं की दूरवरून स्पष्ट ऐकू येते समुद्राची गहनगभीर गाज, क्वचित शांत वाऱ्याची घुण घुण.

दिवसभराच्या ध्वनींची, नादाची आवाजाची आवर्तनं घोळवित, दिवसाची सांगता होते. नादांच्या या स्पंदनांनी साऱ्या देहात एक अनाम नादसंगीत झिरपत राहतं अविरतपणे.... जे मला कायम उर्जा देत राहतं.

# माजी आमदार डॉमनिक घोन्सालवीस

**■ अनिलराज रोकडे,**
**अध्यक्ष : वसई विरार महानगर पत्रकार संघ**

वयाच्या नव्वदी नंतरही सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत राहून, अडलेल्या-नडलेल्या नागरिकांस जमेल ती मदत करणे, तथा नागरी समस्या व विकासाच्या प्रश्नांवर संबंधित विभागाकडे आपल्यापरीने पाठपुरावा करून सामाजिक बांधिलकीशी आपली नाळ वार्धक्यातही खंडित होऊ न देणाऱ्या माजी आमदार श्री. डॉमनिक घोन्सालवीस साहेब यांनी दि.१४ डिसेंबर रोजी वयाच्या ९३व्या वर्षात पदार्पण केले आहे. त्यांना यानिमित्त शुभेच्छा देतांनाच, त्यांच्या कारकिर्दीचा थोडक्यात आढावा घेऊया.......!



परवा, रविवारी वसई विरार महापालिका मॅरेथॉन स्पर्धेच्या शुभारंभास अतिथी म्हणून आलेल्या घोन्सालवीस साहेबांची व्यासपीठावर भेट झाली. साहेब थकलेले जाणवले, पण तरीही आपल्या शहरातील या एका मोठया उपक्रमात स्पर्धकांना प्रोत्साहन देण्यासाठी भल्या पहाटे साडेपाच वाजता येऊन प्रयत्नपूर्वक त्यांनी हजेरी लावली. माणसांमध्ये मिसळून सुखदुःख जाणून घेणे, विचारपूस करणे, वेळ प्रसंगी अनुभवातून आलेल्या शहाणपणाच्या चार गोष्टी नवकार्यकर्त्यांना सांगणे असा जनसंपर्काचा त्यांचा हा प्रवास आजही निरंतर सुरु ठेवण्यामागील त्यांची उर्मी प्रेरणादायी वाटली...!!

श्री. घोन्सालवीस साहेबांनी चर्नीरोड येथील शासकीय मुद्रणालयातील प्लानींग ऑफिसर पदावरील नोकरीचा १९७०च्या सुमारास राजीनामा देऊन, त्यांनी स्वतःचा प्रेस वसईत सुरु केला. सहकार महर्षी स्व.म. वि. कुलकर्णी आणि ज्येष्ठ समाजवादी नेते, माजी आमदार स्व. स. गो. वर्टी यांच्या विचारांच्या प्रभावातून घोन्सालवीस साहेबांचा सहकारातून जाणारा राजकीय प्रवास रुंदावत गेला. त्यातूनच १९७२ साली ते ठाणे जिल्हा परिषदेत सदस्य म्हणून निवडून गेले. ही संधी त्यांनी दोन वेळा मिळवली. 1985 साली वसई विधान सभा निवडणुकीत जनता पक्षाचे उमेदवार म्हणून, त्यांनी काँग्रेस उमेदवार, तात्कालीन राज्यमंत्री स्व. तारामाई वर्तक यांचा पराभव करून विधान सभेत कूच केले. या त्यांच्या प्रतिकूल राजकीय वातावरणात मिळवलेल्या विजयाची राज्यभर चर्चा झाली.

अनेक मात्तबर आणि प्रस्थापित सदस्यांचा समावेश असलेल्या त्यावेळच्या विधान सभागृहात नवखे आमदार म्हणून गेलेल्या डॉमनिक साहेबांची अनेक अभ्यासू भाषणे गाजली. परिणामी त्यांना विधान सभा अध्यक्षांच्या तालीकेवर स्थान मिळाले. तसेच त्या काळात त्यांना विरोधी पक्षाचे मुख्य प्रतोद म्हणून काम करण्याची संधी मिळाली. वसईच्या तात्कालीन अनेक प्रश्न, समस्याना आपल्यापरीने त्यांनी न्याय दिला. आमदार झाल्यावर १९८५च्या सुमारास येथील कृषी उत्पन्न बाजार समितीला पुनःरुजीवित करण्याचे महत्वाचे काम त्यांनी केले. आज नावारुपाला आलेली साधना सहकारी पतपेढी, वसई मध्यवर्ती सहकारी भांडार आणि महिला औद्योगिक सहकारी संस्थेचे ते संस्थापक आहेत. पान मार्केटिंग सहकारी सोसायटीवर सतत ३७ वर्षे चेअरमन म्हणून यशस्वी धुरा वाहतांनाच, कार्डिनल ग्रेशर्स हॉस्पिटल ट्रस्टचे ते सुरुवातीपासूनचे विश्वस्थ आहेत. तसेच बॅसीन कॅथॉलिक सहकारी बँकेवर दोन वेळा संचालक म्हणून ते निवडून गेले होते. या शिवाय त्यावेळी  वसईत स्थापन झालेल्या लोकसेवा मंडळ आणि अनेक सहकारी संस्थांच्या उभारणीत त्यांचे मौलिक योगदान लाभले आहे.

सन १९९० च्या विधानसभा निवडणूकीत मात्र युवकांच्या झंजावातासह वादळ बनून आलेल्या काँग्रेसचे नवतरुण उमेदवार हितेंद्र ठाकूर यांच्याकडून डॉमनिक

साहेबांना पराभव पचवावा लागला. त्यावेळी अतिशय धक्कादायक मानल्या गेलेल्या या निकालानंतर काही वर्षातच घोन्सालवीस साहेबांनी स्वतःला सवारले. मोठया मनाने समाजकारण आणि राजकारणतला आ. ठाकुरांचा लोकानुनय उदारपणे मान्य करून, त्यांच्या बद्दलची मनातील कटुता काढून टाकली. स्वभावाप्रमाणे आ. ठाकूर यांनीही घोन्सालवीस साहेबांशी नम्रतेने आदरयुक्त संबंध प्रस्थापित केले. आज हे दोघे अतिशय जवळचे मित्र असून, या संबंधाचा लाभ डॉमनिक साहेब अनेक सामाजिक कामांसाठी करून घेतात. आज विश्रांतीची वेळ असतांनाही घोन्सालवीस साहेब छोटया-मोठया नागरी आणि सामाजिक प्रश्नांचा संबंधित खात्याचे अधिकारी, विद्यमान लोकप्रतिनिधी आणि पत्रकारांच्या माध्यमातून पाठपुरावा करीत असून, यासाठी ते सामाज माध्यमाचाही कल्पक वापर करीत आहेत. समाजाप्रतीची ऋणत्वाची त्यांची जाणीव आणि शक्य तसे, जमेल तितके सहाय्य करण्याची त्यांची भावना राजकारण आणि समाजकारणात नव्याने येणाऱ्या कारकर्त्यांसाठी मार्गदर्शक ठरावी. अश्या श्री. घोन्सालवीस साहेबांना त्यांच्या निरोगी दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा देऊया!!!



# कंबारडा पार मोडला

**■ फ्रान्सिस डिमेलो सर, नंदाखाल**

त्यावहरा रोईनीतूस आगोठ सुरू जाली  आन हारकॅाहुरकॅा पानी पडलॅा. राबाई ऊब जा नाका भुगून लॅाकांई हारजिकीओर पेरन्यो केल्यो.  मिरगात पानी मॅाजाऑ पडल्यामुळॅ आवने बरे पटकान वाडले. जेठी पूर जालॅा. उखळन आटपे तंव शिक्कल कऱ्यासॅा वखत आलॅा.  संज्यावसॅा हन यादो तळेबावी बऱ्यापैकी भरले. आवने जेमतेम मूठ बांद्याओडे जाल्याबरबर लॅाकांई आवन्यो धरल्यो.

दुज्याई आंवदा आवनी घनीस नोती.  एक भॅाठा हॅत फिरावरी हॅाता. आंवदा ता त्या भॅाठ्या गंवादरी हॅाता. शारपास दिहातूस दुझ्यायो आंवजो आटपाल्यो. दाडी वाऑन, उळूद पॅरॅान जालॅा.  भादवडी माल अजून कापतॅा जालॅा नॅातॅा. जेमतेम आठानॅ बारानॅ जालतॅा बास त्याबननी लागवडीला टाईम हॅाता.  केळीत डॅाकावॅान यासा याबिगार  घनास कय काम नॅाता.

यंदा भादवडी माल बगॅान दुझ्या मनातशा मनात खूश जालतॅा. अडीचशे केळीऑ तापॅा हॅातॅा. दोनशे सव्वादोनशे लॅांगरा तॅ नक्की कापॅदॅ. शेटनॅ हारकीहुरकी पट्टी जॅ दिली, हूट घनीस धरली नाय तॅ यंदाऑ माल पॅाराआ लग्नादो बऱ्यापैकी हाथ देदॅ या खुशीत दुझ्या शेटशा वाडीआ रस्त्याला लागलॅा.

हां, आंवदा माआमिनॅ दुझ्या भॅाट्या पॅाराआ पेद्रूआ लगीन धरलोता. त्यापुडनॅ दुझ्यानॅ दोन पोऱ्यो वराडॅान हाऱ्या धाडल्योत्यो. दोगीऑ हनपाळनॅ करॅान जालतॅ.  पॅाराआ लगीन अहल्यामुळॅ घराई थोडी डागडुजी करना भाग होती. आन मग ऑाबायदो थॅाडॅा हमदाव, कपडालत्ता, घनॅ नाय तरी शेदोनशे लोकाआ हाथोरती पानी घालना भाग हॅाता. याकरता तॅला एकूस आदार हॅातॅा तॅा मिंजॅ शेट आन भादवडी माल.

शेटला आपली गरज कहीं पटवॉन द्याशी याई मनातशा मनात शब्दाई जुळवाजुळव करीत दुझ्या निंगालतॉ. वाटॅत बिशाकॅापात भॅटलॉ पन दुझ्याला त्याआ भानूस नॅाता. तॅास बोयलॉ, "कॅापात, आज बों विसारात दिखात्या तॅ." "कय नाय, ऑहॅास, निखळॅास" आंहा कयतरी अडखाळात बॅालात दुझ्या पुडॅ निंगालॉ. शेटसॅा माहनू तडॅ कावडीअॅ लोंगरे वाईतोतॉ. तॉ हांगातॅ, "शेट हल निंगूत घारा गॅलॉ बास. जेमतेम घराअॅ पॅासलॅ हायदॅ."

आज कय करॅान शेटशी भॅट घ्याशीस आंहा ठरवॅान दुझ्या शेटशा पाठोपाट शेटशा बंगल्योर पॅासलॉ. पायरीओर सड्याशा आदीस तॅनॅ टोपी काडॅान हातात धरली. पोन्याई उटी खोशिलती ती खाला होडली. पायात पायताणे तॅ नोतेस. तॉ घाबरात घाबरात पायऱ्यो सडलॉ आन आडॅ तडॅ बगीत मेडीला टॅकॅान खाला बॅहलॉ.

शेट पानगॉ खाऑन, कनेरी पॅऑन तॉंडात पान टाकीत बायार आलॉ. शेटला बगिल्याबरबर दुझ्या ताड्कन उबॉ रॅलॉ आन तॅनॅ शेटशापुडॅ हाथ जोडलॅ.

"आरे दुझ्या, तू कतॅ आलॉ ? आन ऑहॉं खाला कादो बॅहल्या. फलाटीत बॅहॅ गनाय" आंहा बॅालॅान शेट आरामखुर्शीत बॅहलॉ. पन दुझ्या "रेऊं दे रेऊं दे" बॅालात तडेस उबॉ रॅलॉ. शेटसा तॉंड पानाए भरलोता. तॅनॅ थुक्यादो उठताना बिड्याई बशी आन कांड्यापेटी दुझ्यापुडॅ धरॅान बोयलॉ, "आरॅ एक बिडीतरी घॅ" पन शेटशा समोर बिडी कंहीं प्याशी ? ऑहॉं विसार करॅान तॅनॅ बिडी कय घेटली नाय. पानाई पिसकारी टाकॅान परत खुर्शित बॅहॅता बॅहॅता शेटनॅ विसारला, "हां बॅाल दुझ्या क आलतॉ ? का काम काडलोता ?" दुझ्या वाटूस बगितोतॉ. तॅनॅ शेटला पॅाराआ लगनाआ हांगिला.

घराआ हांगताना तॉ बोयलॉ,"आतॅ जरा दिही बदलल्यात, पॅाराला एका बाजूनॅ बारकीशी खोली काडॅान द्या लागे. थॅाडा हॅाना नाना ! पन शेट आंवदा माऑ माल बरॉ भरदॅ. तुमे पायतॅ एकदा यॅऑन तापॉ बगा. आठानॅ, बारानॅस जालॅ पन पंद्राएक दिहात कापनी सुरू हॅायदॅ." "हं, तुऑ माल बरॅास आहातॅ पन आतॅ मालाला पयल्याहारकॅा उठाव रॅलॉ नाय. जळगावातनॅ वॅगनशो वॅगन भरॅान या लागल्यापासून जरा मंदीस पडले. ता जाऊं दे. कॅाडॅ पाओतॅ ?"

शेटला आकडॅा हांगना तॅ भाग हॅातॅा. पन आकडॅा थॅाडॅा बॅाठॅास हॅातॅा भुगून जरा अडखाळात दुझ्या बोयलो, “शेट, पाचशेपरांत मिळद्याद तॅ बरा हॅायदॅ. यंदा मालात सगळॅ फिटॅद्यात. बिआमिंजॅ मा आंगोर गॅल्या सालशी एक दिडकीसुद्दा नाय.“ दुझ्यानॅ त्यांई बाजू मजबूत केली.

“पाचशे ऑाडॅ नाय पन सद्या तीनशे गॅहॅान जाय. माल कापतॅा जालॅा गा बिअॅ दोनशे देनॅ.“ आंहा बॅालॅान शेट आतमिनॅ गॅलॅा आन पैशॅ आन सोपडी गॅहॅान आलॅा. तॅनॅ दुझ्याआ खाता बगिला. दुझ्या आंगोर ना मागशी बाकी गा नाय वहराभरात कुहनी उसल. ता बगॅान शेट खूश जालॅा. तॅनॅ दुझ्या हातात पैशॅ देत हांगिला, “नीट मॅाजॅान घॅ आन अठ्ठ्या सई कर.”

शेटनॅ मोडीत कयतरी लिविलता. दुझ्याला मोडी कय कशात नॅाता. दुहरीपोतूस हिकलेतॅा. जेमतेम सई करतोतॅा. बि मिंजॅ नीट वाशासा मिंजॅ शेटवर अविश्वास दावडल्याहारका हॅायदॅ भुगून तॅनॅ शेटनॅ हांगिला तडॅ पटकान सई केली. शेटनॅ मुद्दाम तॅला रक्काम त्यासमोरुस मॅाज्या लाविली.

दुझ्यानॅ कतॅस पैशॅ बुडविलॅ नॅातॅ आन कतॅस सोरेसारे लोंगरे भय्याला दिले नोते. त्याबननी शेटनॅ खुशीनॅ पटकन पैशॅ दिलॅ. शेटनॅ घनॅस आडॅवॅडॅ घॅटलॅ नाय आन पटकान खॅप्पॅन तीनशे रुपये दिलॅ, या दुझ्याला भॅाटा नवालूस वाटला. तॅनॅ मनात एविजालता गा तीनशार खेपो घाल्या लागॅद्यात तिगाळा कडॅ शेट शे दोनशे रुपये हातोर टेकविदॅ. पन जाला उलटास. तॅा जाम खूश!

त्या मनात आलता गा या खुशीत एखादी नवटाक घ्याई. पन घारा जाऑान कतॅ एकदा बायकूला हांगातॅ आंहां तॅला जालता. तॅा तॅाहॅास तडाक घारा गॅलॅा. दुज्याई बायकू त्यांई वाटूस बगितोती. “भाटात डॅाकाऑान येतॅ“ आंहा हांगॅान कारबारी गॅलॅ तॅा अजून कय नायदॅ आलॅा. मावऱ्यापान्याऑा पत्तॅा नाय. अंहॅा विसार करॅान ती काट्याआ कालवान कऱ्या लागलोती. दुझ्याने सगळी हकिकत तिला हांगिली आन हॅान्या कपड्यालत्त्याकरता दोनशे रुपये तिआ हाथोर ठोयलॅ. बायकूआ काळीज हुपाऑाडा जाला.

या गोष्टीला जेमतेम आठ दिहीस जालॅ हायदॅत. आखाडाऑ शेवटसॉ दिही मिंजॅ गटारी अमावास्या! दुहऱ्या दिहापासून हरावन सालू. बी लोक मटन, कोंबड्या मांगॅ. कुन मुंडी घ्यादो तॅ कून ओदडी घ्यादो. त्यात पातेरातपासून पाण्यानॅ झॅंबाड घायलती. घनॅास जॅारात नॅातॅा तरी न थांबतां पडतोतॅा. कय काम करॅान देत नॅातॅा. सगळे घारास होते भुगून दुझ्या बायकूनॅ मॅारायॅ लाडू कऱ्यासॅा बेत कॅलतॅा. लवकर जिवने आटपॅान तिनॅ पीठ बाफ्या ठोयलॅा. कांदॅ आदीस कापीलतॅ. हळूहळू पान्याऑ जोर वाडलॅा. त्या जोडीला वारा हुटला. वाऱ्याई आन पाण्याई जहनी पैज लागलोती.

दॅागांऑ जोर वाडातूस गॅलॅा. आंगळ्यतनॅ पानी वाया लागलॅा. माड गरगरॅ फिऱ्या लागलॅ. धडाधड मॅाड्या लागलॅ. कुनाए घराए कवले उडले तॅ कुनाए घॅानॅ. ई सादासुदा वारा नाय तॅ भॅाठा सकरी वादळ हाय ई लॅाकांई ओळखीला. जकल्यांना आतॅ केळीई धास्ती लागलोती. पन भाटात जाशी कुनाई हिंमत नोती. दॅापारा एक तॅ अडीच या वेळात वाऱ्यानॅ नुसता थैमान घायलता. केळी ताफॅ शॅ ताफॅ आडवे होया लागलॅ. पन भाटात जाशी कुनाई हिंमत हॅात नोती. पान्याऑ नुसतॅा काळोख ! ज्यांई त्यांई जाऑन पोरे शाळीतनॅ कहें बहें घारा हाडलोते. दॅापरशी हांज कतॅ जाली आन हांज्याई रात कतॅ जाली कुनालास कळला नाय.

हाकोबॅाठ्यादो सगळा सामसुम जालता. नाय वारा, नाय पानी ! जॅा तॅा उठलॅा तॅा सॅाप्पाट भाटात धावलॅा. तडॅ का बग्यासा ? एक कुनाई केळ जाग्योर उबी रेली नोती. आयनॅ पोरे वॅगॅत घॅऑन निजल्याहारक्यो केळी लोंगरे वॅग्यात घॅऑन आडव्यो जालत्यो. त्या आदाराला बांदिलेले टोकरे त्या पाठीओर ! आख्खे भाटे उजाड जालते. दुझ्याने अर्दे मुर्दे पडलेले लोंगरे बगिला आन त्या मांड्यातसा बळूस गॅला. तॅा तॅाहॅास बतकान बॅहॅलॅा. या लोंगऱ्या जीवोर तॅनॅ मनात कॅाडॅ इमलॅ बांदिलतॅ. शेटदरनॅ आंगोर पैशॅ घेटलोतॅ. आतॅ शेटला तॅांड कांहा दावड्यासा या विसारानॅ त्याऑ तॅांडसॅा पानीस पळालॅा.

दोनशार दिही दुझ्या निखळॅास भाटात जाऑन येतोतॅा. त्याला कईस सुसात नॅाता. शिकलात पडलेले लोंगरे कय पान्यात कुया लागलोते तॅ कय अर्धवट पिक्या

लागलोते त्यात कुत्रे फिरातोते.  ता बगॉन दुझ्या डॉखा फिऱ्या लागला.  तॉ तॉहॅांस मांगॅ फिरलॅा आन घरशा वाट्याला लागलॅा. ऑड्यात समोरनॅ नॅमकॅा शेट आलॅा.  कडॅ निकॅा गा पळॅा आंहां तॅला जालता. तॅनॅ पटकन टोपी काडॅान मान लविली.  आन शेटशापुडॅ हाथ जोडले.  खाला मान घालॅान तॅा बोयलॅा, “शेट, माफ करा. एक लॅागरा जाग्योर रॅला नाय. पन मॅ तुमशॅ पैशॅ बुडव्यासॅा नाय. कय तरी करॅान वाळनॅ.“ बॅालताबॅालता त्या डॅाव्यातनॅ आंहों वाया लागले.

शेटला जाम वाईट वाटला. शेट दुझ्या पाठीओर हाथ ठॅाऑान बोयलॅा, “दुझ्या, तू एकल्यास नाय. सगळ्याऑास सत्यानास जालॅ. वादळवारा कतॅ प्रपंच करी नाय. तॅला जकले हारके. जा तुआ तास माआ जालॅ. सगळ्यांईस कंबार पार मोडली. का कऱ्यासा ? नशीब आपला बि का? “  आंहां बॅालॅान शेटनॅ कब्जाआ खिशात हात घायलॅा. दा दाश्यो दा नोटी त्या हाथात ठॅाऑान तॅा बोयलॅा, “ सगळ्यो केळी साफ कर.  हिंग्यो काडॅान लागवड करॅान घॅ. सगळी जमीन हारकी करॅान  काळे रवयशे वांगे लाव नातॅ दोद्याऑा मांडव घाल.  शार पैशॅ मिळद्यात. नुसतॅा हाथ बांदॅान आन रडॅान कांहां सलदॅ.  सल कामाला लाग. पैशा आपुन नंतर बगॅा. त्यांई तू काळजी करॅा नाका“

आपल्यापुडॅ शेट नाय तॅ देव उबॅा हाय आंहा दुझ्याला वाटला.  त्या आंगात हत्तीआ बळ आला. त्या पायातसुद्दा ताकद आली. शेटनॅ आबार  मानीत तॅा घारा निंगालॅा.

# अनंत ध्येयासक्ती...!!

■ **जॉन कोलासो, गिरीज, वसई**

*(ज्येष्ठ पत्रकार आणि साप्ताहिक जनपरिवारचे संपादक तसेच फादर स्टीफन्स अकॅडमी स्कूलचे संस्थापक श्री. ॲन्ड्र्यू कोलासो यांचा जीवनपट)*



ज्येष्ठ पत्रकार आणि साप्ताहिक जनपरिवारचे संपादक तसेच फादर स्टीफन्स अकॅडमी स्कूलचे संस्थापक श्री. ॲन्ड्र्यू कोलासो म्हणजेच आमचा मोठा बंधू, याचा जीवनप्रवास 'अनंत ध्येयासक्ती'ने झपाटलेला आहे. अशा ध्येयासक्तीने त्याने आपल्या कर्तबगारीने अनेक यशाची बंदरे सर करून आपल्या कर्तृत्वाचे झेंडे तेथे रोवलेले आहेत.

भावाने नुकतीच वयाची ८२ वर्षे पूर्ण केली आहेत तर साप्ताहिक जनपरिवारचे ४८ वे वर्षे चालू आहे. सुमारे ४५० वर्षापूर्वी म्हणजे २४ ऑक्टोबर १५७९ रोजी ब्रिटनहून भारतात आलेले आणि गोव्यात व वसई किल्ल्यात मुक्काम करून क्रिस्तपुराण सारखे महाकाव्य लिहिणारे फादर थॉमस स्टीफन्स यांच्या स्मरणार्थ बांधण्यात आलेल्या फादर स्टीफन्स अकॅडमी स्कूलचा रौप्यमहोत्सव गतवर्षी साजरा करण्यात आला.

भावाने जीवनात व्यक्तिगत व कौटुंबिक अशी अनेक संकटे झेलली परंतु, अशा अनेक अरिष्टांना न डगमगता, त्याची जाहीर वाच्यता न करता त्याचा साहित्य, पत्रकारिता, शैक्षणिक, सामाजिक अशा विविध क्षेत्रांतील सव्यासी जीवनक्रम चालू असतो.

आम्ही चार भाऊ आणि दोन बहिणी मिळून सहा भावंडं. वडील नोकरी व व्यवसायानिमित्त कल्याणला मुक्कामाला असायचे. साधारणत: दर महिन्याला घरी यायचे. तेही तीनचार दिवसासाठी...! आमच्या संगोपनाची, आम्हाला वळण

लावण्याची, शिकविण्याची जबाबदारी आईवर. आई अशिक्षित. पण चर्चमध्ये ऐकलेल्या बायबल बोधकथा आम्हाला सांगून सन्मार्गावर ठेवण्याची जबाबदारी तिने चोख पार पाडली.

त्यावेळी तीन चुलत्यांसह एकाच मोठ्या घरात आम्ही राहत होतो. चुलत भावंडांसह घर भरलेलं होतं. परंतु ही भावंडं शालेय शिक्षणात मागे राहिली, आमच्या मोठ्या भावाने, मात्र प्राथमिक शाळेपासूनच आपली शैक्षणिक प्रगती साधली, इतकंच नव्हे तर माध्यमिक शाळेत गेल्यावर कविता करण्यासही सुरुवात केली. 'सुवार्ता'मध्ये त्या प्रसिद्धही होऊ लागल्या. त्यावेळी वसईत घरोघरी सुवार्ता हेच एकमेव नियतिकालिक येत असे. मुंबईतील वृत्तपत्रे क्वचित कधी वाचायला मिळत. पण पुढे अशा वृत्तपत्रांच्या रविवारच्या आवृत्तीतही भावाचे लेख, कथा प्रसिद्ध होऊ लागल्या. त्यावेळी आम्हा भावंडांना मोठ्या भावाबद्दल वेगळाच आदर वाटायला लागला आणि आम्हाला आमच्या शालेय जीवनात भावाबद्दल, त्याच्या लेखनाबद्दल, साहित्यिक वाटचालीसंबंधी ऐकायला मिळू लागले. कोणीतरी सांगायचे, भावाचा लेख वा कविता वाचल्याचे. इतर व्यक्ती त्याच्या प्रती आदराने बोलताना जाणवू लागले. लवकरच तो त्यावेळचे तरुण साहित्यिक रॉक कार्व्हालो यांच्या संपर्कात आला, त्याच्या साहित्यिक गुणांना पैलू पडू लागले.

## साधी जीवनपद्धती

शिक्षण आणि साहित्यप्रांगणात त्याची प्रगती होत असली तरी, घरात त्याने आपण कोणी वेगळे आहोत, साहित्यिक आहोत, असे कधीच भासवून दिले नाही. उलट आम्हा चौघा लहान भावंडांच्या दृष्टीने तोच आमच्यासाठी पालकाची भूमिका बजावत होता. कारण वडील कल्याणहून महिन्याभरात कधीतरी येत असल्याने आमच्या शिक्षणाची जबाबदारी भावानेच पार पाडली. आमच्या सर्वांच्या प्रगतीपुस्तकांवर भावाच्याच सह्या असायच्या. त्यामुळे आमच्या शैक्षणिक 'प्रगती'वर त्याचे नेहमीच लक्ष असायचे. आम्हा सर्व छोट्या भावंडाचा शिक्षणाच्या दृष्टीने भाऊ दीपस्तंभ ठरला. त्याच्या मार्गदर्शनाखाली आमचा शैक्षणिक प्रवास सुरू झाला.

वडिलांना कल्याणहून यायला विलंब झाला की, आईजवळचे घरखर्चाचे पैसे संपत असत. तेव्हा आई भावाला सांगत असे, ‘शावेर, माझ्याजवळचे पैसे संपले आहेत’ आईचे वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच भाऊ आईला धीर देत सांगत असे, ‘ठीक आहे, लोकसत्तेत प्रसिद्ध झालेल्या माझ्या लेखाचे मानधन म्हणून आजउद्या मनिऑर्डर येईल, त्यातून आपण भागवू…!’ आईवडील आणि घरातील चुलते भावाला शावेर याच नावाने हाक मारीत असत. शावेर म्हणजे झेविअरचं मराठी रुपांतर, भावाचं ते टोपण नाव आहे. मात्र आमच्या कुटुंबाबाहेर इतर कोणालाच ते माहीत नाही…!

लेख व कथेच्या मानधनाची मनिऑर्डर दहा रुपयांची असे. पण त्यावेळी दहा रुपयांने काही दिवसाचा घरखर्च सहज भागत असे. त्यावेळी आम्ही लहान असलो तरी भाऊ ज्या पद्धतीने आईला धीर देत असे, ते आम्हा छोट्या भावंडांना खूपच भावत असे. तो कॉलेजला असतानाच नोकरीस लागला. आचार्य अत्रे यांच्या ‘मराठा’मध्ये उपसंपादक म्हणून त्यास नोकरी मिळाली. सकाळी लवकर उठून रुपारेल कॉलेजला जायचा आणि तेथून वरळीला मराठाच्या कार्यालयातून रात्री उशिरा घरी परतायचा. त्यामुळे आम्हा भावंडाशी त्याची दिवसा भेट होणे दुर्मिळ होत गेलं.

आईला आर्थिक मदत करीत असतानाच पुढे वडिलांना कल्याणला मदत करण्यास त्यास वारंवार जावे लागले. वडिलांनी कल्याणला जमीन खरेदी करून तेथे शेतीबागायत सुरू केली होती. जमीनजुमला म्हणजे अतिक्रमण, नोकरांचे प्रश्न अशा अनेक समस्या पुढे येतातच. अशावेळी मदतीसाठी वडील त्याला कल्याणला बोलावून घेत, पण भावाने कधी, ‘मला वेळ नाही,’ असे सांगून टाळाटाळ केलेली नाही. आजही कल्याणच्या जमिनीविषयीची जुनी कागदपत्रे शोधताना दादाच्या हस्ताक्षरातील खूप मोठा दस्तावेज सापडतो. कारण त्यावेळी सर्वप्रकारचे अर्ज हाताने लिहून काढण्याशिवाय गत्यंतर नव्हते, आणि ते काम दादाच करीत असे. त्यासाठी मग त्यास वडिलांसोबत कल्याणला मुक्कामाला राहावे लागत असे. पण त्यामुळे त्याच्या शिक्षणात व लिखाणात खंड पडला नाही. कल्याणहून वसईला आल्यावर त्याच्या श्री. रॉक कार्व्हालो, श्री. जोजेफ डिकुन्हा, श्री. पीटर कर्नेल, श्री. ऑगस्तीन गोन्सालवीस, श्री. राफायल परेरा प्रभृती साहित्यिक आणि साहित्यप्रेमींशी दर रविवारी मैफली जमू

लागल्या. त्याचवेळी गिरीज येथे चर्चच्या आवारात सांस्कृतिक कार्य करणाऱ्या नूतन मंडळाचे अध्यक्षपदही त्याने सांभाळून या मंडळाच्या युवकांसमवेत सणाच्या दिवशी अनेक नाटके सादर करण्यात त्याचा मोलाचा वाटा होता.

दरम्यान, त्याने एम.ए. पूर्ण केले. त्यास त्यावेळच्या पूर्व जर्मनीच्या म्हणजेच जर्मन लोकशाही प्रजासत्ताक देशाच्या मुंबई कार्यालयात माहिती अधिकारी म्हणून नोकरी मिळाली. त्यामुळे 'मराठा'मध्ये असताना रात्री उशिरापर्यंत घरी यावे लागायचे ते थांबले. शनिवार रविवार सुटी मिळाली, त्याचा उपयोग लिखाणासाठी होऊ लागला.

**जर्मनी व रशियाच्या दौऱ्यावर**

पूर्व जर्मनीच्या कार्यालयात नोकरीस असतानाच पत्रकारितेचे शिक्षण घेण्यासाठी त्यास पूर्व बर्लिनला जाण्याची संधी मिळाली. त्याकाळात अशा शिक्षणासाठी परदेशात जाणे म्हणजे फार मोठा गौरव समजण्यात येत असे. अनेक वृत्तपत्रांत त्याच्या परदेशगमनाची बातमी झळकली होती.

जर्मनीमधून परत आल्यावर त्याच्या लिखाणास अधिक गती मिळाली. या परदेशदौऱ्याच्या निमित्ताने खूप लिखाण झाले. जर्मन कथाकादंबऱ्या मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा विडा त्याने उचलला. 'सुझान' ही त्याची पहिली अनुवादित कादंबरी प्रसिद्ध झाली. त्यापाठोपाठ, इतर अनेक पुस्तके प्रकाशित झाली.

पूर्व जर्मनीच्या कार्यालयातील नोकरी करीत असतानाच त्यास सोविएत युनियनच्या मुंबई वाणिज्य कार्यालयात 'सोविएत देश' या मराठी पाक्षिकाचे संपादक म्हणून नेमणूक करण्यात आली. अनेक वर्ष तेथे नोकरी करीत असताना आपले स्वतंत्र लिखाणही दादाने चालूच ठेवले होते. दरम्यानच्या काळात रशियाचा दौराही केला.

**छापखाना, प्रकाशन व साप्ताहिक**

आपल्या लिखाणासाठी व इतर वसईतील होतकरू तरुण लेखकाचे साहित्य प्रसिद्ध करण्यासाठी भावाने 'शब्दपीठ प्रकाशन' सुरू केले, सोबत कल्याणच्या आमच्या जागेत 'सरोज प्रिंटिंग प्रेस' नावाने छापखाना सुरू केला. आमच्या कुटुंबात आजपर्यंत

प्रेसचे काम कोणी कधी केलं नव्हतं. भावालाच, पत्रकारिता व पूर्व जर्मनी आणि सोविएत देशच्या माहिती कार्यालयातील नोकरीनिमित्ताने प्रेसविषयीची माहिती होती. परंतु कामगारांना घेऊन प्रेस चालविण्याचा व्यवसाय नवीनच होता. पण त्याने या व्यवसायातील सर्व तांत्रिक माहिती शिकून घेतली आणि मलाही ती शिकविली. त्यावेळी मीही कॉलेजच्या शिक्षणासाठी कल्याणला मुक्कामाला होतो.

प्रेसचा जम बसत नाही, तोच भावाने मे १९७६मध्ये ‘जनपरिवार’ सुरू केले. आरंभी पाक्षिक स्वरूपात असलेले हे जनपरिवार, १७ वर्षांनंतर साप्ताहिकमध्ये रुपांतरित करण्यात आले. आमचा सर्वांचा मुक्काम कल्याणला, प्रेस कल्याणला, मात्र पाक्षिक वा साप्ताहिक वसईसाठी प्रकाशित करण्यात येऊ लागले. त्यावेळी कल्याण-वसई संपर्काची सुविधा चांगली नव्हती. त्यामुळे भाऊ दर शनिवारी-रविवारी कल्याणहून वसईला येऊन वसईतील आपल्या साहित्यिक मित्रांशी संपर्क साधून साहित्य जमा करीत असे. नोकरी, संसार सांभाळून हे कामही तो सहजपणे करीत असे.

साप्ताहिक जनपरिवार, आज ४६ वर्षे झाली, नियमितपणे प्रसिद्ध होत आहे. पहिल्या पानावर स्वत: संपादकीय लिहिण्याची परंपरा अखंडपणे कायम ठेवली आहे. येथे अभिमानाने सांगावयाचे वाटते ते म्हणजे राज्य सरकारने जाहीर केलेल्या सर्वोत्तम अग्रलेखाचा पहिला पुरस्कार सा. जनपरिवारला मिळालेला आहे. त्यावेळचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते हा पुरस्कार दादाला मंत्रालयात झालेल्या खास समारंभात प्रदान करण्यात आला होता.

वसईविरारमधील अनेक होतकरू तरुण लेखक या साप्ताहिकात लिहीत आले असून त्यापैकी काहीजण आज नामवंत लेखक बनले आहेत. त्यामध्ये माझाही समावेश आहे. मलाही सा. जनपरिवारमध्ये लिखाण करण्याचा सराव झाल्यामुळे प्रथम ‘नवशक्ती’ आणि नंतर ‘महाराष्ट्र टाइम्स’मध्ये उपसंपादक म्हणून व पुढे मुख्य उपसंपादकपदापर्यंत जाण्याची संधी मिळाली.

अशाप्रकारे जनपरिवार साप्ताहिक लेखक, कवी आणि पत्रकार घडविण्याची कामगिरी पार पाडत आहेच पण त्याच सोबत सामाजिक, सहकार, शैक्षणिक अशा विविध

क्षेत्रांतील घडामोडींना व उपक्रमांना ठळक प्रसिद्धी देण्याचीही कामगिरी पार पाडत आहे. साप्ताहिकाच्या दरवर्षी होणाऱ्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईतले अनेक मान्यवर साहित्यिकांना बोलावून मिनी साहित्य संमेलनाचा कार्यक्रम वसईत तो आयोजित करीत असे. आज वसईत अनेक साहित्यिक उपक्रम अनेक संस्थांमार्फत आयोजित केले जातात. परंतु, वसईत ही प्रथा रुजविण्याचे काम सा. जनपरिवारमार्फत दादांनेच पार पाडले. अर्थात या कामी श्री. रॉक कार्व्हालो, श्री. जोजेफ डिकुन्हा, पीटर कर्नेल, ऑगस्तीन गोन्सालवीस प्रभृतींचे फार मोठे साहाय्य त्यास लाभले.

या उपक्रमाचे पुढचं पाऊल म्हणजे डिंपल प्रकाशनचे श्री. अशोक मुळे यांच्यासमवेत 'साहित्य जल्लोष प्रतिष्ठान'ची स्थापना करून वसईत गेली २० वर्षे साहित्य उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. या प्रतिष्ठानचा भाऊ अध्यक्ष आहे. साहित्य जल्लोष प्रतिष्ठानतर्फे १७ सप्टेंबर २०२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या साहित्य संमलेनाचे उद्घाटन ९५व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमलेनाचे अध्यक्ष भारत सासणे यांच्या हस्ते करण्यात आले.

**शाळेची स्थापना**

साप्ताहिक जनपरिवारचे कार्य अखंडपणे चालू असतानाच वसई परिसरातील गरीब कुटुंबातील मुलांना इंग्रजी माध्यमातून शिकता यावे म्हणून फादर स्टीफन्स ॲकॅडमी नावाने शाळा सुरू करून ती नावारूपाला आणली आहे. केजी व इयत्ता पहिलीपासून सुरू करून दहावी इयत्तापर्यंत असलेल्या या शाळेने वसईतील एक अग्रेसर व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणारी शाळा म्हणून नावलौकीक संपादन केलेला आहे. गेली दहा वर्षे सलग शालांत परीक्षेत शाळेचा शंभर टक्के निकाल लागत आहे. रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण केलेल्या या शाळेतून शालांत परीक्षा उत्तम गुणांनी उत्तीर्ण झालेले काही विद्यार्थी पुढील शिक्षण पूर्ण करून डॉक्टर, इंजिनीयर, सी.ए. झाले आहेत. तर अनेक विद्यार्थी परदेशांत नोकरीनिमित्त वास्तव्य करीत आहेत.

वर्षाचे ३६५ दिवस सकाळी साडेसहा ते संध्याकाळी साडेसहा शाळेत राहून आपले जीवन शालेय जीवनास अखंडपणे वाहून घेण्याचे व्रतच जणू भावाने घेतलेले आहे.

हा सर्व व्याप सांभाळून बॅसीन कॅथोलिक बँकेचे सलग दोन टर्म, म्हणजे एकूण दहा वर्षे संचालक म्हणूनही कार्य त्याने केलेले आहे.

भावाच्या संसाराचे एक चाक कधीच निखळून पडलेले आहे. आमच्या वहिनीला कर्करोग झाल्याचे निदान झाले. आमचे सर्व कुटुंबच एकदम खचले, पण भावाने ते अत्यंत धीराने घेतले. अशा दुर्धर रोगात तिची शेवटपर्यंत काळजी घेण्याचे एकहाती काम भावानेच अनेक वर्षे पार पाडले.

वहिनीला उपचारासाठी मुंबईतील माहिमच्या डॉक्टर बावडेकर यांच्याकडे घेऊन जाणे, हिंदुजा हॉस्पिटलमध्ये केमो देण्यासाठी घेऊन जाणे, उपचारासाठी वहिनीसोबत हिंदुजा हॉस्पिटलमध्ये राहणे, हे सर्व भावाने एकट्याने केलं. तेही नोकरी सांभाळून. त्यावेळी त्याची तिन्ही मुलं लहान होती. त्यांच्याकडून मदतीची अपेक्षा नव्हतीच. आपल्या दु:खाचा क्रूस आपणच आपल्या खांद्यावर घेऊन वाहिला पाहिजे, भावाने वहिनीची याच भावनेने शुश्रूषा केली. हा काळात तो एखाद्या स्थितप्रज्ञासारखे जीवन जगत आला.

अशाप्रकारे कोणतीही कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना आमच्या भावाने शाळाकॉलेजात असतानाच वाङ्मयीन प्रांतात प्रवेश केला, असंख्य कविता व कथा लिहिल्या. अनेक विषयांवर वृत्तपत्रीय लिखाण केले. पत्रकार म्हणून नोकरी, त्यानंतर स्वत:ची प्रिंटिंग प्रेस सुरू करून प्रकाशन व्यवसायास आरंभ. पाठोपाठ वसई परिसरासाठी साप्ताहिक सुरू केले व ते गेली ४६ वर्षे नियमित प्रकाशित करण्यात येत आहे. त्यानंतर केजी व पहिल्या इयत्तेपासून दहावीपर्यंत स्वत:च्या इमारतीत सुसज्ज शाळा सुरू केली. याशिवाय वसईच्या सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक, सहकार अशा विविध क्षेत्रांत सक्रिय भाग घेणे त्याचे चालूच असते. भावाची, अनंत आमुची ध्येयासक्ती, अनंत अन आशा... या ध्येयाने झपाटून विभिन्न क्षेत्रांत केलेली देदीप्यमान कामगिरी पाहता, आमच्या पुढील पिढीसाठी भावाची ही कामगिरी दंतकथा नक्कीच बनणार आहे, याबद्दल शंका नाही. त्यास हे कार्य करण्यासाठी सुदृढ आरोग्य लाभो ही सदिच्छा.

# मराठी साहित्य संमेलने

■ रेमंड मच्याडो, होळी – ८६६८६३९९८९

लेखक व कवी यांच्या सृजनशीलतेला निसर्गातील सुष्टीसौंदर्य, बरेवाईट प्रसंग, व्यक्तिगत नातेसंबंध, परिसरातील व पर्यावरणातील घडामोडी, इत्यादी गोष्टी साहित्यनिर्मितीसाठी सतत खतपाणी पुरवत असतात. कोणतीही कला कलाकाराच्या प्रतिभावंत हृदयातून प्रसवते व ती संवेदनशील प्रेक्षकांच्या, रसिक-श्रोत्यांच्या किंवा वाचकांच्या हृदयाला जाऊन भिडते. उत्तम प्रभावी साहित्य उदात्त विचारमंथनातून निपजलेले असते. सामान्य वाचकांच्या ज्ञानामध्ये ते प्रचंड भर घालते. आणि त्यातील अनेकांना ते त्यांच्या आयुष्याला दिशा देणा-या दीपस्तंभासारखे ठरते. साहित्याद्वारे आपण आपले हक्क जाणू शकतो व ते गाजवू शकतो.

समाज घडविण्यासाठी साहित्याचा उपयोग अपरिहार्य आहे. प्रसार माध्यमातून सहिष्णू व सर्वसमावेशक जनहितार्थ जनमत तयार करण्यासाठी साहित्य अत्यंत महत्त्वाची भूमिका निभावते. शिक्षण आणि साहित्यातून माणसांच्या जाणिवा जागृत होतात व त्यामुळे त्यांचे परिवर्तन होऊन त्यांतील शक्तिकेंद्रे विकसित होतात. अशाप्रकारे साहित्याद्वारे विकसित झालेल्या व्यक्ती पुढे पूर्णत्वाच्या दिशेने वाटचाल करतात. साहित्यिक आपल्या प्रतिभावंत निर्मितीद्वारे सामान्य नागरिकांसाठी एक आदर्श बनतात. त्यातून सुशिक्षित झालेल्या व्यक्ती स्वत:च्या, समाजाच्या, पर्यावरणाच्या, देशाच्या व निसर्गाच्या संवर्धनाविषयी कार्यशील बनतात.

महाराष्ट्रातील मुंबई शहराच्या कुशीत वसलेल्या वसई तालुक्यातील लोकांची मातृभाषा मराठी असून तिच्या उदरातून जन्मलेल्या भूमीपुत्रांना तिने आपल्या छातीवर पेलून बाळकडू पाजले. त्यातून निपजलेल्या साहित्यिकांची किर्ती आज देशात व जगातही गाजत आहे. अनेक प्रतिभावंत ख्रिस्ती साहित्यिक आपल्या लेखणीतून सकस

साहित्याची निर्मिती करत आहेत. वसईतील अनेक सामाजिक चळवळींमध्ये जनमत तयार करण्यासाठी ह्या साहित्यिकांचे भरपूर योगदान लाभले आहे.

आज वसईमध्ये कादंबरी, कथा, ललित, आत्मचरित्रे व कविता संग्रह या साहित्य प्रकारांद्वारे भरपूर साहित्य निर्मिती होत आहे. त्याचप्रमाणे वसईत प्रसिद्ध होणारी अनेक ख्रिस्ती नियतकालिके नवोदित कवी-लेखकांना आपली सृजनशीलता प्रकट करण्यासाठी वाव व व्यासपीठ देत आहेत. त्यात 'सुवार्ता' मासिक अग्रक्रमावर असून, 'जनपरिवार', 'निर्भय आंदोलन', 'वसई टाइम्स' व ‘कॅथलिक’ ही नियतकालिके गेली अनेक वर्षे वसईतील मराठी भाषक आम जनतेला साहित्यसेवा पुरवत आली आहेत. तसेच 'गीत', 'ख्रिस्तायन', 'संक्रमण', 'निर्मिती' इत्यादी नाताळ वर्षांक आणि वसईतील प्रत्येक धर्मग्रामातून वार्षिक उत्सवाच्या निमित्ताने प्रसिद्ध होणारे वर्षांक यांमधून पुष्कळ नवीन तरुण कवी-लेखकांना लिहिण्याची संधी उपलब्ध होत असते.

वसई मराठी ख्रिस्ती साहित्य मंडळाच्या नावावरूनच काही जिज्ञासू व्यक्तिंच्या मनात वादळ उठू लागते की, साहित्य शुद्ध व प्रांजळ का असू नये, त्याला जात, धर्म व प्रांत असे निकष लागू द्यावे का? त्याला आमचे उत्तर आहे की, मराठी ख्रिस्ती साहित्य ही संज्ञा ख्रिस्ती धर्मीय मराठमोळ्या साहित्यिकांनी लिहिलेल्या मराठी साहित्यास उद्देशून वापरलेली गेली आहे. इंग्रजी ही जागतिक भाषा असल्यामुळे आणि त्याला जाती धर्माचा किंवा वर्णाचा संदर्भ नसल्यामुळे तेथे ख्रिस्ती इंग्रजी, हिंदू इंग्रजी किंवा आदिवासी इंग्रजी अशी वर्गवारी होत नाही. कारण प्रमाणभाषा म्हणून इंग्रजीचा सगळीकडे एकच दर्जा राखला जातो. काही देशांतील बोली इंग्रजी भाषेच्या उच्चारामुळे त्यास विशेषणे लावली जातात परंतु व्याकरणबद्ध लिखित इंग्रजी सगळीकडे एकच परिमाण वापरते. भारतात भाषेचा हा प्रश्न जसा गंभीर तसा संवेदनशीलही आहे, म्हणून त्यास सोपे कामचलावू उत्तर देणे रास्त होणार नाही.

साहित्यिक व साहित्यप्रेमी वाचक व श्रोते सोडले तर प्रचंड संख्येने सामान्य जनतेला मुळात साहित्य संमेलने कशासाठी भरवली जातात हा प्रश्न पडलेला असतो. अलीकडे आपण अनुभवले आहे की साहित्य संमेलनात साहित्य संकल्पनांबाबत चर्चा करण्याचे सोडून, साहित्यिक व्यक्तिगत वाद-विवादात गुंतलेले असतात. अशा

संमेलनांमध्ये सामाजिक प्रश्नांना साहित्यविश्वाशी जोडून चिंतनात्मक मंथन करण्याऐवजी, मंडळाचे अधिकारी व आयोजक, ज्येष्ठ साहित्यिक व इच्छुक उमेदवारांचे अतिउत्साही कार्यकर्ते यांच्या दरम्यान् संमेलनाध्यक्षाच्या निवडणुकीतील एक ना अनेक कारणांमुळे वाद-विवाद होत असतात व एकमेकांची उणीदुणी चव्हाट्यावर आणली जातात. कार्यक्रमाच्या वेळी प्रत्यक्षात व्यासपीठावर नसले तरी पडद्यामागे काय महाभारत घडते त्याचा वृत्तांत आजच्या जासूसी पत्रकारितेद्वारे प्रेक्षकांपर्यंत पोहचत असतो.

आज सर्वसाधारण प्रेक्षक व वाचकाला वाटते की ज्या उद्देशासाठी आद्य भाषिक संमेलने सुरू झाली त्याचे आजच्या आयोजकांना भान राहिलेले नाही. संमेलनामध्ये अनेक भाषतज्ज्ञ व विद्वान साहित्यिकांचा समावेश असतो आणि त्यांच्या योगदानाने भाषेचा विकास व विस्तार होण्यास मदत होते; त्यांचे मार्गदर्शन भाषेच्या पुढील वाटचालीची दिशा नक्की करण्यासाठी उपयोगी पडते. पंरतु अगोदरच संमेलन कुठे भरवायचे, कोणत्या उमेदवाराला पसंती द्यायची, मतदारांनी नवीन संमेलनाध्यक्षाच्या निवडणुकीबाबत जातीवर्णावरून व अलीकडे राजकारणावरून कोणत्या लॉबीशी संलग्न राहायचे, अशा अन्य कारणांवरून संमेलनाचे वातावरण अगोदरच गढूळ झालेले दिसते.

आज बहुतांश कवी-लेखक स्वतःच्या साहित्यिक यशप्राप्तीसाठी इतके मग्न व स्वकेंद्रित झालेले असतात की मान वर करून इतर नवोदितांना साहाय्य करण्यासाठी त्यांच्याकडे अवसर नसतो. प्रतिभेची देणगी कमीजास्त प्रमाणात सर्वांनाच मिळालेली असते परंतु तिला जोपासणे, तिचा विकास करणे आणि त्यातून प्रसवलेल्या निर्मितीचे समाजापुढे सादरीकरण होणे व तिचे रसग्रहण होऊन तिला दाद व प्रसिद्धी मिळणे तितकेच महत्त्वाचे असते. या सर्व कारणांमुळे आज असा प्रश्न पडतो की संमेलनामुळे साहित्याला मिळालेली सामाजिक प्रतिष्ठा, साहित्य निर्मितीसाठी मिळणारे पुरस्कार, मान-सन्मान आणि त्यामुळे निर्माण झालेल्या साहित्यिक चढाओढी व स्पर्धा खरोखरच साहित्याच्या सर्वांगीण उद्धारासाठी पोषक ठरतात का? की त्या मारक ठरत आहेत, हे जाणून घेणे व त्यावर उपाययोजना करणे आज आवश्यक झाले आहे!

साहित्य संमेलनांच्या कार्यक्रमांना उपस्थित राहाताना आपोआपच नजरेसमोर येते की प्रेक्षकांमध्ये अधिकतम साहित्यप्रेमी, पोक्त वाचक व श्रोते, पूर्णसिद्धी किंवा अर्थसिद्धी पावलेले कवी-लेखक हजेरी लावतात. अनेक निवृत्ती पावलेल्या ज्येष्ठ नागरिकांना तीन दिवसीय साहित्य संमेलनाला हजर राहिल्याचे मित्रमंडळीला अभिमानाने सांगण्याची संधी प्राप्त होते म्हणून विरंगुळ्यासाठी येथे आलेले असतात.

काही लोक, विशेषकरून 'संमेलन-टू-संमेलन' यामध्ये नेहमी भेटणारे व परिचय झालेले नवे मित्र-मैत्रिणी सदर संमेलनात हमखास भेटतील या इर्षेने आलेले असतात. हे आम्ही जबाबदारीने व्यक्त करतो, कारण अनेक ठिकाणी अनेक सत्रे चालू असतात व बरेच अभ्यागत इतस्ततः फिरत असतात. किंवा पाठीमागे घोळक्याने गप्पागोष्टी करत उभे असतात. अगदी थोडेच लोक किंवा एखाद्या सत्रात पूर्णवेळ बसून सहभागी होतात. प्रेक्षकांवरून नजर फिरवताना किंवा बुक-स्टॉलमध्ये फेरफटका मारताना किंवा भोजनालयाच्या ठिकाणी युवा पिढीचे दर्शन बिलकुल घडत नाही.

ज्या प्रमाणात मराठी संख्या वाढते आहे त्या प्रमाणात मराठी कवी-लेखक व साहित्यप्रेमी यांची वाढ होतेय का यासंबंधी साहित्य व संस्कृती मंडळाने सर्वेक्षण करणे अगत्याचे ठरले आहे. आजचा तरुणवर्ग साहित्य संमेलनांकडे का आकर्षित होत नाही याची कारणे शोधणे गरजेचे आहे. त्यांच्या अभिव्यक्तीला पुरेसा वाव दिला जातो का? युवा साहित्यिकांना साहित्य निर्मितीबद्दल पुरेशी प्रेरणा व मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. त्यांच्यातील नवनवीन साहित्य प्रवाहांना मुख्य प्रवाहामध्ये सामावून घेतले गेले पाहिजे. साहित्याव्यतिरिक्त इतर प्रलोभने त्यांना अधिक आकर्षित करतात आणि सोशल मिडियामुळे त्यांचे जीवन अधिक गतिमान झाले आहे आणि त्यामुळे त्यांना साहित्याकडे लक्ष देण्यास रस वाटत नाही.

ही प्रसारमाध्यमे आजच्या युवापिढीला क्षणभंगुर सुखप्राप्तीकडे ओढतात. त्याचबरोबर पारंपरिक साहित्याद्वारे मिळणारी मूल्याधिष्ठित सांस्कृतिक व सामाजिक गुणवत्तेची पकड ढिली होत गेल्यामुळे सामाजिक व नैतिक मूल्ये एकदमच निसटून रसातळाला जात आहेत. युवापिढीच्या इत्यादी प्रश्नांवर संमेलनाच्या एकातरी सत्रात चर्चा घडवून त्यावर उपाय शोधणे काळाची गरज आहे. आजच्या तरुण वगनि सहित्य

संवर्धनाची धुरा सांभाळण्याची तयारी सुरू केली नाही तर मराठी भाषेच्या भवितव्याबद्दल चिंता वाटणे क्रमप्राप्त ठरते!

आधुनिक जीवनशैलीमध्ये वाढणा-या युवापिढीचा मातृभाषानिष्ठेचा प्रश्न दिवसेंदिवस अधिक जटील होत चालला आहे. त्यालासुद्धा अनेक कारणे आहेत. इंग्रजी ही जागतिक ज्ञानभाषा असल्यामुळे मराठी शाळा बंद पडत आहेत आणि इंग्रजी शाळांचे भरपूर पीक उगवले आहे. गेल्याच आठवड्यात वृत्तपत्रात बातमी वाचली की मुंबईमधील शाळांचे शिक्षणाचे माध्यम इंग्रजी करण्यात येणार, म्हणजे मराठीची अधिकृत गळचेपी होणार!

त्यात राजकारण्यांनी व भांडवलशहांनी आपल्या राजकीय व आर्थिक शक्तीचा फायदा उठवून परदेशांतील ब्रँडेड शिक्षणसंस्थांच्या शाखा आपल्या शहरात व नगरात आयात केल्या आहेत. मध्यम व उच्चमध्यम वर्गातील कटुंबीय आपली प्रतिष्ठा अबाधित ठेवण्यासाठी अशा इंपोर्टेड शाळांसमोरही 'ॲडमिशन'साठी रांगा लावत आहेत. आंतरधर्मीय किंवा आंतरभाषिक पालक असलेल्या कुटुंबातील पाल्याचा जेव्हा भाषानिष्ठेचा प्रश्न उद्भवतो, तेव्हा तोडगा म्हणून पती-पत्नी दोघांना अवगत असलेल्या इंग्रजी भाषेला प्राधान्य दिले जाते. घरातील वातावरण इंग्रजाळते व पाल्यदेखील आंतरराष्ट्रीय रिंगणात उतरण्यास तयार होते. परंतु अशा परिस्थितीत मातापित्याच्या दोन्ही मातृभाषांची अखंडता तुटली जाते. आजचे तरुण-तरुणी अशा साहित्यिक व सामाजिक सद्यःपरिस्थितीत अडकलेले असताना, त्यांना साहित्य संमेलनापासून काही मिळण्याची आशा किंवा गरज नसेल तर ते तिकडे कशासाठी फिरकतील?

भावी मराठी साहित्य संमेलनांमधून भाषेविषयी उपरोल्लिखित समस्या आणि अडचणी यांवर रास्त चर्चा व परिसंवाद घडवून उपाय शोधले गेले नाहीत आणि सद्यःपरिस्थितित सुधार केला नाही तर विविध प्रकारच्या व ठिकाणच्या साहित्य संमेलनावर करदात्यांची शासनाद्वारे केली जाणारी लाखो रुपयांची रक्कम नक्कीच इतर लोकोपयोगी उपक्रमांसाठी वापरता येईल यात दुमत नसावे!

# पेडोफिलिया (बालकांची लैंगिक छळवणूक), एक गंभीर समस्या

■ प्रा. स्टीफन आय परेरा. संपर्क (9850878189)

येशूने एका बालकाला शिष्यांच्यामध्ये उभे करून म्हटले, 'मी तुम्हाला निश्चितपणे सांगतो की, जर तुम्ही तुमची मनोवृत्ती बदलणार नाही आणि या बालकांसारखे होणार नाही तर तुम्हाला स्वर्गराज्यात प्रवेश मिळणार नाही. जो कोणी माझ्यासाठी अशा एका बालकाचे स्वागत करतो तो माझे स्वागत करतो. पण जो कोणी मजवर श्रध्दा ठेवणाऱ्या अशा लहान मुलांपैकी एखाद्याला पापास प्रवृत्त करतो अशा माणसाला त्याच्या मानेभोवती जात्याची तळी बांधून समुद्रात खोल ठिकाणी बुडविणे हेच त्याच्यासाठी कल्याणप्रद होईल (मत्तय १८ : ५-६).

'मुले ही देवाच्या बागेतली फुले आहेत. मुलं ही उद्याची आशा आहे. मुलं हीच देशाची फार मोठी संपत्ती आहे' अशा तऱ्हेची विधाने आपण नेहमीच ऐकतो किंवा वाचतो. या लहान बालकांची निरोगी व सुदृढ वाढ होण्यासाठी समाजाने काळजी घ्यावी अशी अपेक्षा असते. दुदैवाने माणसाचा स्वभाव विलक्षण मिश्रणाने भरलेला असल्याने त्यात सत्-असत्, पाप-पुण्य, दैवी- सैतानी अशा अनेक परस्परविरोधी प्रवृत्ती लपून बसलेल्या असतात. यातील नकारात्मक प्रवृती मधूनच बालकांची छळवणूक होत असते. बालकांची छळवणूक प्रामुख्याने तीन प्रकारात होऊ शकते - भावनिक (मानसिक छळवणूक) यामध्ये लहान मुलांना दमदाटी देणे, त्यांच्यावर रागावून त्यांना नेहमी दोषी ठरविणे, त्यांचा अवमान आणि त्यांची मानहानी करणे, त्यांच्या वागणुकीवर सतत टीका करीत राहणे इ. गोष्टींचा समावेश करता येईल. अशा छळवणुकीमुळे मुलांमध्ये नैराश्य येऊ शकते, त्यांची बौध्दिक हानी होऊ शकते.

छळवणुकीचा दुसरा प्रकार म्हणजे शारीरिक छळवणूक, ही छळवणूक अतिशय कडक आणि काटेकोरपणे वागणाऱ्या आईवडील, शिक्षक किंवा नातेवाईक यांच्याकडून होऊ शकते. दारिद्र्य रेषेखालील अशिक्षित आईवडिलांकडून लहान बालकांना अतिशय क्रूर प्रकारची छळवणूक सहन करावी लागत असल्याचे आपल्या निदर्शनास येईल, त्यात लहान मुलांच्या कोवळ्या हातावर अगर पाठीवर तापलेल्या धातूचे चटके देण्याचीही शिक्षा असे. अलिकडे मात्र बहुतांश देशात आणि विशेषतः आपल्या सारख्या प्रगत देशांत बालकांना दिल्या जाणाऱ्या शारीरिक शिक्षेला कायदेशीर बंदी घातली आहे त्यामुळे मुलांनी तक्रार केल्यास आईवडिलांना किंवा शारीरिक शिक्षा करणाऱ्यांना अटक होऊ शकते.

बालकांची तिसऱ्या प्रकारची छळवणूक म्हणजे, लैंगिक छळवणूक, सर्वच प्रकारची बालकांची छळवणूक वाईटच परंतु लैंगिक छळवणूक ही अतिवाईट समजली जाते. या छळवणूकीत वयात आलेली प्रौढ माणसे लहान अजाण बालकांचा लैंगिक सुखासाठी वापर करतात. सुरुवातीला गोजिरवाण्या बाळकांना जवळ घेऊन कुरवाळून, आंजारून गोंजारून त्यांचे मुके घेऊन हळूहळू स्वतःच्या लैंगिक तुप्तीसाठी त्या अजाण बालकांना काही गलिच्छ कृती करायला लावतात अगर त्यांच्यावर बळजबरीने अत्याचार करतात, अशाप्रकारच्या बाळकांच्या छळवणुकीला पेडोफिलिया म्हणजे बालकांचे लैंगिक शोषण किंवा बालकांची लैंगिक छळवणूक म्हणतात. Paedophilia हा शब्द ग्रीक भाषेतील. Pais म्हणजे अल्पवयीन मुले आणि Philia म्हणजे मैत्री या दोन शब्दांनी बनला आहे. वयस्कर व्यक्तीला अल्पवयीन मुलांविषयी आकर्षण वाटून त्यांनी अशा मुलांचा लैंगिक छळ करणे ही मानसिक विकृती असून ती विकृती मानवी इतिहासाइतकीच पुरातन आहे. ही विकृती सर्व तऱ्हेच्या लोकांमध्ये दिसून येते. श्रीमंत, गरीब, उच्चवर्गीय, पांढरपेशी, आणि कामगार वर्ग अशा सर्व स्तरावरील व्यक्ती या विकृतीत गुरफटलेल्या दिसून येतात. कोणतीही व्यक्ती मग ती कुठल्याही अधिकार पदावर असो वा नावाजलेली असो, दैहिक वासनेला बळी पडून अल्पवयीन बालकांचा लैंगिक छळ करण्यास धजावते याची कितीतरी उदाहरणे देता येतील. घरातील लहान सहान कामे करण्यासाठी नेमलेल्या लहान मुलांमुलींवर

घरातील प्रौढ व्यक्तीकडून लैंगिक छळ झाल्याची उदाहरणे आहेत. लैंगिक छळ अगर अत्याचार अगदी जवळच्या व्यक्तीकडूनही होऊ शकतो. त्यात शेजारी, चुलतभाऊ, मामेभाऊ, आतेभाऊ, पाहुणेमंडळी, नोकरवर्ग अशा कुणाचाही समावेश होऊ शकतो. बालकामगारही त्यांच्या मालकांकडून सुरक्षित असतात असे म्हणता येत नाही.

आपण लहान मुलांना शाळेत शिक्षणासाठी पाठवितो. तेथे त्यांच्यावर सुसंस्कार व्हावेत अशी अपेक्षा असते. दुर्दैवाने अशा या विद्यामंदिरातही एखादा शिक्षक लैंगिक वासनेच्या आहारी जाऊन निरागस बालकांचे लैंगिक शोषण करतो अशी उदाहरणे निदर्शनास आली आहेत. काही वर्षापूर्वी राजधानी दिल्लीतील एका शाळेत ३५० शाळकरी मुलांचे सर्वेक्षण करण्यात आले, त्यात ६२% मुलींवर लैंगिक अत्याचार घडलेला असल्याची खळबळजनक माहिती बाहेर आली. शाळेतील शिक्षकांनी शाळेतील विद्यार्थिनींचा केलेला गैरवापर, अनाथालयातील चालकांनी केलेले दुराचार याविषयी अधूनमधून वृत्तपत्रातून आपण बातम्या वाचतो. लहान मुले भिडस्तपणामुळे काही बोलत नाहीत. मात्र असल्या प्रकारांमुळे अजाण मुलामुलींच्या मनावर तिव्र धक्का बसतो. ती अबोल बनतात, त्यांच्यात न्यूनगंडाची भावना वाढीस लागते.

शेवटी ज्यांनी आध्यात्मिक धडे द्यायचे त्या साधूंकडून संधीसाधूपणे बालकांचे लैंगिक शोषण झाल्याची उदाहरणे समोर आली तेव्हा या विकृतीने कळस गाठला असे म्हणावे लागेल, २०व्या शतकाच्या अखेरीस युरोप अमेरिकेत गाजलेली धर्मगुरूंची लैंगिक गैरवर्तनाची प्रकरणे साऱ्या जगाला धक्का देणारी होती. वास्तविक धर्मगुरु, शिक्षक ही समाजातील वंदनीय व्यक्तिमत्वं असतात. त्यांच्याकडून नैतिक मूल्यांच्या पालनाची अपेक्षा केली जाते तरीही अशा व्यक्तींकडूनही प्रमाद घडू शकतात. मात्र सर्वजण तसे असतात असे मुळीच नाही. चुकणाऱ्यांची संख्या अल्प असली तरी त्या एक-दोघांमुळे सर्वांना दोष दिला जातो.

प्रत्येक सजीव प्राणिमात्रांमध्ये लैंगिक आकर्षण असते. त्यावर ताबा मिळवून काहीजण आमरण ब्रह्मचर्य स्वीकारतात. हिंदू धर्मातील साधू, रामकृष्ण मिशनच्या ब्रह्मकुमारी, बौध्द धर्मातील भिक्षुक आणि खिस्ती धर्मगुरु व धर्मभगिनी यांचा त्यात समावेश होतो. धार्मिक आणि वैयक्तिक उद्दिष्टय साधण्यासाठी ब्रह्मचर्य पत्करणे

काहीही वावगे नाही. मात्र ब्रह्मचर्यंत राहून पाय घसरलेल्या व्यक्ती टीकेचा विषय बनतात इतकेच नव्हे तर या एका व्यक्तीमुळे बाकी सर्वांना दोषी धरले जाते. धर्मगुरूंच्या गैरवर्तनामुळे समाजात असंतोष पसरतो. सदर धर्मगुरूंना शासन करण्याऐवजी त्यांची फक्त बदली करणे आणि त्याद्वारे त्यांना संरक्षण देणे असे प्रकार काही ठिकाणी झाल्यामुळे लोकांनी नापसंती व्यक्त केली. युरोप अमेरिकेतील प्रकरणे पोपमहाशयांच्या कानावर जाताच त्यांनी त्वरित वरिष्ठ धर्माधिकाऱ्यांची व्हॅटिकनमध्ये सभा घेऊन या प्रकाराचे गांभिर्य स्पष्ट शब्दात समजावून सांगितले. सुरुवातीला धर्मगुरूंच्या चांगल्या कामाची नोंद घेऊन धर्मगुरु सामाजिक, आध्यात्मिक व शैक्षणिक क्षेत्रात करीत असलेल्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करून ते पुढे म्हणाले, 'काही धर्मगुरूंच्या गैरवर्तनामुळे जे हजारो धर्मगुरु प्रामाणिकपणे सेवाकार्य करीत आहेत त्यांच्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. सफेद मेंढरांच्या कळपात एखादं-दुसरं काळं मेंढरू आढळते. पुढे पोप महाशयांनी बालकांच्या लैंगिक शोषणाबद्दल तीव्र खेद व्यक्त केला. धर्मगुरूंकडून असले गैरप्रकार होणे हे सर्वथा चुकीचे आहे. समाजाच्या दृष्टीने तो गुन्हा आहे. तसेच देवाच्या दृष्टीने ते एक महान पातक आहे, अजाण बालकांना ज्या धर्मगुरूंकडून धोका आहे अशा धर्मगुरूंना चर्चमधे राहता येणार नाही.'

चुकलेल्यांना पाठीशी न घालता पोपमहाशयांनी घेतलेली ही कर्तव्यकठोर भूमिका ख्रिस्तमंडळाच्या शुध्दीकरणासाठी स्वागतार्ह ठरली. वास्तविक ती ख्रिस्तमंडळाच्या स्थापनेपासूनची प्रभू येशूची शिकवणच आहे, हे आपण लेखाच्या सुरुवातीला मत्तयच्या शुभवर्तमानातून घेतलेल्या येशूच्या कडक शब्दांतून पाहिले. यातून आणखी एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे बालकांचे शोषण ही ख्रिस्तपूर्वकाळापासून समाजाला भेडसावणारी समस्या होती. बालकांचे लैंगिक शोषण ही एक जागतिक समस्या बनली आहे. पर्यटनाच्या नावाखाली अनेक देशात बालवेश्या व्यवसाय आणि किशोरवयीन बालकांचे लैंगिक शोषण यात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. देवाच्या बागेतील सुमनांना कुस्करणाऱ्यांची जगातली वाढती संख्या ही जागतिक समस्या आणि आजच्या सुशिक्षित व सुसंस्कृत समाजावरील फार मोठा कलंक आहे असेच म्हणावे लागेल.

# पवित्र भूमी दर्शन

■ **पौलस वाघमारे, अहमदनगर**
**(अध्यक्ष, मराठी ख्रिस्ती साहित्य परिषद)**

आटपाट नगरात एक राजा राज्य करीत होता. राजा फार हुशार होता. असा तो स्वतःच समजत असे. परंतु त्याचे हुशारीचे अनेक नमुने जनतेने अनुभवले होते. त्यामुळे प्रत्यक्ष तोंडावर ते त्याला काहिही म्हणत नसत. मात्र त्याच्या माघारी ते त्याच्या हुशारीचे किस्से चघळून चघळून चर्वित चर्वण करीत असत. राजा उत्तरेला शिकारीला निघाला की राज्यभर दवंडी पिटायची की राजा शिकारीला दक्षिणेला निघालेला आहे. सर्व जनतेत एकच चर्चा असे की, राजा दक्षिणेला शिकारीला गेला आहे. याला राजाची मुत्सद्देगिरी मानली जात असे. मुत्सद्देगिरीत राजा इतर राजांपेक्षा अती विद्वान आहे अशी मान्यता होती.

एकदा असेच राजाने दवंडी पिटवली की तो दक्षिणेवर कूच करणार आहे. शिकारीत फत्ते करूनच माघारी येईन. राजाच्या कर्तबगारीवर जनतेचा मोठा विश्वास होता. जनतेने वेशीपर्यंत राजाला सोबत केली आणि वाटे लावले. तेथून पुढे राजा आणि काही निवडक सैनिक मोहिमेवर गेले. परंतु पुढे जाऊन राजाने दिशा बदलली आणि तो उत्तरेकडे गेला. हे अंधविश्वासू जनतेला ठाऊक झाले नाही.

काही दिवस उलटून गेले असतील. आणि आकाशात आभाळ भरून आले. ढगांनी दाटी केली. कधीही ओघळून खाली पडेल अशी स्थिती होती. जोराचा पाऊस होईल. असे जो तो म्हणत होता. आणि झालेही तसेच. पावसाला सुरूवात झाली. धो धो पाऊस कोसळू लागला. इतका की, तो थांबायचे नावच घेईना. पाणी वाहू लागले. सुरूवातीला ओढ्यांची पोटे फुटून पाण्याने पात्रे सोडली. नंतर नदीचे पाणी पात्राबाहेर वाहू लागल्याच्या बातम्या येऊ लागल्या. परंतु राजा दक्षिणेकडे गेल्याचे सर्वांना ज्ञात

होते. त्यामुळे सर्व जनता निर्धास्त होती. पावसाच्या बातम्या उत्तरेकडून येत होत्या. पावसाने हाहाकार माजवला होता. नदी नाले ओसंडून वाहत होते. घरेदारे, शेतीबाडीचे अतोनात नुकसान झाले होते. नदीवरचे पूल, ओढ्यावरचे पुल पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे वाहून गेले होते. त्यामुळे दळणवळणावर परिणाम होऊन जनता आपापल्या गावात अडकून पडली होती. राजाही एका गावात अडकून पडला होता. परंतु कोणाला सांगणे, कळवणे, किंवा मदत मागवणे शक्य नव्हते. तसे करावे तर आपण जनतेची फसवणूक केली आहे. हे उघड होईल अशी भिती राजाच्या मनात होती. आणि राजा दक्षिणेकडे गेला आहे. पावसाचे संकट उत्तरेवर आले आहे त्यामुळे राजा सुखरूप आहे या भ्रमात जनता होती. जनतेला फसवणे राजाच्या अंगलट आले होते. राजा मनोमनी वरमला होता. परंतु काहीतरी करावे असे राजाच्या हाती उरले नव्हते. परंतु राजाने धीर सोडला नाही. पाऊस ओसरायची वाट त्याने पाहिली. पाऊस ओसरत्यानंतर त्याने आपल्या राज्याकडे प्रस्थान ठेवले.

दक्षिणेची मोहिम फत्ते करून राजा राज्यात परतला म्हणून जनतेने आनंदोत्सव केला. राज्यातील घराघरावर गुढ्या उभारल्या. अनेकांनी राजाला हार तुऱ्यांनी मढवले. आम्हीच राजाचे हितचिंतक आणि निष्ठावंत आहोत हे दर्शविण्यासाठी अनेकांनी उड्या घेतल्या. राजानेही मोहीम फत्ते करून आल्याचा सत्कार मोठ्या गर्वाने स्वीकारला.

परंतु आपला निर्णय चुकला होता. जनतेशी दगलबाजी करून आपण स्वतःच संकटात सापडल्याची खंत राजाला वाटत होती. म्हणून राजा काही दिवस आपल्या महालातून बाहेर आला नाही. महालातच काही तथाकथित विद्वांनाशी गुळगुळीत विषयांवर चर्चा करीत बसला.

राज्याच्या पश्चिमेकडील प्रांतातील जनतेमध्ये कुरबुरी ऐकायला येत होत्या. राजाने आपल्या दिमतीला काही अष्टप्रधान मंडळ नेमले होते. हे प्रधान मंडळ. वासरात लंगडी गाय शहाणी अशा स्वरूपाने ते बौद्धिक कुवतीप्रमाणे राजाला सल्लामसलत करत असत. आणि अष्टप्रधानातील काही विद्वानांनी दिलेले सल्ले राजा अमलात आणण्याचा प्रयत्न करीत असे. ते किती योग्यतेचे आहेत. त्यामुळे राज्याला किती फायदेशीर ठरतील याचा कोणताही सद्सदविवेक विचार राजा करीत नसे. यामुळे

राज्यातील जनतेत कुरबुरी सुरू झाल्या होत्या. राज्याच्या पश्चिमेतील प्रांतातून कुरबुरी ऐकू येऊ लागल्या होत्या. तसेच दक्षितेणतील काही विभागातूनही हालचाली जाणवत होत्या. परंतु अष्टप्रधानातील विद्वानांच्या सल्ल्यामुळे राजा अशा कुरबुरींकडे सोयीस्कररित्या दुर्लक्ष करीत होता. त्यामुळे जनतेत असंतोषाचे वारे वाहू लागले होते. हे असंतोषाचे वारे घोंगाऊ लागले तरी तथाकथित विद्वान अष्टप्रधान आणि राजा सुस्तावल्यासारखे गप्प होते. यामुळे व्हायचे तेच झाले. कुरबुरींचे पर्यावसान बंडात झाले. वेळीच प्रसंगावधान राखत राजाने बंड शमवले. आणि राज्यात स्थिर परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. एका निवांत क्षणी राजा आणि त्याचे विद्वान अष्टप्रधान महालात काही गहन विषयावर चर्चा करीत बसले होते. त्यावेळी कोणी एक गरीब मनुष्य घोडा घेऊन आल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. एका प्रधानाने त्या घोडेवाल्याला जवळ बोलावले. त्याची चौकशी केली. कोण कुठून आला ?

शेजारच्या अश्वनगरीतून आल्याचे त्याने सांगितले. तो एक गरीब घोडे व्यापारी होता. त्याच्याकडील घोडा विकावा या उद्देशाने तो या राज्यात आला होता. त्याच्याकडील तो मरतुकडा घोडा पाहून राजाने त्याची किंमत विचारली. घोडे व्यापाऱ्याने त्याची किंमत एक लाख रूपये इतकी सांगितली. एका मरतुकड्या घोड्याची किंमत एक लाख रूपये ऐकून राजा आणि त्याच्या सोबतच्या लोकांनी आश्चर्य व्यक्त केले. घोड्याची किंमत इतकी कशी? असे राजाने त्या घोडे व्यापाऱ्याला विचारले. महाराज हा साधासुधा घोडा नाही. मोठा गुणी घोडा आहे. अनेक गुण याच्या सामावले आहेत. परंतु तुम्ही जसे याच्याशी वागाल तसे तो तुमच्याशी वागेल. माणसांचे स्वभाव तो तत्काळ ओळखतो. इतकेच काय तो माणसांनाही ओळखतो. कोण गैरमर्जी करतो, कोण दगलबाजी करतो, कोण खोटे वागतो. हे हा गुणी तत्काळ ओळखतो. आणि प्रसंगी त्या व्यक्तीला लाथेने उडवतो. हा घोडा घ्या महाराज. तुम्हाला फायदेशीर ठरेल.

पण मला याची काय गरज. याच्यापेक्षा विद्वान लोक माझ्या दरबारी आहेत. मी मुक्या जानवरावर कशाला अवलंबून राहू ? तू पुढच्या राज्यात जाऊन तुझा घोडा विक. आम्हाला याची आवश्यकता वाटत नाही.

राजाचे हे बोलणे ऐकून घोडे व्यापारी जरा खट्टू झाला. तरिही प्रयत्न करावा म्हणून त्याने आपले म्हणणे पुढे रेटून नेले. महाराज, या घोड्याने जर जवळचे खोटे लोक ओळखून बाजूला काढले तर तुम्ही निश्चित सुरक्षित व्हाल. इतकेच नाही महाराज. आणखी एक खासियत आहे. माझ्या घोड्यात. याच्यावर बसल्यावर थेट पवित्र भूमीचे दर्शन घडते महाराज.

आता मात्र राजाचे डोळे चमकले. त्याचे कुतुहल जागे झाले. घोड्यावर बसल्यानंतर पवित्र भूमीचे दर्शन घडते हे तो पहिल्यांदाच ऐकत होता. कारण पवित्र भूमी पाहण्यासाठी खूप खर्च येतो हे तो ऐकून होता. परंतु एक लाखाचा घोडा खरेदी केला तर केवळ लाखात पवित्र भूमीचे दर्शन होईल. असा विचार राजाने मनोमन केला. घोडा खरेदी करण्याचे निश्चित झाले. घोडा खरेदी केल्यानंतर काय काय करायचे या मनोमन विचार करू लागला. कारण राज्यातील अनेक लोक राजाशी दुहेरी भूमीकेतून वागत होते. तरीही राजाला ते निश्चित कळत नसल्याने राजा त्यांच्याशी प्रेमानेच वागत होता. परंतु हा घोडा खरेदी केल्यानंतर दुधका दूध आणि पाणी का पाणी असे राजाला करता येणे शक्य होणार होते. तरीही राजाने घोडे व्यापाऱ्याला एक अट घातली.

आम्ही तुझा घोडा खरेदी करण्यापूर्वी त्याची परिक्षा घेऊ. जर खरोखरीच आम्हाला या घोड्यावर बसल्यानंतर पवित्र भूमीचे दर्शन झाले तरच आम्ही तुला घोड्याची किंमत अदा करू. यासाठी आमचे विद्वान प्रधानजी प्रथम घोड्यावर बसतील.

जरूर महाराज. प्रधानजींनी जरूर घोड्यावर बसावं. तत्पूर्वी मला काही सांगायचे आहे.

सांग. काय तुझे म्हणणे आहे. तुझे शब्द मागे तर घेणार नाहीस ना.

नाही महाराज. मी अगदी सत्य बोलत आहे. अट फक्त एकच आहे. या घोड्यावर बसल्यानंतर जो सत्य बोलतो. म्हणजे लबाड बोलत नाही. खोटारडा नाही. पवित्र शास्त्र स्वत:साठी प्रमाण मानतो, त्यांनाच पवित्र भूमीचे दर्शन घडते. महाराज आपण तर सत्यवचनी आहात. उभ्या पंचक्रोशीत सत्य वाचेबद्दन आपली ख्याती आहे. आपणास जरूर पवित्र भूमीचे दर्शन घडेल महाराज.

चला. खात्रीच करून घेऊ. प्रधानजी प्रथम तुम्ही या घोड्यावर बसून बघा. मग आम्ही बसून बघू.

महाराजांचा आदेश शिरसावंद्य मानून प्रधानजी घोड्यावर बसले. इकडे तिकडे, खाली वर, लांबवर त्यांनी पाहिले. परंतु दूर दूर पर्यंत काही दिसेना. पवित्र भूमीचा मागमूसही दिसत नव्हता. परंतु नाही म्हणायची सोय नव्हती. जर काहीच दिसत नाही म्हणावे तर आपण सर्वांसमोर लबाड, खोटारडा तसेच पवित्र शास्त्र न मानणारा गणला जाणार. सर्वांसमोर आपली नाचक्की होणार ही भिती होती. मनोमन असा विचार करून प्रधानही अचानक म्हणाले.

व्वा महाराज. काय ती भूमी ! व्वा महाराज पवित्र भूमी चांदीसारखी चकाकत आहे. आहाहा काय ते तेज ! महाराज या तेजाने माझे डोळे दिपले आहेत. तुम्हीही या पवित्र भूमीचे दर्शन घ्या महाराज. असे बोलून प्रधानजी घोड्यावरून खाली उतरले. प्रधानजींनी वर्णन केल्यामुळे राजाचेही कुतुहल वाढले होते. तोही तातडीने घोड्यावर बसला. राजाने पवित्र भूमी पाहण्याचा प्रयत्न केला. दूरवर नजर टाकली. वर पाहिले, डावीकडे, उजवीकडे पाहिले. परंतु कुठेही पवित्र भूमीचे दर्शन झाले नाही. असे जर सांगावे तर आपण लबाड, ढोंगी, खोटारडे ठरणार असे राजाने मनोमन ताडले. आणि तो तात्काळ उग्दारला. व्वा. काय ते दर्शन ! धन्य झालो मी! काय चमकतेय ती पवित्र भूमी ! ख्रिस्ताच्या पदस्पर्शाने पावन झालेली ती भूमी या डोळ्यांनी मला स्पष्ट दिसत आहे. असे म्हणून राजा घोड्यावरून खाली उतरला.

राजाने घोड्याची किंमत ठरवली. आणि घोडा खरेदी केला. कसे बनवले. असे भाव घोडे व्यापाऱ्याच्या मुखावर दिसत होते.

(एका लोककथेवर आधारीत)

# देवाचं देणं!

■स्टॅन्ली गोन्सालविस, वसई
मो. ८३९०७०६०१३
ई-मेल : stanleyg2013@gmail.com

डायना आंटी खूप म्हणजे खूपच रागावली होती. संतापाने नुसती फणफणत होती. पाऊस धूम कोसळत होता. हवेत चांगलाच गारठा भरून राहिला होता. घोंगावणारं आषाढवारं हुडहुडी भरवत होतं.

''आयला... तुमच्या ते ऽऽ हे... हे... तुमचं पाणी आमच्या दारात... तळं का खळं हाय ये आमचं? बांध नाय घालता येत का? नुसता चिखल न राडा करून ठेवलाय दारात...''

पायरीवर उभी राहून जोरजोरात हातवारे करीत ती ओरडत होती.

पुन्हा एकदा पावसाची सर थडथडत आली. पाऊसपाणी धबाधबा धावून आलं. जेनीच्या अंगणाच्या वरच्या बाजूने पाण्याचा मोठा ओहोळ वाहून येत होता. ते गढूळलं पाणी खळाळत पुढे पुढे आंटीच्या घराच्या बाजूने जात होतं.

''डोळे साफ फुटले काय तुमचे? बगा, बगा हे पाणी... गावभराचा हगमूत आमच्या दारात... सत्यानाश होईल मेल्यांचा... सकोट होईल... सकोट...''

चहुबाजूंनी कोसळणारा पाऊस व वाहत जाणारं पाणी डायना आंटीचा पारा अजून चढवित होतं.

पावसाच्या आवाजातही जेनीच्या कानावर आंटीचे शब्द पडत होते. हे सगळं आपल्यालाच ऐकवलं जात आहे हे तिला माहीत होतं. पण तिथे दुर्लक्ष करून ती आपल्या स्वैपाकात मग्न होती. तशी तिला सवयच झाली होती आंटीच्या बडबडीची व पाऊसपाण्याची. गेल्या दहा-एक वर्षांपासून गावच पाण्याखाली जाऊ लागलं होतं. तासभर पाऊस पडला की सारे रस्ते नदीसारखे भरून वाहू लागत. पाणी बंगल्यांच्या भोवती वेढा देऊन बसे. अनेकांच्या घरातही शिरायचं.

पाण्याबरोबर वाहून येणारा झाडपाला, प्लास्टिक, थर्माकोल, नॅपीज असा गावकचरा म्हणजे आणखी डोकेदुखी...

जेनीने खिडकीतून बाहेर नजर टाकली. पावसाच्या दाट धुक्यातही समोरचा उंच इमारतींचा कॉम्प्लेक्स तिला स्पष्ट दिसत होता. गाव असं खूपच बदलत चाललं होतं. वाढती मुंबई ऑक्टोपससारखी हातपाय पसरून इथवर सरकत होती. ते आक्रमण गावाला येऊन भिडलं होतं. पूर्वी हिवाळा- उन्हाळ्यात भाजीपाला व पावसाळ्यात भातं पिकायची. सारा परिसर हिरवळलेला. पुढे मजूर बांधकामावर जाऊ लागले, तशी शेतमजुरी परवडेनाशी झाली. त्यात शिकलेली नवी पिढी मातीत हात घालायला नाखूश. दिवसभर उन्हात राबायचं आणि भाजीला उद्या काय भाव मिळेल या चिंतेत रात्र घालवायची. पाऊसही कधी पडणार तर कधी महिनाभर गायब. त्यापेक्षा नोकरीत बऱ्यापैकी पैसे मिळतात ना, मग लोकांनी शेतीच टाकून दिली. पोरं मुंबईला लहान-मोठ्या नोकऱ्या करतात. त्यावर सुशेगाद गुजराण होते... मातीचा एक एक तुकडा विकला तर मग चिंताच मिटली.. व्याजावर जगायचं, शिवाय नवं घर, गाडीसुद्धा येतेय..

बिल्डर तयारच होते. आधी गावाबाहेर इमारती उठल्या. नंतर ते गावातही आले. खलाटीच्या जमिनीवर भराव घालून गावातच टॉवर उभे राहू लागले. नवी बांधकामं भरपूर उंचावर केली जात होती, तसे रस्ते खाली खाली जाऊ लागले. जुनी घरं त्यामुळे पुराच्या पाण्यात बुडू लागली. जेनीच्या डोळ्यापुढे गावातलं भलंमोठं बावखल उभं राहिलं. वैशाखातही ते भरलेलं असायचं. कमळांनी गच्च दाटलेलं असायचं. त्या पाण्यावर बागायत बहरायची. पुराचे पाणी बावखलाच्या पोटात सामावलं जायचं. आता प्रत्येकाला जागा कमी पडू लागली. भोवतालच्या लोकांनी बावखलाच्या काठावर राबिट, केरकचरा, माती टाकून इंचाइंचाने आपल्या सरहद्दी पुढे सरकवल्या. कोणी अगदी काठावर बंगले उभारले, कोणी गॅरेज बांधली तर कोणी बाग फुलवली होती. एकेकाळी ऐसपैस पसरलेली गावातली सर्वच बावखलं आता डबक्यागत आकुंचली होती.

बावखलं आकसली तसं वाटा अडवलेलं पाणी शेतीवाडीतून वाहू लागलं. बागायतीच्या सखल भागात पाणी साचून केळी, पपयांचे मळे पिवळेफेक होऊन मरून जात. वांगी माना टाकीत. दुधी-पडवळाच्या वेलांची पुरती पानगळ व्हायची. त्यामुळे प्रत्येक पावसाळा म्हणजे गावात कज्जेरगडे आणि शिवीगाळी. कधी कोणी मारामारीवरसुद्धा यायचे. गावकीत प्रकरण जायचं. पण तिथला निवाडा

कोणी मानायचेच नाहीत. वाढणारा गाव आणि जमिनीला आलेलं मोल... माझी जागा... माझं मी बघून घेईन. तू कोण विचारणारा? अशी भांडणं...

''मम्मीऽऽ सीऽ सो मच रेन!'' रिचा व्हरांड्यातल्या रेलिंगवरून हात पुढे करून वरून पडणारं पावसाचं पाणी झेलत ओरडत होती. असा झिम्म पाऊस पाहून ती अगदी खूश झाली होती. मम्मी घरात नसती तर ती एव्हाना अंगणातल्या चिखलपाण्यात उतरली असती...

''रिचाऽऽ प्लीजऽ ओरडू नकोस. तुझा आवाज ऐकून तिकडचा आवाज वाढेल... इकडं पाऊस आणि तिकडं आगीचा वर्षाव...'' जेनी किचनमधून बाहेर येत म्हणाली ''आणि हे काय? पाण्यात खेळतेयस? ताप आला तर? पाणी गार आहे... समजत नाही का तुला?'' रिचाला भिजलेली पाहून ती ओरडली.

''काय गं मम्मा, माझ्यावर कशाला ओरडतीयेस? जरासुद्धा खेळू देत नाहीस मला.'' रिचा पाय आपटीत मम्मीकडे पाहत ओरडली.

''अगं, तुझा खेळ चाललाय, पण तुझा आवाज ऐकून बाजूचा तोफखाना अजून धडाडू लागेल.'' जेनी डायनाआंटीच्या घराकडे नजर टाकीत हळू आवाजात म्हणाली.

थंडगार पाण्याने भिजलेले आपले दोन्ही हात चेहऱ्यावर चोळीत रिचाने विचारले, ''पण आंटी का ओरडत असते सारखी? शी ऑल्वेज क्वारल्स विथ अस... व्हॉटस् रॉंग विथ हर?''

''कसं सांगू तुला? अगं, आपल्या दारातून हे पाणी जातंय ना, ते पुढे आंटीच्या दारात साचून राहतं. कधी घरातही शिरतं त्यांच्या... जुनं घर... त्यात खोलगट जागा ती... आणि पलीकडे त्या बिल्डिंगवाल्यांनी नाला बुजवून घातलेला कंपाउंडचा बांध... राग आपल्यावर काढते ती... जाऊ दे ते... तू आधी आत चल. सगळा फ्रॉक भिजलाय तुझा.'' जेनीने तिला हाताला धरून घरात आणलं.

''मम्मा, आपण पोलिसांना सांगू. ते आंटीला पकडून नेतील. जेलमध्ये टाकतील. मज्जाच होईल मग.. आंटीचा आवाज बंद!.. हो ना?''

''असं नसतं बोलायचं, रिचा...'' आलेलं हसू दाबत जेनी तिला दटावीत म्हणाली.

''मग ते आपल्याला किती बॅड वर्ड्स बोलतात ते? त्या दिवशी जॅक अंकल म्हणाले ना.. ब्यान्...''

‘‘शट अप्, रिचा! तसलं काही ऐकायचं नसतं आणि बोलायचंही नसतं आपण. कपडे बदल. होमवर्क करायचंय अजून...’’

‘‘पण ते आपल्यालाच का बोलतात तसं? तू काहीच रिप्लाय का नाही देत त्यांना? ए मम्मा, ब्यान... म्हणजे काय?’’ रिचाने सहज प्रश्न केला. जेनी दचकली. तिच्या ओठावर हात दाबत ती म्हणाली, ‘‘स्टॉप इट नाऊ, रिचा!’’

‘‘मम्मा, जॅक अंकल म्हणाले तसं...’’

‘‘माय गॉड! काय शिकतेय ही पोरगी...’’ जेनी स्वतःशीच पुटपुटली.

‘‘मम्मी, आंटी पूर्वी मला चॉकलेट्स द्यायची. शी वॉज सच अ नाईस आंटी... आता बोलतसुद्धा नाही माझ्याशी, मी गुड मॉर्निंग केल्यावर...’’ मम्मीच्या अंगाशी येत रिचा म्हणाली.

‘‘येस माय डिअर, शी इज स्टील नाईस लेडी!’’ जेनी तिच्या केसांतून हात फिरवत म्हणाली, ‘‘पण आता ती म्हातारी झालीय ना, त्यामुळे असेल कदाचित, खूप चिडते ती. आपण लक्ष नाही द्यायचं मोठ्या माणसांच्या बडबडीकडे.’’

‘‘तू पण म्हातारी झाल्यावर अशीच बडबड करशील का मम्मा? हाऊ फनी!’’ रिचा टाचा उंचावून टाळी वाजवत ओरडली.

ते ऐकून जेनीला हसू आवरले नाही. पण लगेच गंभीर होत ती म्हणाली, ‘‘रिचू, फार बोलतेस हं तू! अगं म्हातारपण म्हणजे दुसरं बालपणच असतं. त्यात त्यांच्या अंगणात, घरात शिरणारं पाणी आणि जमणारा कचरा, घाण... कसा दोष देणार त्यांना? असतो एकेकाचा स्वभाव.. त्यात शेजारी म्हणून आपणच... सारा राग आपल्यावर...’’ जेनी स्वतःशी बोलल्यासारखी म्हणाली. रिचाला ते काही समजलं नसावं.

‘‘बट आय लाईक रेन! हेवी रेन आला की स्कूलला पण हॉलिडे मिळतो. पावसात खेळायला किती मज्जा येते! उद्या मिळेल का हॉलिडे, मम्मी?’’ रिचाने बाहेर बरसणाऱ्या पावसाकडे बघत विचारलं.

‘‘हॉलिडे मिळाला तरी ऑनलाईन क्लास असणार बरं आणि तुझे हे प्रश्न संपणार कधी? होमवर्कमधील क्वेश्चन्स् कोण सोडवणार? रात्री कार्टून बघत बसते उशिरापर्यंत.. सकाळी जीव जातो माझा तुला उठवताना... कमॉन, लेट्स कम्प्लीट होमवर्क!’’ जेनीने तिला बळेबळे ओढीत स्टडी रूममध्ये आणले. लाईट, फॅन लावला. बॅगेतून तिची पुस्तकं, वह्या काढल्या. “पप्पा पण बसतात ना मॅच बघत, आपण झोपल्यावर?’’ रिचाचा टोकदार प्रश्न. जेनीने काहीच उत्तर दिले नाही. तिने

रिचाकडे डोळे वटारून पाहिले. मग ती वही उघडत म्हणाली, ‘‘सम्स दिली आहेत. ती करायला घे आधी. नंतर एस्से रायटिंग आहे.’’

‘‘पण अजून आंटीचा आवाज ऐकू येतोय. मम्मा, तू जाऊन सांग ना तिला. मला डिस्टर्ब होतंय!’’ रिचा त्राग्याने टेबलवर हात आपटीत म्हणाली.

‘‘होय गं राणी, पण तिच्या तोंडाला कोण लागणार? पप्पा आल्यावर सांगतील बरं जॅक अंकलना..’’ जेनीने उठून खिडक्या बंद केल्या. दरवाजा लावला. बाहेरचा आवाज थोडा कमी झाला. दीर्घ सुस्कारा सोडीत ती रिचाजवळ येऊन बसली.

‘‘पण जॅक अंकल तरी कुठे ऐकतात पप्पांचं? एकदा ते कसे पप्पांना मारायला आले होते! आय वॉज सो स्केअर्ड...’’ रिचा शहारल्यासारखे करीत म्हणाली.

‘‘कुणाचंच ऐकत नाहीत गं ते!’’ जेनी भिंतीवरील येशू-मरियेच्या तसबिरीकडे पाहत हात जोडीत स्वतःशी म्हणाली. ‘‘समझोत्याचे थोडे का प्रयत्न झाले? पण त्यांच्या मनासारखा झाला तरच समझोता.. जुनंपानं कधीचं काढून अडून बसतात.. आमची जमीन तुम्ही खाल्ली म्हणतात.. भांडतात.. सगळं असताना ही अशांती... देवा रे! क्षमा कर... त्यांना आणि आम्हालाही...’’

‘‘आर यू प्रेईंग, मम्मा?’’ रिचाने मान वळवून हळुवारपणे विचारले.

‘‘तेवढाच एक आधार उरला आहे,’’ खिडकीतून दूरवर पाहत जेनी म्हणाली, ‘‘आकाशातला पाऊस. कुठेही पडतो, कसाही पडतो. देवाचं देणं ते... माणसाची झोळी फाटकी... म्हणे, निसर्गावर विजय मिळवला! झोळी भरण्याचा हव्यास सुटत नाही, आणि हे असं सारंच वाहून जातं. वाहतं पाणी... त्याला त्याच्या वाटेने जाऊ दिलं तर ते कशाला तुमच्या घरादारात शिरेल? पाऊसपाण्याला त्याच्या जागेत वाहू द्यावं, मुरू द्यावं... पण नाही, तळी, डबकी, नाले बुजवायचे. कुठेही बिल्डिंगी बांधायच्या... आणि मग हे झगडे... पावसाळ्यात असं तर उन्हाळ्यात पाण्याची बोंब...’’

‘‘मम्माऽ मम्माऽऽ’’ रिचा मम्मीच्या दंडाला धरून हलवत म्हणाली. ‘‘आय ॲम सो सॉरी... आय मेड यू क्राय...’’ गोंधळलेल्या रिचाचे डोळे ओलावले होते.

‘‘नो माय डियर, मला रडवणारी तू नाहीस,’’ रिचाला जवळ ओढून गोंजारीत जेनी म्हणाली, ‘‘आपलीच माणसं पाणी आणतात आपल्या डोळ्यात. प्रत्येक

पावसाळ्यात अंगावर असे शिंतोडे उडतात, बघ. अख्खा गाव पाण्याखाली जातो. पूर्वीसुद्धा असाच पडायचा ना पाऊस, पण तो कधी जीवावर उठत नसे कोणाच्या... आता रस्ते, घरं, शेतं पाण्यात आणि माणसंही एकमेकांच्या उरावर चढायला लागलेली... देवधर्म करणारी माणसं आम्ही... देवळात कसे, देवळाबाहेर असे...''

रिचा बावरून गेली होती. ती पुन्हा जेनीचे दंड हलवत म्हणाली, ''मम्मा, मी तुला आंटीबद्दल काही म्हणजे काहीसुद्धा विचारणार नाही... सॉरी टू हर्ट यू...''

''माझी शाणी रिचू,'' जेनीने तिला आणखी जवळ ओढले. तिच्या गालाचा मुका घेत ती म्हणाली, ''तुझ्यापर्यंत हे आणायलाच नको होतं मी... जाऊ दे ते. आपण जाऊ बाहेर. पाऊस थोडा थांबल्यावर... आवडतं ना तुला त्या मडी पडलमध्ये उड्या मारायला? पेपा पिगसारखं? मी तुला होड्या बनवून देईन. पाण्यात खेळू... थोडं थोडं भिजूया बरं का!'' ती हसत हसत म्हणाली.

''व्वॉव! पप्पांना अजिबात सांगायचं नाही! विल एन्जॉय, मम्मा!! पाऊस त्यासाठीच पडतो ना? कध्धीपासून मी पाण्यात खेळली नाही...'' रिचा हर्षभरीत झाली होती.

''येस्स! पण त्या आधी होमवर्क...!''

# देवाचा शब्द

■ फ्रान्सिस आल्मेडा सर, निर्मळ, वसई

सगळे धर्म आपल्या धर्मग्रंथातील लिखित शब्द हे देवाचे शब्द आहेत असे म्हणतात. बायबल, कुराण आणि इतर सर्व धर्म ग्रंथांची भाषा अशीच असते की, तिच्यात कोणताही बदल होऊ शकत नाही. त्यामधील सर्व शब्द हे देवाकडून किंवा देवाच्या प्रेरणेने आलेले आहेत असे मानल्यामुळे ते पवित्र असून त्यामध्ये कोणतीही चूक असू शकत नाही म्हणून कोणताही बदल देखील करता येत नाही. प्रत्येक धर्मग्रंथांची भाषा मात्र ज्या ठिकाणी आणि ज्या काळात धर्माची स्थापना झाली त्या स्थळ काळातील भाषाच असते. देव एकच असला तरीही तो तेथील लोकांना समजावे म्हणून वेगवेगळ्या भाषेत बोलत असेल हे शक्य आहे परंतु त्यातील विचार मात्र वेगवेगळे का असावेत हा प्रश्न आहे.

धर्मग्रंथांमध्ये ज्या गोष्टींची चर्चा केलेली असते त्यामध्ये मानवाला पडणाऱ्या मूलभूत प्रश्नांची उत्तरे असतात. हे विश्व कसे निर्माण झाले? सृष्टीची रचना कशी व कोणी केली? सृष्टीतील वेगवेगळ्या घटना कशा घडतात? सजीव सृष्टी आणि मानवाची निर्मिती कशी आणि का झाली? या प्रश्नांच्या उत्तरात देव हा कर्ता असतो. मानव ही त्याची सर्वश्रेष्ठ कृती असते. अर्थात देव जरी कर्ता असला तरी, या प्रश्नांची उत्तरे ही त्यावेळी प्रचलित असलेली माहिती आणि मानवी कल्पना यांच्या आधारे दिलेली दिसतात. काही धर्मग्रंथ सृष्टीमधील जीवन चक्र एका योनीतून दुसऱ्या योनीमध्ये जाण्याचे वर्णन करतात. त्यामुळे सर्व सजीव सृष्टी ही एक आहे हे दाखवले जाते आणि आज मानव असलेला प्राणी उद्या दुसऱ्या प्राण्यांमध्ये किंवा वनस्पतीमध्ये जाऊ शकतो. त्यामुळे सर्व सृष्टीबद्दल आत्मीयता निर्माण होऊ शकते. यातूनच पूर्व जन्माच्या पाप-

पुण्याच्या कल्पना मांडता येतात. अर्थात सृष्टीची निर्मिती किंवा पूर्वजन्माची कल्पना या सर्व आधार नसलेल्या काल्पनिक गोष्टी आहेत.

देवाचा शब्द म्हणून धर्मग्रंथामध्ये काही नीतीतत्वे देखील दिलेली असतात. यामधील काही नीतितत्वे सर्व मानवजातीला उपयोगी पडतील अशी असतात, उदाहरणार्थ एकमेकांवर प्रेम करणे, शेजाऱ्यावर प्रेम करणे, अडचणीत असलेल्यांना मदत करणे वगैरे. काही नीतितत्वे मात्र स्थळकाळाशी संबंधित असतात. एका पुरुषांनी अनेक स्त्रियांशी लग्न करणे किंवा एका स्त्रीने अनेक पुरुषांशी लग्न करणे काही ठिकाणी प्रचलित आहे. काय खावे प्यावे, कसे कपडे परिधान करावेत याविषयी वेगवेगळी नितीतत्वे वेगवेगळ्या धर्मात आहेत. ही सर्व नितीतत्वे लोकांना एकमेकांशी बांधून ठेवण्यासाठी व समाजाची धारणा घडवून आणण्यासाठी त्या त्या काळात उपयोगी ठरली असावीत. ही भाषादेखील त्यावेळच्या जाणत्या लोकांची भाषा होती, ती देखील देवाची भाषा नव्हे.

धर्मग्रंथ हे आपल्याला आजाराच्या आणि संकटांच्या भीतीपासून मुक्त करण्याचे आश्वासन देतात. पूर्ण विश्वास ठेवला असता श्रद्धेमुळे तुम्ही बरे व्हाल किंवा संकटमुक्त व्हाल असे सांगितले जाते. अर्थात ह्या आश्वासनावर शंका घेतली तर त्यांचा परिणाम होत नाही ही अट असते. त्यामुळे खरेखोटे काहीच तपासता येत नाही. आणखी एक गोष्ट म्हणजे धर्मग्रंथ आत्म्याचे अमरत्व किंवा पुनर्जन्म आणि शेवटी मोक्ष याबद्दलही आश्वासन देतात. या सर्व गोष्टी लोकांना सभोवतालच्या अस्थीर परिस्थितीमध्ये धीर देतात. मृत्यूची भीती कमी करतात. परंतु त्यांच्यातील सत्यता पडताळून पाहता येत नाही. तसेच सगळ्या धर्मांमध्ये या आश्वासनांविषयी एक वाक्यता आढळत नाही. त्यामुळे धर्मग्रंथ हे देवाची भाषा असे समजणे तर्काला पटत नाही.

देवाचा शब्द किंवा देवाची खरी भाषा कोणती? एखाद्या चित्रकाराला त्याच्या चित्रावरून, संगीतकाराला त्याच्या संगीतावरून आणि शिल्पकाराला त्याच्या शिल्पकृतीवरून आपण ओळखतो आणि समजून घेऊ शकतो. तसेच देवाला समजण्यासाठी त्याने निर्माण केलेली चराचर सृष्टी समजून घेणे आवश्यक आहे. ही ईश्वरनिर्मित सृष्टी समजून घेण्याचे काम विज्ञान करते त्यामुळे विज्ञानाची भाषा हीच

खरी देवाची भाषा होय. ती भाषा जगभरातील विज्ञान जाणणाऱ्या सगळ्यांना समजते. तसेच त्या भाषेचा उपयोग करून मानवाच्या सुखात भर घालता येते. पाण्यात पदार्थ का तरंगतो हे आर्किमिडीजने समजून घेतले आणि तरंगणाऱ्या पदार्थाचा नियम तयार केला, त्यामुळे आपल्याला समुद्रावरून प्रवास करता येणे शक्य झाले. झाडावरून खाली पडणारे फळ, पृथ्वीभोवती फिरणारा चंद्र आणि सूर्याभोवती फिरणारी पृथ्वी या सगळ्यांना जोडणारे गुरुत्वीय बळ न्यूटनने समजून घेतले. त्या गुरुत्वाकर्षणाचा नियम वापरून आपण पृथ्वीच्या बाहेर अवकाशात जाऊ शकलो. सूर्यमालेचे रहस्य समजून घेऊ शकलो. सूक्ष्म जीवजंतूच्या संशोधनातून पाश्चर व जेन्नर सारख्या शास्त्रज्ञांनी रोगावरील उपाय आणि प्रतिबंधक लसी शोधल्या. देवाची भाषा समजून घेण्यातील सामर्थ्य विज्ञानामुळे आपल्याला कळले.

निसर्गातील विविध गोष्टीचा अभ्यास करून देवाची भाषा समजून घेणारे आणि त्याचा उपयोग करायला शिकवणारे शास्त्रज्ञ ही खरंच देवाची माणसे आहेत. जगात पाण्याची वाफ होत होती परंतु त्या वाफेवर चालणारे इंजिन तयार करून त्याला माणसाच्या सेवेसाठी वापरणे ही गोष्ट विज्ञानाने शक्य केली. विज्ञानपूर्व काळात माणसे इतर प्राण्यांचा उपयोग आपली कामे करून घेण्यासाठी करीत होती. शेती करण्यासाठी बैल, दुधासाठी गाय-म्हैस, प्रवासासाठी घोडा इत्यादी प्राणी वापरले जात होते. विज्ञानाने निर्जीव वाफेचे इंजिन कामाला लावले. नंतर पेट्रोलवर चालणारे इंजिन आले. विजेचा शोध लागल्यावर विजेवर चालणारी मोटार आली. विजेचे दिवे आले. विविध प्रकारची यंत्रे विजेच्या साह्याने चालवता येऊ लागली. वैज्ञानिकांनी अखंड अभ्यास करून देवाची भाषा अधिकाधिक समजून घेतली, सृष्टी वाचली आणि त्या भाषेचा उपयोग करून मानवाचे सामर्थ्य कैक पटीने वाढवले. म्हणून वैज्ञानिक हेच खरे तपश्चर्या करणारे ऋषी व संत आहेत.

धर्म संस्थापक किंवा धर्माचे आचरण करणारे संत यांची आपण पूजा प्रार्थना करतो. त्यांच्याकडे सुखसमृद्धी आरोग्य मागतो. देवाचा कोप झाल्याने आजार येतात म्हणून त्याला बळी देणे, त्याची पूजा करणे, भजन पूजन करणे हे हजारो वर्षे आपण करीत आलो. परंतु त्यामुळे रोगराई नाहीशी झाली नाही, आपले आयुर्मान वाढले नाही,

जीवनात सुखसमृद्धी आली नाही. परंतु वैज्ञानिकांनी सर्व चराचर सृष्टीचा अभ्यास सुरू केला आणि सर्व आजार व संकटे यावर मार्ग सापडू लागले, सुखसमृद्धीची साधने निर्माण झाली. हजारो वर्षाच्या पूजा-प्रार्थनेने ज्या गोष्टी शक्य झाल्या नाहीत, त्या विज्ञानाने शक्य करून दाखवल्या. केवळ जमिनीवरूनच नव्हे, तर समुद्राच्या पाण्यावरून आणि समुद्राच्या पाण्याखालून प्रवास, आकाशातून प्रवास आणि आकाशापलीकडे प्रवास विज्ञानामुळे शक्य झाला. या सर्व गोष्टीसाठी देवाची विज्ञानाने शिकवलेली भाषाच समजून घ्यायला हवी. शास्त्रज्ञांची पूजा अर्चा किंवा भक्ती करायची गरज नाही तर त्यांनी शोधून काढलेली भाषा अभ्यासून आपल्याला सुखी होता येते. डॉक्टर विज्ञानाच्या भाषेचा अभ्यास करून आरोग्यासंबंधी ज्ञान मिळवतात आणि आपल्याला बरे करण्यासाठी वापरतात. तंत्रज्ञ विज्ञानाच्या अभ्यासातूनच वेगवेगळी यंत्रे उपकरणे तयार करतात आणि आपल्या सुखसमृद्धीत भर घालतात. विज्ञानाची भाषा शोधणारे शास्त्रज्ञ हे खरे संत आणि त्याचा अभ्यास करून मानवाला सुखी करणारे हेच आधुनिक काळातील ऋषीमुनी होय.

विज्ञानाने निर्जीव सृष्टीला देखील सजीव प्राण्यांप्रमाणे काम करायला लावले आहे. वाफेच्या इंजिनापासून विजेच्या यंत्रापर्यंत सर्व निर्जीव उपकरणे आपल्याला सजीवांसारखी मदत करतात. आता कम्प्युटरच्या रूपाने, केवळ आपली शारीरिक कामेच नव्हे तर मानसिक कामे देखील निर्जीव पदार्थाकडून होऊ लागली आहेत. लेखन-वाचन करणे, गणिते सोडवणे, चित्र काढणे व संगीत तयार करणे अशी कामे तर कम्प्युटर करतेच, परंतु आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने आपल्यासारखा विचारदेखील करायला कॉम्प्युटरला शिकवले आहे. सर्व चराचर सृष्टी हीच देवाचे रूप आहे. त्याची वेगळी भाषा नाही. त्यासाठी देवाची वेगळी आराधना करण्याची गरज नाही. सर्व सृष्टीचे, आपल्या मानवासह अस्तित्व म्हणजेच देव आहे. आपल्यामधील दैवी सामर्थ्याने देवाचे सर्वसृष्टीतील कर्तृत्व समजून घेणे हीच देवाची खरी आराधना होय!

# समाजाचे मेंढपाळ

■ फादर मायकल जी. (९३२६४३३४८७)

'संजाछाया' नावाचं प्रशांत दळवींचं एक नाटक. सध्या ते मुंबईमध्ये व्यावसायिक रंगभूमीवर खूप गाजत आहे. त्याचा प्रयोग मी दोनदा पाहिला. ती एका रिटायर्ड निवृत्त जोडप्याची कथा आहे. ते आपला वेळ केवळ मुलांच्या संसारात न घालवता आपले स्वतंत्र विश्व निर्माण करतात. समाजाच्या 'संसारा'त काहीतरी सेवा देता येईल, या दृष्टीने ते मुले देशापरदेशात गेल्यावर रिकामी झालेले आपलं घर एक कार्यालय बनवतात. त्या ठिकाणी अनेक क्षेत्रात तज्ञ म्हणून प्रसिध्द पावलेले, पण आता निवृत्त झालेले बुजुर्ग लोक स्वखुषीने येऊन बसतात. ते गरजूंना आपापल्या अनुभवानुसार मोफत मार्गदर्शन करतात. संज्या तर मंत्रालयातील समस्यांवर अचूक मार्गदर्शन करतो.

आज राजकीय पक्ष केवळ एकमेकांवर 'खोक्या'च्या विषयावर हल्ला करत बसले असताना हे 'संजा-छाया'चे बुजुर्ग बेकारी, भूकबळी, जातीयवाद, अन्यायाला बळी पडलेली कुटुंबे, दिशाहीन तरूण ह्यावर समाजाचे दिशादर्शक बनतात.

आजच्या धूर्त आणि स्वार्थी समाजात ते अनेक गरीब नि अशिक्षित जनतेला मोठा आधार देतात. कार्यालयाला समर्पक असे नाव दिले आहे: HAPPINESS CENTRE. माझ्या मनात आले, हेच खरे समाजाचे 'उत्तम मेंढपाळ' आहेत. समाजाला मेंढपाळांची गरज आहे; धार्मिक, सामाजिक तसेच राजकीय क्षेत्रात समाजाला उत्तम मेंढपाळांची गरज आहे.

बायबलमध्ये मेंढपाळाची कल्पना फार अधोरेखित केली आहे. आपल्या मेंढरांची आत्मीयतेने, डोळ्यात तेल घालून काळजी घेणारा तो खरा मेंढपाळ! ख्रिस्त स्वत:ला आपल्या प्रजेचा 'उत्तम मेंढपाळ' म्हणवून घेतो आणि प्रजेची लूट करणाऱ्या नियुक्त

मेंढपाळांची खरडपट्टी काढतो -अगदी पुरोहितांचीदेखील ! (योहान १०.११-१८) येशू दाखवून देतो की मेंढपाळच मेंढरांची लूट करणारे ‘लूटारू’ बनले आहेत!

## जोसेफ, येशूचा मेंढपाळ

बायबल येशूची जडणघडण करणारा त्याचा बाप जोसेफ एक उत्तम कुटुंब-मेंढपाळ म्हणून सादर करते. त्याची नीट कल्पना येण्यासाठी एक उदाहरण देतो. मला एका विवाहित जोडप्याचं सिक्रेट माहित आहे. त्यांच्या लग्नाला आता पन्नास वर्षे होत आहेत, गोल्डन जुबिली साजरी होत आहे. त्यांचा तो प्रेमविवाह होता. नॉर्बर्ट आणि सविता अशा त्या जोडप्याची नावे आहेत.

लग्नाच्या आधी दोघांचं खूप प्रेम होतं. लग्नाची तारीखसुद्धा ठरली होती. तेवढ्यात सविता ही मुंबई महानगरपालिकेमध्ये शिक्षिका असल्या कारणाने बदलींची धामधूम सुरू झाली. ज्यांच्या बदल्या आहेत त्यांच्यासाठी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याने मुंबईच्या एका आलीशान हॉटेलमध्ये त्यांना मुलाखतीसाठी बोलावले. सावधगिरीने सविता आपल्या एका मैत्रिणीला घेऊन गेली. परंतु प्रत्यक्ष मुलाखतीसाठी तिला अधिकाऱ्यांच्या खोलीत एकटीने जावे लागले आणि तिथे अनर्थ घडला. तिच्यावर बलात्कार झाला! त्याने ती एवढी खलास झाली की परत येताना विरार लोकल भाईंदरच्या पुलावर येताच ती त्यामध्ये उडी टाकायला धावली! केवळ मैत्रिणीने तिला मागे खेचले म्हणून ती वाचली!

त्या मैत्रिणीने सविताचा जोडीदार नॉर्बर्ट ह्याला सगळी कथा वर्णन केली. त्यावर तो म्हणाला, “मला सविताचे प्रेम आहे माहित आहे. हा एक अपघात घडला आहे. त्याला मी जास्त महत्त्व देत नाही. ठरलेल्या दिवशी आमचं लग्न होणारच!" आणि झालंच तसं! आज त्याला पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. त्या बलात्कारापासून तिला झालेला त्यांचा पहिला मुलगा आज सेमिनरीमध्ये धर्मगुरूचे प्रशिक्षण घेत आहे!

तुम्ही विचाराल, “ही सत्य घटना आहे?” मी म्हणेन, “का? संशय येतो?” येणारच. आजच्या कलीयुगात असले सतपुरूष कुठे दिसतात? जोसेफ आणि मरिया हेदेखील एक तरुण जोडपं होतं. लवकरच ते विवाहबद्ध होणार होते आणि

चारचौघांसारखं सामान्य माणसाचं वैवाहिक जीवन जगणार होते. तेवढ्यात बलात्कार नाही पण मरियेच्या जीवनात पवित्र आत्म्याचा शिरकाव झाला आणि ती गर्भार राहिली. बातमी पसरली;

ती जोसेफपर्यंत पोहोचली. त्याने मारियेला गुपचूप सोडून देण्याचा विचार केला; पण देवदूताने त्याला ती बदफैली नसल्याचे सत्य सांगितले आणि जोसेफने गर्भार मरियेचा त्याने स्वीकार केला. तिचा आणि येशूबाळाचा सांभाळ केला. त्याने असे एक सुरक्षित आणि सुसंस्कृत कौटुंबिक वातावरण निर्माण केलं की ज्यामध्ये येशू ‘शरीराने नि ज्ञानाने’ मोठा होत गेला (लूक २.४०). म्हणून त्याला गावामध्ये जोसेफच्या कामधंद्यावरून 'सुताराचा मुलगा' असंच ओळखलं जात असे. जोसेफ हा एक कौटुंबिक मेंढपाळ होता. त्याने येशूवर एवढे चांगले संस्कार केले की तो पुढे स्वत: सबंध जगाचा एक उत्तम मेंढपाळ झाला आणि आपल्या शिष्यांसमोर त्याने 'उत्तम मेंढपाळा'ची आदर्शवत कल्पना मांडली.

**धार्मिक मेंढपाळ.**

येशू म्हणतो, “ मी उत्तम मेंढपाळ आहे." हा मेंढपाळ मेंढवाड्यामध्ये आपल्या मेंढरांना आपल्या मांडीवर, छातीशी कुरवाळत बसत नाही; तर तो वाट चुकलेल्या मेंढराच्या शोधात रानावनात फिरतो, काटा-कुटयात अडकलेली मेंढरे सोडवतो, त्यांना आपल्या खांद्यावर घेऊन घरी परत येतो आणि त्यांची ‘घरवापसी’ साजरी करतो! आपले जीवनध्येय जाहीर करताना तो म्हणतो, "मी धरून नेलेल्यांना सोडवण्यासाठी आलो आहे.” (लूक ४.१८ ). येशूच्या पावलावर पाऊल ठेवून आम्ही धर्मगुरूंदेखील उत्तम मेंढपाळ बनतो. मी एक फादर ह्या नात्याने फक्त चर्चमध्ये सुसज्ज अशा खोलीत बसून 'मेंढरां'ची वाट बघत बसणार नाही तर त्यांच्या शोधात जाईन. पालघर जिल्यातील डहाणू तालुक्यातील धावरली गावात मुंबई वडोदरा द्रुतगती महामार्गाचे काम चालू आहे. गेल्या आठवड्यात ते तेथील आदिवासी शेतकऱ्यांच्या झोपड्या पोलिसांनी जेसीपी लावून उखडून काढल्या आणि बायका मुलांना रस्त्यावर फेकले! सर्वत्र आक्रोश झाला. त्याची एक व्हिडिओ क्लिप एका यूटयूब न्यूज सर्विसने

व्हायरल केली आहे. मी ती व्हिडिओ क्लिप बिशपांना पाठवली आणि प्रश्न केला: ह्या गरीब शेतकारी-आदिवाशांच्या झगड्यात ख्रिस्तसभा कुठे आहे? मला वाटलं की 'समाजशुध्दी अभियान'तर्फे त्या ठिकाणी जावं, अधिकाऱ्यांची भेट घ्यावी आणि ह्या भूमिपुत्रांच्या वडीलोपार्जित झोपड्या उखडून टाकून त्यांना त्यांच्याच जंगलामधून आपण हद्दपार कसे करू शकता? निदान त्यांना पर्यायी जागा द्या, मोबदला द्या!' कोणी मेंढपाळाने असा आवाज उठवावा!

आज मी जर ख्रिस्तासारखा 'मेंढपाळ' होऊ इच्छित असेन तर जे अन्यायाचे बळी ठरले आहेत त्यांची बाजू घेऊन फादर स्टॅन स्वामीप्रमाणे भूमिका घेतली पाहिजे. केवळ देवळात बसून पूजाअर्चा करून, अन्नछत्र चालवून, केवळ अध्यात्मिक दिलासा देऊन भागणार नाही. त्यासाठी होय वास्तविक आम्ही प्रत्येकाने कळकळीचे 'मेंढपाळ' बनण्याची गरज आहे. परवा मी एक पालक पाहिला. त्याचा मुलगा आज २३ वर्षांचा आहे. त्याने भविष्यासाठी तयारी करावी, परीक्षा द्याव्यात; पण त्याऐवजी तो फक्त मोबाईलवर खेळत बसतो! त्या मुलाला मार्गावर कसे लावावे, ह्या विवंचनेत तो पालक-मेंढपाळ आहे!

# इजिप्तचे पिरॅमिड्स –
## अजब संस्कृतीचा एक अवाढव्य वारसा.

**■ ज्युलियस (दीपक) मच्याडो, पाली, वसई**

**मो. ९९६७२३८६११**

**ई-मेल : deepak.machado@yahoo.com**

जगातील अनेक ऐतिहासिक आश्चर्यापैकी एक म्हणजे इजिप्त मधील पिरॅमिड्स. इस्त्राएल, जॉर्डन इत्यादी देशांत गेलेल्या पर्यटकांची इजिप्त वारी ही क्रमप्राप्तच असते. इजिप्तमधील पिरॅमिड्स ही प्राचीन मनुष्यजातीच्या कल्पकची प्रतीके आहेत. इजिप्तच्या फारोंचा (इजिप्तचे त्याकाळचे राजे ह्यांना फारो -किंवा फॅरो -म्हणत) असा दृढ विश्वास होता की मृत्युपश्चात जीवन आहे. फारोना नंतरच्या जीवनात देव बनण्याची अपेक्षा होती. पुढील जगाची तयारी करण्यासाठी त्यांनी देवतांची मंदिरे आणि स्वत:साठी भव्य पिरॅमिड थडगे उभारले; प्रत्येक शासकाला पुढील जगात मार्गदर्शन आणि स्वतःला टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टींनी भरलेले! म्हणूनच त्यांच्या मर्त्य शरीरांची विल्हेवाट न लावता त्याची "ममी" (माणसाचे शरीर हजारो वर्षे शाबूत राहण्यासाठी केलेली प्रक्रिया) बनवून ते पिरॅमिडसारख्या एका अतूट अशा संरचनेत  ठेवत असत. फारो यांना आयुष्यात दैवतासमान सन्मानाचे स्थान असायचे आणि फारोच्या मरणानंतर तो ओसायरिस, (Osiris) म्हणजे मृतांचा राजा बनतो असा इजिप्शियन लोकांचा विश्वास होता. पिरॅमिडमध्ये मृत शरीर ठेवून त्याचा सन्मान केला नाही तर मरणोत्तर जीवनात त्याचा प्रवेश होऊ शकणार नाही आणि इजिप्त देशावर कोप होऊन विनाश होईल अशी भावना होती. म्हणून पिरॅमिडमध्ये फक्त फारोचे मृत शरीरच  नव्हे तर त्याच्या “उदरनिर्वाहाची” साधने, जशी सोनं, खाद्य पदार्थ, आसन व्यवस्था याचीही सोय करीत असत.

**पिरॅमिड्स - जगातील सर्वात अवाढव्य अशा बांधकाम संरचना**

इजिप्तमध्ये १०० पेक्षा अधिक अशी पिरॅमिड आहेत पण त्यातील सर्वात लोकप्रिय ही गिझा इथे आहेत. गिझाच्या लोकप्रियतेचे एक प्रमुख कारण म्हणजे ते पिरॅमिड्स आजही जगातील सर्वात अवाढव्य अशा बांधकाम संरचना आहेत. (त्यांना इमारत



म्हणून संबोधणे योग्य नाही म्हणून) यातील खुफू हे सर्वात मोठे पिरॅमिड. ४८० फूट उंच असलेले, म्हणजेच जवळजवळ ४० मजले इतक्या उंचीचे हे पिरॅमिड बांधण्यासाठी पंधरा ते वीस वर्ष लागली असावीत असा इतिहासकारांचा अंदाज आहे. एका पिरॅमिडच्या बांधकामासाठी जवळजवळ वीस ते तीस हजार कामगार लागले असावेत. हे पिरॅमिड इसवी सनापूर्वी २५०० च्या सुमारास बांधण्यात आले. फारो बरोबर त्याच्या राणी साठी देखील अलग विभाग येथे बनवण्यात आलेला आहे. यांच्या अभियांत्रिकीच्या कौशल्याची एक झलक म्हणजे इतके अजस्त्र बांधकाम असून देखील चारी बाजूचे माप समान आहे आणि ह्या भागांचे  जमिनी जवळील मध्य बिंदू होकायंत्राच्या चार मुख्य बिंदूंकडे अचूकपणे केंद्रित आहेत.  (दिशांच्या अचूक रेषेत आहेत). त्रिघाती आकाराच्या कोरलेल्या चुनखडीच्या वीस लाख पाषाण शीला ह्याच्या बांधकामासाठी लागल्या असतील असा अंदाज आहे.

प्राचीन इजिप्शियन संस्कृतीमध्ये प्रतीकवाद आणि परंपरा ह्यांना महत्वाचे स्थान होते. ह्या कारणास्तव बहुतेक पिरॅमिड नाईल नदीच्या च्या पश्चिमेला बांधले गेले होते. पिरॅमिड्स ही फारोची अंतिम विश्रांतीची ठिकाणे असल्याने, त्यांचे आत्मे मृत्यूनंतरच्या जीवनात त्यांचा प्रवास सुखरूप करू शकतील अशा ठिकाणी त्यांनी वास्तव्य केले पाहिजे असा अर्थ आहे. प्राचीन इजिप्शियन लोकांसाठी, मरणोत्तर जीवन आणि सूर्य एकमेकांशी जोडलेले होते. त्यांचा मृतांचा देव ओसायरिस, हा सूर्याच्या चक्राशी जोडला गेला आहे. मावळणारा सूर्य मृत्यूचे प्रतीक म्हणून गणले जाते.  सूर्य प्रत्येक रात्री पश्चिमेला मारतो आणि शाश्वत जीवनाचे प्रतीक, म्हणून सकाळी तो पुन्हा उगवतो तसेच

फारोंचे आत्मे पटकन मावळत्या सूर्याशी जोडले जावेत आणि ते सकाळी पुनरुत्थित व्हावेत म्हणून नाईल नदीच्या पश्चिमेला ही विश्रामस्थाने आहेत.

**पिरॅमिड्स ची गुण-वैशिष्ट्ये**

फारो खुफूने पहिला गिझा पिरॅमिड प्रकल्प इ.स.पु. २५५० च्या सुमारास सुरू केला. त्याचा "ग्रेट पिरॅमिड" हा गिझामधील सर्वात मोठा आहे. त्याच्या बाजू ५२ च्या कोनात वर जातात. ग्रेट पिरॅमिडचा गाभा पिवळसर चुनखडीच्या दगडी शिलानी बनलेला आहे.



बाहेरील आवरण (आता जवळजवळ पूर्णपणे नाहीसे झाले आहे) आणि आतील पॅसेज हलक्या रंगाच्या चुनखडीचे आहेत आणि आतील दफन कक्ष ग्रॅनाइटच्या प्रचंड ब्लॉक्सने बांधलेला आहे. ५,७५ दशलक्ष टनांची रचना तयार करण्यासाठी सुमारे २.३ दशलक्ष दगडांचे ब्लॉक्स कापले गेले, वाहून नेले गेले आणि एकत्र केले गेले, जे तांत्रिक कौशल्य आणि अभियांत्रिकी क्षमतेचा उत्कृष्ट नमुना आहे. अंतर्गत भिंती तसेच बाहेरील दगड जे अजूनही जागेवर आहेत ते प्राचीन इजिप्तमध्ये बांधलेल्या इतर कोणत्याही दगडी बांधकामापेक्षा बारीक सांधे दर्शवतात.




खुफूचा मुलगा फारो खफरे याने ई. स. पू. २५२० साली गीझा येथे दुसरा पिरॅमिड बांधला. त्या मध्ये स्फिंक्स, म्हणजेच सिंहाचे शरीर

आणि फारोचे डोके असलेले एक रहस्यमय चुनखडीचे स्मारक देखील समाविष्ट होते. स्फिंक्स ची उभारणी फारोच्या संपूर्ण थडग्याच्या संकुलासाठी एक संरक्षक म्हणून केली असावी असे अनुमान आहे. गिझा पिरॅमिड्स पैकी तिसरा पिरॅमिड पहिल्या दोन पिरॅमिडपेक्षा

खूपच लहान आहे. हा सुमारे ई. स. पू. २४९० साली फारो मेनकौरेने बांधलेला आहे. प्रत्येक भव्य पिरॅमिड हा महाल, मंदिरे, सौर नौका ठेवण्यासाठी खड्डे आणि इतर वैशिष्ट्यांसह असलेल्या एका मोठ्या संकुलाचा एक भाग असायचा. ह्या सौर नौका किंवा जहाजे ठेवण्यामागे उद्देश पुनरुत्थान झालेल्या राजाला त्यात बसून सूर्य देवा कडे प्रयाण करावे असा होता. सर्वात प्रसिद्ध सौर जहाज, निःसंशयपणे, ग्रेट पिरॅमिडच्या पायरीवर सापडलेले, आज खुफू जहाज म्हणून ओळखले जाते. खुफूचे सौर जहाज हे प्राचीन इजिप्तमधील ४३ मीटर लांबीचे जहाज आहे जे सुमारे इ.स.पु. २५०० मध्ये गीझाच्या महान पिरॅमिडच्या पायथ्याशी खंदकात पुरले होते. हे बहुधा इजिप्तच्या जुन्या राज्याच्या चौथ्या राजवंशातील दुसरे फारो चेप्स साठी बांधले गेले होते. १९५४ मध्ये कमल अल-मल्लाख यांनी याचा शोध लावला होता. त्यानंतर ह्या जहाजाची जोडणी करून ते इजिप्शियन म्युझियममध्ये प्रदर्शनासाठी ठेवण्यात आले आहे.

**मौल्यवान आणि ऐतिहासिक वस्तूंचा खजिना**

फारो जोसेरच्या काळापासून (सुमारे इ.स.पु. २६३० ते २६११ पर्यंत) ते अहमोस, (सुमारे इ.स.पु. १५५०) पिरॅमिड्स हे इजिप्शियन फारोंची समाधी म्हणून वापरले जात होते. यापैकी बहुतेक पिरॅमिड शतकांपूर्वी लुटले गेले होते, परंतु काही राजेशाही थडगी अबाधित राहिली आहेत आणि त्यांच्या मुळे ह्या थडग्यांत काय काय असू शकते ह्याचा बोध होतो. राजकुमारी नेफेरुप्ता (इ.स.पु. १८००) हीस कैरोच्या दक्षिणेस सुमारे १०० किलोमीटर अंतरावर हवारा येथे पिरॅमिडमध्ये पुरण्यात आले. तिच्या दफन कक्षाचे १९५६ मध्ये जेव्हा उत्खनन करण्यात आले तेव्हा मातीची भांडी, शवपेटींचा एक संच, काही सोनेरी वैयक्तिक अलंकार आणि मृतांचा देव ओसायरिसशी तिची ओळख पटवणारा राजेशाही चिन्हांचा संच होता. राजा होर (इसपु १७५०) याच्याही थडग्यात तश्याच वस्तू होत्या. संशोधक ग्राजेत्स्की म्हणतात "होर याचे शरीर तागात गुंडाळलेले होते, आंतरिक अवयव, कॅनोपिक जार ज्याला म्हणतात अशा विशेष कंटेनरमध्ये ठेवले होते, आणि त्याचा चेहरा ममी मास्कने झाकलेला होता." खुफू (महान पिरॅमिड बांधणारा फारो) ची आई राणी हेतेफेरेसची कबर थोडी अधिक विस्तृत आहे. गीझा येथे बांधलेल्या या थडग्यात एक पलंग आणि दोन खुर्च्या होत्या ज्या सोन्याने सजवल्या होत्या, तसेच मातीची भांडी आणि तांब्याची उपकरणे होती. राजा सेखेमखेतचा साक्कारा येथील अपूर्ण पिरॅमिडचा (इ.स.पु. २६११ ) थडगे लुटारूंपासून बचावला होता. राजाची शवपेटी रिकामी होती परंतु पुरातत्वशास्त्रज्ञांना एका कॉरिडॉरमध्ये २१ सोन्याच्या बांगड्या, एक सोन्याची कांडी किंवा राजदंड आणि सोन्याच्या दागिन्यांच्या विविध वस्तू सापडल्या.



पिरॅमिड्स मुळे प्राचीन इजिप्तच्या स्थापत्यशास्त्राची ओळखच करून देत नाही तर या सुशोभित थडग्यांमध्ये प्राचीन इजिप्तमधील जीवनाच्या प्रत्येक पैलूची अद्भुत प्रचिती येते. समाधी मधील कलांमधून प्राचीन शेतकऱ्यांचे त्यांच्या शेतात काम करणे आणि पशुधन सांभाळणे, मासेमारी आणि पक्षीपालन, सुतारकाम, पोशाख, धार्मिक विधी आणि दफन पद्धती ह्याचे दर्शन होते. शिलालेख आणि मजकूर इजिप्शियन व्याकरण आणि भाषेच्या संशोधनास मदत करतात. संशोधक डेर मॅन्युलियन म्हणतात, "फॅरोनिक सभ्यतेबद्दल तुम्हाला अभ्यास करायचा असलेला जवळजवळ कोणताही विषय गिझा येथील थडग्याच्या भिंतींवर उपलब्ध आहे."

**अचंबित करणारी अभियांत्रिकी आणि स्थापत्यकला**

इजिप्तचे पिरॅमिड हे अभियांत्रिकी आणि स्थापत्यकलेचे आश्चर्यकारक नमुने आहेत. शतकानुशतके, ते कसे बांधले गेले याबद्दल अनेक सिद्धांत आणि गृहीतके आहेत, परंतु कोणतेही निश्चित उत्तर नाही. तथापि, विविध स्त्रोतांकडून मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे, त्यांची संभाव्य बांधकाम पद्धती आणि तंत्रांबद्दल अनुमान केले गेले आहेत. पिरॅमिड बनवण्याच्या मुख्य आव्हानांपैकी एक म्हणजे मुख्य सामग्री म्हणून वापरल्या जाणाऱ्या मोठ्या दगडांच्या ब्लॉक्सची वाहतूक करणे आणि उचलणे. काही सुत्रां नुसार, दगड जवळच्या ठिकाणांवरून किंवा नाईल नदीच्या पलीकडून उत्खनन केले गेले आणि नंतर घर्षण कमी करण्यासाठी ओल्या वाळू किंवा चिकणमातीवर लाकडी स्लेज किंवा लॉगवर ओढले किंवा पलटवून नेले. तांब्याच्या छिन्नी आणि दगडी हातोड्यांचा वापर करून काही दगड कापले गेले आणि अचूकपणे एकत्र बसण्यासाठी आकार दिला गेला.

आणखी एक आव्हान म्हणजे इच्छित उंचीपर्यंत दगड चढवण्यास आणि त्यांना अचूकपणे ठेवण्यास रॅम्प (चढीचा रस्ता) तयार करणे. रॅम्पचा आकार आणि स्थान, जसे की सरळ, किंवा वळणावळणाचा आणि ते पिरॅमिडच्या आत किंवा बाहेर बांधले गेले होते याबद्दल भिन्न सिद्धांत आहेत. उत्खनन स्थळावरील अलीकडील शोधावरून

असे सूचित होते की प्राचीन इजिप्शियन लोकांनी एक उंच आणि प्रभावी उतार तयार करण्यासाठी लाकडी चौकटी आणि पायऱ्या असलेली दोरी आणि पुली प्रणाली वापरली होती. प्राचीन इजिप्शियन लोकांनी पिरॅमिडचे इष्टतम स्थान आणि आराखडा निश्चित करण्यासाठी खगोलशास्त्रीय निरीक्षणे आणि गणिती गणना वापरली. संरचनेची अचूकता आणि स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी त्यांनी प्लंब बॉब, लेव्हल्स आणि स्क्वेअर यासारखी साधी साधने देखील वापरली.

इजिप्तचे पिरॅमिड्स ही मानवी सर्जनशीलता आणि कल्पकतेची उल्लेखनीय उदाहरणे आहेत आणि ती हजारो वर्षांचा काळ आणि नैसर्गिक ऱ्हास ह्याच्या कसोटीवर टिकून आहेत. त्यांचा अजूनही पुरातत्वशास्त्रज्ञ, इतिहासकार आणि शास्त्रज्ञांद्वारे अभ्यास आणि शोध घेतला जात आहे ज्याद्वारे त्यांच्या बांधकाम आणि अर्थाव्यवस्था ह्या बद्दल अधिक रहस्ये उलगडण्याची आशा आहे. जगभरातील लाखो लोक त्यांची प्रशंसा करतात, त्यांना भेट देतात आणि त्यांच्या सौंदर्य आणि भव्यतेने आश्चर्यचकित होतात.

-----------------------------------------------

फोटो सौजन्य : रेमंड मच्याडो, विवियन मच्याडो

# स्कॉटिश मिशनरींच्या शाळेत जोतिबा
## आधी विद्यार्थी आणि नंतर शिक्षकसुद्धा

■ कामिल पारखे

९९२२४१९२७४, camilparkhe@gmail.com

सावित्रीबाई आणि महात्मा जोतिबा फुले यांच्या विविध चरित्रांत अमेरीकन मराठी मिशनच्या अहमदनगरच्या सिंथिया फरारबाई, त्याचबरोबर स्कॉटिश मिशनरी जॉन स्टीव्हन्सन, मार्गारेट आणि डॉ. जॉन विल्सन, जेम्स मिचेल, मिसेस मिचेल आणि जॉन मरे मिचेल यांची नावे विविध संदर्भांत वारंवार येत असतात.


सावित्रीबाईंच्या आणि महात्मा फुले यांच्या जडणघडणीत पुण्यातले स्कॉटिश मिशनरी रेव्हरंड जेम्स मिचेल, त्यांच्या पत्नी मार्गारेट शॉ मिचेल, रेव्हरंड जॉन मरे मिचेल आणि त्यांच्या पत्नी मारिया मॅकेंझी मिचेल यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे.

रेव्हरंड जॉन स्टीव्हन्सन आणि जेम्स मिचेल यांनी १८२९ साली पुण्याचा दौरा केला आणि प्रवचने दिली. तेथे त्यांचे चांगले स्वागत झाल्याने स्टीव्हन्सन यांनी १८३० साली पुण्यातच पुण्यात स्कॉटिश मिशनचे शैक्षणिक आणि धार्मिक काम सुरु केले. संस्कृत आणि मराठीवर जॉन स्टीव्हन्सन यांचे कमालीचे प्रभुत्व होते, प्राच्यविद्यापंडित म्हणूनही त्यांची एक वेगळीच ओळख आहे.

पुण्याला स्थायिक झाल्यानंतर जॉन स्टिव्हन्सन यांनी या शहरात एक इंग्रजी शाळा सुरु केली होती. पुण्यातल्या सर्व जातींच्या आणि समाजघटकांनी या शाळेचे कौतुक केले. मात्र ईस्ट इंडिया कंपनीच्या सरकारला मुंबईप्रमाणेच पुण्यातही इंग्रजी शाळा सुरु करायच्या होता. त्यामुळे स्टिव्हन्सन यांनीं आपली शाळा १८३३ साली कंपनी सरकारकडे सुपूर्द केली. मात्र मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड क्लेर यांच्या विनंतीनुसार

त्यांनी या शाळेत शिकवणे चालूच ठेवले. स्टिव्हन्सन या शाळेशी संबधित असेपर्यंत तिथे ख्रिस्ती धार्मिक शिकवण देणे चालूच राहिले होते.

विशेष म्हणजे रेव्हरंड जॉन स्टीव्हन्सन यांनी सुरु केलेल्या आणि नंतर ईस्ट इंडिया सरकारकडे सुपूर्द केलेल्या या शाळेतच जोतिबा फुले आणि त्यांचे सहकारी सदाशिव बल्लाळ गोवंडे यांनी आपले शिक्षण घेतले होते.






'आपल्या विद्यार्थिदशेतच जोतीने सदाशिव बल्लाळ गोवंडे यांच्याशी अभंग अशी मैत्री जोडली. जोतीच्या ह्या गोवंडे मित्राचा जन्म १८२४ मध्ये पुण्यात झाला. तो ब्राह्मण कुटुंबातील होता. त्याने दृढनिश्चय आणि अखंड उद्योगशीलता या गुणवत्तेवर आपल्या पुढील आयुष्यात मोठीच प्रगती केली. तो स्कॉटिश मिशन शाळेत असताना जोतीचा स्नेही झाला. आणि पुढे बुधवारवाड्यातील सरकारी शाळेत ते दोघे शिकत असताना त्यांचा स्नेह दृढ होत गेला. ही शाळा स्टीव्हन्सन नावाच्या गृहस्थाने सप्टेंबर १८३२ मध्ये काढली होती. ती पुढे त्याने सरकारच्या स्वाधीन केली' असे जोतिबा फुले यांचे चरित्रकार धनंजय कीर यांनी लिहिले आहे.

'जोती आपले शिक्षण पूर्ण करीपर्यंत मिशन शाळेत जात होता. त्या काळी इंग्रजी शिक्षणासाठी महाराष्ट्रात महाविद्यालय नव्हते. इंग्रजी शिक्षण देणारी तशी मोठी एखादी संस्थाही नव्हती. याच दिवसांत सदाशिव गोवंड्यांनी मोरो विठ्ठल वाळवेकर या ब्राह्मण

मित्राशी आणि वाळवेकरांचा ब्राह्मणमित्र सखाराम यशवंत परांजपे यांच्याशी मैत्री जोडली. मोरो वाळवेकर हा गरीब ब्राह्मणाचा मुलगा होता. त्याचेही शिक्षण एका मिशनशाळेत झाले होते. वाळवेकर आणि परांजपे हे जोतीचे परम स्नेही झाले. पुढे ते दोघे जोतीच्या कार्यातील मोठे सहकारी म्हणून गाजले'. असेही कीर यांनी लिहिले आहे.

अहमदनगर येथे मुलींच्या शाळा चालवणाऱ्या सिंथिया फरारबाई यांच्याव्यतिरिक्त जोतिबांवर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तींमध्ये पुण्यात स्कॉटिश मिशनच्या शाळा चालवणारे रेव्हरंड जेम्स मिचेल यांचा उल्लेख करता येईल. स्कॉटिश मिशनरी जेम्स मिचेल आणि जॉन मरे मिचेल यांच्या शाळेत जोतिबांनी १८४१ ते १८४७ या काळात आपले माध्यमिक इंग्रजी शिक्षण पूर्ण केले. सावित्रीबाईनी पुण्यात मिसेस मिचेल यांच्या निर्मल स्कुलमध्ये अद्यापनाचे धडे घेतले असा उल्लेख हरी नरके आणि इतर संशोधक करतात त्या मिसेस मिचेल म्हणजे रेव्हरंड जेम्स मिचेल यांच्या पत्नी मागरिट शॉ मिचेल.

जोतिबांनी सावित्रीबाईंच्या मदतीने आपल्या शाळा वेतन न घेता चालू ठेवल्या. त्याकाळात अर्थार्जनासाठी जोतिबा फुले स्कॉटिश मिशनरी जेम्स मिचेल आणि जॉन मरे मिचेल यांच्या शाळांत अर्धवेळ शिक्षक म्हणून कार्य करत होते. मेजर थॉमस कँडी काही काळासाठी मायदेशी गेल्यावर रेव्हरंड जॉन मरे मिचेल हे पुण्यातल्या १८२१ साली स्थापन झालेल्या संस्कृत कॉलेजचे - नंतरच्या पुना कॉलेजचे आणि आजच्या डेक्कन कॉलेजचे - प्राचार्य (व्हिजिटर) आणि संस्कृत-मराठी विभागांचे प्रमुख होते.

जोतिबांनी १८४७ साली स्कॉटिश मिशनरींच्या इंग्रजी शाळेतील आपला अभ्यास पूर्ण केला. जोतिबांचे मोठेपण अधोरेखित करताना धनंजय कीर, लिहितात : 'जोतीच्या पूर्वीच्या पिढीतील राममोहन रॉय यांच्याप्रमाणे जोतीलाही सरकारी नोकरी मिळून तीत त्याला बढती मिळत गेली असती. जी परीक्षा लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख उतरले होते, तीच परीक्षा जोती उत्तीर्ण झाला होता. मुंबई विद्यापीठ स्थापन झाले त्या पूर्वीच्या काळात विद्यार्थ्यांची लायकी ठरविण्यास दुसरे साधन नव्हते. इंग्रजी राजवटीत महाराष्ट्रातील पहिल्या श्रेणीच्या ज्या नेत्यांनी सरकारी नोकरी पत्करली नाही, त्यांपैकी जोती हा पहिला नेता होय. जगन्नाथ शंकरशेट हे लक्ष्मीपुत्र होते. जोतीचे दुसरे

समकालीन लोकहितवादी. त्यांनी न्यायालयात लेखनिकाची नोकरी धरली. दुसरे तेजस्वी नेते होते बाळशास्त्री जांभेकर, तेसुद्धा सरकारी नोकरीत होते. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी सरकारी नोकरी केली. भाऊ महाजन हे मात्र त्याला अपवाद होते.'

जोतिबांची शाळा बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यात १८४८ च्या ऑगस्ट महिन्याच्या आसपास सुरु झाली असावी असे कीर यांनी म्हटले आहे.

'ही शाळा जोतीबांसारख्या ब्राह्मणेतराने काढलेली. तीत महारमांग चांभारादी अतिशूद्रांच्या मुली शिकत. पुणे हा सनातन्यांचा बालेकिल्ला. स्त्रियांना आणि त्यातही शूद्र अणि अतिशूद्र ह्या जातीतील स्त्रियांना शिक्षण देणे हा त्या सनातन्यांच्या दृष्टीने अत्यंत भयंकर भ्रष्टाचार होता. महान पातक होते. त्यांनी त्याविरुद्ध आरडाओरडा करण्यास प्रारंभ केला. शूद्रांच्या घरी विद्या आणि ज्ञान चालले, असे ते ओरडू लागले. शास्त्राप्रमाणे शूद्रांना विद्येचा अधिकार नाही. त्यांना शिक्षण देणे म्हणजे देव, धर्म, समाज यांच्याविरुद्ध वर्तन करणे होय. आणि मुलींना शिकविणे म्हणजे हिंदुधर्मावर मोठा भयंकर अत्याचार करणे नि मोठे पातक करणे होय. ज्या शाळेत पुरुष मुलींना शिकवतो, त्या शाळेत मुलींना पाठविणे हा तर लोकांच्या दृष्टीने मोठाच अपराध होता.'

'आम्ही पाहिलेले फुले' या हरी नरके संपादित आणि महाराष्ट्र सरकारने प्रकाशित केलेल्या पुस्तकात सत्यशोधक कार्यकर्ते शास्त्री नारो बाबाजी महाघट पाटील यांनी १८९१ साली लिहिलेले जोतिबांचे अल्पचरित्र समाविष्ट केले आहे. त्यात सावित्रीवाई फुले यांनीं मिसेस मिचेल यांच्या नॉर्मल स्कुलमध्ये अद्यापनाचा अभ्यासक्रम पूर्ण केला असे म्हटले आहे:

'जोतीरावांचे शिक्षण बुडाल्याने सगुणाबाईचा जीव तिळतिळ तूटत होता. तिने लिजिटसाहेबामार्फत गफार बेग मुनशीचे वजन गोविंदरावांवर पाडून त्यांचे मन वळविले. त्यामुळे जोतीराव १-१-१८४३ पासून बुधवारवाड्यातील शाळेत पुन्हा जाऊ लागला. त्याच वेळेपासून सगुणाबाईच्या आग्रहामुळे ते सगुणाबाईस व सावित्रीबाईस शिकवू लागले. सगुणाबाई पूर्वी जोतीरावांकडून थोडेफार शिकली होती पण ती विसरून गेली होती. दोघीही एकमेकांच्या सहवासात चढाओढीने शिकत होत्या.

जोतीराव अभ्यासू व हुशार मुलगा होता. त्याने प्रत्येक वार्षिक परीक्षेत निरनिराळी पुस्तके बक्षिसे मिळविली होती. पत्नीला व माईला मराठीचे सर्व शिक्षण दिल्यावर त्यांना मिसेस मिचेल यांच्या अत्याग्रहावरून शिक्षणिकीचा कोर्स देण्यासाठी त्यांनी ठरविले. हा कोर्स नार्मल स्कूलमध्ये मिचेलबाईच चालवीत होत्या. या बाईंनी सावित्रीदेवीची व सगुणाबाईची परीक्षा घेऊन त्यांना तिसऱ्या वर्षाचा प्रवेश दिला. त्यांचे तिसरे वर्ष (१८४५-१८४६) साली पास झाले. (१८४६-१८४७) साली ४ वर्षाची परीक्षा देऊन त्या स्कूलमधून बाहेर पडल्या. या दोघीही पुढे उत्तम ट्रेड मिस्ट्रेस म्हणून नावाजल्या. १८४७ साली महात्मा जोतीराव इंग्रजी शिक्षणाची शेवटची परीक्षा उत्तम तऱ्हेने पास झाले.

सनातनी मंडळींच्या प्रखर विरोधामुळे ही शाळा जोतीबांना बंद करावी लागली. ‘जोतीरावांच्या वडिलांनी तर त्यांना केव्हाच घरातून घालवून दिले होते. ना पित्याचा आश्रय, ना स्वतःचा धंदा. त्यामुळे त्यांची संसारात फारच आर्थिक कुचंबणा झाली. अशा परिस्थितीत त्यांना पुण्यातील स्कॉटिश मिशनऱ्यांचा मुलींच्या शाळेमध्ये शिक्षकाची नोकरी करणे भाग पडले. ही शाळा ख्रिस्ती- मिशनऱ्यांनी १८५४ जुलै महिन्यात मिशनच्या आवारात सुरू केली होती. मुलींचे वसतिगृहही तेथेच होते. त्या संस्थेमध्ये टाकलेली मुले, अनाथ मुले आणि ख्रिस्तीधर्म स्वीकारलेल्या गरीब लोकांची मुले आणि ज्यांच्यावर मिशनचा पूर्ण ताबा होता अशी मुले त्या संस्थेत शिकत होती. जेवणाखाण्याची तेथेच व्यवस्था असे’ असे कीर यांनी आपल्या, ’महात्मा जोतीराव फुले' या पुस्तकात लिहिले आहे.

धनंजय कीर यांनी लिहिले आहे कि ‘पुण्यातील स्कॉटिश मिशनऱ्यांचा मुलींच्या शाळेची माहिती देताना एका इतिवृत्तात चालकांनी असे म्हटले आहे की, सध्या आमच्याकडे वसतिगृहामध्ये राहणारी १३ मुले आहेत. दिवसा त्यांचे शिक्षण होत असताना दुसरी ४० मुले त्यांच्याबरोबर शिकतात. पुण्यातील एक अत्यंत उत्साही आणि निपुण शिक्षक आमच्या शाळेत दररोज चार तास शिक्षणाच्या कार्यात साह्य करावयास लाभला आहे याविषयी आम्हांला समाधान वाटते. ते म्हणजे परोपकारबुद्धीचे आणि कनिष्ठ जातींच्या मुलींच्या शिक्षणासाठी अविरत झगडणारे आणि ज्यांच्या कार्याची

शिक्षामंडळीने आणि स्वतः सरकारने मनापासून प्रशंसा केली, ते जोतीराव फुले होत. त्यांनी आमच्या मोठ्यात मोठ्या शिक्षणविषयक आशा फलद्रूप केल्या.'

महात्मा फुले स्कॉटिश मिशनरींच्या शाळेत शिक्षक होते याचा उल्लेख ज्ञानोदय या मासिकात जोतिबांच्या निधनानंतर १८ डिसेंबर १८९० रोजी लिहिलेल्या अग्रलेखातसुद्धा पुढीलप्रमाणे आढळतो : 'पुण्यातील मिशनरीनी त्यास आपल्या ख्रिस्ती मुलीच्या शिक्षणाच्या कामावर पगार देऊन नेमले. येथे कामावर असता त्यांनी मिशनरी लोकांच्या सुचनेवरून ख्रिस्तीधर्माकडे विशेष लक्ष पुरविले'

महात्मा जोतिबा फुले हंटर शिक्षण आयोगापुढे पुणे येथे १९ ऑक्टोबर १८८२ रोजी सादर केलेल्या निवेदनात आपल्याला ख्रिस्ती मिशनरींनीं मुलींसाठी सुरु केलेल्या शाळांमुळे आपल्याला प्रेरणा मिळाली, आपण आपल्या शाळा नंतर मिसेस मिचेल यांच्याकडे चालवण्यासाठी दिल्या, तसेच ख्रिस्ती मिशनरींच्या शाळेत आपण स्वतः शिक्षक होतो असे नमूद केले आहे.

जोतिबांनी या निवेदनाच्या पहिल्या परिच्छेदांत म्हटले आहे :

'माझा शैक्षणिक क्षेत्रातील अनुभव पुणे आणि पुण्याच्या परिसरातील खेडी यापुरताच प्रामुख्याने आहे. सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी ख्रिस्ती धर्मप्रसारकांनीं या पुण्यात स्त्रियांसाठी एक शाळा स्थापन केली होती. पण जिला स्वकीय म्हणता येईल अशी एकही मुलींची शाळा नव्हती. म्हणून तशी शाळा स्थापन करण्याची प्रेरणा मला सन १८५४ (१८५३) च्या सुमारास झाली व मी आणि माझी पत्नी अशा उभयतांनीं कित्येक वर्षांपर्यंत त्या शाळेत काम केले... या संथांमध्ये मी सुमारे नऊदहा वर्षे कार्य करीत होतो; पण काही विशिष्ट परिस्थितीमुळे ते कार्य मी सोडले. सध्या समितीने मुलींच्या शाळांची व्यवस्था शिक्षणखात्याकडे सुपूर्द केली असून मिसेस मिचेलच्या देखरेखीखाली त्या शाळा अद्यापही चालू आहेत.'

महारमांगादी कनिष्ठ वर्गीयांची शाळासुद्धा आजपर्यंत चालू असली तरी तिची स्थिती फारशी समाधानकारक नाही. ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीं चालविलेल्या वसतिगृही

शाळेत मी काही वर्षे शिक्षकाचे काम केलेले आहे. आता उल्लेखिलेल्या शाळांमध्ये मी जे कार्य केले, तोच शैक्षणिक क्षेत्रातला माझा महत्त्वाचा अनुभव म्हणता येईल.

जोतिबांचे दत्तकपुत्र यशवंत फुले यांनी लिहिलेल्या महात्मा फुले यांच्या अल्पचरित्रात म्हटले आहे.

‘जोतीराव यांचे तीर्थरूप वारल्यामुळे त्यांस बरीच दीनावस्था प्राप्त झाली. इतक्यात त्यांची ही भरभराटी पाहून पुण्यातील काही मिशनरी लोकांनी त्यास आपल्या ख्रिस्ती मुलींस शिक्षण देण्याच्या कामावर नेमले. या कामावर असता परोपकारी मरे मिचेल वगैरे युरोपियन सद्गृहस्थाच्या सूचनेवरून जोतीराव यांनी आपले लक्ष ख्रिस्तीधर्माकडे विशेष पुरविले.’ जोतिबांचे हे अल्पचरित्र 'आम्ही पाहिलेले फुले' या ग्रंथात समाविष्ट करण्यात आले आहे.

स्कॉटिश मिशनरी आणि विशेषतः जॉन मरे मिचेल आणि जोतिबा फुले यांच्या नातेसंदर्भात ज्येष्ठ संशोधक रा. ना. चव्हाण यांनी पुढील शब्दांत लिहिले आहे:

‘इंग्लंड आणि स्कॉटलंडमधून प्रोटेस्टंट मिशनऱ्यांच्या तुकड्या भारतात आल्या. मुंबईस डॉ. विल्सन, कलकत्यास डॉ. डफ. पुण्यास डॉ. मिचेल येऊन थडकले. हे सारे स्कॉच होते. हे लोक मराठी शिकले. कमीअधिक संस्कृत शिकले आणि धर्मप्रचार करू लागले. तरुणांच्या ओळखी करायच्या, त्यांना घरी बोलवायचे, शक्य झाल्यास त्यांच्या घरी जायचे, स्वतःच्या घरात लहानलहान चर्चा मंडळे काढायची, पाहुण्यांना ख्रिस्ताच्या तत्त्वज्ञानाचा परिचय करून द्यायचा, अशी या मिशनऱ्यांची पद्धत होती. अजून आहे. या पद्धतीस अनुसरून मिचेलसाहेबांनी तरूण फुल्यांची ओळख करून घेतली, दोघांचा खूपच परिचय वाढला. चर्चा झाल्या. मिचेलच्या चरित्रात फुल्यांचे उल्लेख येतात. गाठीभेटीत काय घडले हे समजण्यास मार्ग नाही. परंतु अंदाज करण्यास पुष्कळच आधार आहेत.’

त्याशिवाय ‘आम्ही पाहिलेले फुले’ या पुस्तकात सत्यशोधक कार्यकर्ते शास्त्री नारो बाबाजी महाघट पाटील यांनी १८९१ साली लिहिलेले जोतिबांचे अल्पचरित्र

समाविष्ट केले आहे. त्यात सावित्रीवाई फुले यांनी मिसेस मिचेल यांच्या नॉर्मल स्कुलमध्ये अद्यापनाचा अभ्यासक्रम पूर्ण केला असे म्हटले आहे:

जोतीरावांचे शिक्षण बुडाल्याने सगुणाबाईचा जीव तिळतिळ तूटत होता. तिने लिजिटसाहेबामार्फत गफार बेग मुनशीचे वजन गोविंदरावांवर पाडून त्यांचे मन वळविले. त्यामुळे जोतीराव १-१-१८४३ पासून बुधवारवाड्यातील शाळेत पुन्हा जाऊ लागला. त्याच वेळेपासून सगुणाबाईच्या आग्रहामुळे ते सगुणाबाईस व सावित्रीबाईस शिकवू लागले. सगुणाबाई पूर्वी जोतीरावांकडून थोडेफार शिकली होती पण ती विसरून गेली होती. दोघीही एकमेकांच्या सहवासात चढाओढीने शिकत होत्या. जोतीराव अभ्यासू व हुशार मुलगा होता. त्याने प्रत्येक वार्षिक परीक्षेत निरनिराळी पुस्तके बक्षिसे मिळविली होती. पत्नीला व माईला मराठीचे सर्व शिक्षण दिल्यावर त्यांना मिसेस मिचेल यांच्या अत्याग्रहावरून शिक्षणिकीचा कोर्स देण्यासाठी त्यांनी ठरविले. हा कोर्स नार्मल स्कूलमध्ये मिचेलबाईच चालवीत होत्या. या बाईंनी सावित्रीदेवीची व सगुणाबाईची परीक्षा घेऊन त्यांना तिसऱ्या वर्षाचा प्रवेश दिला. त्यांचे तिसरे वर्ष (१८४५-१८४६) साली पास झाले. (१८४६-१८४७) साली ४ वर्षाची परीक्षा देऊन त्या स्कूलमधून बाहेर पडल्या. या दोघीही पुढे उत्तम ट्रेड मिस्ट्रेस म्हणून नावाजल्या. १८४७ साली महात्मा जोतीराव इंग्रजी शिक्षणाची शेवटची परीक्षा उत्तम तन्हेने पास झाले.

ख्रिस्ती मिशनरी आणि महात्मा फुले दाम्पत्य यांचे अशाप्रकारचे अतूट नाते आणि ऋणानुबंध आहेत. जोतिबा फुले अनेकदा हे ऋणानुबंध व्यक्त करतात. या मिशनरींनीं सावित्रीबाई आणि जोतिबा फुले यांची व्यक्तिमत्वे घडवण्यात आपल्या परीने योगदान केले. मात्र गेल्या दोनशे वर्षांच्या कालखंडानंतर आजही या व्यक्तींविषयी, महाराष्ट्रातील सामाजिक आणि शैक्षणिक इतिहासांत या मिशनरींच्या वैयक्तिक चरित्रांवर, कार्यांवर आणि योगदानांवर आजही पुरेसा प्रकाश पाडला गेलेला नाही.

# सरस्वती वैद्य हत्याकांड : एक शोकांतिका

■ **सुहास बिऱ्हाडे, पत्रकार**

*(मीरा रोड मध्ये राहणाऱ्या मनोज साने या विकृत इसमाने त्याची 'लिव्ह इन पार्टनर' सरस्वती वैद्य हिची हत्या केल्याचे प्रकरण देशभर गाजले. कारण साने हा सरस्वतीची हत्या करून थांबला नाही तर तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी मृतदेहाचे करवतीने तुकडे केले आणि ते कुकरमध्ये शिजवले होते... सरस्वती वैद्य ही अनाथ होती आणि विकृत सानेमुळे तिचे आयुष्य एक शोकांतिका बनून गेले.)*

२०१४ ची घटना. मनोज साने नावाचा एक इसम बोरीवली येथील रेशन दुकानात नेहमीप्रमाणे बसला होता. तो या दुकानात काम करत होता. दुपारच्या वेळी एक मुलगी पत्ता विचारत आली. ती कामाच्या शोधात होती. त्या मुलीचे नाव होते सरस्वती वैद्य. तेव्हा ती २२ वर्षांची होती. सानेने तिला पाणी दिलं आणि तिची विचारपूस केली. वडिलधारी व्यक्ती आपुलकी दाखवतोय यावर तिचा विश्वास बसला. सरस्वती अनाथ होती. तिचे बालपण अहमदनगरच्या एका अनाथाश्रमात गेले. तिच्या ४ बहिणी होत्या. त्या देखील अनाथाश्रमातच मोठ्या झाल्या. सरस्वती सर्वात धाकटी. मोठ्या बहिणींची लग्न झाले ती देखील जेमतेम साधारण घरात. शिक्षणही पूर्ण झाले नाही. त्यातच एका बहिणीने परिस्थितीमुळे आत्महत्या केली. अनाथाश्रमातून बाहेर पडल्यानंतर पुढे काय हा सरस्वतीपुढे प्रश्न होता. काही वर्ष आळीपाळीने बहिणींकडे काढली. त्या तरी किती दिवस ठेवणार. पोटापाण्यासाठी नोकरी हवी होती. नोकरीच्या शोधात ती आली होती.

सानेने तिला सहानभूती दर्शवली. मी एकटा राहतो, तू माझ्या सोबत रहा असे तिला सांगितले. साने मोठा असल्याने सरस्वती त्याला मामा म्हणत होती. सानेने तिचा विश्वास संपादन केला होता. कामाची गरज होती आणि राहण्यासाठी घर हवं होतं. त्यामुळे मग काही दिवसांनी सरस्वतीने सानेसोबत राहण्याचा निर्णय घेतला.

मनोज साने (५६) हा मुळचा बोरिवली येथे राहणारा. बोरीवलीच्या बाभई नाका येथील वडिलोपार्जित घरात तो भावंडासह रहात होता. त्याने लग्न केलं नव्हतं. त्या जागेवर २००८ मध्ये त्याच्या कुटुंबियांनी 'साने रेसिडेन्सी' नावाची इमारत बांधली होती. प्रत्येकाला स्वतंत्र फ्लॅट मिळाले. तेथे त्याचे भाऊ राहू लागले. मात्र अविवाहित असणाऱ्या मनोज सानेने आपली सदनिका भाड्याने दिली. नंतर तो मीरा रोड येथे रहायला गेला. बोरीवली येथील घराचे त्याला मासिक ३५ हजार रुपये भाडे येत होते. साने बोरीवली येथील एक शिधावाटप केंद्रात काम करू लागला. त्यावर त्याचा उदरनिर्वाह चालत होता. त्याला सरस्वती भेटली. मग ते दोघे मीरा रोडच्या गीत नगर मधील गीता दिप इमारतीच्या ७व्या मजल्यावर भाड्याच्या सदनिकेत राहू लागले.

पण एक दिवशी व्हायचं तेच झालं... ज्याला मामा म्हणाययी त्या सानेचं वेगळं रुप दिसलं... सरस्वती सानेच्या वासनेची ती शिकार ठरली. तिच्यासाठी हा मोठा धक्का होता. पण ती ठरली अनाथ. जाणार तरी कुठे. तिचा नाईलाज झाला. ज्याला वडीलधारी समजून आश्रयाला गेली त्यानेच तिला वासनेचं शिकार बनवलं होतं. सानेने मग पुढची खेळी केली. आपल्यात वयाचं अंतर असलं तरी आपण लग्न करून पती-पत्नीप्रमाणे एकत्र राहू असं सानेने सरस्वतीला सांगितलं. तिची समजूत काढण्यासाठी सानेने तिला तुंगारेश्वर येथील मंदिरात नेऊन लग्न केलं. अर्थात त्या बेकायदेशीर लग्नाला काही अर्थ नव्हता. सरस्वतीपुढे पर्याय नव्हता. एका थोराड वयस्कर व्यक्तीसोबत तिला पत्नी बनून रहावं लागलं.

सरस्वतीने सानेसोबत लग्न केलं ही बाब जेव्हा सरस्वतीच्या बहिणींना समजली तेव्हा त्यांनी या नातेसंबंधाला विरोध केला होता. मात्र अनाथ सरस्वतीकडे शिक्षण, नोकरी किंवा आधार देणारे कुणी नसल्याने तिला नाईलाजाने सानेसोबत रहावे लागले होते. पण दोघांमध्ये असलेलं वयाचं अंतर आणि ज्याला मामा हाक मारते त्याला पती कसं दाखवणार? त्यामुळे हे नातं घराच्या चार भिंतीतच राहिलं आणि लोकांसाठी ते मामा-भाची ठरले. तिने स्वखुशीने हे ‘लिव्ह इन रिलेशनशीप’चे नाते स्विकारले नव्हते. तिला असे काही नाते असते याची कल्पना देखील नव्हती.

—----

अनाथाश्रमात वाढलेल्या सरस्वतीचे ऋणानुबंध अनाथाश्रमातील मुलांशी जुळलेले होते. अनेकदा ती या आश्रमात जाऊन मुलांना खाऊ वस्तू द्यायची. अपूर्ण राहिलेलं शिक्षण पूर्ण करायचं आणि अनाथाश्रमातील मुलांना आधार देण्याचं काम करायचं हे तिचं स्वप्न. पण सानेकडून तिला कसलाच आधार मिळाला नाही. ना नात्याला नाव मिळालं, ना आर्थिक स्थैर्य. लग्न करून सुखाचा संसार फुलवावा हे प्रत्येक मुलीच्या आयुष्यात असलेले स्वप्नही तिला पूर्ण झालं नाही. तेथूनच दोघांचे मतभेद आणि वाद होऊ लागले. सरस्वती वैद्य एकाकी आयुष्य जगत होती. सरस्वतीला घरातून बाहेर पडण्यास बंदी होती. ती कुणाच्याच संपर्कात नसायची. ती साने व्यतिरिक्त कुणाला ओळखत नव्हती की तिला कुणी ओळखत नव्हतं. तिच्या बहिणींना साने संपर्क करू देत नव्हता. ती दिवसभर घरातच असायची. या काळात ती ख्रिस्ती धर्माकडे आकर्षित झाली होती. तिचा मोबाईल सानेच वापरायचा.

मनोज साने 'हॅजल', 'ओके क्युपिड' अशा डेटिंग ॲप वर सक्रिय होता आणि त्यातून तो अनेक मुलींच्या तो संपर्कात होता. हे समजल्यामुळेच सरस्वती आणि मनोज साने यांच्यात भांडण झाले होते. मनोज साने हा सेक्सच्या आहारी

गेला होता. तो सतत अश्लील संकेतस्थळांना भेटी देत असायचा. त्याच्या मोबाईल मध्ये अनेक अश्लील छायाचित्रे जतन केल्याचे आढळून आले होते.

## माणुसकीला काळीमा फासणारे क्रूर कृत्य

सतत होत असलेली भांडणं यामुळे सानेने तिची हत्या करण्याची योजना बनवली होती. आदल्या दिवशी दुकानातून विद्युत करवत आणि किटनाशक आणून ठेवले होते. त्यानंतर गुगलवर जाऊन दुर्गंधी येण्यासाठी किती वेळ लागेल याची माहिती घेतली होती. ३ जून २०२३ रोजी ताकातून तिला किटकनाशक प्यायला दिले. काही वेळातच तिचा मृत्यू झाला. त्यानंतर सानेने तिच्या मृतदेहाची छायाचित्रे काढली. यानंतर त्याच्या कौर्याला सुरवात झाली. सानेने विद्युत करवतीने मृतदेहाचे असंख्य तुकडे केले. मृतदेहाचे हाडं आणि मांस वेगळे करण्यासाठी तो कुकर मध्ये शिजवत होता. त्यानंतर सलग 4 दिवस तो मृतदेहाची विल्हेवाट लावत होता. जेवणासाठी बाहेर जाताना तो शिजवून वेगळे केलेले मांस नाल्यात टाकत होता. ४ थ्या दिवशी जेव्हा तो कुकरमध्ये मृतदेहाचे तुकडे शिजवत होता तेव्हा शेजाऱ्यांना जेव्हा दुर्गंधी आली. त्यांनी पोलिसांना बोलावले...

पोलीस आले तेव्हा साने इमारतीच्या खालीच होता. त्याला घेऊन पोलीस घरात गेले आणि थरकाप उडवणारे दृश्य दिसले. पोलिसांना घरात सरस्वतीच्या मृतदेहाचे असंख्य तुकडे सापडले. ते तुकडे कुकर, ३ पातेले आणि २ बादल्या भरून होते. नया नगर पोलिसांनी घटनास्थळावरूनच आरोपी मनोज साने याला अटक केली होती.

परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त जयंत बजबळे आणि नया नगरचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी या प्रकरणाचा सखोल तपास करू लागले. चौकशीमध्ये साने पोलिसांना दिशाभूल करणारी माहिती देत होता. कधी मला दुर्धर आजार आहे त्यामुळे आमचे शारिरीक संबंध येत नव्हते तर  मी नपुंसक

झाल्याचेही पोलिसांना सांगत होता. साने बोरिवली येथील एका शिधावाटप दुकानात अर्धवेळ काम करत होता. तिथे त्याला पाच हजार रुपये पगार मिळत होता. बोरिवली येथील घराचे त्याला 35 हजार रुपयांचे घर भाडे मिळत होते. मात्र तो कर्जबाजारी झाला होता. सोसायटीचे थकीत मेंटेनन्स भरण्यासाठी त्याने कर्जही काढले होते.

पोलिसांनी मग सरस्वती वैद्य ज्या आश्रमात होती तिथून माहिती काढली. पोलिसांना घटनास्थळावरून पुरावे तर सापडले होते. पण हत्या कशी झाली ते उलगडत नव्हतं. यासंदर्भात सानेने केलेले दावे तपासण्यासाठी तसेच हत्या कशी केली ते शोधण्यासाठी पोलिसांनी अनेक वैद्यकीय चाचण्या केल्या. नेमकी कशी केली याचा शोध पोलिसांना घ्यायचा आहे. त्यासाठी न्यायवैद्यक चाचण्या करून पुरावे गोळा करायचे आहेत. मात्र ती सोय महाराष्ट्रात कुठेही नसल्याने पोलिसांनी आता परराज्यातून तज्ञांचे पथक मागवले होते.

सरस्वतीची अशा प्रकारे हत्या झाली हे तिच्या बहिणींना वृत्तवाहिन्यांमधील बातम्यांतून समजले. तिच्या तीन बहिणींनी पोलिसांना संपर्क केला होता. पोलिसांनी त्यांचे जबाब घेतले आणि या प्रकरणात अनेक गोष्टी समोर आल्या. जेजे रुग्णालयात सरस्वतीच्या मृतदेहावर शवविच्छेदन करण्यात आले आणि शरीराचे तुकडे जुळविण्यात आले होते. पोलिसांनी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन मृतदेह बहिणींच्या ताब्यात दिला होता. जेजे रुग्णालयातून मृतदेह मिळाल्यानंतर लगेचच रे रोड येथील स्मशानभूमीत तिच्या बहिणी, मोजके नातेवाईक आणि पंचांच्या उपस्थितीत तिच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**१२०० पानांचे दोषारोपपत्र**

या प्रकऱणी नया नगर पोलिसांनी तब्बल १२०० पानांचे दोषारोप पत्र तयार करून ठाणे सत्र न्यायालयात सादर केले आहे. त्यामध्ये एकूण ६८ जणांचे जबाब नोंदविण्यात आले आहे. त्यात विष, कटर, प्लास्टीक ज्या दुकानातून घेतले त्या

दुकानदारांचे जबाब आहेत. शेजाऱ्यांपासून न्यायवैद्यक कर्मचाऱ्यांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत. आरोपी मनोज साने याचे हत्येपूर्वी ६ महिन्यांपासून सरस्वती वैद्य बरोबर भांडण सुरू होते. त्यामुळे त्याने सरस्वतीला मारण्याची योजना बनवली होती. ताकामधून विष देऊन तिला मारले आणि नंतर तिच्या मृतदेहाचे तुकडे करून विल्हेवाट लावली असे या दोषारोप पत्रात (चार्जशीट) म्हटले आहे. हत्या केल्यानंतर साने याने मृतदेहासोबत ३५ छायाचित्रे काढली होती. त्याचा मोबाईल न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठवून पोलिसांनी ती छायाचित्रे पुन्हा मिळवली आहेत.

मनोज साने याची पोलिसांनी मानसिक स्वास्थ तपासण्याची चाचणी केली होती. त्यात तो तंदुरुस्त होता. त्याला कसलाही मानसिक आजार नसल्याचे पोलिसांनी सांगितले. साने याला एचआयव्हीची लागण झाल्याचे चाचणीतून स्पष्ट झाले. सुरुवातीला त्याने नपुंसक असल्याचा दावा केला होता. मात्र त्याची चाचणी करण्यास त्याने संमती दिली नव्हती.

साने सध्या तुरूंगात आहे. अनाथ आश्रमातून बाहेरच्या जगात आलेली सरस्वती एक सर्वसाधारण आयुष्य जगण्याचे स्वप्न बघत होती. पण तिच्या आयुष्याच्या एका वळणावर मनोज साने आला आणि तिचे आयुष्य शोकांतिका बनून गेले.

—-------------------------------

# आगरातली आषाढी एकादशी

■ अतुल काटदरे, गोखिवरे, वसई

"पंढरपूरन वारीहाटी झामूच गर्दी जमली व्हती. चंद्रभागा नटून थटून उबी व्हती. चंद्रभागेन सवताची पापं बुरवून पापमुक्ती कराला आयलेली भगतगन त्या नटलेल्या पोरीकरं बगतच रेली न गरीब याचकाचं सोंग घेऊन पानी मांगाला आयलेला इठ्ठल पान्याची प्यास लागून तरफरतच रेला.."

ज्यांगा भाव त्यांगा देव ही संतांची वानी।

काय पन नी करता कोनी बगिलाय का कोनी।।

"काय र बाला कटनहीन आयलास?" या प्रश्नाने माझी तंद्री भंगते.

गोखिवरे, राजावली, टिवरी, ज्यूचंद्र.. वसई स्टेशनलगतच्या मिठागरातून सुरू होणाऱ्या माझ्या सायकल राईडचा हा रेग्युलर रूट. विकासाच्या नावाखाली शहरीकरणाचा प्रचंड वेग धारण केलेल्या पण गावपण हरवत चाललेल्या या गावांतून मी बऱ्याचदा काळाच्या ओघात पुसट होत चाललेल्या निसर्ग व संस्कृतीच्या पाऊलखुणा शोधत तासन् तास फिरत असतो!

इथल्या ग्रामदेवता, वर्षानुवर्षे बंद असलेल्या कौलारू घरांचे मोडकळीस आलेले लाकडी वासे, जिल्हा परिषदेच्या बंद शाळांच्या रिकाम्या पडव्या, रस्त्यांलगत उन्मळून पडलेल्या डेरेदार वृक्षांचे बुंधे मला आकर्षित करतात.. काही सांगू पहातात!! बहुतेक 'आगरी' वस्ती असणारी, दारावर पाटील, भोईर, किणी नावाच्या पाट्या मिरवणारी, कोणे एके काळी टुमदार भासणारी ही गावं आज अवैध बांधकामं व परप्रांतीयांच्या बकाल आणि अनधिकृत वस्त्यांनी वेढलेली आहेत. त्यातच भर म्हणून 'कमर्शियल डेव्हलपमेंट'ची गोंडस स्वप्न दाखवणाऱ्या बिल्डर्स व डेव्हलपर्सनी उरल्या सुरल्या

मोकळ्या जागाही ताब्यात घेत त्यावर स्मार्ट (?) सिटीज उभारण्याचा असा काही सपाटा लावलाय जणू काही यापूर्वी इथे रहाणारी माणसं स्मार्ट नव्हतीच. या 'ग्लोबल' सिटीजमधल्या इमारतींच्या उंच मनोऱ्यांकडे मान वर करत बघणारा इथला स्थानिक भुमिपुत्र मात्र या गर्दीत काहीसा हरवत चाललाय.. कदाचित काही वर्षांनी इथली आगरं नाहिशी होतील आणि कोणे एके काळी इथे मीठ पिकत होतं यावर विश्वास बसणं कठीण होऊन जाईल. असो, कालाय तस्मै नमः।

तरिदेखिल आजही या आगरातून फिरताना मला काही ना काही नवीन अनुभव येतंच असतात. ऐन हंगामातली मिठाची शेती आणि पावसाळ्यात चालणारी खाडीतली मासेमारी मी इथेच अनुभवली. आज आगरालगतच्या खडकाळ जमिनीवर काही बाया काम करताना दिसल्या. नक्की काय चालू आहे ते पहावं म्हणून सायकल मुख्य रस्त्यापासून वळवून कच्च्या रस्त्यावर घेतली. पहातो तर 'आवणी' चालू होती. मिठागरांलगतच्या मोकळ्या जागेत अनेक वर्षांपासून भातशेती होते हे ऐकून होतो पण एकंदरीतच झपाट्याने होणारं शहरीकरण, मजुरांची टंचाई आणि मेहनतीच्या अनुशंघाने खुपच् कमी मिळणारा मोबदला यांमुळे आजही कोणी शेती करत असेलसं वाटलं नव्हतं.

पश्चिम पट्ट्यातील हरित वसई अजून बऱ्यापैकी टिकून राहिली असली तरी पूर्वेकडील भागात शेती वगैरे माझ्याकरीता खुपच् अनपेक्षित होतं ! इथल्या उरल्या-सुरल्या मोकळ्या जमिनी या स्थानिक आगरी समाजाच्या मालकीच्या असल्या तरी शेतात राबणारे मजूर हे बहुधा आदिवासी समाजाचे आहेत. चारोटी, सातपाटी वगैरे पालघर/डहाणू पट्ट्यातला हा आदिवासी वर्ग कालांतराने वसईत स्थायिक झालेला आढळून येतो. पारंपारिक पद्धतीने केल्या जाणाऱ्या या भातशेतीत नांगरणीसाठी हल्ली बैलजोडीऐवजी ट्रॅक्टर वापरला जातो. वज्रेश्वरीहून बी-बियाणं, खतं, कीटकनाशकं, युरिआ वगैरे आणून पेरणी केली जाते. काही एकरांवर केल्या जाणाऱ्या या शेतीतून ३ महिन्यात २ खंडी भाताचं पीक घेतलं जातं ज्यामुळे जमिनीच्या मालकाला बाजारातून तांदूळ विकत घ्यायची कधी गरजच वाटत नाही उलट वर्षभराची सोय करून उरलेला माल हा बाजारात विक्रीला पाठवला जातो. याखेरीज इथे भेंडी, कोबीसारख्या

फळभाज्यांची लागवडही पावसाळ्यात केली जाते. केवळ जमिनी आहेत म्हणून पिक घेणाऱ्या या शेतमालकांप्रमाणेच निव्वळ ३००रूपये रोजंदारीवर राबणाऱ्या त्या शेतमजूरांची मेहनत पाहून मला कौतुक वाटलं !

सहज गप्पा माराव्यात म्हणून सायकल बांधाला लावून मी त्या बायकांच्या घोळक्यात सामील झालो. रामराम-नमस्कार, कोण-कुठले वगैरे मोघम तोंडओळख झाल्यावर लक्षात आलं की आज गावातून आषाढी एकादशीनिमित्त दिंडी निघणार होती. गावातल्या सर्व बाया नटून-थटून तयारीला लागल्या होत्या.  घरांसमोर रांगोळ्या अन् दारावर पताका चढल्या होत्या. स्पीकर तर पहाटेपासूनच वाजत होता. एकंदरीत मंगलमय आणि उत्साही वातावरण होतं. पण रोजंदारीच्या कामामुळे इच्छा असूनही आपल्याला तिथं जाता आलं नाही याची खंत इथे शेतावर आलेल्या काहींना होती. त्यावरंच त्यांचं आपापसात बोलणं चालू होतं.

शेताचा मालक जवळच्या डबक्यातून पाणी भरायला गेल्यामुळे या बायांच्या गप्पांना ऊत आला होता. भाताची रोपं उपटून, मुळाची माती साफ करून त्याच्या जुड्या बांधल्या जात होत्या. सोबत तण, कचरा सराईतपणे वेगळा केला जात होता. पुढे त्या सर्व जुड्या एक टोपात भरून जवळच् नांगरून तयार केलेल्या जमिनीत 'लावणी'साठी नेल्या जाणार होत्या. अजून सबंध 'कोपरा' करायचा बाकी होता. भरभर चालणाऱ्या हातांसोबत तोंडही चालू होती. त्यावर एक वयस्कर बाई समजावणीच्या सुरात म्हणते,

"काय लावीले गं बायांनु? आपले कामानंह आपला इठ्ठल हाय. चोखामेल्याची गोष्ट मायीत नी का तुमनं? शेतनचं काम होरून एकदं चोखा निंगाला पंढरपूरला. इठ्ठलाला हांगाला लागला, मी येते तुये दरशनाला. माये शेताची कालजी घे रं बाबा! अवरं हांगून पोचला देवलंन; बगते तं काय? इठ्ठलहं गायब! याला दिखलाह नी. तं पांडुरंग हांगते कहा, अरं बाबा तू मानं अटं शेतावं लक्ष ठेवून राखन कराला हांगून गेला. मी बहलू अटं राखनदारागत.. तुला कहाकाय मिलनार? तवं लक्षनन ठेवा, देव काय हांगय नी देवलंन येवून गर्दी कराला. तो भावाचा भूकेला हाय न भक्तीचा भूकेला हाय. देव हांगते ज्यांगा आहाल त्यांगूनह हात जोरा मी तुमचेनंह हाय.  ही हाताची धा बोटं

म्हनजे केली, आपलं डोखं म्हनजे नारल न मन म्हनजे फुलं. यांगा शेतन बहून चांगले मनानं हात जोरून डोख्याला लाविला की तो पोचतो इठ्ठलाला !"



मला गंमत वाटली. साधीशी साडी, कमरेला पंचा गुंडाळलेला, डोक्यात सोनचाफ्याचं फुल खोवलेलं. दगडावर बसून झटपट हात चालवणारी ती मावशी कर्मयोगाचं हे अगाध ज्ञान अगदी हसत खेळत गप्पा गोष्टीतून सांगत होती.. माझ्या चेहऱ्यावर उमटलेलं हास्य पाहून म्हणली, "काय बाला, काय चुकीचं बोलते का मी? अरं जनाबाईच्या शेनी शेजारचे बाईनी चोरील्या. तवं त्या शेनी नक्की कोनच्या हान हे ओलखाला त्यानं कान लावून बगिलं त सगलेच शेनीनहीन 'इठ्ठल इठ्ठल' आयकाला आयलं. देव मनन आहला कि पावते... जनाबायचा भाव शुद्ध म्हनून इठ्ठल तिचे घरन पानी भराचा, दलन दलाचा.

नाम दळणी कांडणी | म्हणे नामियाची जनी||

अरं आहबापाहला आश्रमनं टाकून पंढरपूरला गेलं त पांडुरंग कहा काय मिलेल? आहबापाहला हात जोरा ते देवाला आपोआपहं पोचेल !"

महाराष्ट्र ही संतांची भुमी. ज्ञानोबा-तुकोबांपासून अगदी तुकडोजी-गाडगेबाबांपर्यंत सर्वांनीच सोप्या भाषेत आध्यात्मिक भावार्थ अभंग-दोह्यांतून समजावला आणि 'कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी' असं आळवणाऱ्या शेतकऱ्यांनी भात लावणीच्या प्रसंगी गायल्या जाणाऱ्या गोष्टी-गाण्यांतून तो जपला.

आज नेमकं आषाढी एकादशीच्या दिवशी या माऊलीच्या रूपाने मला शेतात राबणाऱ्या विठ्ठलाचं दर्शन झालं! तिच्या पावलांवर नतमस्तक व्हावं अशी मनोमन इच्छा झाली पण चारचौघात इतकं मनमोकळं वागण्याएवढं धारिष्ट नसल्याने तसाच निघालो.. निघताना एक सुंदर आठवण म्हणून तिच्या पाउलखुणांचा फोटो घ्यायला मात्र विसरलो नाही..

जाता जाता कोपऱ्यात लावलेल्या भाताच्या हिरव्यागार पिकांवरून प्रेमाने हात फिरवला.. तेव्हा 'वाडा कोलम' अधिकच बहरून आलेला!!

*टिप : मी केवळ 'आगरी' बोलीभाषा समजू शकतो परंतू बोलू अथवा लिहू शकत नाही. तरीदेखील या भाषेची गोडी व ठसका अनुभवता यावा याकरीता सदर लेखातील काही भाग हा मुद्दाम आगरी भाषेत लिहिला आहे. भाषांतराकरिता ज्या स्थानिक आगरी मित्रमंडळींचं अमूल्य मार्गदर्शन लाभलं त्यांच्या ऋणात रहाणंच पसंत करेन.*

# १८ डिसेंबर पालीचा फेस्ता

## सर्व धर्मियांचा उत्सवाचा सोहळा!

■ सिडनी मोरायस, पाली, वसई.

'माय दे देऊस' म्हणजे देवाची आई (मदर ऑफ गॉड) या नावाने सर्वांना परिचित असलेले. हे तीर्थ क्षेत्र, 'देवाची माता' पवित्र मारिया हिला समर्पित केलेले आहे.

वसई किल्ल्याच्या प्रवेशद्वारात असलेल्या 'संत अंतोनी' या ऐतिहासिक चर्चमधून फ्रान्सिस्कन धर्मगुरु जवळच्या खाडीच्या जलमार्गे पालीला येऊन त्यांनी इ. स. १५७७ साली एक छोटे चर्च बांधले. किल्यातून येऊन हे धर्मगुरु चर्चचे व्यवस्थापन पाहत व भाविकांना धर्म शिकवत. १५८५ या वर्षी फादर डायगो व फादर फ्रान्सिस हे धर्मगुरु येथे कार्यरत असल्याची नोंद ऐतिहासिक दप्तरात सापडते.

कालांतराने चर्चमधील मारिया भक्तीचे रुपांतर एका नामांकित तिर्थ क्षेत्रात झाले. चर्चच्या वेदीवर एक नयन मनोहर माऊलीची मूर्ती होती. या मरियेच्या पुतळ्यांची भक्ती त्यावेळच्या धर्मगुरुंनी सुरु केली व भाविक दर शनिवारी तेल व मेणबत्ती घेऊन माऊलीसमोर अर्पण घेऊन येत असत व विनंत्या ठेवत.

ही चर्चची चौथी वास्तू आहे. १८४० ते १८४४ या ४ वर्षांच्या काळात तिची गरजेनुसार नव्याने उभारणी झाली. व कालांतराने चर्चच्या आकारात बदल ही केला गेला. १९ व्या शतका अखेर विस्तार भागही जोडण्यात आला. दरवर्षी डिसेंबर महिन्याच्या १८ तारखेला या चर्चमध्ये 'माय दे देऊस' माऊलीच्या नावाने सोहळा साजरा होतो व भव्य यात्रा भरते. त्यालाच सर्व धर्मिय भाविक 'पालीचा फेस्ता' असे म्हणतात. या दिवशी माऊलीच्या चर्चमध्ये तुफान गर्दी उसळते. हा सोहळा ख्रिस्त जयंतीच्या (२५ डिसेंबर) ७ दिवस अगोदर साजरा होतो, म्हणून त्यांचा संदर्भ मारिया

आई देवपूत्र येशूच्या जन्माच्या प्रतिक्षेत आहे, अशी भाविकांची श्रद्धा आहे. असा उल्लेख चर्चचे नामांकित इतिहासकार फादर पावलो दे त्रिनिदाद आपल्या ग्रंथात करतात.

पाली चर्च हे समुद्र किनाऱ्यावर वसलेले आहे. चर्च समोरून जाणाऱ्या रस्त्या लगत कोळीवाड्यांपर्यंत कोळी लोकांची वसाहत होती. तेथील पाली बंदर रस्त्यालगतचे कोळी बांधव मासेमारी करण्यास वसई पाचूबंदर येथे स्थलांतरीत झाले.

पावसाळ्याच्या ४ महिन्यात सर्वच मचव्याचे (अर्नाळा, उत्तन, नायगांव, खोचिवडे, वसई कोळीवाडा) भागिदार विविध दिवशी पाली चर्चला येऊन 'माय दे देऊस' माऊलीला प्रार्थना विधि अर्पण करीत. दुपारचे भोजनही तिथेच करुन तो दिवस कुटुंबासह माऊलीच्या चरणाजवळ आराधनेत घालवित असत.

संपूर्ण वसई तालुक्यातील सर्वधर्मिय शतकानुशतके पाली चर्चच्या माय दे देऊस माऊलीची भक्ती करत आले आहेत. कारण ती आहे नवसाची माऊली. समुद्रात मच्छिमार बांधवांचे रक्षण करणारी, भाविकांच्या गरजा पूर्ण करणारी अशी लोकांची श्रद्धा होती. पूर्वी ८ डिसेंबर मारीया माऊलीचा सण त्या दिवशी सर्व मचवे किनाऱ्याला येत. वर्षभराच्या मिळकतीचा हिशोब होऊन झालेला नफा सर्व भागिदारांना त्यांच्या कामानुसार वाटला जाई.

८ डिसेंबरला पांढरा बावटा चर्च आवारात फडकवला जाई. आज हा बावटा माऊलीचा फोटो फ्रेम करून तो एका खांबावर चर्चच्या मुख्य दरवाज्यात उभा केला जातो. त्याला ख्रिस्ती बांधव सणाच्या पूर्व तयारीची माऊलीची फॉम उभारली असे म्हणतात. ही सणाची उद्घोषणा आहे. तेथूनच पुढील नवदिवस नवदिन भक्तीचे. माऊलीची ९ दिवस उपासना करण्याचे दिवस व १० व्या दिवशी १८ डिसेंबरला मोठ्या उत्साहाने सण साजरा केला जातो. त्या दिवसाला 'फेस्त' संबोधू लागले. असा हा आजतागायत चालत आलेला सर्वच धर्मियांचा 'पालीचा फेस्ता'.

पूर्वी चर्च आवारात कार्टूसात गंधक भरून ही कार्टूसे पहाटे, दुपारी, सायंकाळी पेटवत. त्याचा ॲटमबॉमसारखा मोठा आवाज होई. फेस्ता जवळ आल्याची ती नांदी

असे. पुढे ॲटमबॉम्ब आले. आता तर चर्च आवारात फटाके वाजविण्यास बंदीच आहे. पाली चर्च व परिसराला फेस्त्यासाठी जी विजेची रोषणाई केली जाते ती पूर्वी वसई कोळीवाड्यातील विविध बोटीचे नाखवा व भागिदार विनामूल्य करीत. त्यांचे हे प्रेम वाखाणण्याजोगे होते.

कुठल्याही कोळीवाड्यात लग्न ठरले की, लग्नाच्या आदल्या दिवशी नवरदेवाला घेऊन करवल्या ताशे व पिपाण्या वाजवत पाली चर्चला माऊलीच्या पायाशी येऊन नारळ व नैवद्य दाखवत. (आज फुले व मेणबत्त्या अर्पण करतात) नंतर इतरही देव-देवीच्या मंदिरात जाऊन नैवद्य देत व आशिर्वाद घेत हा त्याचा श्रद्धेचा भाग होता.

काहीजण नववधूला गर्भधारणा व्हावी, माझ्या पोरीची-सुनेची कुस उजवावी, असे माऊलीला साकडे घालीत. बाळ जन्माला आले की, फेस्त्याच्या दिवशी बाळाला देवळात घेऊन येत. प्रार्थना विधित सहभागी होत. नंतर चर्चच्या वस्त्रालयात (कपडे ठेवण्याची खोली) एक तराजू असे. एका पारड्यात बाळ व दुसऱ्या पारड्यात बाळाच्या वजनाइतके तेल ओतले जाई. ही एक आभार व्यक्त करण्याची रुढी परंपरा होती. हे तेल माऊलीच्या वेदीवर जो दिवा जळतो तो अहोरात्र तेवत रहावा म्हणून वापरले जाई. पुढे विजेचे दिवे आले व ही प्रथा लयास गेली.

तशीच दुसरी प्रथा या लहान बाळांना धर्मगुरुंकडे आणत व धर्मगुरु बाळाच्या आईच्या हातात एक चांदीचा स्तंभ देत (त्याला 'वार' म्हणत) धर्मगुरु बाळाच्या कपाळावर क्रूसाची खूण करुन प्रार्थना करुन पवित्र पाणी शिंपडीत. ख्रिस्ती बांधव या प्रथेला 'इरमाव' म्हणजे माऊलीचा सभासद होणे असे संबोधित. या सर्व प्रथा काळाच्या ओघात लयास गेल्या.

आता ही बालक फेस्त्याच्या सायंकाळी माऊलीच्या पायाशी आणतात. स्वयंसेवक ती वेदीवर झोपवतात. आशिर्वादाची प्रार्थना करतात व आईच्या हातात देतात, ही प्रथा आजही चालू आहे.

पूर्वी मुख्य वेदीवर माऊलीच्या पायाशी दोन मेणबत्ती स्टँड ठेवायचे. भाविक माऊलीच्या पायाजवळ मेणबत्ती लावण्यासाठी दान देत व या मेणबत्ती त्या दात्याच्या

नावाने पेटवून पुन्हा विझवली जाई. २० व्या शतकात अनेक साक्षर मुले चर्च सेवेत आली त्यांना ही मेणबत्ती पेटविणे पुन्हा फुंकर मारुन विझविणे पद्धत पटेनाशी झाली नंतर माऊलीची प्रतिकृती बनवून चर्च बाहेर मंडपात ठेवून तेथेच भाविकांना स्वतः मेणबत्ती लावण्याची मुभा दिली होती. पुढे चर्चच्या मुख्य गेटवर डोंगराच्या आकाराचा जो माऊलीचा ग्रोटो आहे. तीर्थ यात्रेकरु भाविक मेणबत्ती पेटवून लावतात. तो श्रद्धेचा भाग आहे, म्हणून ही प्रथा बंद होणार नाही.

नवीन घर हवं असेल, बोट बांधायची असेल, बाळ हवं असेल, शरीराचा व्याधिग्रस्त अवयव याच्या मेणाच्या प्रतिकृती यात्रेत विकत घेऊन त्या आभार वा विनंती दर्शविण्यासाठी माऊलीच्या चरणाशी अर्पण केल्या जातात.

पूर्वी १७ डिसेंबरला माय दे देऊस माऊलीचे (वेस्पर्स) बेसपुर सणाची पूर्व संध्या. कोळी समाज भक्तीने साजरा करीत. वसई कोळीवाड्यातून मुळगांव, खोचिवडे मार्गे चालत भाविकांची मिरवणूक (काही अनवाणी येत) चर्चकडे येत व बेसपुर या प्रार्थना विधित सहभागी होत. नंतर टांगे आले ते भाविकांची ने आण करीत आज तर रिक्षा, बसेसची सोय झाली आहे. मात्र परंपरा आजही टिकून आहेत.

अशी ही माय दे देऊस माऊली सर्व धर्मियाची नवसाची माऊली. 'पालीचा फेस्ता' या नावाने महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहे. पूर्वी धारावी बेट, उत्तन, गोराई, मनोरी, अर्नाळा, सातपाटी येथून भाविक फेस्त्याला येत. माऊलीला अर्पणे देत व चर्चच्या खाडी लगतच्या भागात स्वयंपाक करुन भोजन करत. यात्रेत जल्लोष करत व या यात्रेची रात्री ८ वाजता सांगता होत असे.

आज फेस्त्याचे स्वरुप बदलले आहे. जत्रेतील मज्जातर औरच झाली आहे. प्रविण रुग्णालयापासून नायगांव आईस फॅक्टरीपर्यंत जत्रेतील विक्रेत्याचे प्रमाण वाढले आहे. विविध प्रकारच्या झोक घेणाऱ्या खेळाचे (पालने), लहान मुलांची खेळणी, खवय्यांचे, मेणबत्त्या विक्रेते व थंडपेय या सर्वांना सीमाच उरलेली नाही. रात्री १२ ते १ वाजेपर्यंत माऊलीच्या दर्शनासाठी वसईच्या सर्वच धर्मियांची रिघ लागलेली असते. जत्रेतील तरुणाई मनोसोक्त मज्जा करतात, असे आहे फेस्त्याचे आकर्षण.

आजही खोचिवडे, दरपाळे, कोळीवाडा व विविध गावातील अन्य धर्मिय आपल्या सासुरवाशिनींना माहेरी आमंत्रित करतात. सहभोजन करुन फेस्ता साजरा करतात. माऊलीच्या दर्शनाने पावन होतात. जत्रेतील आनंद लुटतात.

माऊलीच्या हातात दोन खेळणी आहेत. बाळासाठी वुलचे कानटोपी बनविण्याची ती साधने आहेत. पूर्वी गर्भवती स्त्रीया अशा गरम वुलच्या कानटोप्या आपल्या बाळासाठी बनवित असत. कारण मारिया आहे येशू बाळाच्या प्रतिक्षेत. ख्रिस्त जन्माच्या ८ दिवस अगोदर होणारा हा सोहळा १८ डिसेंबरलाच होत असतो व अनंतापर्यंत होत राहिल त्याच तारखेला.

कारण माऊली कुणाला कधी फेस्त्याला

या - असं सांगत नाही

ती - आलेल्या कुणालाच

जा - असं म्हणत नाही

तरी - लाखो भाविकांची

१८ - डिसेंबरला रिघ लागते

तिच्या - दर्शनासाठी आशिर्वादासाठी

हाच आहे महिमा पाली फेस्त्याचा त्यावर गाणी देखील गायिली जातात.

पालीचा फेस्ता पालीचा फेस्ता...

घाटं ही वाजतानं पालीचे देवलानं

सगले जातीचे लोक आयल्यानं

पालीला माऊलीचे दारान

जत्रेन करतान बगा कवरी मज्जा

काय बगा व गाजते पालीचा फेस्ता

खावाला मिलतान शिंगार, कवरा

आमी करताव मज्जा...

# घर

■ लेस्ली से. डायस (गीत), सांडोर.

diasleslie@gmail.com

नमस्कार,

खूप विचार करून एक गोष्ट सांगणार आहे तुम्हाला. आमच्या घरची गोष्ट.

माझे नाव मायरा. वसईतील एका मोठ्या शाळेत इयत्ता आठवीत शिकतेय मी. तीन भावंडांत मी सर्वांत मोठी. पुढील महिन्यात चौदा वर्षांची होईन. धाकटी बहीण आता अकरा आणि लहान भावाचे आता आठवं वर्ष सुरू आहे.

आम्हाला आई नाहीय. ती आमच्या लहानपणी गेली. आईविना पोरं म्हणून घरच्या आजीनेच वाढविलं आम्हाला. तिच्या मदतीला दोन-तीन बाई माणसंही असतात आमच्या घरी कामाला. आमची छान काळजी घेऊनही आता आता मला आजीचा खूप राग येऊ लागलाय. कारण ती आमच्या पप्पांना खूप रागे रागे बोलत असते.

पप्पा दिवसभर आपल्या कंपनीच्या कामात. इंजिनिअर आहेत ते. खूप मोठी कंपनी आहे त्यांची.

संध्याकाळी कधी लवकर घरी आले तर पप्पा आम्हा तिन्ही भावंडांना बाहेर फिरायला घेऊन जातात. खूप खाऊ-पिऊ घालतात. कधी चांगलासा सिनेमाही दाखवितात. आजी कधी बाहेर येत नाही. तिला बाहेरचं खाणंपिणं आवडत नाही.

पप्पांनी बाहेर फिरायला नेलं की खूप धम्माल. आम्ही तिघेही जण खूपच खूश. मोठ्या हॉटेलमध्ये आवडेल ते मागवायचं. आवडेल ते खायचं. त्या दिवशी आमचे लाडच लाड.

आमच्या खाण्या-पिण्याकडे पप्पा कौतुकाने पहात असतात. स्वतः मात्र विशेष काही खाणार नाहीत. आमचं खाऊन झालं की मॉलमध्ये जाऊन आमच्या आवडीच्या गोष्टींची खरेदी होऊन जाते. मग आम्हाला घरी आजीकडे सोडून पप्पा पुन्हा बाहेर निघून जातात.

त्या रात्री पप्पा घरी परतत नाहीत. मग आजी त्रागा त्रागा करत राहते. रात्रभर तिची बडबड सुरू असते. या बडबडीची आता आम्हाला सवय झालीय.

आता जग बऱ्यापैकी कळतंय मला. पप्पा रात्री कुठे जातात ते आता मला माहीत आहे. ते आमच्या नव्या मम्मीला भेटायला जातात. रात्रभर ते तेथेच राहतात. आमची नवी मम्मी तिच्या माहेरी राहते. आम्ही जेव्हा फिरायला बाहेर जातो तेव्हा ती आम्हाला भेटत असते. खरं तर आजीला आमची नवी मम्मी पसंत नाही. म्हणून आम्हाला तिला भेटायची बंदी व तिला आमच्या घरी येण्याचीही बंदी. तिच्या बाबतीत आजी पप्पांना नेहमी टाकून बोलत असते.

लहानपणी काही कळत नव्हतं, तेव्हा मला काही वाटत नव्हतं. पण आता मोठी झालेय मी. आजीनं असं पप्पांना घालून पाडून का बोलावं? आमचे शांत आणि विचारी पप्पा चुकीचं मुळीच वागणार नाहीत. आजीचा असा पप्पांवर राग का तेच मला कळत नाही.

"बापाने सुरू केलेल्या फॅक्टरीवर मोठा झालायस तू. शेठ झालास. बायको गेली आणि त्या बयेच्या नादी लागलास, असं आजी पप्पांना नेहमी बोलत असते. वास्तविक आजोबांनी सुरू केलेली फॅक्टरी पप्पांनी दहापटीने मोठी केली, असे आमचे सर्व नातेवाईक सांगत असतात. त्यांनी तीनशे- साडेतीनशे कामगारांना काम दिलंय. कंपनीचा एवढा मोठा कारभार सांभाळून पप्पा आम्हांला जमेल तसा वेळ देतात.

आमची नवी मम्मीसुद्धा चांगल्या स्वभावाची. म्हणून तर आजीचा विरोध झुगारून पप्पांनी तिच्याशी लग्न केलं. खूप शिकलेली आहे ती. पण आपल्या शिक्षणाचा तिला जराही गर्व नाही. आजीने घरात घेतलं नाही म्हणून माहेरीच राहते ती.

कालपरवाचीच गोष्ट. पप्पांनी आम्हाला बाहेरून फिरवून आणलं आणि त्या रात्री ते मम्मीला भेटायला ते बाहेर निघून गेले. काहीतरी बिनसलं म्हणून छोट्या भावाने माझ्या नकळत पप्पांना फोन लावला आणि काही तरी तक्रार केली. त्याची बालीश तक्रार ती. तरीही पप्पा घरी परतले.

आता भाऊ झोपला होता. तरी कुणाकडे काहीही चिडचिड न करता पप्पा शांतपणे आपल्या खोलीत झोपायला निघून गेले.

सकाळी उठून ते आजीशी बोलत होते. "आई तू नीलमला उगाच बोलू नकोस. तिला नावं ठेवू नकोस. खूप चांगल्या स्वभावाची आहे ती. रात्री मी तिच्या घरी असताना पोराचा फोन आला तेव्हा तिने मला घरी पाठवून दिले. म्हणाली, घरी जा उमंग. लहान आहेरे पोर. त्याला तुझी आठवण आली असेल. आई, तू तिचा सून म्हणून स्वीकार का करत नाहीस? ह्या तुझ्या नातवांना मम्मीची गरज आहे हे तुला कसे कळत नाही?"

"उगाच सुतावरून स्वर्ग गाठू नकोस तू उमंग. जगात सावत्र आया कशा असतात ते चांगलं माहितीय मला. ती बाई मला या घरात नको आहे", असं बोलून आजी तरातरा स्वयंपाक घरात निघून गेली. आणि स्वयंपाक करणाऱ्या मावशीवर उगाच अधिकार गाजवत बसली.

पप्पांनी आमच्या नव्या मम्मीचं नाव घेणंही तिला आवडत नाही. येथे याआधी कुणीतरी येईल व आपल्यावर अधिकार गाजविल ही भीती तिला नेहमी वाटत असते. मला नेहमी प्रश्न पडतो की आजी अशी का वागते? ती नियमित देवळात जाते, धर्मगुरूंची प्रवचने ऐकते मग इतरांचा असा राग राग का करते ती?

फेब्रुवारी महिना उजाडला. एके दिवशी पप्पांना आमच्या शाळेतून बोलावणं आले. स्कूल प्रिन्सिपल शालेय प्रगतीविषयी पालकांशी संवाद साधणार होते. ते पप्पांशी बोलताना म्हणाले, "तुमच्या मुलांचा अभ्यास बरा आहे, मुले हुशारही आहेत पण तुम्हा कुटुंबियांचा या मुलांशी फारसा संवाद होत नसावा. ही मुले नेहमी थोडी बुजलेली दिसतात. त्यामुळे इतर गोष्टीत ती थोडी मागे पडलेली दिसतात. शाळेत इतर मुलांतही

ही मुले जास्त मिसळत नाहीत. मुलांच्या शैक्षणिक विकासाबरोबर कलाकौशल्य विकसित व्हायला हवे ते होताना दिसत नाही."

पप्पांनी काही न बोलता मौन बाळगले व आम्हाला घेऊन घरी आले. पुढे चार-सहा दिवसांतच त्यांनी एक धाडसी निर्णय घेतला. दूर गावच्या प्रसिद्ध बोडींग स्कूलमध्ये आम्हा तिघा भावंडांचा प्रवेश घेण्याचा. मुलांमुलींसाठी वेगवेगळ्या असलेल्या त्या दोन्ही शाळांचा लौकिक देशभरात प्रसिद्ध होता.

या दोन्ही शाळांचे शैक्षणिक वर्ष मार्च महिन्यापासून सुरू होत होते.

आम्हा तिघांना पप्पांनी जवळ घेतले आणि ते म्हणाले, मुलांनो, तुमच्या सर्वांगीण विकासासाठी मी हा निर्णय घेतोय. तेथे तुम्हाला काही अडचण आली तर तुम्ही तसे मला कळवा. मी शक्य तेवढ्या लवकर तुम्हाला भेटायला येईन. घाबरायचे नाही. एरवी लहानसहान गोष्टीवरून भोकांड पसरणारा माझा लहान भाऊ जराही न रडता शांतपणे पप्पांचे बोलणे ऐकत होता. पहिल्यांदाच आम्हाला त्याच्यामध्ये खूप समंजसपणा दिसला.

आजी कुठे बाहेर फिरायला गेली होती. ती घरी आली. दूरगावच्या आमच्या बोर्डिंग स्कूलबाबत तिला कळताच तिने घर डोक्यावर घेतलं. "उमंग, हे काय डोक्यात आणलेस तू? माझी नातवंडे येथेच शिकतील. मला सोडून ती कुठे दूर जाणार नाहीत."

कधी नव्हे ते पप्पा आजीवर चिडले म्हणाले, "आता बस्स झालं आई. पोरांच्या शिक्षणाच्या आड येऊ नकोस. त्यांच्या भवितव्याचा प्रश्न आहे हा. तुझ्याकडे वेळ आहे का त्यांच्याशी बोलायला? त्यांच्याशी खेळायला. त्यांना जाणून घ्यायला? त्यांना समजून घेताना त्यांच्या विश्वात शिरावं लागते आई. केवळ 'माझी पोरं, माझी पोरं एवढं बोलून नाही चालत.

जिच्याशी मी लग्न केलंय त्या माझ्या बायकोला नीलमला तू कधी घरी येऊ देत नाही. नेहमी फॅक्टरीच्या मालकीवरून मला बोलतेस, 'बाबांनी सुरू केलेली फॅक्टरी, बाबांनी सुरू केलेली फॅक्टरी'.

होय, खरंय, बाबांनी सुरू केलेली फॅक्टरी मी चालवतोय. ती त्यांची आठवण म्हणून. आणि फॅक्टरीत काम करणाऱ्या तीनशे-साडेतीनशे कामगारांची रोजी रोटी सुरू रहावी म्हणून. ही जबाबदारी माझ्यावर नसती तर मुलांना घेऊन दूर गावी गेलो असतो. यापुढे मला फॅक्टरीबद्दल टाकून बोलणार असशील तर घे फॅक्टरी तुझ्या ताव्यात आणि चालव ती. हा व्याप सांभाळताना तू माझा छळ का करतेस?" आजीवर कधी नव्हे ते पप्पा आज खूपच चिडले होते. वैतागले होते. पप्पांचे बोलणे आजीला अनपेक्षित होते. काही न बोलता ती तिच्या खोलीत निघून गेली.

आम्ही प्रवेश घेत असलेल्या दूर गावच्या त्या दोन्ही शाळा आठवडाभराने उघडणार होत्या. तेथे निघायच्या आठ दिवस आधीच आमचा कपडालत्ता, वह्या, पुस्तके, शूज, खाऊचा डबा अशा विविध साहित्याने भरलेल्या आमच्या ट्रंका घेऊन जाण्यासाठी टेम्पो अंगणात येऊन थांबला होता.

येथील जुन्या शाळेतील काही सोपस्कार पार पाडून आठवडाभराने आम्हीही निघणार होतो. पप्पा घरी हजर राहून ट्रंका भरण्याचे काम स्वतः करीत होते. आमचे सामान भरण्याचे काम सुरू असतानाच आजी तिच्या खोलीतून बाहेर आली आणि गेले काही दिवस तिने पप्पांशी धरलेला अबोला सोडून त्यांना म्हणाली,

"जरा थांब उमंग. या ट्रंका पाठवून देऊ नको. मी जरा बाहेर जाऊन येते. तोपर्यंत थांब" आणि आमच्या ड्रायव्हर काकांना बरोबर घेऊन कार घेऊन ती निघून गेली.

आजी आमच्यासाठी काही तरी भेटवस्तू आणण्यासाठी बाहेर गेली असावी असे आम्हा सर्वांना वाटत होते म्हणून आजी येईपर्यंत ट्रंका भरण्याचे काम आम्ही थांबविले आणि आम्ही चौघेही जण आजीची वाट पहात थांबलो.

आजी आम्हाला देण्यासाठी काय भेटवस्तू घेऊन येणार याची आम्हा मुलांना खूप उत्सुकता लागून राहिली होती.

काही वेळाने आजीची कार अंगणात येऊन थांबली. कधी नव्हे अशा हसतमुख चेहऱ्याने आजी कारमधून बाहेर पडत होती. आजी एकटी नव्हती. तिच्यामागे आमची नवी मम्मी कारमधून बाहेर पडत होती. तिला बघून आम्ही सर्वजण चकीत झालो.

आजी मम्मीला घरात घेऊन आली आणि तिचा हात तिने पप्पांच्या हाती सोपविला व म्हणाली, "उमंग ही तुझी बायको आणि नीलम ही तुझी मुले. आजपासून तू यांची आई. आजपासून सांभाळ तुझ्या मुलांना. आजपासून हे घर तुझे.

आता पोरं शिकायला बाहेर कुठे जाणार नाहीत."

'होय आई', आजीच्या सुरात सूर मिसळून मम्मीने आम्हा तिघा भावंडाना कवेत घेतले.

आमचा हा कौटुंबिक सोहळा आमचे ड्रायव्हर काका, स्वयंपाक घरातील मावशा आणि इतर नोकर चाकर कौतुकाने पहात होते.

बऱ्याच वर्षांनी आमचे घर प्रकाशाने उजळले होते. परिपूर्ण झाले होते.

# अर्ध्यावरती डाव

■ डॅनिअल मस्करणीस, वाघोली, वसई

सकाळचे अकरा वाजले होते. सायमन घराच्या मागच्या बाजूस, परसदारी खुर्ची घेवून पेपर वाचत बसला होता. पलीकडे रिटा कोयती घेवून शहाळ्याचे पाणी काढत होती. नारळ फोडून त्यातील पाणी ती स्टीलच्या भांड्यात जमा करीत होती. समोर बसलेल्या सायमनला तिचे श्रम दिसत होते पण त्याचा नाईलाज होता. तीन मोठे पेले भरतील एवढे शहाळ्याचे पाणी निघाले होते. तिने बाकीचे नारळ तिथेच राहू दिले. नारळाची करवंटी व इतर कचरा तिने बाजूच्या टोपलीत भरला व ती लगबगीने स्वयंपाकघरात शिरली. दुपारच्या जेवणाची तयारी करण्याची वेळ झाली होती. सायमननेही नाश्ता केलेल्याला तीन तास होत आले होते. तिने घाई घाईने सकाळी साफ करून ठेवलेली मच्छी करण्यास घेतली. त्याला कोथिंबिरीची वडी आवडते म्हणून तिने बाजूच्याच शेतातून खुडून आणलेली कोथिंबिरीची जुडी कापण्यास घेतली.

तोच घराची बेल वाजली. दोन्ही मुले, नेल्सन व सिल्विया क्लासनिमित्ताने बाहेर गेलेली होती. रिटा स्वयंपाक घरातून उठली व तिने घराचा दरवाजा उघडला. पुढे उभी असलेली ती व्यक्ती पाहून ती प्रथम थोडी बावरली व नंतर थोडी अवघडली. 'हे का आले असतील बरे ? ह्यांना काही कळले तर नाही?' असा विचार करीत ती तिथेच घुटमळली, मग तिने स्वतःला चटकन सावरून त्यांना आत येण्यास सांगितले. ती व्यक्ती म्हणजे त्यांच्या गावातीलच करारी व्यक्तीमत्व असलेले अण्णा हे होते.

इथे सायमनने घराची बेल वाजली ते ऐकले होते. कुणीतरी पाहुणेमंडळीच आलेली असणार असे वाटून तो पुन्हा विचार करू लागला , 'रिटा काही लपवत तर नसेल ? काय झाले असेल बरं मला ? पोटातली आतडी दुखतेय म्हणून आपण दोन महिने अगोदर डॉक्टराकडे पहिली फेरी घेतली होती. आणि त्यानंतर लिवरला सूज

आल्यामुळे आपलं पहिलं ऑपरेशन एक महिन्यापूर्वीच झालेलं. 'हा आजार ६-७ महिने राहतो, त्यात चिंता करण्याचे काही कारण नाही. फक्त थोड्या वेदना सहन करीत थोडी विश्रांती घ्यावी लागेल' हेच काय ते रिटाने आपल्याला सांगितलेलं. आता तिने सांगितलेलं आहे म्हणजे ते खरंच असणार. पण त्यात पाहुण्यांना एवढी माझ्याकडे लगबगीने येण्याची काय गरज ? पण कदाचित असेही असू शकेल. माझी पाहुण्यांना खरंच काळजी असावी. आणि का नाही ? मी रिटाच्या आणि माझ्या सगळ्या पाहुण्यांच्या दुखण्या खुपण्यासाठी गेलेलो आहे. रिटा पूर्ण दिवस कामानिमित्त बाहेर. त्यामुळे तिचे पाहुणेही मीच घेतलेले.

एवढ्यात 'अरे सायमन, काय बोलतोस ? कशी आहे तब्येत ?' असे विचारत अण्णांनी सायमनची तंद्री भंग केली. सायमन वर मान करून पाहतो तो काय, साक्षात अण्णा पुढे उभे. त्याला क्षणभर काय बोलावे हेच सुचले नाही, 'उम्म्म.. हो... ठीक आहे आता', असे म्हणत सायमनने आपली मान खाली घातली. 'नीट खातपीत जा. स्वतःची काळजी घे', असे म्हणून अण्णा निघून गेले.

'रिटा... ' सायमनने क्षीण पण काहीश्या अस्वस्थपणे रिटाला हाक दिली.

'हो... आले'

'रीटा, तुला माहीत आहे ना, माझा तुझ्यावर किती विश्वास आहे तो?'

'हो... तुमच्या स्वतःपेक्षाही जास्त', रिटा त्याच्या नजरेला प्रेमाने नजर भिडवित म्हणाली.

'अण्णाने आपल्याला किती त्रास दिला आहे हे तुला माहिती आहे. तो माझा किती द्वेष करतो हे देखील तुला माहिती आहे. तरीही आज तो माझ्या या लिव्हरच्या आजारासाठी माझ्याकडे का आला ?'. 'रिटा, तू माझ्यापासून काही लपवत तर नाहीस ना? काय झाले आहे गं, मला ?'

'अहो' रिटा त्याला मध्येच तोडत म्हणाली, 'काही नाही, ते का कुणी परके आहेत. जमिनी जमिनी वरून भांडणे कुणा परकीयात नाही होत, आपल्या माणसातच होतात ! ते आपल्या गावातील ज्येष्ठ व्यक्ती आहेत. कुणाच्या दुखण्या-खुपण्याला ते

नेहमी जातात. तुम्ही उगाच कशाचा कशाशीही संबंध जोडता. चला मी आता पटकन जेवण करते. आज आपल्याला संध्याकाळी डॉक्टराकडे जायचंय, लक्षात आहे ना ? रिक्षा ४ वाजता येईल', असे म्हणत ती लगबगीने आतमध्ये गेली.

अण्णा हे सायमनच्या गावातील ज्येष्ठ व्यक्ती. त्यांचा शेती जुमला सगळ्यात जास्त. त्यांचा दराराही तसाच मोठा. तो दरारा मग शेतीतही दिसून यायचा. त्यांच्या शेतीसाठी दुसऱ्यांचे पाणी अडवणे. दुसऱ्यांच्या शेतीमध्ये कुरघोडी करणे, शेतीचा बांध फोडणे, या बाबत तो काहीसा कुप्रसिद्ध होता. सायमन अण्णाविषयी हे अगोदरपासून जाणून होता परंतु अण्णाबरोबर त्याचा प्रत्यक्ष संबंध येईपर्यंत त्याला त्याची धग जाणवली नव्हती. आठ वर्षापूर्वी सायमन ज्या कंपनीत काम करत होता, ती कंपनी अचानक बंद पडली. वाढलेलं वय, तुटपुंजे शिक्षण ह्यामुळे दुसरी नोकरी काही त्याला गवसली नाही. मग शेवटी घरातील शेतीकडे त्याने पूर्णवेळ लक्ष देण्यास सुरुवात केली. शेती कसताना अण्णाच्या वागण्याचे चटके त्यालाही जाणवू लागले. सायमन जरी कमी शिक्षित असला तरी तो आपल्या हक्काच्या बाबतीत कमालीचा जागरूक होता. त्याला हे खचितच पटणारे नव्हते. आणि ह्यावरून त्यांचे नेहमीच खटके उडायचे. ३-४ महिन्यापूर्वी तर अण्णाने हद्दच केली होती. गावातील प्रत्येक शेतकऱ्याला त्याची शेती शिंपण्यासाठी एक दिवस आणि एक वेळ आखून दिलेली असताना, नेमका सायमनच्या वेळेअगोदर अण्णाने मोटर चालूच ठेवली आणि विहिरीचे संपूर्ण पाणी वाया घालवले. सायमनला त्याची शेती शिंपण्यासाठी पाणीच उरले नव्हते. हा अन्याय असह्य होऊन मग दोघांमध्ये बरीच जुंपली होती. हे प्रकरण चर्चच्या फादरापर्यंत पोहोचले होते. त्या दिवसापासून दोघांमध्ये संभाषण नव्हते. 'खरंच, अण्णा मनाने मोठे असावेत. माझ्याशी कितीही वाद झालेला असला तरी माझ्या तब्येतीची चौकशी करण्यासाठी ते माझ्या घरी आले. त्यांचा स्वभाव कसाही असला तरी ते आपल्याला वडीलधारी आहेत. आपण उगाच त्यांच्याशी वाद घातला' काहीसा असा विचार, सायमन परसादाराकडून दिसणाऱ्या लांब शेतीच्या शिवाराकडे नजर लावीत स्वतःशी करू लागला.

दुपारी चार वाजता ठरल्याप्रमाणे रिक्षा आली. रिटा सायमनला घेवून हॉस्पिटलला पोहोचली. अगोदर घेतलेल्या अपॉइंटमेंटप्रमाणे डॉक्टरांनी सायमनला तपासले.

'काही औषधे द्यावी लागणार आहेत. त्याला ह्याचं शरीर कसं साथ देते ते तपासण्यासाठी याला आजची रात्र इथेच काढावी लागेल'

'हो चालेल डॉक्टर, मी राहीन ह्यांच्या बरोबर'

डॉक्टर आणि रिटा ह्यांचं संभाषण सायमन ऐकत होता. त्याच्या पोटात अचानक सुरु झालेल्या वेदना सहन करण्यावाचून तो काहीच करू शकत नव्हता. रिटाने जनरल वॉर्डमध्ये एक खाट बुक केली.

संध्याकाळचे आठ वाजत आले होते. डॉक्टरांनी सायमनला दोन इंजेक्शने आणि काही औषधे दिली. डॉक्टरांनी सूचना दिल्याप्रमाणे नर्सने सर्व काही फाईलमध्ये व्यवस्थित लिहून ठेवले. हळूहळू रुग्णांना भेटण्यास आलेले आप्त-नातेवाईक ह्यांची पांगापांग होत होती. त्या जनरल वॉर्डमध्ये जवळजवळ १५ एक खाटा होत्या. प्रत्येक रुग्णांचे कोणी ना कोणी नातेवाईक त्यांबरोबर वस्तीला थांबलेले होते. सायमनने असह्य वेदना होत असूनही पाहिले कि आलेल्या रुग्णाबरोबर थांबलेले त्यांचे नातेवाईक हे सगळे पुरुष आहेत. 'आपल्या रिटाला ह्या परपुरुषांबरोबर इथे हॉस्पिटलमध्ये अख्खी रात्र काढावी लागणार' ह्या कल्पनेने तो व्यथित झाला.

'रिटा, प्रश्न फक्त एका रात्रीचा आहे, तू प्रायवेट मध्ये जागा असेल तर तिथे मला शिफ्ट कर. माझ्यावर आता औषधांचा अंमल चढला कि मी झोपी जाईन, पण ह्या सगळ्या पुरुष मंडळीत मला तुझी सुरक्षितता जास्त महत्वाची वाटते' असे सांगून त्याने रिटाला प्रायवेट रूममध्ये त्याची खाट हलविण्यास सांगितले.

जसजशी रात्र चढत गेली तसतसा औषधांचा अंमल त्याच्यावर चढत गेला. तो गाढ झोपी गेला.

रिटा मात्र त्याच्या शेजारी बसून त्याच्या मलूल होत चाललेल्या शरीराकडे पाहत होती. 'इतक्या वेदना होत असूनही, याला मात्र माझी काळजी. मी एक तर ही अशी काळी सावळी. त्यात व्यापामुळे आणखीनच ओबडधोबड झालेले माझे शरीर. कोणी माझ्यावर कसं आणि का बघेल? पण सायमनला मात्र अजून मी सुंदरच वाटते. याचं किती रे माझ्यावर प्रेम'.

'खरंच, आता दोन महीने होतील सायमन बिछान्यात पडून, पण आता त्याची किंमत कळते आहे. शेतातील कामे, घरातील दैनंदिन कामे, बाजारहाट, मुलांच्या अभ्यासावर लक्ष देणे. नातेवाईकांकडे ये जा करणे. सगळं किती हा सुंदररित्या करीत होता. मी फक्त कामावर जावून येऊन संध्याकाळी स्वयंपाक करणे एव्हढेच काय ते मला माहित. देवही किती क्रूर? कसलंही व्यसन नव्हतं ह्याला. तरीही ?'.

तिला तो दिवस आठवला. अचानक दुपारी कामावर असताना सायमनचा फोन आला, 'अगं, मी इथे एका अनाथ आश्रमात आलो आहे, आज माझ्या दादीचा वाढदिवस, त्यामुळे इथल्या मुलांना पाच किलो बिर्याणी आणली होती मी. जवळपास २० एक मुले आहेत. काय गोड मुलं आहेत गं, आपल्या नेल्सन आणि सिल्वियासारखीच. त्या बिच्चाऱ्यांचं कोणीच नाही गं ह्या जगात. मी त्यांना सांगितलंय. माझी दोन्ही मुलं दहावी बारावीच्या परीक्षेला बसली आहेत. त्यांच्यासाठी प्रार्थना करा ती पास झाली कि मी पुन्हा तुमच्या साठी पेढे घेऊन येणार'. सायमनच्या बोलण्यात इतका आनंद होता कि, 'किती पैसे संपले ?' अशा प्रश्नांना काहीच किंमत नव्हती !

रिटाला तिच्या नवऱ्याचा तेव्हा खूप अभिमान वाटला होता. 'इतर बायकांचे नवरे जरी ऑफिसला जाणारे असले तरी स्वतःच्याच व्यसनात मश्गुल असतात. आणि इथे माझा त्यांच्या तुलनेत 'अडाणी, बायकोला कामाला पाठवून घरी बसणारा नवरा' किती श्रेष्ठ होता! खरंच सायमनचे हृदय किती सुंदर आहे आणि तो माझ्यावर किती निस्सीम प्रेम करतो', रिटा त्याच्याकडे डोळे भरून पाहतच राहिली. रात्रीचे बारा वाजत आले होते. काही वेळाने तीही बसल्या जागेवरच डोळे बंद करून पडून राहिली.

'रिटा, उठून थोडं पाणी देतेस का, घसा जर कोरडा वाटतोय' ह्या बोलण्याने रिटा पटकन भानावर आली. सकाळ झाली होती. तिने डोळे चोळून लगेचच बाजूच्या बाटलीमधून त्याला ग्लासमध्ये पाणी दिलं. तो पाणी पीत असतानाच नर्स खोलीत आली.

'गुड मॉर्निंग, आता कसं वाटतंय ?'

''सिस्टर, रात्री काही जाणवलं नाही, सगळं झोपेत गेलं. पण आता पुन्हा तशीच वेदना जाणवतेय हो'

'हो, औषधांचा प्रभाव ओसरला कि असंच', असं म्हणत तिने सायमनला चेक करून काही डिटेल्स फाईलमध्ये नोट करून ठेवले व जाताना त्याच्या देखत रिटाला म्हणाली,

'डॉक्टर, आज मुंबईला गेले आहेत, पण त्यांनी टाटामध्ये ह्यांच्यासाठी पुढच्याच आठवड्यात, शुक्रवारी अपॉइंटमेंट घेतली आहे, तुम्ही तिथे त्यांना डायरेक्ट तिकडे घेऊन जा' असे म्हणत नर्स खोलीबाहेर निघून गेली.

'टाटा' !! शेवटच्या स्टेजला आलेल्या कॅन्सरग्रस्त रुग्णांची शेवटची आशा. आणि हा संदर्भ सायमनला माहित होता. त्याचा पाण्याचा घोट तसाच तोंडातून बाहेर आला व तो बिछान्यात कोसळला. रिटा धावत त्याला सावरण्यासाठी धावली. तिलाही आता सायमनला कसे सावरावे हे कळत नव्हते. क्षणात, गुपित हे गुपित राहिले नव्हते. ती तिथेच त्याच्या छातीवर डोके ठेवून रडण्यास लागली. आणि तो अगोदरच खोल गेलेल्या नजरेतून आणखीच शून्यात नजर लावून पाहू लागला....

त्याला घरी आणून दोन दिवस झाले होते. नातेवाईकांची वर्दळ सुरूच होती. कोणी रिटाकडे 'हा गरीबाच्या घरी श्रीमंत पाहुणा कसा आला ?' म्हणत सहवेदना दाखवत होता तर, 'माझ्या दोन्ही मुलांबरोबर मीही या वर्षी आयुष्याच्या परीक्षेसाठी बसलो आहे' असं सायमन उपहासाने आलेल्या नातेवाईकाबरोबर वेदनेने कण्हत बोलत होता. दोघा मुलांनाही आपले पप्पा आता आपले थोड्या दिवसाचेच साथी आहेत हे कळून चुकले होते. एका रात्री त्याने आपल्या दोन्ही, नेल्सन आणि सिल्विया ह्या मुलांना जवळ बोलावले, 'मुलांनो, माझे बाबा जेव्हा मरण पावले तेव्हा मी फक्त ४ वर्षाचा होतो. जे काही मला जमले ते माझ्या कुवतीने केले, पण तुम्ही १४ वर्षाचे आहा, व्यवस्थित रहा आणि मम्मीची काळजी घ्या'

शेवटी ती काळरात्र आली. मुले नेहमीप्रमाणे अभ्यास करीत खोलीत बसलेली होती. आणि रिटा सायमनच्या शरीराला थंड पाण्याने लेप देत होती. केमोथेरपी आणि

इतर जड औषधांमुळे त्याच्या अंगाची लाही लाही होत होती. तो असह्यपणे खिडकीतून बाहेर दिसणाऱ्या नारळाच्या काळोख्या स्तब्ध प्रतीकृतीकडे तेवढ्याच निपचीतपणे पाहत होता. थोडा वेळ निघून गेला व त्याला पोटात अचानक अस्वस्थ वाटू लागले, 'मी जरा शौचालयात जाऊन येतो' असे म्हणून तो कसाबसा उठून परसदारी शौचालयात गेला. थोडा वेळ होत नाही तोच त्याने रिटाला साद घातली. नैसर्गिक विधी उरकण्यास त्याला त्रास होत होता. आजाराने भंगलेले त्याचे शरीर त्याला आता साथ देत नव्हते अश्या परिस्थितीत, नैसर्गिक विधी उरकण्यास त्याला त्याच्या अर्धांगीनीची साथ हवी होती. त्याने अगतिकपणे तिला साद घातली...

एकवेळ दुसऱ्याच्या मनातील घाण साफ करणे सोप्पे आहे, पण दुसऱ्याच्या शरीरातील घाण साफ करणे? तिथे फक्त त्या व्यक्तीवर असलेले अमर्याद व निस्सीम प्रेमच एखाद्याला तसे करण्यास प्रवृत्त करू शकते. नवऱ्याचे हे अकाली आलेले मोठे आजारपण, रात्री-अपरात्री त्याची डोळ्यात तेल घालून केलेली सेवा, डॉक्टरांचे झिजवलेले उंबरे, पैशासाठी केलेली धावपळ, घर-संसाराची जबाबदारी, पाहुण्यांचे आदळणारे लोंढे अशा वेगवेगळ्या पातळ्यावर रिटा हे मागील काही महीने तडफदारपणे लढत होती. सायमनच्या आजारपणामुळे अगोदर काहीशी बुजरी, शांत असणारी रीटा ही एकदम झुंझार आणि धीट झाली होती. तिला तसे बनण्याशिवाय दुसरा काही पर्यायच नव्हता म्हणा. नियती जणू जीवनाच्या रंगमंचावर कुटुंबप्रमुखाच्या भूमिकेसाठी तिला तयार करीत होती.

'घाबरू नका मी ही आलेच' असे म्हणत, ती रणरागिणी तडक हातात जुने फडके घेऊन शौचालयात धावली. अर्धा-एक तासाच्या अथक परिश्रमानंतर तिच्या मदतीने त्याने तो नैसर्गिक विधी उरकला. रात्रीचे ११ वाजत आले होते. सायमन पलंगावर पहुडला. आजाराने पोखरलेल्या त्याच्या शरीराला आता बरे वाटू लागले होते. त्याच्या वेदनामय चेहरा आता शांत वाटत होता. रिटालाही त्याच्या चेहऱ्यावरचे समाधान बघून खूप बरे वाटले. तिने ह्या आजारपणात त्याला केलेल्या मदतीचे व दिलेल्या साथीचे मोल कोणत्याच शब्दाने भरून निघणारे नव्हते. त्यालाही ते माहित होते. त्याने फक्त कृतार्थपूर्ण नजरेने तिच्याकडे पाहिले. व तो शांतपणे झोपी गेला. खूप

दिवसांनी सायमनला असे शांतपणे झोपताना पाहून तिलाही बरे वाटले. तो जास्त वेळ जगेल अशी उगाच खोटी आशा तिला वाटून गेली. पण सायमन शांतपणे झोपी गेला होता तो कधीच पुन्हा न उठ्ण्यासाठी, त्याने घेतलेली निद्रा ही अनंतकाळाची होती.

सकाळी अंत्यविधीच्या वेळी ती जोरजोरात 'धन्या, मला एकटे सोडून तुम्ही कुठे निघून गेलात' म्हणून जोरजोरात आक्रोश करीत होती. त्या आक्रोशात वेदना होती, दुःख होते पण हतबलता नव्हती. तिला तिच्या जोडीदाराला त्या दुर्धर आजारातून बाहेर काढण्यास सफलता आलेली नसली तरी 'काहीच करू शकले नाही' अशी विफलताही नव्हती. तिला जे काही शक्य होते ते तिने अगदी मनापासून केले होते. तिचा साथीदार जरी दूरदेशी निघून गेला असला तरी त्याला शांतपणे पाठविता आले याचे मोठे समाधान तिच्याकडे होते. राजा राणीची कहाणी जरी अधुरी राहिली असली तरी उरलेला उरलेला अर्धा डाव ती तिला नव्याने गवसलेल्या आत्मविश्वासाच्या जोरावर आणि सायमनच्या आठवणीच्या बळावर पूर्ण करणार होती.

(प्रकाशित: सुवार्ता, ऑगस्ट, २०१४)



# जनरेटिव्ह एआय (चॅट जीपीटी)
## आणि बदलणारे मानवी जीवन

■ चिन्मय गवाणकर, वसई

*(लेखक माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात दोन दशकांहून अधिक काळ कार्यरत असून ते कृत्रिम बुद्धीमत्ता, डेटा ॲनालीटीक्स आणि मशीन लर्निंग क्षेत्रातील तज्ञ म्हणून ओळखले जातात.)*

**जनेरेटिव्ह एआय म्हणजे काय आणि आपण या तंत्रज्ञानांबद्दल का जाणून घेत ले पाहिजे ?**

नुकताच म्हणजे ३० नोव्हेंबर २०२३ रोजी चॅट जीपीटीचा पहिला वाढदिवस साजरा झाला. जनरेटिव्ह आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे चॅट जीपीटी हे एक उत्तम उदाहरण आहे. पण आपण आज या लेखात समजून घेऊ की जनरेटिव्ह एआय मुळे मानवी आयुष्यात नक्की काय परिणाम होतील.

जेनेरेटिव्ह एआय हा एक प्रकारचा कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रकार आहे आहे जो काही इनपुट डेटाच्या आधारे मजकूर, प्रतिमा, संगीत किंवा भाषण यासारख्या नवीन सामग्री तयार करू शकतो. उदाहरणार्थ, आपण जेनेरेटिव्ह एआयला एक प्रॉम्प्ट देऊ शकता, जसे की "जेनेरेटिव्ह एआयबद्दल लेख लिहा", आणि जादू झाल्याप्रमाणे एक कोरा करकरीत मजकूर तयार होईल करेल जो अगदी माणसाने लिहिल्यासारखा सुसंगत असेल! आश्चर्यकारक वाटते, बरोबर?

परंतु आपण जेनेरेटिव्ह एआय बद्दल का जाणून घेतले पाहिजे ? कारण यामुळे तुमचं आयुष्य अनेक प्रकारे सोपं आणि मजेशीर होऊ शकतं. जनरेटिव्ह एआय आपल्याला सर्जनशीलता, वैयक्तिकरण किंवा संप्रेषण आवश्यक असलेल्या कार्यांमध्ये

मदत करू शकते. विविध क्षेत्रात जेनेरेटिव्ह एआय आपले जीवन कसे बदलू शकते याची काही उदाहरणे आपण पाहूया.

**ग्राहक सेवा: मैत्रीपूर्ण आणि विनोदी बॉटसह चॅट करा**

कल्पना करा की आपल्याला आपल्या ऑनलाइन दिलेल्या कुठल्याही ऑर्डरमध्ये काही समस्या आहे किंवा आपल्याला एखाद्या उत्पादन किंवा सेवेबद्दल काही माहिती हवी आहे. आज तुम्ही काय कराल? बँकेला किंवा त्या कंपनीला फोन करून फोन वर एजंट येण्याची वाट बघत थकून जाल! किंवा कंपनीला ईमेल कराल ज्यास उत्तर मिळण्यास काही दिवस सुद्धा लागू शकतात.

हे सगळे करण्यापेक्षा कंपनीच्या वेबसाईट किंवा ॲपवर एक जनरेटिव्ह एआय बॉट असेल ज्याच्याशी तुम्ही चॅट करू शकता, आपली समस्या सोडवून घेऊ शकता किंवा अगदी मस्त गप्पा सुद्धा मारू शकता! मानवी हस्तक्षेपाशिवाय असा बॉट आपल्याला सर्वोत्तम समाधान प्रदान करेल आणि आपल्याला हसवण्यासाठी काही विनोद देखील सांगू करू शकेल.

उदाहरणार्थ, आपण सर्वांना माहिती असलेला चॅटजीपीटी हा एक जनरेटिव्ह एआय बॉट आहे जो चित्रपटांपासून राजकारणापर्यंत कोणत्याही गोष्टीबद्दल आपल्याशी गप्पा मारू शकतो आणि त्याच्या विनोदी प्रतिसादांसह आपल्याला हसवू शकतो. चॅटजीपीटी २०२२ मध्ये लाँच करण्यात आले होते आणि त्याच्या क्षमतांनी लाखो वापरकर्त्यांमध्ये खळबळ माजली होती. तुम्ही सुद्धा त्याच्या या विनोद आणि "व्यक्तिमत्त्वाचा" आनंद घेतला असेलच! आणखी एक उदाहरण म्हणजे रेप्लिका, एक जनरेटिव्ह एआय बॉट जो आपला वैयक्तिक साथीदार आणि मित्र असू शकतो आणि आपल्याला तणाव, एकटेपणा आणि चिंतेचा सामना करण्यास मदत करतो. ज्यांना गप्पा मारायला मित्र अथवा कुटुंबीय नाहीत आणि एकटेपणा वाटतो अशा लोकांना कुठलीही अपेक्षा न करणारा, तुम्हाला काहीही स्वार्थ न ठेवता सल्ला देणारा असा डिजिटल मित्र बनू शकतो.

**शिक्षण: वैयक्तिकृत आणि संवादात्मक शिक्षकाकडून ट्यूटरकडून शिका**

कल्पना करा की आपल्याला एखादी भाषा, वाद्य किंवा सॉफ्टवेअर सारखे नवीन कौशल्य शिकायचे आहे. आणि तुमच्या आसपास असे शिकविणारा कुणी चांगला शिक्षक नाही किंवा क्लास सुद्धा नाही. असलाच क्लास तर खूप महाग फी आहे किंवा तुम्हाला कंटाळवाण्या क्लासमध्ये जायचेच नाही आणि यु ट्यूब वरचे कुठले तरी रटाळ व्हिडियो नुसतेच बघून सुद्धा शिकायचे नाही ! मग आहे ना पर्याय आज ! तुमचा स्वतःचा चॅट जीपीटी “शिक्षक" !

जेनेरिक आणि कंटाळवाण्या कोर्समध्ये प्रवेश घेण्याऐवजी किंवा निष्क्रिय आणि कंटाळवाणा व्हिडिओ पाहण्याऐवजी, आपण जेनेरेटिव्ह एआय "शिक्षकाकडून“ शिकू शकता जे आपल्या पातळी, प्राधान्ये आणि उद्दीष्टांशी जुळवून घेऊ शकतो. उदाहरणार्थ, जेनेरेटिव्ह एआय आपल्या प्रगती आणि कामगिरीवर आधारित आपल्यासाठी सानुकूलित धडे, व्यायाम, क्विझ आणि अभिप्राय तयार करू शकते. आपला शिकण्याचा अनुभव अधिक मजेदार आणि इमर्सिव्ह बनविण्यासाठी जेनेरेटिव्ह एआय वास्तववादी आणि आकर्षक परिस्थिती, संवाद आणि कथा देखील तयार करू शकते.

आणखी एक उदाहरण म्हणजे डुओलिंगो, एक जनरेटिव्ह एआय अँप जे आपल्याला जगातील कोणतीही भाषा शिकवू शकते, आणि ते सुद्धा वैयक्तिकृत आणि गमतीदार धडे तुमच्यासाठी तयार करून आणि तुम्हाला जगभरातील आणि मैत्रीपूर्ण आणि सहाय्यक समुदायाशी जोडून! आहे कि नाही गम्मत!

**रिटेल शॉपिंग : वैयक्तिकृत आणि सर्जनशील कॅटलॉगमधून खरेदी करा**

कल्पना करा की आपण भेटवस्तू, कपड्यांची वस्तू किंवा गॅझेट सारखे ऑनलाइन काहीतरी खरेदी करू इच्छित आहात. सध्या आपण ऍमेझॉन, फ्लिपकार्ट अशा वेबसाईट्स वर जाऊन त्यांनी सुचविलेले पर्याय बघत बसतो. पण ते पर्याय अगदी वैयक्तिक “टेस्ट"ला साजेसे असतीलच असे नाही. नाहीतर दुसरा पर्याय म्हणजे तुम्हाला प्रचंड मोठ्या कॅटलॉगमध्ये तुम्हाला आवडती वस्तू शोधात बसावी लागेल. असे मोठ्या प्रमाणात आणि प्रचंड कॅटलॉगद्वारे ब्राउझ करण्याऐवजी

किंवा विशिष्ट आणि दुर्मिळ उत्पादन शोधण्याऐवजी, आपण आपल्या प्राधान्ये, गरजा आणि बजेटवर आधारित आपल्यासाठी परिपूर्ण उत्पादन तयार करू शकणाऱ्या जेनेरेटिव्ह एआय कॅटलॉगमधून खरेदी करू शकता.

उदाहरणार्थ, जेनेरेटिव्ह एआय आपल्या निकषांशी जुळणारी प्रतिमा, वर्णन आणि उत्पादनांच्या किंमती तयार करू शकते किंवा अद्याप अस्तित्वात नसलेली परंतु आपल्याला आवडेल अशी नवीन उत्पादने देखील तयार करू शकते. आपल्याला सर्वोत्तम निर्णय घेण्यास मदत करण्यासाठी जेनेरेटिव्ह एआय पुनरावलोकने, रेटिंग आणि शिफारसी देखील तयार करू शकते. आणखी एक उदाहरण म्हणजे स्टिच फिक्स, एक जनरेटिव्ह एआय सेवा जी आपल्याला आपली शैली, आकार आणि प्रसंगावर आधारित कपडे आणि ॲक्सेसरीजचा वैयक्तिकृत बॉक्स पाठवू शकते.

भारतात सुद्धा तुम्ही मिंत्रा या कपडे खरेदी करण्याचा ऍप मध्ये याचा अनुभव घेऊ शकता. 'मिंत्रा'ने काही महिन्यापूर्वी "माय फॅशन अड्वायझर" नावाचा बॉट लाँच केला आहे. तिकडे जाऊन तुम्ही "मला मित्राकडे नाताळच्या पार्टीसाठी जायचे आहे,मला काय कपडे घालू ते सुचवा" असे सांगितल्यास तुमच्या आधीच खरेदीच्या इतिहासावर आधारित आणि नाताळ पार्टी थीमसाठी तुम्हाला आवडतील असा अक्खा "लूक" हा बॉट तयार करून देतो. तुम्ही हे नक्की ट्राय करा.

**फायनान्स : स्मार्ट आणि विश्वासार्ह सल्लागारासह आपले पैसे व्यवस्थापित करा**

कल्पना करा की आपण आपले पैसे बचत, गुंतवणूक करू इच्छित आहात किंवा आपले पैसे शहाणपणाने खर्च करू इच्छित आहात. गुंतागुंतीच्या आणि गोंधळात टाकणाऱ्या स्प्रेडशीटवर अवलंबून राहण्याऐवजी किंवा पक्षपाती आणि महागड्या मानवी सल्लागारावर विश्वास ठेवण्याऐवजी, आपण जनरेटिव्ह एआय सल्लागारासह आपले पैसे व्यवस्थापित करू शकता जे आपली आर्थिक परिस्थिती, उद्दीष्टे आणि जोखीम सहिष्णुतेचे विश्लेषण करू शकते आणि आपल्याला सर्वोत्तम सल्ला, रणनीती आणि पर्याय प्रदान करू शकते.

उदाहरणार्थ, जेनेरेटिव्ह एआय आपले उत्पन्न, खर्च, बचत आणि गुंतवणुकीचे अहवाल, चार्ट आणि अंदाज तयार करू शकते आणि आपली आर्थिक योजना कशी ऑप्टिमाइझ करावी हे सुचवू शकते. जेनेरेटिव्ह एआय आपल्याला ट्रॅकवर राहण्यास आणि तोटे टाळण्यास मदत करण्यासाठी अलर्ट, स्मरणपत्रे आणि टिपादेखील तयार करू शकते. आणखी एक उदाहरण म्हणजे मिंट, एक जनरेटिव्ह एआय ॲप जे आपल्याला आपले बजेट व्यवस्थापित करण्यास, आपल्या खर्चाचा मागोवा घेण्यास आणि पैसे वाचविण्यात मदत करू शकते.

असे आणखी बरेच उपयोग आहेत ज्याने येत्या काळात आपले आयुष्य आमूलाग्र बदलणार आहे. वर दिलेल्या काही माफक उदाहरणावरून आपल्या हे लक्षात आले असेलच कि, जेनेरेटिव्ह एआय हे एक शक्तिशाली आणि अष्टपैलू तंत्रज्ञान आहे जे आपले जीवन बऱ्याच प्रकारे सोपे आणि मजेदार बनवू शकते. जेनेरेटिव्ह एआय नवीन सामग्री तयार करू शकते जी प्रासंगिक, सुसंगत आणि मूळ आहे आणि जी आपल्याला सर्जनशीलता, वैयक्तिकरण किंवा संप्रेषण आवश्यक असलेल्या कार्यांमध्ये मदत करू शकते. आपल्याला मैत्रीपूर्ण आणि विनोदी बॉट, वैयक्तिकृत आणि इंटरॅक्टिव्ह ट्यूटशिक्षक, सर्जनशील आणि सानुकूलित कॅटलॉग किंवा स्मार्ट आणि विश्वासार्ह सल्लागाराची आवश्यकता असो, जेनेरेटिव्ह एआय आपल्याला सर्वोत्तम समाधान देऊ शकते. जेनेरेटिव्ह एआय हे केवळ एक साधन नाही तर एक मित्र, एक शिक्षक, एक डिझायनर आणि मार्गदर्शक देखील आहे, जे आपले जीवन समृद्ध करू शकते आणि आपल्याला आनंदी बनवू शकते.

# ब्लेसिंगस ओन्ली !

■ सचिन मेंडीस, बोळींज, वसई

‘अहेर स्विकारला जाणार नाही’ ह्या वाक्यात जितका आनंद आहे तितकाच त्या वाक्याच्या पोटात एका सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक पर्वाचा अंत आहे. कुणा एका कुटुंबाच्या सोहळ्यात अनेकांनी उपस्थित राहून अहेररूपी आर्थिक भेट देणे, हे आजच्या काळातील इन्शुरन्सचं एक मूलभूत रूप. प्रत्येकाने प्रत्येक सोहळ्याला थोडा थोडा अहेर घालून आपल्या घरातील कार्याला तो एकत्र पदरात पाडून कार्याच्या खर्चाचा बराचसा भाग उचलणे, अशी ही साधी सोपी सुटी संरचना.

मला हे अहेराचं नसणं हे सद्य समाजाच्या सुबत्तेचं जितक लक्षण वाटतं, त्याहून जास्त ते आजच्या पिढीने अहेर पुन्हा परत करण्याच्या बंधनाला झुगारण्यासाठी सुरू केलेली अप्रत्यक्ष सामाजिक चळवळ वाटते.

आमच्या उत्तर वसईत आपल्या घरातील कार्यात आलेला अहेर नाव, गाव व रक्कम असा लिहून ठेवण्याचा प्रघात होता. कुणा एखाद्याच्या घरी लग्नकार्याला जाताना कपाटातील अहेराची वही काढून अमुकाने किती अहेर घातला होता ह्याची खात्री करून परतफेड केली जात असे. एखाद्याकडून स्विकारलेला अहेर चुकून परत करायचा राहून गेल्यास अहेर घातलेल्याने अमुकाने आमचा अहेर ‘खाल्ला’ असा गावभर प्रचार केल्याचे अनेकदा कानी आले आहे. हा प्रकार म्हणजे चलनी नोटावर ‘मै धारक को ५०० रूपये अदा करने का वचन देता हूँ !’ ह्या प्रतिबध्दते प्रमाणे ‘मी घेतलेला अहेर घालणाऱ्या व्यक्तीस व्याजासकट परत करण्याचं वचन देतो’ असा अनौपचारिक समाज संकेत वाटतो.

लग्नकार्यासाठी निघताना अहेराचं पाकीट सापडण्याची किंवा मिळवण्याची मोठी कसरत करावी लागत असे. ५०० रूपये किंवा १००० रूपये अहेरात घालण्याची तयारी असलेल्या व्यक्तीच्या घरात ५० पैशाचे अहिराचे पाकीट नसणे हा मला दुर्दैवी व

विचित्र प्रकार वाटायचा. लग्नमंडपातही दोन रांगा असायच्या. एक अहेराची रांग तर दुसरी जेवणाची रांग. बहुधा अहेराच्या रांगेत पहिल्यांदा पसंदी लावून मग जेवणावळीत जाण्याचा शास्त्रीय नियम होता. अर्थात नियमाला अपवादही असतं.

अनेकदा सफेद शर्ट घातलेल्या एखाद्या पुरूषांच्या पारदर्शक शर्टमधून अहेराचे पाकीट डोकावत असे. असे पाकीट बाहेरून पाहत त्यातील पैशाच्या आकड्याचा अंदाज बांधण्यात एक वेगळाचं आनंद वाटत असे. मंडपात स्टेजवर फोटो काढण्यायोग्य नसलेली मंडळी ही यजमानांनी लग्नमंडपात जमवलेली गर्दी असते हा माझा कॅमेऱ्याचा शोध लागल्यापासूनचा ठाम समज होता. त्यामुळे लग्नात आपला फोटो न काढता रांगेतील आपल्या पुढच्या मंडळींचा फोटो काढण्यामागे असलेली पात्रता हा संशोधनाचा विषय राहिलेला होता. कुणा एका अहेराची पाकिटे वितरीत करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेने केलेल्या संशोधनानुसार हातात अहेराचे पाकीटे घेऊन स्टेजवर चढणाऱ्या मंडळींचे फोटो काढले जाण्याचे प्रमाण हे रिकाम्या हाती यजमानांना तोंड दाखवणाऱ्या मंडळीपेक्षा जास्त असल्याचे कळाले. मद्यपानाची अपेक्षा करत अहेराच्या पाकिटात २०० रूपये टाकलेल्या कुणा एका अज्ञात व्यक्तीने मंडपात मद्याची सोय नसल्याने निषेध म्हणून अहेराच्या पाकिटातून १०० रूपये काढून पुन्हा खिशात टाकल्याचा दाखला अनेकांनी ऐकला असावा. बहुधा पुरूषांच्या अहेर पाकिटातील अहेराचा आकडा मंडपातील मद्याच्या ब्रँड व लिटरच्या समप्रमाणात बदलत असावा.

असो, धन्य ती व्यक्ती अन धन्य ते पाकिट. हस्तकलेत निपुण असलेल्या माझ्या एका कला शिक्षक मित्राने लग्नमंडपात टिश्यू पेपर व भाताचे कण घेऊन अहेराचे पाकीट बनवल्याचे मी याचि देही याचि डोळा पाहिलेले होते. टिश्यू पेपर नावाचा स्वस्त आयटम लग्नमंडपात जेवण संपण्याअगोदर का संपतो ह्याचे कारण असे मास्तर असावेत.

नवरा नवरीच्या सोबत असलेल्या बेस्टमॅन व बेस्टगर्लच्या अनेक कर्तव्यापैकी अहेराची पाकिटे नवरा नवरीच्या हातातून घेऊन ती पिशवीत सांभाळून ठेवणे, हे प्रमुख काम होते. अहेर नसलेल्या काही लग्नात बेस्ट मॅन व बेस्ट गर्ल हे स्टेजवरील निरूपयोगी मान्यवर असतं. त्यांना शेकहॅण्ड केल्यास जगात माणुसकी शिल्लक आहे ह्याचा त्यांना

अनुभव येत असे. मी अनेकदा असं माणुसकीचं कार्य करून खूप पुण्य कमावलेलं आहे. काळाच्या ओघात ही अहेरपध्दत मागे पडत असल्याने बेस्टमॅन व बेस्टगर्ल ही जमात नष्ट होण्याची भीती अलिकडेच ऑल इंडिया मॅरेज असोशिएशने व्यक्त केली आहे.

काही लग्नात अख्खी अहेराच्या पाकीटाच्या पिशव्या लंपास झाल्याच्या घटना ऐकिवात आहेत. ह्या नाजुक दरोड्याच्या केसेस अजूनही तपासाअंती सुटलेल्या नाहीत. असो, जिथे पैसा आहे तिथे नात्यातही धोका असतोच. काही वेळेला नवरदेवाने चुकून सुटच्या खिशात ठेवलेली पाकिटे काही महिन्यांनी तो सूट एखाद्या कार्यक्रमासाठी अंगावर चढवल्यावर हाती येत असतं. अशी हाती आलेली पाकिटे व त्यातील रक्कम ही खरा बोनस असे. त्यावर लग्नाच्या खर्चाचा भार नसे. असं घडणं हेही नशीब असावं. काही नवरदेव अशी रिकामी पाकिटे आयुष्यभर जपून ठेवतं.

माझं गणित व अक्षर चांगलं असल्याने अनेक लग्नकार्यात अहेराच्या वहीत अहेर लिहिण्याचं पुण्य माझ्या वाट्याला आलेलं होतं. आज शेअर मार्केटला एखादा स्टॉक हाताळताना जी थ्रील अनुभवायला मिळते तसाच परंतु थोडा वेगळा फील तेव्हा अहेराचे पाकीट ‘फोडताना’ यायचा.

पाकीटावरील नाव पाहून त्यातील अहेराचा अंदाज बांधणे हा मानसशास्त्र व समाजशास्त्र ह्या विषयाचा अनोखा संगम असायचा. एखाद्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व, राहणीमान व समाजाने ठरवलेली पत ह्यावरून हा अंदाज बांधला जायचा. ह्यात अनेकदा अंदाज बरोबर यायचे व अनेकदा चुकायचे. पाकीटातून बाहेर आलेल्या नोटा त्याच्या मूल्यानुसार एकत्र रबरबॅंडने बांधल्या जात तर चिल्लर तिच्या महत्त्वानुसार दुर्लक्षित असे. नव्वदच्या दशकात पाकिटातून ५०० किंवा १००० ची नोट निघणे हे मोठं अप्रूप होतं. हे अहेर बहुधा काका-काकी, मामा-मामी किंवा जवळच्या नात्यातून येत असत. अनेकदा गावात एकाच नावाच्या अनेक व्यक्ती असल्याने नेमका कोणता अहेर कुणी घातला आहे हे कळणे कठीण जाई. ह्या समस्येवर उपाय म्हणून संपूर्ण नाव लिहिले जाई. अलिकडे अशा नावासमोर घराचे नाव लिहिण्याची एक साहित्यिक पध्दत आली होती. तोंडावरून व्यक्तीचे नाव समजणे कठीण जाणाऱ्या काळात घराच्या

नावावरून ओळखणे हा अशा व्यक्तींचा भाबडा आत्मविश्वास होता. ॲमेझॉनच्या डिलिव्हरी बॉयकडून गावातील घराची नावे अनेकदा विचारली जात असल्याने हा आत्मविश्वास वाढला असावा.

बऱ्याच वेळा गचाळ अक्षरामुळे अहेर घातलेल्या व्यक्तीचे नाव समजणे कठीण जाई. मोठा अहेर घालूनही पाकिटावर आपले नाव न वाचता येण्याईतपत गचाळ लिहिणारी माणसं मला पापभिरू व निस्वार्थी वाटतं. खरं तर तो त्यांच्या स्वभावाचा विजय नसून हस्ताक्षराचा पराभव असे. एकदा अहेराचं पाकिट फोडण्याअगोदर ते जाडजूड असल्याचं माझं लक्षात आलं होतं अन हे पाकीट एका षटकात ३६ धावा देऊ शकेल अशी मला मनोमन आशा झाली होती. दुर्दैवाने त्या पाकीटात १० रूपयाच्या ५० नोटा निघाल्या अन आमचा अपेक्षित स्कोर मागे पडला. काही वेळेला अहेराच्या पाकीटावर नाव लिहिलेलं परंतु आतमध्ये नोट टाकायला विसरलेले व कधी आतमध्ये नोटा परंतु पाकिटावर नाव नाही असंही पाकीट उघडल्यावर आढळत असे. असा अहेर यजमानांच्या स्पेशल ऑडिटसाठी बाजूला काढून ठेवला जाई. कुणा मुलीच्या लग्नात नाव गाव नसलेल्या पाकीटात मोठा अहेर सापडल्यास तो त्या मुलीवर अव्यक्त प्रेम केलेल्या प्रेमीचा समजला जाई. हाताची नस कापून अयशस्वी आत्महत्या करणाऱ्या प्रेमीपेक्षा मला असा मोठा अहेर घालणाऱ्या प्रेमीच्या प्रेमाबद्दल अभिमान वाटत असे. असे ५-१० प्रेमी असलेल्या मुलीच्या अहेरात आलेल्या निनावी जाडजूड पाकिटामुळे लग्नातील बाजेवाल्यांचा खर्च सुटत असे. आपल्या अव्यक्त प्रेमाचे आपल्याच अहेराच्या पैशातून न मिळालेल्या मुलीच्या लग्नात बाजे वाजवले जाणे हे अशा प्रेमी तरूणांसाठी दुर्दैवी योग असे. अखेर अहेराचा लेखाजोगा होऊन नाव गाव व रक्कम लिहिलेली वही नोटांच्या पुडक्या सकट यजमानांच्या हाती देणं हे मोठं समाधानाचं व पुण्यांचं काम वाटे. मग दिवसभर गावात वधू किंवा वरास लाखोचा अहेर पडल्याची यजमानांकडून दवंडी पिटवली जात असे.

अहेरांचे आकडे हे यजमानांची सामाजिक प्रतिष्ठा मोजण्याचं एक परिमाण मानलं जाई अन म्हणून अहेराचे आकडे अनेकदा फुगवून सांगितले जात. रिकामी मागे उरलेली पाकिटे मग एकत्र करून घरामागे जाळली जात. पोटातील नोटा बाहेर

काढल्यावर त्या पाकिटाचं व त्यावरील नावाचं महत्व शून्य उरत असे. एकेवेळी लाखोची रक्कम पोटात घेऊन रूबाबात मिरवणारी पाकिटे आता जाळून मागे मूठभर राख म्हणून उरलेली पाहताना यातना होत असे. परंतु तेच जीवनाचं कटु सत्य असे.

आजच्या गुगल पे अन पेटीअमच्या जमान्यात अहेरपध्दती सुरू असती तर अनेक मंडपाच्या प्रवेशद्वारावर आपल्याला बारकोडची सोय पाहावयास मिळाली असती. काळाच्या ओघात अहेर मागे पडल्याने ह्या सर्व कार्य कर्तव्याला नव्या पिढीला मुकावे लागत आहे. अहेर नसणे हे अनेकांसाठी लग्नकार्याबाबतीत उत्तरदायित्व नसल्याचे आज निदर्शनात येते. पूर्वी अहेराकरिता अनेकांना लग्नमंडपात पोहोचून वधू-वरांना तोंड दाखवायची तसदी घ्यावी लागत असे. आता ऐन वेळेला लग्नाचा बेत रद्द करताना अहेराचा धाक किती गरजेचा होता असं मनोमन वाटतं. लग्नपत्रिकेत ‘आपली उपस्थिती हाच आमचा अहेर’ असं वाचताना त्या अहेराच्या पाकिटाला लग्नाच्या आमंत्रणातून वगळल्याचं माझ्यासारख्या अनेकांना शल्य वाटते. आता नव्या पिढीची लग्न टिकण्याची काळजी बुजूर्गांना लागलेली असताना विस्मृतीत जात असलेल्या अहेर प्रथेचं दु:ख वाटायला माझ्यासारखे हाताच्या बोटावर मोजता येणारे उरलेले असावेत. तुर्तास Blessings Only !

# तरीही वसंत फुलतो....

■ मॅक्सवेल लोपीस, नंदाखाल, वसई.

नेहमीप्रमाणे आश्रमात मनःशांतीसाठी आलेल्या समुदायापुढे मी बसलो होतो. गायत्री मंत्राचे धीरगंभीर स्वरांत पठण चाललेले होते माझ्या वाणीतून निघणारे ते संस्कृत उच्चार टिपण्यासाठी प्रत्येक जण गात गातच मोठ्या आदरयुक्त जिज्ञासेने माझ्याकडे पाहत होते. एरव्ही डोळे मिटून दोन भृकुटींच्या मध्यभागी कुंडलिनी जागृतीचा शोध घेणारा मी, आज न जाणे का, परंतु डोळे मिटू शकत नव्हतो. समाधीअवस्थेतील परमानंदापेक्षा आज त्या समुदायात बसलेल्या १६-१७ वर्षाच्या एका सुकुमार मुलाकडे माझे लक्ष खिळले गेले होते. भोळ्या, निखळ नजरेने त्याचे ते पाहणे... ती गौरकांती... निष्पाप असे ते डोळे... आणि आणि ते रूप... अगदी तिच्यासारखे !

मी स्वामी प्रेमानंद. जो या सर्व लोकांना आपल्या जगतापेक्षा अन्य अशा जगतातला भासतो... संसारी जीवनाच्या धुमश्चक्रीतून दूर पळणारा एक तपस्वी... एक ब्रह्मचारी आणि ती ! हो, पारमार्थिकतेच्या शोधजगतात एकरूप होऊन आज किती वर्षे भरली ! पण आजदेखील हृदयाच्या कपाटात ती बंदिस्त आहे. अगदी प्राणज्योत म्हणावी तशी ! किंबहुना हृदयातील तीचे अस्तित्व आणि प्रत्यक्ष आयुष्यातील तीचे अनस्तित्व या भावनेतच जीवन, दुःख आणि परमानंद त्या तिहेरी नात्यातला अर्थ मला गवसला. आणि आज जसजसा मी त्या मुलाकडे पाहत आहे, भूतकाळाच्या काही सुखर आलापी मला आपल्याकडे खेचत आहेत. गायत्री मंत्राचे स्वर हळूहळू पुसट होत आहेत आणि कित्येक वर्षांअगोदर ऐकलेले ते गीत आज स्मृतीपटलातून पुन्हा ऐकू येत आहे. नव्या जीवनातील मंगलमय आत्म्याचा हात धरत मी आज पुन्हा त्या संसारी जगतात शिरकाव करीत आहे.

अहाहा! व्योमसरींच्या संततधारांचे भूमातेवरील नृत्य आठवावे अशा त्या संतूराच्या लयकारी त्यानंतर बासरीची ती हृदयभेदक धून संपता संपता महेन्द्र कपूरच्या मखमली आवाजातील त्यावेळी ऐकलेले ते गीत.

'मैं अकेला बहुत देर चलता रहा,

अब सफर जींदगानी का करना नहीं..

जब तलक कोई रंगीन सहारा न हो

वक्त काफीर जवानी का कटना नही..

तुम अगर...'

'सौंदर्या आणि मी, म्हणजे त्यावेळचे माझे नाव वसंत. आम्ही एका वर्गात शिकत होतो. अभ्यासात दोघेही हुशार, कधी तिचा प्रथम क्रमांक तर कधी माझा.. त्या अर्थाने आम्ही एकमेकांचे प्रतिस्पर्धीच ! तिचे दिसणे अगदी नाजूक, कोमल नीरजाप्रमाणे आणि मी त्याच्या शुभ्रतेला जणू आव्हान देणाऱ्या हंसाप्रमाणे. त्यामुळे वर्गातील सर्व मुले आम्हाला एक-दुसयांची नावे ठेवत. स्पर्धेच्या त्या रिंगणात मला मात्र तिच्यावर प्रेम किंवा आकर्षण काय ते जडले नाही. एस.एस. सी झालो. ती प्रथम आणि मी द्वितीय. काही पॉइंट्सचाच फरक पडला होता. सुरवातीपासूनच कलेची आवड असल्याने मी गेलो कला शाखेत आणि ती विज्ञान शाखेत. कॉलेजची वर्षे कशी अगदी भराभर भरत होती. अभ्यासाच्या आणि कलासंवर्धनाच्या त्या काळात कुणाच्या प्रेमात पडण्याचा प्रसंग काही आला नाही. ग्रॅज्युएट झालो. चांगले ८०% गुण मिळवून महाविदयालयात प्रथम आलो होतो. आता अर्थशास्त्रात एमए करून पीएचडी करण्याचा विचार होता.

एक दिवस बाजारातून फेरफटका मारत होतो. अचानक पुढे सौंदर्या ! पाच वर्षांनंतर आज तिला इतक्या जवळून पाहत होतो. आजही अगदी तशीच दिसत होती ती. मला पाहून स्मीत करीत म्हणाली, 'वसंत'.

तिची ती हाक ! नव्हे एका प्रेमानेच मला पहिल्यांदा घातलेली साद होती ती. त्यात स्पर्धत्वाचा कुठलाही रंग नव्हता. हृदयाचे ठोके जलद पडू लागले. मी स्वतःला सावरले.

“सौंदर्या. कशी आहेस ? हल्ली काय चालू...”

एकमेकांची विचारपूस करून आम्ही निघालो. त्या रात्री झोप काही येईना. सारा वेळ कानात तिची तो हाकच घूमत होती. डोळे मिटले तर पुढे तिचेच चित्र. मी स्वतःलाच प्रश्न विचारू लागलो, हेच असते का प्रेम ? त्यानंतर कितीतरी प्रेमपट पाहिले. बरीच युगुलगीते ऐकली. माझ्या मनातील प्रत्येक भावाला कलाकृतींच्या साच्यात उतरवल्याचे मला तेव्हा वाटत असे आणि मग समजून येई 'हेच प्रेम आहे.'

त्यानंतर वारंवार सौंदर्यांची भेट घडू लागली. या त्या विषयांवर बोलून आम्ही पुढे जात असू. बोलण्याच्या भरात मी नकळत तिच्या डोळ्यांत पाही आणि मग तिथे देखील मला प्रेमाचेच संकेत दिसत. परंतु त्याविषयी बोलण्यास मी कधीही धजावलो नाही. एकदा एक अजबच स्वप्न मी पाहिले. मी जीवनमृत्यूच्या अगदी मध्यभागी उभा होतो... एक परमपुरुष मला सांगत होता, "तुझी आता आत्म्यातून परमात्म्याकडे, विनाशातून चिरंतन जीवनाकडे वाटचाल होत आहे.” सुरलोकीच्या देवदूतांप्रमाणे संथ उडत मी निघालो. इतक्यात एका विचाराने मी पुन्हा मागे फिरत त्या मंगल पुरुषास विचारले, 'हे दिव्य पुरुषा, मी आता विश्वाच्या परमोच्च शक्तीमधे विलीन होण्यास निघालो आहे. मात्र त्या अगोदर मानवी जन्मात अनुत्तरित राहिलेल्या एका प्रश्नाचे उत्तर मला दे. ज्याप्रमाणे माझे सौंदर्यावर प्रेम होते त्याप्रमाणे तिचे माझ्यावर प्रेम होते का ?'

तो म्हणाला, “होय, तिचे देखील तुझ्यावर तितकेच प्रेम होते.” 'त्याच्या त्या उत्तराने माझी उडणारी पंखं जड झाली. माझ्याने उडवेना, स्वर्गलोकीची ती सारी सुखे मला फिकी वाटू लागली... पुढे काय घडले हे कळण्याअगोदर स्वप्न संपले होते. शेवटी स्वप्नच ते ! अर्थशून्य आणि पोकळ आश्वासनांची दुनियाच ती ! वास्तव नाही.

एकंदरीत कल्पनाविश्वात रंगवलेल्या त्या प्रेमसागरात मी चिंब चिंब झालो होतो. मात्र तरीही कळत नव्हते की हे काय होत आहे? हे नक्की परिपूर्ण प्रेमाच्या अस्तित्वाचे सूचक आहेत की क्रूर नियतीने आपल्यासोबत चालवलेला एकतर्फी प्रेमाचा खेळ आहे. परंतु काहीही असो ते दिवस सुखाच्या अनंत छटांनी, असंख्य रंगानी रंगलेले होते.

दरम्यान एक घटना घडली. एका फार मोठ्या संकटाचे सावट माझ्या कुटूंबावर आले. माझ्याहून सात वर्षे छोटा असलेला माझा भाऊ तेजस यास फुफ्फुसाचा कर्करोग

असल्याचे निदान झाले. आजार इतका दुर्धर होता की त्यातून बाहेर पडण्याचा एकच मार्ग होता, 'मृत्यू'. सर्व डॉक्टर्सनीदेखील या केसमधून हात काढून घेतले. कुटूंबात प्रचंड तणाव, दु:ख, नैराश्य होते. विज्ञानाच्या शोधांची प्रत्येक दारे जेव्हा आमच्यासाठी बंद झाली, त्यावेळी माझ्या भावाचे जीवन घेऊन मी भक्तिच्या दारावर थाप दिली, कितीतरी तिर्थक्षेत्री मी फिरलो. प्रत्येक ठिकाणी मी पाही की विनंती घेऊन येणारा भाराक्रांती मनुष्य परमेश्वराकडे समर्पणाची भावना व्यक्त करतो आणि त्याची मनोकामना पूर्ण होते.

एकदिवस तेजस वेदनेने विव्हळत होता. त्याच्या त्या बालजीवाची ती स्थिती पाहून मला दु:खावेग आवरेना. मी घराच्या छताकडे धाव घेतली. त्या मुक्त वातावरणात विश्व व्यापलेल्या आणि तरीही नजरेपलिकडे वसलेल्या परमेश्वरापुढे मी पूर्णतः शरण गेलो. मनाच्या अगदी खोल खोल गाभाऱ्यातून मी त्याच्याकडे आर्जव करू लागलो.

"हे ईश्वरा, जशी वाघास मासांची, एखाद्या माथेफिरूस रक्ताची आणि कुणा व्यसनी इसमास एखादया नशेची चटक असावी, तशी तुला माणसाच्या अश्रूंची, त्याला दु:ख पीडेत पाहण्याची, त्याच्या वेदनेच्या किंकाळ्या पत्थराप्रमाणे ऐकत बसण्याची चटक लागली आहे. माझ्या या धारणेमुळे तू मला अल्लड, अज्ञानी, असमंजस, आगाऊ काहीही समज. परंतु तेजसच्या प्रत्येक वेदनेबरोबर माझी ही धारणा अधिकच दृढ होत चाललेली आहे. मात्र तरीही मूर्खाप्रमाणे मी तुझ्याच आश्रयाला आलो आहे. प्रभो, या आमच्या असहाय्यतेचा किती रे फायदा घेशील ? आजवर तुझ्याकडे मी कितीतरी नवस बोलले आणि आज माझ्या जीवनाचा एक हिस्सा, नव्हे हे जीवनच मी तुला दान करतो. माझ्या भावाला या आजारातून बाहेर आण. शारिरिक वेदनांच्या य मालिकेतून त्याची मुक्तता कर. शपथ माझ्या प्रेमाची, सौंदर्या... तिच्या संबंधाने रंगविलेल्या साऱ्या स्वप्नांना तिलांजली देऊन आयुष्यभर एक ब्रह्मचारी बनून तुझी सेवा करीन यापेक्षा अजून मी तुला काय देऊ?"... कितीतरी वेळ, अगदी अंधार पडेपर्यंत मी त्या एकांतात रडत होतो.

त्यादिवशी हृदयाला सतार बनवून जीवनदु:खाच्या प्रत्येक करांनी छेडलेल्या भावनांच्या तारांचे ते करुण स्वर अखेर त्या परमेश्वराच्या कानी गेले, माझी प्रार्थना

ऐकली गेली. असाध्य रोगाच्या त्या विळख्यातून तेजस बाहेर आला. मोठमोठाले डॉक्टर्सदेखील नियतीचा तो दुर्मिळ चमत्कार पाहून स्तंभित झाले.

आता माझी अग्निपरिक्षा होती... दिलेल्या वचनास जागण्याची... फक्त अग्निची एक दाहक चिता पार करायची नव्हे तर सारे आयुष्य त्यावरुन मार्गक्रमण करायची. मी 'ध्यानसाधना' आश्रमाचे नाव ऐकून होतो. अशांततेच्या भोवऱ्यात अडकलेल्यांचा जीवनोद्धार करणाऱ्या या आश्रमात मी रुजू झालो, माझ्यासारख्या हुशार, तरुण, देखण्या मुलाने निवडलेला तो मार्ग पाहून समाजाने, कुटूंबाने अगदी तेजसनेदेखील मला वेड्यात काढले हो! इच्छाप्रवाहाच्या विरुद्ध पोहण्याचा तो निर्णय वेडेपणाचाच नव्हता का? मात्र त्या वेडेपणाचे खरे कारण मला आणि त्या ईश्वराला तितके ठाऊक होते. परिस्थितीच्या दबावाखाली त्यानेच तर माझ्या मुखातून ती शपथ वदवून घेतली होती! खूप कठिण होते हे सर्व· कुटूंबाच्या उबदार छायेतून बाहेर येणे आणि या विश्वाला आपले कुटूंब समजून पिडीतांना आपल्या मायेची ऊब देणे... मनोरंजनाच्या आणि सुखोपभोगाच्या साऱ्या साधनांचा एकाएकी त्याग करून दिवसरात्र 'सोहम्' चा नाद ऐकणे... स्वतःच्या अंतःकरणातील स्पंदनांचा डाव चुकवून दुसऱ्यांच्या जीवनाम हसू पेरणे... आपल्या भाग्यात जे नाही त्यास भाग्य बनवणे... खरेच हे सर्व खूपच कठिण होते. आणि सौंदर्या। फक्त एक प्रेमप्रस्ताव टाकण्याइतपत अंतिम पायरीवर पोहोचलेल्या प्रेमापासून मी दूर जात होतो. चांदण्या रातीच्या तिसऱ्या प्रहरी मालकंस रागाच्या साक्षीने पडलेले एखादे स्वप्न म्हणावे तसेच सौंदयाचे माझ्या जीवनात येणे झाले. ले स्वप्न अखेर तुटूनच गेले.....'

अचानक मी भानावर आलो. गायत्रीचा जप संपून सर्वजण आपापल्या निवासकक्षाकडे निघालेले होते. त्या मुलाला मी खुणेनेच जवळ बोलावले.

“कुठून आलास बाळा?"

“रत्नागिरीहून” अत्यंत शुक शब्दात तो बोलला.

“नाव काय तुझे?"

'माधव!

“अरे माधव, तुला माहित नाही, मी देखील मुळचा रत्नागिरीचाच !”

“माहित आहे. तुमचा भाऊ तेजसनेच मला येथे येण्याचे सुचवले. कॉलेजच्या एका प्रोजेक्टसाठी त्यांच्या बँकेत गेलो असता त्यांच्याशी ओळख झाली.”

'अरे वा ! म्हणजे आमच्याच भागातला दिसतोस तू, नाव काय तुझ्या वडिलांचे !”

“मला वडील नाहीत”. त्याचा आवाज कठोर होता.

“मग तुझ्या आईचे नाव ?'

“सौंदर्या, ती देखील माझ्या जन्मावेळी गेली.” त्याचा आवाज काहिसा थरथरला.

माझ्या पायाखालील जमीनच सरकली. एव्हाना त्याच्या चेहरेपट्टीवरून मला पूर्णत: खात्री पटली होती की हा त्याच सौंदर्याचा, माझ्या सौंदर्याचा मुलगा. नशिबाच्या ज्या सुवर्णकिरणापासून मी स्वतःला लपवून घेतले होते, ते किरण तर माझ्या मागे कधीच विरून गेले होते आणि आज त्याचे एक प्रतिकिरण जणू साऱ्या जून्या कटूगोड आठवणींना उजाळा देण्यासाठी माझ्यापुढे उभे होते. माझा तोल जाऊ लागला. शरीराची सारी शक्ति एकटवून स्वतःला मी सावरले.

“बरे बाळ. आज रात्री जेवणानंतर मला येऊन भेट”

दुपारच्या त्या भेटीनंतर रात्रीपर्यंतची ती वेळ ! साऱ्या आयुष्याचा टप्पा एकीकडे तर दुसरीकडे ते सात आठ तास ! डोळ्यातून अविरतपणे वाहणारे अश्रू थांबवण्यासाठी ध्यानाला बसण्याचादेखील प्रयत्न केला मात्र विचलित गर्तेत ते देखील जमले नाही. काय घडले असेल माझ्या मागे ! माधवचे आईवडील दोघेही नाहीत, मी आईचे नाव त्याने सांगितले पण वडिलांचे मात्र.... आईच्या नावाने त्याच्या शब्दांचे ते थरथरणे परंतु वडिलांविषयी बोलताना त्याच्यातील ती कठोरता ! काय रहस्य असावे हे ! कसा मी माधवला यातून बाहेर आणणार ?

रात्री माधव मला भेटावयास आला. त्याला पाहताच माझ्या आत काहीतरी होत असल्याचा भास मला झाला. मातेच्या ममतेचा आणि पित्याच्या वात्सल्याचा झरा एकाचवेळी माझ्यात पाझरला होता. खूप मायेने मी त्याला म्हणालो,

"बाळ, तूला कुठले तरी फार मोठे दु:ख सलत आहे असे मी मघापासून अनुभवत आहे. हे बघ, मला अगदी आपला समज आणि ज्या ज्या गोष्टींनी तू त्रस्त आहेस, आयुष्याच्या या प्रवासात ज्या ज्या घटनांनी तुझ्या या पुष्पासमान मनाला मोठ्या निर्घुणतेने छळले आहे, सर्व काही मला सांग. मी तुला वचन देतो, माझे सर्वस्व पणाला लावून तूझ्या जीवनात सुख पेरण्याचा मी प्रयत्न करीन. तुला अजून खूप जगायचे आहे, खूप मोठे व्हायचे आहे. जीवनातील अशांतीच्या या साम्राज्यावर जी शांती राज्य करू शकते, तिला तिथपर्यंत येण्यास अडवू नकोस ! मायेने भरलेल्या त्या शब्दांमुळे असेल अथवा रात्रीच्या त्या नीरव शांततेमुळे असेल, तो आता अगदी मोकळा होऊन बोलू लागला.

“'स्वामीजी, मला मुक्ती हवी आहे. जगण्याच्या या बंधनातून... आपले कुणी नातलग आहेत या भासातून मला मुक्ती हवी आहे. जीवनाच्या प्रत्येक वळणावर मला दुःखाची सोबत मिळालेली आहे. अगदी माझ्या जन्मानंतर चार-पाच दिवसांत माझ्या आईने या जगाचा निरोप घेतला. एकीकडे जीवन तर दुसरीकडे एका काळोखी नशिबाची साथ देऊन गेली ती मला. मृत्यूशय्येवर असताना म्हणे तिच्या मुखी एकच नाव होते- ‘वसंत’.

बांध मोकळा केल्यावर पाण्याचा एकदम ओघ सुटावा त्याप्रमाणे माधवच्या त्या बोलण्याने माझ्या डोळ्यातून भरदिशी पाणी खळले, खिशातून जाड भिंगांचा चष्मा काढून डोळ्यावर चढवत मी ले लपवले. म्हणजे त्या रात्री स्वप्नातील त्या दिव्य पुरुषाचे उत्तर लौकीक अ लौकीकतेचा तो नजारा... सारे काही वास्तवाशी निगडीत होते. शून्य नजरेने माधव बोलत होता.

..... न जाणे कुणाचे नाव होते ते.. मुळात संशयी स्वभावाच्या माझ्या वडीलांनी त्या शब्दावरून आणि अखेरच्या क्षणी वडील पुढे असताना त्यांना देखील आईने

'वसंत' अशी हाक मारणे या गोष्टीवरून तिला सरळ व्यभिचारिणी ठरविले. मला आपला मुलगा मानण्यास आणि माझे संगोपन करण्यास नकार दिला, आईचे शेवटचे तोंडदेखील पाहिले नाही त्यांनी. आईबद्दल त्यांच्यात निर्माण झालेली कटूता इतक्या प्रचंड थराला गेली की अवघ्या महिन्याभरात त्यांनी दुसरे लग्न केले.

आप्तेष्ट असे माझे कुणीच नव्हते त्यामुळे ज्या हॉस्पीटलमधे आई डॉक्टरची सेवा देत होती त्याच संस्थेच्या अनाथालयात मला ठेवले गेले. मी वाढत होतो, वडील जीवंत असूनदेखील एखादया अनाथासारखा... निष्कलंक असूनदेखील एखाद्या कलंकाचा शिक्का माथी मारल्यासारखा आणि जेव्हा आईच्या एका सहकारी डॉक्टर मैत्रीणीकडून मला हे सत्य समजले त्या दिवसापासून एखादया जिवंत प्रेतासारखा...

काहीक क्षण अबोल्यातच गेले.

'स्वामीजी मी नाही जाणत तो वसंत कोण होता ? आईच्या आयुष्यात त्याचे असे कोणते स्थान होते की मरणशय्येवर असता तिच्या तोंडी त्याचेच नाव होते ? मात्र अंतःकरणातील एक आवाज मला पुन्हा पुन्हा सांगतो की त्याचे आणि आईचे नाते अगदी आकाश धरतीच्या नात्याइतके पवित्र होते. हल्लीच मला समजले की माधव या नावाचा अर्थ देखील वसंत म्हणजे आपल्या मुलास हे नाव सुचविताना आईला कुठल्यातरी तुटलेल्या स्वप्नांची स्मृती माझ्यारुपात कायम जिवंत ठेवायची होती. परंतु जगाच्या व्यभिचारी नजरेला त्यात काय दिसले ? बघा ना या पंधरा वर्षात माझ्या जन्मदात्या बापाने तोंड देखील पाहिले नाही माझे. यालाच का म्हणतात रक्ताचे घट्ट नाते ? कधीही न तुटणारे अतूट नाते! कुठलीही अपेक्षा न ठेवणारे निःस्वार्थी नाते ! या सर्वांचा शोध घेण्यासाठी मी एकदिवस वडीलांना भेटावयास गेलो होतो. आपल्या मुलांबरोबर कुठे निघाले होते ते. माझी ओळख देताच कारचा दरवाजा धाडदिशी बंद करून निघून गेले.

जगण्यातील माझा रसच निघून गेला. कधीकधी उंच टेकडीवर हिंडायला जाई. खालील खोल दरी मग मला साद देई की ‘ये, मी तुला आपल्यात सामावून घेते.’ मात्र

त्यावेळीच सायंकाळच्या प्रहरी शहरातील घरात लागलेले दिवे मला दिसत आणि वाटे की नाही, मी एकाकी नाही, विश्वाच्या या विशाल पसाऱ्यात कुणीतरी असेल माझे !

माझ्याने राहवेना, ब्रहमचारी होण्याच्या माझ्या प्रतिज्ञेत एका बालजीवाची, माझ्या सौंदर्याच्या शरीरातील एका अवयवाचीच चाललेली ती हेळसांड माझ्यासाठी असह्य होती. त्या क्षणी माझ्यातील स्वामीची जागा एका अकल्पित पितृत्वाने घेतली. माधवला मी घट्ट मिठीत घेतले. “माधवा, माझ्या बाळा खुप दुःख सोसलेस तू. परंतु यापुढे नाही. यानंतर तू इथेच राहशील, माझा मुलगा बनून. जगाला जीवनपथ दाखवणारा मी एक जगद्गुरू असलो तरी तुझ्यासाठी फक्त तुझा पिता असेन. तुला ज्ञानाने, विद्येने, आदर्शांनी, संस्कारांनी मी सर्वस्वी मंडीत करीन. आणि त्याहीपलीकडे तुला इतके प्रेम देईन, इतके प्रेम देईन ज्याच्या विशालतेत जीवनाच्या या साऱ्या कटूता विरून जातील.

तुला आज एक सत्य सांगतो, अरे मीच तो वसंत. ज्याच्या नावाचादेखील तू तिरस्कार करावा तो वसंत. परंतु आज काहीच विचार करु नकोस. प्रश्नांची सरबत्ती करून त्याची उकल करण्याची वेळ तर कधीच सरली आहे. मी तुझ्याकडून क्षमा देखील मागणार नाही. त्यासाठी एखाद्या फार मोठ्या अपराधाचा शिक्का जरी माझ्या माथी असता तरीही मी स्वतःला भाग्यवान समजले असते. परंतु माझ्याकडे ते देखील नाही आज. दोष कुणाचाच नव्हता. तुझ्या वडीलांचादेखील नाही. निसर्गाने दिलेल्या संशयी स्वभावाला ते मात करू शकले नाहीत ही त्यांची दुर्बलता होती, दोष नव्हता. अक्राळविक्राळ नशिबाची जी महाकाय लाट आपल्या सर्वांच्या जीवनावर धडकली, त्यातून फक्त आपण दोघेच आज जिवंत बाहेर आलो आहोत. पोरके होऊन... एकाकी बनून... अर्थशून्य जीवनाचा उपहार घेऊन.

माधवदेखील घळाघळा रडू लागला. मला घट्ट मिठी मारत तो फक्त बोलला 'बाबा'.

त्याच्या त्या हाकेने माझ्या सर्वांगातून रोमांच फुलले. सौंदर्याच्या त्या अकथ्य प्रेमाची आज माझ्यावर पुन्हा बरसात होत होती. ती साद पुन्हा त्याच बासरीच्या हृदयाभेदक धूनीचे पार्श्वसंगीत घेऊन ऐकू आली. 'वसंत'. परमेश्वरा तुझ्याकडून मला

आता काहीच नको. जे जे माझ्याकडून नशिबाने हिरावून घेतले होते, ते सर्व सर्व आज तू शतपटींनी परत केले आहे. या पत्थराप्रमाणे असलेल्या रुक्ष, कठोर जीवनातून एका जगद्गुरु स्वामीचे माझ्या माधवच्या प्रेमळ पित्याचे शिल्प तू घडवलेय. आज माझे जीवन सार्थकी लागले. यापुढे मला जगायचे आहे. साऱ्या जगासाठी... माझ्या माधवसाठी. सात्विक सुखाचा प्रत्येक अनुभव त्याला देण्यासाठी मला जगायचे आहे. खरोखर क्षणभराच्या प्राप्तीहून आयुष्यभराच्या त्यागातच त्या अबोल प्रेमाचा सर्वार्थाने विजय झाला होता. उत्कट प्रेम, त्याग आणि त्यानंतरचा विरह यांच्या सुमनांनी केलेली ती मधुराभक्ती आज सफल झाली होती.

'लाखों सितम सहे हैं, मुहब्बत की राह में,
इस राह पे मिटने का फक्र और कुछ है।'  - ईश्वरदास 'चाँद'

(प्रेममार्गाची वाटचाल करताना मी लाखो प्रकारचा जुलूम सहन केला आहे. तरीही या मार्गाने जाताना होणाऱ्या बरबादीबद्दल वाटणारा अभिमान हा काही वेगळाच आहे.)

# जगावे का मरावे?

## Die with dignity!

■ अतुल आल्मेडा, निर्मळ, वसई

एका रविवारी वर्तमानपत्र वाचत होतो. त्यावेळी एका नातेवाईकांचा फोन आला. आपला मित्र अचानक गेला. हा मित्र परिचित होता. वय जरी पंच्याहत्तरीच्या पलीकडे होते, तरी धडधाकट होता. म्हणून मी कळविण्याऱ्या मित्राला विचारले, असे अचानक काय झाले? आत्महत्या केली. मी विचारात गुरफटून गेलो. दोन प्रश्न समोर उभे ठाकले. माणूस आत्महत्या का करतो? व्यक्तीला त्याचे जीवन संपविण्याचा हक्क असावा का? म्हणून हे चिंतन!

आणि डेव्हिड म्हणाला : जोपर्यंत माझा मुलगा जिवंत होता, तोवर मी सारे उपासतापास केले, शोक केला. मला असे वाटत होते की, न जाणो, परमेश्वराच्या कृपेचा वर्षाव माझ्यावर होईल आणि माझा मुलगा जिवंत होईल. पण दुर्दैवाने माझा मुलगा जिवंत झाला नाही मग मी उपासतापास का करू? मी त्याला परत आणू शकेल का? मी त्याच्याकडे जाईन, पण तो... आता तो काही माझ्याकडे येणार नाही. (सॅम्युएल II १२: १९-२३) आयुष्यातील प्रसंग समजून घेण्यासाठी डेव्हिडचे वरील भाष्य मदत करू शकते. तुम्ही धार्मिक असा वा नसा. सन १९००पर्यंत जागतिक सरासरी आयुष्यमान ४० वर्षापेक्षा जास्त नव्हते. तर त्यावेळी भारतीय सरासरी आयुष्यमान २७ वर्षाचं होतं.

आज सरासरी जागतिक आयुष्यमान त्यामानाने दुप्पटीपेक्षा जास्त आहे. तरीही माणूस आनंदी राहण्यासाठी धडपडत आहे. इपिक्युरिस या प्राचीन ग्रीस तत्त्वज्ञानीच्या म्हणण्यानुसार मृत्यूनंतर कुठलंच अस्तित्व नाही आणि आनंद मिळवणं हाच आयुष्याचा एकमेव उद्देश आहे. जेरेमी बेंथम या ब्रिटिश तत्त्वज्ञानाने असे मत जाहीर केले कीं

'जास्तीत जास्त व्यक्तीचं अधिकतम सुख' हे मानवतेचे ध्येय असावे.  हे सुख दोन प्रकारचे आहे. एक शारीरिक आणि दुसरे मानसिक.

जैविक भाषेत सांगायचे झालं, तर आपल्या अपेक्षा आणि आपला आनंद या दोन्ही गोष्टी आपल्या शरीरातील जीवरसायनशास्त्र ठरवत असतं; आपली आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिस्थिती नव्हे. नैसर्गिकरित्या आनंद किंवा दु:ख या भावना म्हणजेच आपल्या शरीरातील त्या त्या वेळच्या जैविक-रासायनिक क्रिया असतात.  ' सुख म्हणजे केवळ आनंददायक भावना आणि दु:खापासून सुटका' आनंद आणि वेदना यांच्या पलीकडे काहीही चांगलं किंवा वाईट नाही. शरिरातील संप्रेरकांमुळे, मेंदूतील संदेशवहकामुळे आणि शरीरातल्या नसाच्या  पसरलेल्या जाळ्यामुळे या भावना आपल्याला जाणवत असतात.

जैवरासायनिक प्रक्रियेत बदल करून आनंद मिळवता येतो. काही लोकांना प्रामाणिक मेहनत करून आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करून आनंद मिळतो. सुख लाभते. तर काही लोक मादक रासायनिक द्रव्यांचा डोस घेऊन फार सहजपणे हा आनंद लुटतात. पण इपिक्युरसनं हेही सांगितले आहे, कीं 'आनंदाचा प्रमाणापेक्षा अधिक काळ पाठलाग केला, तर त्यामधून सुखापेक्षा दु:खंच हाती लागेल'.

आपल्या भारतीय गौतम बुद्धानं असे म्हटले आहे कीं ' सुखाचा शोध घेणे हेच दु:खाचं मूळ आहे’. माणसाने जीवनात सुखाची हाव धरलेली आहे. लोभ धरलेला आहे.  उदाहरणार्थ सायकलची  अपेक्षा पुर्ण झाली, की बाईक्सची अपेक्षा होते, ती झाली कीं चारचाकी अशी ही तृष्णा वाढतच जाते. बुद्धाने सांगितलेला हा आनंदाबाबतचा दृष्टीकोन जैवरसायनशास्त्राशी खुपसा जवळचा आहे. आनंद मिळवण्याचे मार्ग हे जगामध्ये गुन्हे घडण्याचे एक नंबरचे कारण आहे. आनंददायक संवेदना जितक्या चटकन निर्माण होतात, तितक्याच चटकन विरून जातात.

बुद्धाच्या मते  माणसाने सुखद संवेदनासाठी असणारी आपली तहान नियंत्रित करून समाधानी जीवन जगणे हे उद्दिष्ट ठेवले पाहिजे. जन्माला उद्दिष्ट असेल/नसेल, पण जीवनाला उद्दिष्ट हवे. जीवनाचे उद्दिष्ट समोर असेल, तर मृत्यूची वेळ ठरविता येते.

गेल्या काही काळांत जीवनविषयक अभ्यासाअंती, हे स्पष्ट झालेले आहे कीं मनुष्याच्या भावना ही दैवी किंवा आध्यात्मिक बाब नसून एक जैव-रासायानिक सूचनांचा क्रम (अल्गोरिदम) आहे. अल्गोरिदम म्हणजे विशिष्ट गणित नव्हे, तर ते गणित सोडवण्यासाठी लागणारी पद्धत आहे. एक उदाहरण पाहू. दोन संख्याची सरासरी हवी असेल, तर सोपी पद्धत त्या दोन संख्यांची बेरीज ही पहिली पायरी. दुसरी पायरी आलेल्या संख्येला दोनने भागा. ही प्रक्रिया म्हणजे अल्गोरिदम.

जीवंत माणूस (प्राणी) एक प्रोग्राम आहे. भावना हा सस्तन प्राण्यांच्या जगण्यासाठी व पुनरुत्पादनासाठी एक जैव-रासायानिक आहे. माणसाचं जीवनाचे नियंत्रण करणारे अल्गोरिदम्स म्हणजेच माणसाच्या संवेदना, भावना आणि विचार. अल्गोरिदम्समुळे सर्व सस्तन प्राण्यांचं आणि पक्षांचे जीवन नियंत्रित केले जाते. माणसाचं घाबरणं, आनंदी होणं, दु:खी होणं, या सर्व संवेदना म्हणजे माणसाच्या मेंदूमधल्या चेतापेशींच्या प्रक्रिया आहेत.

थोडक्यात व्यक्तीचे जीवन म्हणजे अनेक अल्गोरिदम्सचा एक प्रोग्राम आहे. हा प्रोग्राम योग्य वेळी बंद करण्याचा किंवा थांबविण्याचा हक्क व्यक्तीला असावा कीं नसावा? मला वाटते असावा. आपल्या मनातली खरीखुरी इच्छा ओळखणे सोपे नाही. जेव्हा आपण स्वतःलाच ऐकायचा प्रयत्न करतो, तेव्हा विचारांचा डोक्यात गोंधळ माजतो. कारण आपण करतो, तो विचार आपल्या दृष्टीने योग्य की अयोग्य एवढया पुरता संकुचित न ठेवता मानवतेच्या दृष्टीने योग्य की अयोग्य हे तपासणे आवश्यक असते.

चांगलं व्यक्तीमत्व होण्यासाठी 'स्वत:च़' ऐकलं पाहिजे. माझ्या आतला खोलवरचा खराखुरा स्वत:चा आवाज आकलन होणे, क्रमप्राप्त आहे. हा आवाज ऐकून, त्याचे आकलन झाले, तर तसे वागणे मानवतेच्या दृष्टीने  हितकारक ठरू शकते. हा आवाज मग तो आपला जैविक रसायनिक प्रोग्राम बंद करण्याचा ही असु शकतो.

भौतिक जीवन संपविण्याचा निर्णय. "Swarajya is not rule of the self, but rule on the self! स्वत:वर, स्वत:च्या इच्छांवर, स्वत:च्या वासनांवर, स्वत:च्या

वर्तनावर मला नियंत्रण करता आलं पाहिजे. असे मा. गांधीजी म्हणत." प्रायोपवेशन करून विनोबांनी १९८२ मध्ये देहत्याग केला. ज्ञानेश्वरांनी तरूण वयात, कार्य पुर्ण झाले आहे असे म्हणत समाधी घेतली. सावरकरांनी सुद्धा पंचाहत्तरी पुर्ण केल्यावर आत्मसमर्पन केले. 'विचारी माणसाने मरणाची सवय करायला हवी' असे प्लेटोचे मत होते. आध्यात्मिक साधनेची ती एक पायरी असू शकते. मृत्यूचा विचार, माणसाला जगण्याचे भान देते. आयुष्याचा प्रत्येक क्षण जाणिवपूर्वक जगायला शिकविते. एवढेच नाही तर मृत्यू स्विकारण्याची मानसिक तयारी होते.

आत्महत्या गुन्हा नाही. आत्महत्येचा अयशस्वी प्रयत्न गुन्हा ठरतो. मृत्यू ही आत्महत्या, आत्मसमर्पण, दयामरण, प्रायोपवेशन की आणखीन काही; हे मृत्यूस्विकारणाऱ्याच्या मानसिक परिस्थितीवर ठरू शकते. मला या चिंतनातून असे वाटते कीं आमच्या मित्राने मृत्यूला स्विकारले. आनंदाने व चांगल्या उद्देशाने जीवन जगावे हे जीवनाचे सुत्र आहे. या दोन्हीपैकी एकही समोर नसेल, शिवाय जगण्यांत परावलंबित्व असेल, तर मृत्यू स्विकारणे योग्य वाटतं. तुम्हाला काय वाटते?

# आम्ही अल्पसंख्यांक !!

■ वेन्सी डिमेलो, शिरपूर

भारतात ख्रिस्ती लोक हे अल्पसंख्याक म्हणून गणले जातात. केवळ २% आहेत. तरी देशातील शैक्षणिक, वैद्यकीय, सामाजिक, सहकारी सेवेची मूख्य सुत्रे, क्षेत्रे नि केंद्रे ते व्यापून आहेत. देशाला सेवा देत आहेत. तरीही मूळ भारतीय प्रवाहापासून अनेक क्षेत्रांत बरेच अंतर ते दूर आहेत. त्यात राजकीय नेतृत्व प्रामुख्याने दुर्लक्षित आहे.

"रंगात मिसळूनी रंग. रंग माझा मात्र वेगळा." अस्मिता, संस्कृती, धर्म, पेहराव, रीतीरिवाज, पूजा, उपासना सारे पाश्चात्य घाटणीचे. मात्र मूळ भारतीय संस्कृतीतील संस्कृती पेहराव नि रीतीरिवाज पहावयाचे झाल्यास महाराष्ट्रात नगर, वसई, आदिवासी भागात तसे ख्रिस्ती दिसतात. तरीही त्यांची निष्ठा पाश्चातच !! अशी टीका होते. हे दुर्लक्षित करून चालणार नाही.

साथी जॉर्ज फर्नांडिस सारखे अपवादात्मक काही ख्रिस्ती भूमीपूत्र सोडले तर भारतीय राजकारणात ठसा उमटवील असा भारत मान्य ख्रिस्ती नेता नाही. आणि केवळ देशातच नाही तर संपूर्ण जगात मान्य असलेले मदर तेरेसा सारखे सर्वस्पर्शी सेवानेतृत्व नाही. "धर्मांतर म्हणजे देशांतर नव्हे" असे देशाबद्दल जाज्वल्य अभिमान असलेले आणि "तुका निर्मित सेतुवरूनी आलो ख्रिस्त चरणी" माझा धर्म ख्रिस्ती असला तरी माझी संस्कृती भारतीय आहे. पाश्चात्य नाही. असे मानणारे नारायण वामन टिळक म्हणूनच महाराष्ट्राने द्रष्टे कवी म्हणून स्वीकारले. अशी आदर्श अल्पसंख्याकांची नेतृत्व नजरे समोर असूनही...

आपण ख्रिस्ती लोक भारतात अल्पसंख्याक म्हणून गणले जात आहोत. आणि आपणही स्वतःला तसे मानतो. तरीही देशाच्या मुख्य प्रवाहात सामील होऊनही मानाने जगता येते असा प्रघात अनेक विविध ख्रिस्ती नेतृत्वाने दिला आहे. त्यामुळे ख्रिस्ती जनतेने 'अल्पसंख्याक' असा उगाच बाऊ करण्याचे कारण नाही. स्वतःला हिणवून घेण्याचे कारण नाही. इथे गरज व्यापक विचारांचे बनण्याची आहे. इथे गरज धर्मापलीकडचा धर्म जगण्याची आहे. धर्म गर्व अभिनिवेश सोडून मानवी समाजात मिसळण्याची आहे.

देशाच्या प्रवाहात सामील न होता सतत स्वत:स अल्पसंख्याक समजून बहुसंख्याकांच्या छायेखाली वागण्याची सवय परिस्थितीच्या दडपणामुळे आपणाला लागली आहे. त्यामुळे कोणत्याही प्रांगणात स्वयंप्रेरणेने पुढाकार घेण्याची प्रवृत्ती आपणामध्ये बाणलेली नाही.

सतत आपण स्वत:ला खुरडलेलेच समजत आलो आहोत. बहुसंख्याकांचा अनुनय करणे क्रमप्राप्त झाल्यामुळे व त्यांच्यात आणि आपल्यात कर्मठ धार्मिक तफावत असल्यामुळे कोणत्याही खडतर कार्याची धुरा स्वीकारताना त्यांच्या संपूर्ण पाठिंब्याची व सहकार्याची शाश्वती आपणास वाटत नाही व म्हणूनच आत्मविश्वासाने उगाच न्युनगंड बाळगून कोणतेही महान कार्य हाती घेणे दुरापास्त होते. ह्याचाच परिणाम मानसशास्त्रीय भाषेत बोलावयाचे म्हणजे आपल्याठायी 'हीनगंड' निर्माण होतो. योग्य गुण असूनही बाह्य परिस्थितीच्या दडपणामुळे त्या गुणांना योग्य वाव मिळत नाही. व त्यामुळे अंगच्या उपजत नेतृत्वाचे मात्र खच्चीकरण होते.

उपरनिर्दिष्ट विवंचनातील न्युनगंडाचा तथ्यांश जरी तुर्तास आपण ग्राह्य धरला तरी एक गोष्ट आपणाला डोळ्याआड करता येणार नाही. खरा नेता, मेंढपाळ जाती, धर्म, समाज, वर्ग, वर्ण ख्रिस्तादि, बापूजी आदींच्या सारखा धर्म, जाती आदींच्या बंधनापलीकडचा असतो. त्यांच्या अंगभूत गुणांमुळे तो सर्वांना

हवाहवासा होतो. इतरांवर छाप पाडणारे व्यक्तीमत्व. सर्व समाजात मिसळण्याची किमया, कला. निरनिराळ्या विषयांचा व्यासंग, समाजसेवेचे व्यसन, विनम्रता,निस्वार्थीपणा, कळकळ, विनम्र वृती इत्यादी शिदोरी त्यांच्या पदरी असली तर त्याला आपोआप चार लोकांत मान मिळतो. त्यांच्या नेतृत्वाचा स्वीकारही होतो.

जे अखंड समाजात मिसळत नाहीत आणि आपला समाज तेवढाच गृहीत धरतात. ते खूप संकोचित विचार करतात. आपण धार्मिक अल्पसंख्याक असू पण माझ्या देशाचे नागरिक म्हणून अल्पसंख्याक कसे?

म्हणूनच समाजाचा संकोचित विचार करणाऱ्यांचे, आपल्याच अल्पसंख्याक न्युनगंडाचा मनात विचार करणारे यावर काहींचे म्हणणे असे आहे की आमच्या अल्पसंख्याक समाजाची मनोवृत्तीच अशी की आमचे नेतृत्व कबूल करावयास आमचे लोक तयार नाहीत. निःस्पृह नेतृत्वासाठी 'आमचे तुमचे' असे रडत राव घोंगडे, रडगाणे चालत नाही. तर 'सर्वच माझे' असाच खुला विचार हवा. ते खरे नेतृत्व.

तात्पर्य अल्पसंख्याक जनतेच्या दृष्टिकोनात मूलभूत फरक झाल्याशिवाय व अल्पसंख्याक तरूणांच्या वर्तणुकीत समूळ बदल झाल्याखेरीज, आणि सर्वसमावेशक झाल्याशिवाय आपल्या कथीत अल्पसंख्याक समाजातून प्रभावी नेतृत्व लाभणे कठीण आहे...

अल्पसंख्याकांचे नेतृत्व, राखीव जागांतून नेतृत्व, ओबीसी नेतृत्व, आदिवासी नेतृत्व, सेड्यूलकास्ट नेतृत्व, महिला नेतृत्व असे न रहाता, संवैध्यानिक, संविधान सर्वसमावेशक नेतृत्व निर्माण होण्याची, करण्याची आज गरज आहे.

जगातील अल्पसंख्यांक गणलेला ज्यू यहुदी आणि पारशी समाज कधीही न्यूनगंड न बाळगता आज जगात अनेकविध कार्यात सक्रीय आहे. विद्या, विज्ञान नि व्यापारात जगाचे नेतृत्व करीत आहे.

शेक्सपिअर, टॉलस्टॉय, किंवा कालिदास, ज्ञानदेव ह्यांना आपण म्हणत नाही की ते ख्रिस्ती, हिंदू साहित्यिक आहेत. त्यांना आपण वैश्विक म्हणतो. बुद्ध, ख्रिस्त, गांधी ह्यांचीही शिकवण विश्व व्यापणारी आहे. 'चार्ली चॅप्लिन' जसा सर्व जगाला निखळ हसविणारा आहे तशीच आमची 'श्यामची आई' जगातील सर्व माताभगिनींच्या वात्सल्याचे प्रतिनिधित्व करीत आहे.

अल्पसंख्यांक असा न्युनगंड न बाळगता आणि बहुसंख्याक असा अहंगंड न मनात आणता सर्वसमावेशक जगावे. आपले कला गुण नेतृत्व सादर करावे. ते मोठ्या मनाने स्वीकारावे हाच जगण्यातील मोठा व्यवहार आहे. आनंद आहे....

नाही अल्पसंख्याक नाही बहुसंख्यांक!! भेद नुरे!!

मी एक मानव आहे....

नव्या मनुंतील नव्या दमाचा

शूर शिपाई आहे.

ब्राह्मण नाही हिंदूही नाही.

न मी एक पंथाचा.

मळ्यात माझ्या कुंपण पडणे...

कुपातील मी नच मंडूक...

शांतीचे साम्राज्य स्थापू...

बघत काळ जो आहे.

प्रेषित त्याचा

नव्या दमाचा शूर शिपाई आहे.

...केशवसुत.

# सुखी वैवाहिक जीवनाचे मर्म !

■ ॲड. जॉन रॉड्रिग्ज, 9821116898

आपण टीव्हीवर एक जाहिरात पाहतो, "एक वर्षाहून अधिक काळ होऊनही गर्भधारणा होत नसेल, तर तुम्ही प्रोजेनिसीस इन्फर्टिलिटी सेंटरला भेट द्या. फोन क्रमांक....... सदर जाहिरात ही वंधात्वासबंधी असते. सदर जाहिरातीचा आपण तौलनिक विचार केला तर आपणास असे आढळून येईल की, विज्ञान किती प्रगत झालेलं आहे. एखाद्या जोडप्यास लग्न होऊन काही काळ लोटल असेल आणि मुलबाळ होत नसेल तर डॉक्टरी सल्ला घेऊन, त्या जोडप्यास अपत्यप्राप्ती होते, आणि कुटुंबात आनंदी वातावरण होऊ शकते. तीस ते चाळीस वर्षापूर्वी अशी परिस्थिती नव्हती. म्हणून एखाद्या जोडप्यास दत्तक घेण्याशिवाय दूसरा पर्याय उपलब्ध नहता. आणि दुधाची तहान ताकावर भागवता येत असे.

परंतु काळ बदलला. काळाबरोबर जीवनाची गणितं बदलली. माणसाची जीवनशैली बदलली. त्याचबरोबर आपला गरजा वाढल्या. उपलब्ध असलेल्या साधनाद्वारे (मर्यादीत) माणसाच्या गरजा पूर्ण होण्यास कठीणाई येऊ लागली. गरज ही शोधाची जननी आहे ह्या उक्तीप्रमाणे माणसाला विज्ञानाची मदत घेणे हे क्रमप्राप्तः झाले. Therefore, science is try to fulfil the vicissitudes of life म्हणजेच विज्ञानात उलथापालथ होऊन माणसाच्या जीवनात अनेक स्थित्यंतरे घडून येताना दिसतात. त्यातलेच एक स्थित्यंतर म्हणजे विज्ञानाने वंधत्वावर केलेली ही मात. निपुत्री म्हणणे अशी कुजकट वैचारीक सामाजिक घटकावर केलेली मात किंवा शापीत कलंकाला पुसून टाकण्याचा विज्ञानाने दिलेला दिलासा. असो. हा झाला इतिहास.

परंतु या वंधत्वावर एवढा ऊहापोह करण्याची गरज काय ?

कारण ऐंशी किंवा नव्वदीच्या दशकापर्यंत वंधत्वाबाबतीत काळजी करण्याचे कारण नव्हते. नवीन लग्न झालेल्या जोडप्यास वर्ष दोन वर्षामधे मुल व्हायचं; काहीक दुर्मिळ घटक सोडल्यास. परंतु, सध्याच्या परिस्थितीत बऱ्याच प्रमाणात लग्नानंतर लवकर मूल होण्याचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते. लग्न आता लग्न झाल्यानंतर जर एखादी विवाहीत स्त्री गरोदर दिसली नाही तर New news किंवा नवीन बातमी नाही वाटत, असं समाजात विचारणा केली आते किंवा विषय चर्चीला जाऊ लागतो. अशा घटना गावाकडील किंवा मागास वर्गीय समाजात दिसून येतात. त्याचा दुषःपरिणाम त्या नवविवाहीत स्त्रीच्या मनावर किंबहुना तिच्या कुटुंबातील सदस्यावर होतो. तसच ते कुटुंब एका अदृश्य तणावाखाली वावरत असतात. आणि त्या जोडप्यामध्ये न्युनगंड निर्माण होतो.

हे सगळं विस्ताराने सांगण्याचा हेतू हा की, अशी परिस्थिती आता समाज्यात का यावी आणि त्याचे कारण काय ? तुमचा, प्रश्न योग्य आहे. जरा साकल्याने आणि शोधक दृष्टीकोनांतून विचार केला, तर आपणास असे आढळून येईल की, ह्याला केवळ आणि केवळ कारण म्हणजे आपली बदललेली 'जीवन शैली”. मग ती, सामाजिक, आर्थिक, भावनिक असो किंवा मानसिक समस्या असो. ह्या सगळ्या समस्यांचा आपल्या मनुष्यमात्रावर कळत नकळत दुष्परिणाम होत असतो.

पूर्वीच्या काळी ठराविक वयामधे नोकरी मिळायची किंवा माणसाला उपजीविकेचे साधन किंवा व्यवसाय मिळायचा आणि मर्यादित गरजा भागवून आपला संसाराचा गाडा पुढे पुढे रेटायचा. असं म्हणतात की, 'बदल हा निसर्गाचा नियम आहे.’ काळाबरोबर माणूस बदलला. त्याच बरोबर जीवनाची व्याख्या बदलली. आधुनिक जगात प्रलोभने वाकुल्या दाखवायला लागली. मानवी मन त्याला बळी पडू लागलं. गरज नसतानाही नवीन गोष्ट हवीहवीशी वाटू लागली. ती गोष्ट किंवा वस्तू आत्मसात करण्यासाठी आर्थिक परिस्थिती उंचवावी लागली. त्यामुळे माणूस मृगजळाचा पाठलाग करु लागला. परिणाम, त्याला स्पर्धात्मक स्वरूप आलं. जीवन इतकं गतिमान झालं की, माणसाला उसंतच मिळू लागली नाही. पायाला जणूकाही चाकं बांधलेली.

शेवटी माणसानी आपले ध्येय साध्य केलं. एक vicious circle पूर्ण झालं. परंतु साधन साध्य करण्यासाठी त्याची किती दमछाक झाली ती त्याला कळलीच नाही.

हा प्रवास इतका दूरचा होता की तरुणाईची वेळ व वय निघून जायला वेळ लागला नाही. आर्थिक परिस्थिती उंचावण्यासाठी एक जागा (Post), दोन माणसाचा पगार तर तीन माणसाचं काम, हे सूत्र अवलंबावं लागलं. आर्थिक परिस्थिती उंचावली, परंतु, चैन की नींद गमावून बसलो. कुछ पानेके लिए कुछ गवाना पडता है। पैसा, हुद्दा मिळाला, परंतु मानसिक संतुलन बिघडण्याची किंमत मोजावी लागली. शाररिक हानी झाली. ना ठराविक वेळ खाण्याची, ना ठराविक वेळ घरी येण्याची ना ठराविक वेळ झोपण्याची, तर ना ठराविक वेळ प्रियकराबरोबर हितगुज करण्याची. मग तर शाररिक सुख घेण्याची वार्ताच सोडूनच द्या.

निसर्गाचे काही नियम आहेत. निसर्ग हा आपला गाडा नियमानुसार सुरळीत चालवतो. परंतु, त्यात बिघाड झाला तर अवकाळी पाऊस पडणार, तुफानी वादळे होणार, अंगाची लाहीलाही होणारी उष्णता होणार, तर प्रलय सद्रुष्य पूर येणार. आणि होत्याचे नव्हते होणार.

मानवी शरीराची रचना सुद्धा तशीच आहे. निसर्गातच शरीरामधे सुध्दा प्रत्येक अवयवामध्ये त्यांच्या कार्यात सुसुत्रता येण्यासाठी अनेक प्रकारची रसायने chemicals स्त्रवत असतात. त्याचे संचालन मेंदू करतो. भावना उद्देपित करण्यासाठी Dopamine व टेस्टेटोरीन केमिकल स्त्रवणे जरुरीचे असते. आणि त्यासाठी अनकूल वातावरण निर्मितीची गरज असते. पण लक्षात कोण घेतोय ?

करीअर करण्याच्या नादात वय कधी निघून गेलयू त्याचं माणसाला भान राहत नाही. वयानुसार प्रजनन अवयवावर त्याचा दुष्परिणाम होतो आणि गर्भधारणा होण्यास अडचण निर्माण होते. ह्या सगळ्या समस्या मानवनिर्मित आहेत आणि त्याचे मूळ हे नवीन अवलंबीलेली जीवनशैलीत दडलेलं आहे. उच्चशिक्षण घेतलं असल्यामुळे गलेलठ्ठ पगाराची नोकरी. अपेक्षित नोकरी मिळाल्यामुळे त्याप्रमाणात काम करणे हे क्रमप्रातः ओघाने तणावा खाली कामाची पूर्तता ही आलीच. वेळेवर जेवन न घेणं, भूक

भागवण्यासाठी फास्ट फूडचा आधार घेणं. अरबट चरबट खाल्याने ॲसिडिटी, पोटात दुखणं, ॲलर्जीचा त्रास वगैरे वगैरे आजार ओढवून घेणे हे आलंच. एक चीनी म्हण आहे की, सुखी जीवन म्हणजे शांत झोप. झोपेला तर आपण कधीच बाय बाय केलेला असतो. वास्तविक कामजीवन हे प्रेम व्यक्त करण्याची भावना आहे. वाढत वय हे शरीरात संप्रेरकी स्त्रवणाऱ्या कार्यप्रणाली होणाऱ्या बदलाची आपणास जाणीव होते, परंतु, त्याला जास्त महत्व न दिल्यामुळे त्याचा आपल्या वैवाहिक जीवनावर नक्कीच दुष्परीणाम होतो. त्यामुळे माणूस तणावाखाली वावरतो. आणि नकळत एकमेकामधे दुरावा व सुसंवाद न होण्याचे प्रमाण वाढीस लागतं. आणि सहजीवनातली मजा ही हळूहळू कमी होते.

परंतु, या सगळ्या समस्यावर आपण मात करू शकतो. त्यासाठी जोडप्यानी वैवाहिक जीवन जगत असताना चुकीच्या जीवनशैलीचा प्रथम त्याग करण्याची नितांत गरज आहे. दोघामध्ये जेवढा सहवास वाढवता, येईल, तेवढा वाढवण्याचा प्रयत्न करणे. वेळोवेळी तज्ञ डॉक्टराचा सल्ला घेणे हे तेवढेच गरजेचे आहे. योग्य आहार, वेळेवर खाणंपिणं, करीअररुपी मृगजळाच्या मागे धावणे कमी करणे, सहवास वाढवून सकारात्मक दृष्टीकोन ठेवल्यास, वैवाहिक रुपी वेलीवर नक्कीच फूल उमलल्याशिवाय राहणार नाही. कारण, मुलाशीवाय कुटुंबाची व्याख्या पूर्ण होऊच शकत नाही. छोटंसं बाळ आपल्या पप्पा-मम्मीला सांगतं Father And Mother I Love You [Family].

# एकच आस आणि ध्यास... वाचनसंस्कृती संवर्धनाचा

■ जॉन गोन्सालविस, उमराळे, वसई.

"Books are the windows through which the Soul looks out."

आजही ज्ञानाचे प्रत्यक्ष आदानप्रदान मौखिक स्वरूपापासून डिजिटल तंत्रज्ञानापर्यंत येऊन पोहचलेले आहे. बदलत्या आधुनिक युगात बदलल्या आधुनिक जीवन शैलीमुळे सानापासून थोरापर्यंत, ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत सर्वांच्याच हातात पुस्तकाच्या जागी मोबाईलसारखे स्मार्टफोन आले आहेत. मात्र मोबाईलमुळे घटकाभराची करमणूक होईल परंतु पुस्तके हीच जीवनाला आकार देणारी शिदोरी आहे. जीवनाला योग्य दिशा देणारे दीपस्तंभ आहेत.

अम्बर्टो इको म्हणतात, "पुस्तकाचा शोध हा चाकाच्या शोधासारखा मानवजातीच्या इतिहासातल्या 'मूलभूत' शोधांपैकी एक आहे. अशा शोधात पुढे बदलत्या काळानुसार फेरफार होत राहिले, तरी त्यातली मूळ संकल्पना कायम राहते.” पुस्तकाचं स्वरूप बदलले काळानुसार.. कागदावर छापलेलं पुस्तक जाऊन त्या जागी ऑडियो-विडियो बुक, ईबुक, किंडल आले पण त्यातली "वाचन करणे' ही गोष्ट कायम राहील. जोवर माणसाला नवनव्या गोष्टी जाणून घेण्याची जिज्ञासा आहे तोवर पुस्तकाला मरण नाही. नील गायमन या लेखकाने म्हणूनच "A Book is a dream you hold in your hand" अशा तरल शब्दांत भावना व्यक्त केलेली आहे.

सुमारे दीडशे वर्षांपूर्वी मराठी भाषेचे शिवाजी विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी आपल्या ‘निबंधमाला' मध्ये वाचन ही ६४ कलांपैकी एक कला आहे असे नमूद केले

आहे. कोणतीही कला आत्मसात करण्यासाठी किमान काही परिश्रम घ्यावेच लागतात, स्वतःला शिस्त लावून घ्यावी लागते, त्यासाठी वेळ द्यावा लागतो तसेच साधनेही उपलब्ध करून द्यावी लागतात. वाचनासाठी विचार करता पुस्तके उपलब्ध करून द्यावी लागतात. केवळ साधने उपलब्ध करून भागत नाही, तर त्यासाठी प्रेरणा, प्रोत्साहन द्यावे लागते, मार्गदर्शन करावे लागते. वाचन हा केवळ छंद नव्हे; तर तो एक संस्कार आहे. वाचन संस्कार, वाचन संस्कृती जोपासना व वाचन संस्कृती संवर्धनासाठी सरकारी पातळीवरून अनेक स्वयंसेवी संस्था, वाचनालये विविध उपक्रम राबवत असतात या संदर्भात काही व्यक्तींनी त्यासाठी आपल्या आयुष्याच्या समिधा केलेली अनेक उदाहरणे दिसून येतात. वाचन संस्कार पेरणी, वाचन संस्कृती जोपासना व वाचन संस्कृती संवर्धन हेच आपल्या जीवनाचे जीवितकर्तव्य मानणाऱ्या काही प्रातिनिधिक व्यक्तींची उदाहरणे सांगता येतील.

**सायकलवरील ग्रंथालय**

सायकल या दुचाकीवर ग्रंथालय चालवणारे सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील सर्वोदयी कार्यकर्ते म्हणजे जीवन इंगळे. ग्रामीण भागात वाचनाची संस्कृती रुजवण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करणारी पुस्तकप्रेमी व्यक्ती. २००८ पासून त्यांनी सायकलवर फिरते ग्रंथालय सुरू केले. यामागची प्रेरणा त्यांच्या वडिलांनी स्वातंत्र्यलढ्यासाठी दिलेले योगदान व त्यांचे मार्गदर्शन हेच होते. प्रथम ते गावागावात अंगणवाडी, शाळेशाळेत गेले. सायकलवरील पुस्तके बघून लोकांचे कुतूहल जागृत झाले. लोक चौकशी करू लागले. त्यांनी नाममात्र एक रुपया सभासद शुल्क घेऊन लोकांना ग्रंथालयाचे सभासद करून घेतले. हळूहळू आसपासच्या गावागावांत माहिती पसरली. पुस्तके आपल्या सवडीने वाचायची. पुस्तक फाटले, हरवले तरीही चालेल पण पुस्तक वाचा या अटीवर पुस्तके गावागावांत पोहचली.

**वाचनाची पेरणी**

गेली दहा वर्षे रोज किमान दोन ते तीन तास व सुट्टीच्या दिवशी जेवळा वेळ मिळेल तेवढा वाचन चळवळीसाठी काम करणारे बारामती तालुक्यातील विद्या प्रतिष्ठान प्राथमिक शाळेतील शिक्षक, श्री. लक्ष्मण जगताप व खडकी जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका असलेल्या सौ. विदया जगताप ह्या पती-पत्नींचे कार्य नजरेआड करता येणार नाही. जवळजवळ सातशेपेक्षा जास्त शाळेत जाऊन बालगोपाळांवर वाचन संस्कृतींचा संस्कार रुजवत आहेत. वाचन संस्काराची पेरणी करीत आहेत.

प्रथम ज्या गावात, ज्या भागात हे दांपत्य जातात तिथे अगोदर मुले, मोठी माणसे यांच्या समोर जाऊन त्यांना जीवनात वाचन किनी महत्वाचे आहे, यावर भरभरून बोलतात. सोबत आणलेली पुस्तके लोकांना वाटतात. मग त्याच भागात दारोदारी पुस्तके मागतात. लोक छान प्रतिसाद देतात. गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पुस्तके कशी पोहचवायची यासाठी या दोघांनी ध्यास घेतलेला आहे. जमेल तेथे जाऊन पुस्तके वाटतात. शाळांमध्ये जाऊन व्याख्यान देतात. गावकट्ट्यावर बसलेल्या माणसांना पुस्तके वाटतात. वाचनाचे महत्व अधोरेखित करतात.

**विनया चल ग्रंथालय**

घरपोच आणि कोणत्याही ठिकाणी पुस्तके मिळावी यासाठी पुण्यातील महाळुंगे येथील विनया डोईफोडे यांनी अत्यंत अल्पदरात 'विनया चल ग्रंथालय' सुरू केले आहे. विनया डोईफोडे यांनी भारती विद्यापीठातून एम.ए. पदवी संपादन केलेली असून एन.जी.ओ. मध्ये बारा वर्षे नोकरी केली. त्यानंतर काहीतरी वेगळे करावे या त्यांच्या मनातल्या ऊर्मीने उचल खाल्ली. त्यामुळे त्यांनी सात वर्षापूर्वी फिरल्या ग्रंथालयाच्या माध्यमातून रिक्षाने घरपोच पुस्तके दयायला सुरुवात केली.

पुस्तकांसाठी माफक रक्कम आकारली जाते. पुस्तके महिन्याभरात परत करावी लागतात. वारानुसार ही पुस्तके वाचकांना विविध भागात उपलब्ध केली जातात. सोमवार औंध, मंगळवार बाणेर, बुधवार बालेवाडी, गुरुवार भूगाव आणि रविवारी सातारा रस्त्यावरील भारती विद्यापीठ या विकाणी पुस्तके उपलब्ध केली जातात. लहान

मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी घरात लहान मूल असेल, तर पाच पुस्तकांवर एक पुस्तक मुलांसाठी दिले जाते.

**रिक्षात फिरते वाचनालय**

वाचकांपर्यंत नेण्यासाठी पुण्यातील एका रिक्षाचालकाने चक्क आपल्या रिक्षातच वाचनालय सुरू केले आहे. या रिक्षाचालकाचे नाव आहे प्रशांत कांबळे. कांबळे हे पिंपळे निलख येथील रहिवासी आहेत. गेल्या चार-पाच वर्षापासून ते रिक्षा चालवतात. प्रशांत कांबळे हे मूळचे नाट्यकलाकार आहेत. विविध प्रायोगिक नाटकांत त्यांनी काम केले आहे. मात्र कोरोना काळात नाट्य व्यवसायाला खीळ बसली. नाईलाजाने उपजीविकेसाठी त्यांना रिक्षा व्यवसायाकडे वळावे लागले. संकटातून त्यांना संधी मिळाली.  त्या संधीचे त्यांनी सोने केले.

कोरोना काळात रिक्षाद्वारे घरपोच भाजी पोचवण्याचा व्यवसाय ते करत होते. फावल्या वेळात रिक्षात बसून ते पुस्तक वाचत असत. त्याचवेळी ही पुस्तके रिक्षातून प्रवास करताना प्रवाशांनाही वाचायला नक्कीच आवडतील, असा विचार त्यांच्या मनात आला. त्यासाठी रिक्षातच त्यांनी एक छोटेसे लाकडी कपाट तयार केले. एकावेळी या कपाटात चाळीस ते पन्नास पुस्तके ते ठेवतात. या रिक्षात स्वामी विवेकानंद यांचे ज्ञानयोग', क्रिकेटवीर सुनील गावसकर यांचे 'आयडॉल्स', आचार्य अत्रे यांचे 'अत्रेटोला', शिवराज गोर्ले यांचे 'नग आणि नमुने', बाबा आमटे यांचे 'ज्वाला आणि फुले' आदि पुस्तके यात पाहायला मिळतात. रिक्षामध्ये त्यांनी मराठी भाषेतली पुस्तकेच ठेवलेली आहेत. कारण आजच्या तरुणाईच्या बोलण्यातून मराठी भाषा अस्तंगत होत आहे, असे दिसून येते. त्यामुळे तरुणांना वाचनाची गोडी लावण्यासह मराठी भाषेबद्दल आपुलकी निर्माण व्हावी, हा त्यांचा प्रांजळ उद्देश आहे.

रिक्षात बसलेल्या प्रवाशांनी हवे ते पुस्तक निवडावे आणि वाचावे, अशी ही कल्पना आहे. प्रवाशांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पुस्तकांच्या सोबतीने त्यांनी रिक्षातील आपला प्रवास अधिक सुखदायी आणि ज्ञानवर्धक केला.

**ग्रंथविश्व**

सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा येशील व्यवसायाने प्राथमिक शिक्षक असलेले श्री. राकेश औदुंबर गायकवाड ह्या वाचनवेडया अवलियाने आपले घरचं ;ग्रंथविश्व' बनवून गेली २१ वर्षे वाचन चळवळ निरंतर सुरू ठेवली आहे. राकेश गायकवाड यांच्या भगिनी सविता व भाऊजी प्रा. संजय सातपुते यांचे २००० मध्ये अपघाती निधन झाले. वाचनावर नितांतपणे प्रेम असणाऱ्या बहीण व भाऊजी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गायकवाड सरांनी २००२ या वर्षी 'ग्रंथविश्व' या वाचनयज्ञास सुरुवात केली.

राकेश गायकवाड यांनी कल्पकतेने बनविलेली 'ग्रंथविश्व' ही इमारत पाहताक्षणी वाचकांचे लक्ष वेधून घेते. इमारतीच्या बिम, पिलरची यांची पुस्तकाप्रमाणे रचना, त्यावर विविध पुस्तकांची नावे, वाचन संस्कृतीची ओळख करून देणारे प्रवेशद्वार खास तयार करून घेतलेले आहे, या 'ग्रंथविश्वा'मध्ये सोळा हजार पुस्तके, पन्नासहून अधिक मासिके व साप्ताहिके दररोज नियमित येणारे सोळा वृत्तपत्रे व बालवाचकांसाठी स्वतंत्र दालन याव्यतिरिक्त परदेशी व भारतीय नाणी, पोस्टाची तिकिटे यांचा संग्रह वाखाणण्याजोगा आहे.

याशिवाय शाळकरी मुले वाचनाकडे वळावीत यासाठी दत्तक शाळा योजना, ज्येष्ठ नागरिकांना घरपोच सेवा, वर्षभर विविध प्रबोधनात्मक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन हे विविध नावीन्यपूर्ण उपक्रम याठिकाणी राबविले जातात. वाचनप्रेमी गायकवाड सर हे आपल्या 'स्वर्गीय संजय-सविता स्मृती सार्वजनिक वाचनालय' माध्यमातून वाचन संस्कृती जपण्याचे महान कार्य करीत आहेत.

**ग्रंथसखा**

महाराष्ट्र राज्य शासनाचा दोन लाख रूपयांचा 'ग्रंथसखा' पुरस्कार मिळालेले बदलापूरचे ग्रंथप्रेमी श्री. श्याम जोशी सरांनी जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधून शिक्षण पूर्ण केल्यानंतर कल्याणच्या छत्रपती शिवाजी मंडळाच्या शाळेत शिक्षक म्हणून काम केले. त्यांचा वडिलांच्या निधनानंतर जोशी सरांना वडिलांकडून दहा हजार पुस्तके मिळाली. त्याच पुस्तकांतून त्यांनी बदलापूरात 'ग्रंथसखा' लायब्ररीची सुरुवात केली. वाचन

आणि वाचनालयाची संस्कृती जपण्यासाठी त्यांनी सर्वस्व अर्पण केले आहे. यासाठी त्यांनी स्वत:चा प्रोव्हिडेंट फंडही वापरला इतकंच काय, बदलापूरातील स्वत:चा बंगलाही विकला. हे करताना राज्यभरातील अनेक लेखकांनीही त्यांना पुस्तकरूपी भेट देत त्यांच्या मोहिमेला हातभार लावला. बदलापुरातील ग्रंथसखा वाचनालयाचा सांभाळ करताना त्यांनी बदलापुरात स्वायत्त मराठी विद्यापीठ स्थापन केले असून त्यातून मराठी भाषा इतिहास व संस्कृती संशोधनाचे एक व्यासपीठ उभारले आहे. या विद्यापीठाच्या माध्यमातून त्यांनी अनेक लेखक जोडले. बदलापुरात नव्याने सुरु करण्यात आलेल्या यशस्वी भवनातील वाचनालयात त्यांनी तब्बल एक लाख पुस्तके दिली आहेत. याशिवाय श्याम जोशी यांनी मुंबईच्या सिद्धिविनायक ट्रस्टचे वाचनालय उभारण्यासाठी, अंबरनाथ नगरपालीकेतर्फे सुरू करण्यात येणाऱ्या लायब्ररीसाठी यांचे योगदान नजरेआड करता येणार नाही.

**खाकी वर्दीची धडपड**

मुंबई पोलिसांच्या संरक्षण आणि सुरक्षा विभागात कार्यरत असलेले महेश गुरव मुळचे सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्याच्या दादपूर गावचे. पदवीधर असलेले गुरव २०१०च्या स्पर्धा परीक्षा देऊन पोलिस उपनिरीक्षक म्हणून महाराष्ट्र पोलिस दलामध्ये दाखल झाले. सुरुवातीची तीन वर्षे गडचिरोलीच्या नक्षलग्रस्त भागामध्ये सेवा बजावल्यानंतर २०१४ मध्ये त्यांची मुंबईत नेमणूक करण्यात आली. त्यांना कॉलेजमध्ये असल्यापासून वाचनाची आवड होती. पोलिस दलाने दाखल झाल्यानंतर त्यांनी ही आवड स्वतःपुरती मर्यादित न ठेवता इतरांमध्येही निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू केले. मंत्रालय सुरक्षा विभागात नेमणुकीला असलेला त्यांच्या पत्नी प्रमिला यांनादेखील वाचनाची आवड आहे. दोघांनी चारशेपेक्षा अधिक पुस्तकांचा संग्रह आपल्या घरातील छोटेखानी पुस्तक पेढीत तयार केला आहे.

२०१९मध्ये त्यांच्या आईचे कॅन्सरच्या रोगाने निधन झाले तेव्हापासून आपल्या आईच्या स्मृतीप्रीत्यर्थ्य ज्या ठिकाणी संधि मिळते त्या ठिकाणी ते अवांतर वाचनाच्या पुस्तकांचे वाटप करतात, गावपातळीवरील धार्मिक कार्यक्रम असो वा कार्यक्रम व मित्र

परिवाराचे वाढदिवस असोत, प्रत्येक ठिकाणी पारंपारिक स्वरूपात वस्तू रूपात, पैशा रूपात आहेर देण्याऐवजी ते पुस्तकच भेट देतात. तीन वर्षापूर्वी गावातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विदयार्थ्यांना गुरव दांपत्त्यांनी उपयुक्त पुस्तके उपलब्ध करुन दिलेली आहेत. तर गेल्या वर्षी त्यांच्या मूळ दादपुर गावी आपल्या घराची वास्तूशांती होती, त्याप्रसंगी आलेल्या आपल्या मित्र परिवार व आप्तेष्टे यांना त्यांनी शंभर पुस्तके पुस्तके भेट म्हणून दिली. वाचन संस्कृती अधिक बळकट करण्यासाठी वर्दीतील अधिकारी दांपत्य करत असलेल्या धडपडीला एक कडक सॅल्युट ठोकावासा वाटतो.

**ग्रंथदान चळवळ**

शहरे, निमशहरे, तालुक्याची ठिकाणे या स्थानी बहुधा वाचनालये असतात परंतु अति दुर्गम भागातल्या गावांमध्ये इच्छा असूनही लोक पुस्तके आणि वाचनाच्या आनंदापासून वंचित राहतात. ही परिस्थिती लक्षात घेऊन पुणे, वारजे माळवाडी येथील 'सद्गुरू सेवा प्रतिष्ठान'चे अध्यक्ष सचिन म्हसे यांच्या कल्पनेतून 'गाव तिथे वाचनालय' आणि 'शाळा तिथे ग्रंथालय' हा उपक्रम सुरु केलेला आहे. ग्रंथप्रेमी, अभ्यासक, संशोधक यांच्याकडून वाचून झालेली पुस्तके दानरूपाने गोळा करायची आणि ती अशा दुर्गम भागात लोकांना वाचण्यासाठी मोफत द्यायची असा हा उपक्रम आहे. आज त्यांनी पुणे, नंदुरबार, धुळे, जळगाव, जालना जिल्ह्यात  ग्रंथालये सुरु केली आहेत.

सचिन म्हसे हे मूळचे पुण्याचे असून, त्यांनी पुणे विद्यापीठावून इलेक्ट्रिक इंजिनिअरिंगची पदवी संपादन केली आहे. कोरोना संसर्गाच्या काळात त्यांनी सामाजिक बांधीलकीच्या जाणिवेतून 'सद्गुरु सेवा प्रतिष्ठान' ही संस्था सूरू केली. जगप्रसिद्ध साहित्यिक विल्यम शेक्सपियर यांचा जन्मदिन व मृत्यूदिन म्हणजे २३ एप्रिल हा 'जागतिक पुस्तक दिना'चे औचित्य साधून त्यांनी ग्रामीण भागातील विना अनुदानित व अल्प ग्रंथसंख्या असलेल्या सार्वजनिक वाचनालयांना पुस्तकांचे मोफत वितरण करण्यात आले. वाचन चळवळ ग्रामीण भागातही पोहचावी हा यामागील हेतू आहे.

पुण्यासह अनेक शहरांमध्ये त्यांनी यासाठी पुस्तकप्रेमींना साकडं घातलं. त्याला उत्तम प्रतिसादही मिळाला. पुण्यात अवघ्या १३ दिवसांत २०० पुणेकरांनी तब्बल आठ हजार पुस्तके दान केली. त्यापैकी पाच हजार ग्रंथ वेगवेगळ्या दुर्गम भागातल्या वाचनालयांना भेट देण्यात आले. ज्यांनी आयुष्यात कधीच पुस्तके हातात घेतली नव्हती असे लोक आता वाचक होत आहेत. आजपर्यंत या उपक्रमाअंतर्गत वाचनालय आणि शालेय ग्रंथालय मिळून ४६८ ठिकाणी हे ग्रंथदान केलेले आहे. पुस्तकदानाचा हा महायज्ञ येत्या काळात महाराष्ट्रातील अधिकाधिक गावांत-खेड्यांत पोचवण्याचा 'सद्गुरू सेवा प्रतिष्ठान' चा मानस आहे.

# आयज

■ बेर्नादेत रूमाव, बोरीवली

सामवेदी ख्रिस्ती समाजातील लग्नात 'आयज' पाठवण्याचा एक कार्यक्रम असतो. लग्नाच्या आदल्या दिवशी संध्याकाळी म्हणजे शनिवारी संध्याकाळी वराकडून वधूसाठी पाठवल्या जाणाऱ्या भेटवस्तू म्हणजे 'आयज'. त्यात दागदागिने, शालू, अबोलीची मोठी वेणी, नारळ, गूळ आणि केळी यांचा समावेश असतो. दागिन्यात मंगळसूत्र, कर्णफूलं आणि बेसाची (आशीर्वादाची) अंगठी असते. हल्ली त्यात दोन बांगड्या, नाजूक नेकलेस, छोटं मंगळसूत्र अशा आणखीन एक-दोन दागिन्यांची भर पडली आहे. नवऱ्या मुलाची आर्थिक बाजू भक्कम आहे हे दाखविण्याचा त्यात प्रयत्न असतो. अलीकडे तेरा-चौदा हजार किंमतीच्या शालूसोबत आणखीन दोन वजनदार डिझाईनर साड्या पाठविण्याची प्रथा रुढ झाली आहे. लांब कलाबूत असलेली अबोलीची वेणी ही उत्तर वसईच्या लग्नसंस्कृतीची ओळख आहे, तसेच नारळ हे शुभकार्याचे, गूळ हे गोडव्याचे प्रतिक म्हणून पाठविण्याची रीत आहे. काही टारगट व्याहीमंडळी ढेकूळ आणि वालाच्या शेंगाची सालं पाठविण्याचा फार्स करतात.

आयज घेऊन येणारी मंडळी ही खास मानाची असते. त्यात मानापमानाचं मोठं नाटक दडलेलं असतं. रीतीप्रमाणे आयज घेऊन येणाऱ्या मंडळीचा आकडा पाच! पण हल्ली त्यात चार-पाच व्यक्तींची भर पडून हा आकडा दहावर गेला आहे. आयज घेऊन कोणाला पाठवायचे ? हा प्रश्न गुद्द्यावरही येऊ शकतो, म्हणून वरमाय या मंडळींना आधीच हेरून ठेवते. आयज घेऊन येणाऱ्या मंडळीत नवऱ्या मुलाचा मामा म्हणजे वरमायचा भाऊ मस्ट असतो. तो नसेल तर मामाचा मान त्याच्या मुलाकडे जातो. नवऱ्याची मावशी, आत्या यापैकी कुणी सिस्टर (नन्) असेल आणि काका, मामा, आते-मामेभाऊ यापैकी कुणी सेमेनरीत असतील तर आयज घेऊन जाण्यात त्यांची हमखास

वर्णी लागते. व्याहीमंडळीच्या आर्थिक बाजूबरोबरच आध्यात्मिक बाजू देखील दणकट असल्याची ही मंडळी प्रतिनिधीत्व करतात. त्यानंतर नंबर लागतो तो करवलीचा म्हणजे नवऱ्या मुलाच्या बहिणीचा, भावोजीचा आणि त्यांच्या चिल्ल्या-पिल्ल्यांचा. मामाच्या लग्नात जास्त भाव खाऊन जातात ती ही भाचेकंपनी ! तर आयज चढविण्याच्या कार्यक्रमाची ही कथा.

दूरवरून येणारा बॅण्डचा आवाज आता हळूहळू वाढत होता. आता तो अगदी कानाजवळ वाजत असल्यासारखा वाटत होता. 'स्टेफीऑ आयेज आलॉ भाटते!' लग्नघराला कुणकुण लागली आणि लगबग सुरू झाली. उद्या पंचक्रोशीत पाच लग्नं होती, त्यामुळे वाजणारा प्रत्येक बॅण्ड आपल्याच व्याहीमंडळीचा आहे, असं वाटून लग्नघरातील मंडळी कानोसा घेत होती. त्यातच अर्ध्या तासापूर्वी भाटोरी आळीत मन्या मिनेझच्या घरी आयज घेऊन जाणारी मंडळी चुकून बस्त्याव कुण्यातच्या मांडवात घुसली होती. पण चूक ताबडतोब लक्षात येऊन दोन्हीकडून खुशीत असणाऱ्या मंडळीत हास्याचे फवारे उडाले होते. मांडवदारी 'स्टेफी वेड्स स्टिफन' आणि 'वेलकम' चा बोर्ड लावणारा पोऱ्या अजून आला नव्हता. त्यामुळे आयज घेऊन आलेल्या व्याहीमंडळीची गफलत झाली होती. पलिकडच्या जेवणाच्या मांडवात टेबलावर दोन्ही बोर्ड आमनेसामने येऊन पडले होते. आणि हातोडी, टेक्स विसरलो, पटकन घेऊन येतो असं सांगून बोर्ड लावणारा पोऱ्या केव्हाच सटकला होता. त्याला जावून आता तासभर झाला होता. लग्न सराईचे दिवस म्हणजे त्याच्या कमाईचे दिवस होते. डेकॉरेशनच्या मिळतील तेवढ्या ऑर्डर्स त्यांनी घेऊन ठेवल्या होत्या. आणि आता ऐन वेळी हाताखालच्या मजूरांनी त्याला दगा दिला होता. सगळ्यांना 'होऽऽ होऽऽ, आता आणतो, आता करतो, पाच मिनिटांत येतो.' म्हणताना त्याचं पुरं घामटं निघालं होतं.

'आरे, पयलॉ तॉ बोरड लाऑन घ्या.' कुणीतरी सूचना दिली.

'तो बोर्ड लावणारा पोऱ्या कुठे गेला?' बस्त्याव कुण्यात खिशातून मोबाईल रिसिव्ह करता करता घाईत म्हणाले.

'तॉस तर शोधित्याव. पण तू घाबरों नका. म्यें त्याला आत्ते फोन लावित्यें.' गावचा नारायण राजूने सबुरीचा सल्ला दिला. आणि आता मांडवादारात आयज घेऊन आलेली मंडळी आपलीच आहे याची दोन्ही बाजूंनी खातरजमा करून घेतले. व्याहीमंडळी मांडवदारी येऊन ठेपली आणि इच्छित स्थळी डेरेदाखल झाल्यामुळे की काय बॅण्डवाल्यांना स्फुरण चढले. ढोलवाला हात वरती खाली नाचवत ढाम् ऽऽ दुम ऽऽ ढाम् ऽऽ ढुम ऽऽ ढाम् ऽऽ ढुम ऽऽ ढोल बडवित होता. ट्रॅम्पेटवाला बाजाचा मोठा भोंगा सावरित एकदा उजवीकडे अन् एकदा डावीकडे ट्रम्पेट वळवून मध्येच डाव्या डोळ्याची भुवई वर उचलून समस्त बॅण्डवाल्यांना आपल्या तालावर नाचवित होता. त्याचे दोन्ही गाल ट्रॅम्पेटमध्ये हवा भरताना टम्म् फुगत होते. मानेखालच्या शिरा ताणल्या जावून तटतट फुगत होत्या आणि ठसठशीतपणे बाहेर येत होत्या. सारी शक्ती एकवटून तो तालासुरात ट्रम्पेटमध्ये हवा सोडत होता. उद्या संध्याकाळी वरात (नावळ) वळेपर्यंत (मुलीला सासरी सोडेपर्यंत) त्याला बाज्या वाजवायचा होता. हीच कृती पुन्हा पुन्हा करायची होती. फुप्फुसे, गळा आणि ओठ यांचा मेळ साधताना बॅण्ड मास्तर बॅण्ड वाजविण्याचे पंचवीस-तीस हजार का घेतो. हा विचार मी ट्रम्पेटवाल्यापाशी येऊन कोपऱ्यात पचकन थुंकला, पांढरे फटके ओठ पाहून मी माझा 'महागडा बॅण्ड'चा शोध थांबवला. ओठाच्या चंबूत बारीक पिपाणीची जिवणी पकडून बॅण्डमास्तर सगळ्या पथकावर नजर ठेवून होता. पण साऱ्या बॅण्डचा महाराजा होता तो मोठ्या तोंडाचा 'टॉ ऽऽ टॉ ऽऽ टॉ ऽऽ ' करीत वाजणारा ट्रॅम्पेट !

'आयज आलाँ वाटाते ?' म्हणत शेजारच्या पशीकाकीने आपल्या हातातलं काम सोडून दिलं आणि माजघरात चमचा-वाटीने खेळत बसलेल्या नातवाला लगबगीने कमरेवर उचलून घेत ती ओटीवर आली. बॅण्ड वाजत होता. शेजारी-पाजारी पटापट घरातून ओटीवर, हिंदोळ्याजवळ आली आणि बस्त्याव कुण्यातच्या मांडवाच्या दिशेने तोंड करून उभी राहिली. पशीकाकीचा नातू बॅण्डच्या तालावर पाय हलवू लागला. मग नातवाचा हात वरती धरून विधवा पशीकाकीने ताल धरला. 'टॉ ऽऽ टॉ ऽऽ टॉऽऽऽ' करीत आजीनातवाची जोडी उभ्या जागी हलू लागली. मांडवदारात बॅण्ड तालासुरात बाजू लागला. बॅण्डकरी दोन्ही बाजूला रांगेत उभे राहिले आणि मध्ये रस्ता तयार झाला

त्यातून आयज घेऊन आलेल्या मंडळीना त्यांनी मानाने मांडवाच्या उंबऱ्यापाशी आणून सोडले. पण मांडवदारी नवरीमुलीकडून स्वागताला कुणी उभं नव्हत म्हणून आयज घेऊन आलेल्या मंडळीने आजूबाजूला नजर फिरवली. आयज घेऊन आलेला नवऱ्याचा हौशी मामा फरशा मग सगळ्यांना ऐकू जाईल अशा आवाजात म्हणाला, 'आरे, आयज पाय, गा पा नाय. गा आमी तहेस वळते जाव.' (आयज हवा की नको की आम्ही परत जाऊ).

'आरे, आमसाँ पॉर पसांद हाय, गा नाय? का हाय ता आत्तेस हांगा रे!' (अरे आमचा मुलगा पसंद आहे किंवा नाही ते आत्ताच सांगा.) मामाची री ओढत नवऱ्या मुलाचा मोठा भावजी अंद्रेस म्हणाला. त्याबरोबर सगळे जण खीखी करत हसू लागले. मांडवात खसखस पिकली. आयज घेऊन जाणाऱ्यात अशी मज्जा मज्जा करणाऱ्या मंडळीची खास निवड केली जात असे. वेळ मारून नेणाऱ्या, पडल्यास दोन-चार ताशेरे ओढणाऱ्या हजरजबाबी मंडळीची वर्णी आयज नेण्याच्या कार्यक्रमात लागत असे.

'आयज आलॉऽऽ आयज आलॉऽऽ' स्टेफी नवरीच्या घरात लगबग सुरू झाली. कामाला वेग आला. मागच्या दारी स्वयंपाक्याला सिलिंडर काढून देत असलेला वधूपिता बस्त्याव कुण्यात मग लगबगीने हात पुसत धावत पळत मांडवदारी आला. आणि 'सॉरीऽऽ सॉरीऽऽ' म्हणत त्यांनी हसतमुखाने सगळ्या व्याहीमंडळीशी हातमिळवणी केली. त्यापाठोपाठ मोठा शेंडा त्यावर कलाबूत घातलेला अबोलीचा झेल्ला, काठपदराची साडी, गळाभर दागिने आणि कोपऱ्यापर्यंत सोन्याच्या बांगड्यांनी लगडलेली नवरीची (आय) वधूमाय साडीच्या निऱ्या सावरीत चटचट पुढे आली. तोंडभर हसू पसरवित तिनेदेखील सगळ्यांशी हस्तांदोलन केले आणि व्याहीमंडळीला मानाने आत आणून मांडवात बसवलं. ऐंशी-नव्वदच्या दशकापर्यंत मांडवात मोठ्या लाकडी फलाटी असत. खास बॅण्डवाल्यांसाठी त्या राखून ठेवलेल्या असत. मांडवाच्या एका कोपऱ्यात खास नवी कोरी सोलापुरी चादर अंथरूण एक खाट कायम सज्ज केलेली असे. व्याहीमंडळी मांडवात आली की हक्काने खास राखून ठेवलेल्या या बाजेवर बसत. नव्या चादरीचा नवा कोरेपणा सिद्ध करण्यासाठी चादरीवरचा गोलाकार

आणि आयताकृती स्टॅम्प काढण्याची तसदी कुणीही घेत नसे. ते काम बच्चेकंपनी येता जाता करीत असत.

बॅण्डकरी मांडवात आले. स्थानापन्न झाले. बॅण्ड वाजू लागला. आवाज घुमू लागला, त्या आवाजानी कोण काय म्हणतं, काय सागतंय, कोणती सूचना देतो, सगळं सगळं ऐकू येईनासं झालं. एक एक गोष्ट चार-चार वेळा कानात मोठ्यांनी सांगावी लागू लागली, तरीदेखील कुणी वैतागत नव्हतं. चिडत नव्हतं. आयज आला म्हणजे धावपळ मस्ट ! गरज असो किंवा नसो. पण उगीच आपली पळापळ लगबग सुरू होते. पूर्वानुपार चालत आलेली ही रीत!

बॅण्ड वाजत होता. त्यांना हुरूप यावा म्हणून नवरीकडील एक-दोन हौशी-नवशीमंडळी, साळकाया-माळकाया मांडवात उतरल्या आणि त्यांनी फेर धरला. नवश्याने बॅण्डवाल्यांना थांबवलं आणि आपल्या पसंतीचे गाणे तो पेश करु लागला.

'स्टेफीच्या ओटीवर चप्पल कुणाशें

स्टिफन गॅलॅ कामाला.. स्टेफी चप्पल कुणाशें..'

'आरे, तॉ नाय... तॉ नाय... मॅ हांगाते तॉ गाणॉ वाजवा.' हवश्या म्हणाला.

बॅण्डकरी थांबले आन् गाण्याची फर्माइश ऐकू लागले. पण हवश्या नवश्यात एकमत होत नव्हतं. एक म्हणतो मी सांगितलेलं गाणं वाजवा तर दुसरा म्हणतो आधी माझी फर्माइश पूर्ण करा. या दोघांच्या जुगलबंदीत बॅण्डवाल्यांना आपसूक पाच मिनिटांचा ब्रेक मिळाला. तेवढ्यात खुळखुळा वाजविणाऱ्या मिंग्याने तंबाखूची गोळी करून गालाखाली सरकवली. ट्रम्पेटवाल्याने ट्रम्पेटची तोटी जमिनीच्या दिशेने हलवून त्यात गेलेली भुंकी बाहेर काढली. ढोलवाल्याने शर्टची कॉलर मागे सरकवून खांद्या-मानेवरचा घाम पुसला. बॅण्डमास्तरने सुवर्णमध्य काढत पिपाणी तोंडात घातली. साळकाया-माळकाया खुशीत येऊन नाचू लागल्या. ओटीवरून, हिंदोळ्यावरून न नाचणारी मंडळी त्यांना निरखू लागली.

व्याहीमंडळीतील स्त्रियांची नजर दाराकडे लागली होती. नवरी मुलगी कधी बाहेर येते, कशी दिसते बरं, साडी कोणती नेसली, मेकअप आणि दागिने कसे आणि कोणते

याकडे लागली होती. आतल्या खोलीत ब्युटिशियन नवरीला सजवण्यात गुंतली होती. बॅण्डचा आवाज कानी येताच तिच्या कामाला वेग आला होता. तिच्या अवती-भोवती नवरीच्या आते, मामे, चुलत बहिणींचा गोतावळा जमा झाला होता. प्रत्येक जण नवरीला काय उठून दिसतं, कोणती हेअरस्टाईल, कोणता रंग उठून दिसेल यावर आपआपली मते, सूचना देत होते.

'स्टेफी एकदम भारी दिखाता हा!' एकजण म्हणाली.

'मग, ती भाशी कुणाई हाय ?' मामीने तोंड घातलं.

'स्टेफीला नाय मेकअपशी गरज ना दागिन्याई.' इतका वेळ थांबून राहिलेली नवरीची मावशी म्हणाली. स्टेफीने जराही मान न हलवता केवळ हसून सर्वांच्या सदिच्छांचा, शुभेच्छांचा स्वीकार करीत होती आणि ब्युटिशियनच्या सूचनांचे पालन करीत होती. तिचे डोळे हसत होते. शरीर हसत होते. आनंदाचे कारंजे जणू तिच्या अंतःकरणात उचंबळून आलं होतं. तोच लगबगीने वधूमाय आत आली, 'स्टेफी, जाली गा तयारी? शोभा जरा हात चालव. व्याहीमंडळींना घाई हाय.'

'हं.... हं.... झालं आता. एवढा ब्रूच लावते की नवरी तयार. फक्त पाच मिनिटं लागतील.' शोभा ब्युटिशियनने आश्वासन दिले. एवढ्यात स्टेफीचा दीड-सव्वा वर्षाचा लाडका भाचा आईच्या हातातून टेपीमावशीकडे झेप घेऊ लागला. सगळ्यांचा लाडका पहिला वहिला एकुलता एक भाचा. पण आज टेपी मावशीला त्याच्याकडे पाहायला सवड नव्हती. सगळ्यांच्या केंद्रस्थानी असलेल्या छोटूची जागा आज मावशीने घेतली होती. थोडी वाट पाहून त्याने ठेवणीतले अस्त्र काढलं. 'प्रिया, त्याला रडवॉ नाका.' स्टेपी मावशी गहिवरली. तिने लाडक्या भाच्याला कौतुकाने मांडीवर घेतले. तसा तो लबाड शांत झाला आणि खुदकन हसू लागला. ‘बोयले ना माय मरो, आन् मावशी जगो.' छबी मावशीने जगाचा नियम सांगितला.

तेवढ्यात नवरीच्या छोट्या मावशीची तरातरा एन्ट्री झाली. 'शोभा, आते जॉला तॉडॉ मेकअप बास् जालॉ लवकर बार सला. आयज सढव्यासा वारणा कऱ्यादो गावात जा लागे. सल पटकन.' भाचीला पुढे लावून मावशी मागे चालू लागली. मावशी भाची

गावात वारणं करायला गेली. मधली मावशी व्याहीमंडळीच्या जेवण्याच्या तयारीला लागली. सोबत मदतीला बस्त्याव कुण्यातची बहीण आली. ती उकडलेली अंडी सोलू लागली. मामी ॲपल कापून त्याच्या प्लेटी भरू लागली. मामा गारेगार बियर घेऊन आला. नारायण राजूने एकवार खोलीत डोकावून व्याहीमंडळीच्या चहा-पाण्याची व्यवस्था नीट आहे किंवा नाही याची चाचपणी केली. आणि लगबगीने मागल्या दारी निघून गेला. तेथून त्यांनी जेवण्याच्या प्लेटस्, टिश्यू पेपर, चिकन, मटन, भात, पाव ह्याचे बोळ भरून आतल्या खोलीत पाठवले आणि सगळं मावशीच्या हाती सुपूर्द केल्याची खातरजमा करीत म्हणाला, 'काही लागलं सवरलं तर सांगा, मी मागल्या दारी कूकच्या बाजूलाच आहे.' नारायण जसा लगबगीने आला तसाच निघूनही गेला. आयज आल्यापासून मामा, मावशी, मामी, काका, काकी, आत्या यांना दिलेली प्रत्येक छोटी मोठी जबाबदारी मानाची होती. त्यामुळे कोण, केव्हा, कधी, कसा दुखावेल याची गॅरंटी नव्हती. बस्त्याव कुण्यात आणि सांतानबायने सगळ्या गोष्टी हसत हसत घेण्याचे आधीच ठरवले होते. पंधरा दिवसापूर्वी कुमारी-कुपारीचं जेवण झालं, त्या दिवशीच दोघांनी मिळून कामाची वाटणी पक्की केली होती. प्रत्येक लग्नात नातेवाईकांचे रूसवे फुगवे सांभाळणं हे माथ्यावरचा झेल्ला आणि गळ्यातील मणभर दागिने सांभाळण्यापेक्षा भारी होतं. 'खूपदा भीक नको, पण कुत्रं आवर', अशीच वरमायची अवस्था असायची. पहिल्या लग्नाच्या अनुभवातून वरमाय आता शिकली होती.

नवरी मुलगी स्टेफी, बेस्ट गर्ल मावशीसोबत मांडवात उतरली. तेव्हा तिच्या बदललेल्या रूपाकडे सगळे जण टक लावून पाहू लागले. नवरीने सगळ्यांशी हस्तांदोलन करून हसतमुखाने सर्वांचे स्वागत केले. आणि मावशीला सोबत घेऊन ती गावातील प्रत्येक घराघराची पायरी चढू लागली. प्रत्येक दारात दादय, काकय छान तयार होऊन केवळ नवरीमुलीचं आमंत्रण स्वीकारण्यासाठीच दारात उभ्या होत्या. 'आयज सडव्यासा वारणा' प्रत्येक घराच्या पायरीवर चढून नवरीने व्यक्तिशः आमंत्रण दिले. चौथ्या घराची पायरी चढताना स्टेफीला रडू कोसळलं. आज या गावातला शेजोळ्यातील तिचा शेवटचा दिवस होता. त्यानंतर ती या गावात 'पाहुणी म्हणून' येणार होती. उद्यापासून हे सगळे ऋणानुबंध, प्रेमळ माणसं आणि हा सर्व गोतावळा मागे

सोडून तिला सासरी जायचे होते. केवळ या विचाराने तिला भरून आले व तिच्या डोळ्यातून आसवं गळू लागली. 'स्टेफी, ई का? आज रड्यासा नाय. उद्या हांशेपारा नावळ डेवरताना ई सगळा कऱ्यासा.' नवरीची मावशी तिला समजावू लागली. जणू काही गळा भरून येणं, डोळ्यांतून आसवांचा पूर येणं हे रंगमंचावर नाटक वठविण्यासारखं होतं जणू!

सगळ्या आळीत घराघराची पायरी चढून स्टेफीने आयज चढविण्याचं आमंत्रण दिलं आणि मावशी सोबत ती मांडवात परत आली. तोपर्यंत ओटीवर एकासमोर एक खुर्च्या मांडून ठेवल्या होत्या. त्यावर स्वच्छ नवे कोरे टर्किश टॉवेल टाकलेले होते. आयज चढविण्याची पूर्वतयारी झाली होती. त्यानंतर एका खुर्चीत नवरी मुलगी स्टेफीला बसवण्यात आलं. दुसऱ्या खुर्चीत मुलाचा मामा बसला. जुन्या जाणत्या बायकांनी ताल धरला. नव्या लग्न झालेल्या सुना-लेकी कानांनी गाणं ऐकू लागल्या. पण त्यांची नजर स्टेफीच्या आयजाकडे लागली होती. आयज चढविण्याच्या विधीची सगळेजण आतुरतेने वाट पाहू लागले. स्त्रियां लग्नगीतं गाऊ लागल्या.

'आयज घेती, आयल्यात गे सखे,
सासरे गे, सखे मामसासरे गे,
पायाला वाळे घेऊन आयल्यात गे सखे,
सासरे गे सखे नंणदोये'.

मामाने नवरीच्या कानांत कुडे घातली. त्याचे मळसूत्र मावशी फिरवू लागली. मामाने मंगळसूत्र, अंगठी उपस्थितांना दाखवून ती वरमायच्या हाती दिली. मग नवरीची नणंद पुढे आली. तिने नवरीच्या पायांत पैंजण घातली आणि शालूची घडी मोडून ती नवरीच्या उजव्या खांद्यावर ठेवली आणि तोंडभर हसून फोटोसाठी छान पोझ दिली. सिस्टर मावशीने दुसरी डिझायनर साडी नवरीच्या डाव्या खांद्यावर ठेवली व कपाळावर पवित्र क्रुसाची खूण काढण्याची ॲक्शन करीत फोटो काढला. उरलेल्या पिशव्या मामाने नवरीच्या आत्याच्या हातांत सुपूर्त केल्या. आयज घालण्याचा कार्यक्रम उरकला. व्याहीमंडळीकडून आलेला मोठा अबोलीचा झेल्ला मावशीने फ्रीजमध्ये नेऊन ठेवला.

नवरीच्या आत्याने शालू व इतर साड्यांच्या पिशव्यांचा ताबा घेतला आणि सगळ्यांच्या साड्या पाहून झाल्यानंतर त्या व्यवस्थित घड्या घालून संबंधित बॉक्समध्ये ठेवल्या. नारळ, गूळ, केळ्याची पिशवी स्वयंपाक घरात गेली. आयजाच्या पेट्या वरमायने नीट कपाटात ठेवल्या आणि चाव्या पुन्हा कमरेला लावल्या. व्याहीमंडळीचा ताबा नवरीच्या आतूच्या नवऱ्याने घेतला. त्याच्या मदतीला मावशी होती. एका मोठ्या प्रशस्त खोलीमध्ये जेवणाची, चहापानाची जय्यत तयारी केली होती. कोल्ड ड्रिंक्स, मिठाई, उकडलेली अंडी छान कापून प्लेट सजवलेल्या होत्या. ते पाहूनच व्याहीमंडळीची तब्येत खूष झाली. जेवणं आटोपली. बॅण्डकरी सरबत घेऊन गार झाले होते. ते नव्या दमाने वाजवू लागले. जेवून तृप्त झालेली व्याहीमंडळी मग आनंदाने निघून गेली. जेवण मंडपात गावकऱ्यांच्या पंक्ती उठू लागल्या. लग्नाचा पहिला विधी सुखरूप पार पडला. तसं बस्त्याव कुण्यातने आपलं लक्ष जेवण मंडपाकडे वळवलं.

'सगळं पुरेसं आहे ना? काही कमी वगैरे...?'

‘'कय काळजी करो नाका. म्यँ सगळा अडे बघिते. तू एकदम निरधास्त रे.' नारायण राजूने छातीवर हात ठेवत जेवणाविषयी निश्चिती दर्शविली आणि पहिला दिवस निर्विघ्नपणे पार पडल्यामुळे बस्त्याव कुण्यातने देवाचे आभार मानले व उद्याची पुढची सगळी सूत्रे देवावर सोपवून तो आपल्या जवळच्या नातेवाईकांसमवेत शेवटी भोजनास बसला.

# कॉलगर्ल

■ सुनिता बर्नड परेरा, गास, मदर तेरेसा शेजोळ

अचानक सोसाट्याचा वारा सुटला होता. ऐन थंडीच्या दिवसात आकाशात काळया ढगांनी गर्दी केली होती. क्षणार्धात ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट सुरू झाला. अवकाळी पावसाने अचानक हजेरी लावल्यामुळे सुधा कावरीबावरी झाली होती. ऑफिस सुटून ती स्टॉपकडे यायला निघाली असताना अचानक दबा धरुन बसलेल्या अवकाळी पावसाने तिला शिकार केले होते. सुधा चिंब भिजलेली होती. त्यात पवनराजाने संधी साधली होती. पावसाने भिजलेला पदर कसाबसा सावरत ती शेडखाली आली. अवकाळी पावसामुळे सर्वांचीच त्रेधतिरपीट उडाली होती. सुधा मुळातच दिसायला गोरीपान, देखणी आणि सुंदर ! त्यात पावसात भिजल्यामुळे तिचे मूळचे रूप अधिकच खुलले होते पावसाचे टपोरे थेंब तिच्या कुरळ्या बटांशी खेळत, बागडत हळुवारपणे चेहऱ्यावरून ओघळत होते. वयाची चाळीशी गाठलेली सुधा आज चक्क स्वर्गातल्या अप्सरे प्रमाणे भासत होती. विजेच्या दिव्याचे तेज तिचा चेहरा अधिकच उजळून टाकत होते.

स्टॉपवरच्या गर्दीत ती रांगेत बससाठी उभी होती. तिने पर्स मधून रुमाल काढला आणि अवखळपणे बागडणाऱ्या थेंबांना तिने पुसून टाकले. इतक्यात बस आली, बसमध्ये चढण्यासाठी सर्वांचीच झुंबड उडाली. सुधाही कशीबशी पर्स सावरत बसमध्ये चढू लागली. पण गर्दीचा धक्का लागून तिचा तोल गेला. अचानक मागून कुणीतरी तिला आपल्या गच्च मिठीत सावरले. मिठीच्या जबरदस्त विळख्यामुळे ती पडता पडता वाचली होती. तोल जातेवेळी घट्ट मिटलेले डोळे तिने उघडले आणि तिला विजेचा जणू करंटच बसला. समोर तिचा भूतकाळ उभा होता, समीरच्या रूपाने......

सुधा नागपूर मधील एका खेडेगावातील अतिशय गरीब घराण्यातील ! शेतात मजुरी करणारे आईवडील आणि चार लहान बहिणी ! आईबाबा शेतात मजुरी करणारे, त्यामुळे चार बहिणीची जबाबदारी तिच्यावर होती. अर्थात आठवीतून तिची शाळा सुटली. आईबाबा यांचा संसार तिने स्वतःच्या खांद्यावर घेतला. पण म्हणतात ना... गरजवंताला अक्कल नसते ! गरिबीला कंटाळून सुधाच्या जन्मदात्यानी तिला एका दलालाला विकले, तेथूनच तिच्या हलाखीला सुरुवात झाली. त्या दृष्ट, क्रूर दलालांनी तिला थेट पिंकीमावशीच्या कोठ्यावर आणले आणी देहविक्रीच्या धंद्यावर बसवले. सुधा मुळात देखणी असल्यामुळे पिंकी मावशीने तिला वेगळ्या स्टेटसमध्ये ठेवले. तिला स्वतंत्र फ्लॅट घेऊन दिला. सुधा बड्या बड्या राजकीय नेत्यांना आणि मोठमोठ्या बिजनेस वाल्यांना रिझवू लागली. ती खऱ्या अर्थाने त्यांची कॉलगर्ल बनली.

एके रात्री ती हॉटेलमधून परतत असतानाच अचानक तिच्या गाडीला अपघात झाला. दोन दिवसांनी ती शुद्धीवर आली त्यावेळी ती समीरच्या घरी होती. त्याच्या बेडवर झोपलेल्या तिच्या हातापायांना बँडेज बांधले होते, आणि समीर तिची सेवा करत होता. 'प्रेम म्हणजे केवळ वासना, आपली शारीरिक भूक भागली की चिंधी झालेल्या वस्त्रासारखे स्त्रीला फेकून देणे' अशी प्रेमाची व्याख्या करणारी सुधा आज प्रेमाचे एक वेगळेच रूप अनुभवत होती. सुधा समीरचे निर्व्याज प्रेम पाहून मनोमनी सुखावली होती. समीरला तर सुधा पहिल्या नजरेत आवडली होती. तिला गाडीतून बाहेर काढतानाच तो अक्षरश: तिचे रूप बघून वेडावला होता. इतके लावण्य त्याने आयुष्यात बघितले नव्हते. दोन दिवस त्याने मन लावून तिची सेवा केली होती. शुद्धीवर येताच सुधा देखील समीरने केलेली सेवा पाहून मनोमनी आनंदली होती. दोघेही एकमेकांकडे आपसूकपणे आकर्षित झाली होती. समीर श्रीमंत आईवडीलांचा एकुलता एक मुलगा ! उच्च शिक्षित ! वडिलांचा बिझनेस सांभाळत होता. आणि हाच समीर आज सुधाच्या प्रेमात आकंठ बुडाला होता. शेजारी स्पिकर वर मधुर गीत वाजत होते,

'सुर तेच छेडिता, गीत उमटले नवे'.

आणि इथे समीर सुधा ह्यांच्या प्रेमाचा वृक्ष बहरत होता.

समीर सुधा आता भेटू लागले. कधी बागेत, कधी सिनेमा तर कधी बीचवर ! त्यांच्या प्रेमाला बहर येऊ लागला. एकमेकांचे स्पर्श हवेहवेसे वाटू लागले. समीरच्या उबदार मिठीत ती विरघळू लागली, तर सुधाच्या मनमोहक लावण्याचा तो दिवाना झाला. पण वास्तवाचे चटके जगावेगळे असतात. समाज आणि कुटुंब एका कॉलगर्लला आपली सून म्हणून स्वीकारू शकत नाही, हे वास्तव जेव्हा सुधासमोर आले तेव्हा ती होरपळून गेली. समीरने आईवडीलांना समजावण्याचा खूप प्रयत्न केला, पण व्यर्थ ! प्रेमाचा सौदा करण्यात आला आणि साम, दाम, दंड, भेद या शस्त्रांचा वापर करून अखेर समीरचे मातापिता यशस्वी झाले. सुधा समीरला टाळू लागली. प्रेमाचा पारिजातक सुकला होता. फुले इतरस्त्र विखुरली आणि सुधा पुण्याला निघून गेली. तिथे कॉन्व्हेन्टमध्ये आश्रमात ती राहू लागली. शिक्षणाची आवड असणाऱ्या सुधाने शिक्षण पूर्ण केले आणि ती नोकरी करू लागली. एका कॉलगर्लचे परिवर्तन झाले होते. तिला सिस्टरांनी आधार दिला होता. तिने संधीचे सोने केले आणि ती स्वपायावर उभी राहिली.

पुढे अनेक वर्षांनी तिची मुंबईत बदली झाली, आणि ती मुंबईत नोकरी करू लागली. आणि आज अचानक तिचा भूतकाळ तिच्या समोर उभा ठाकला होता. वयानुरूप समीर काहीसा पोक्त दिसत असला तरी देखणेपणा तसाच होता. दोघेची पावसात भिजले होते. समीरची गाडी पावसामुळे खराब झाली होती, त्यामुळे तो प्रायव्हेट टॅक्सी करण्याच्या बेतात असतानाच त्यांची नजर सुधावर पडली होती. सुधा अजूनही अविवाहित होती. समीरने सुधाचा ध्यास सोडला नव्हता, त्यामुळे सुधा आयुष्यातून निघून गेल्यावर त्यानेही लग्न केले नाही. आणि आज अचानक नियतीने दोघांची भेट घडवून आणली होती. अवकाळी पावसात दोघांच्या डोळ्यात आसवांचा पूर आला होता. हीच संधी साधून समीरने तिला मागणी घातली, “सुधा, तू शुक्राची चांदणी, मी आकाशातील तारा, बनशील का आयुष्यभर माझा सहारा“.

सुधाने बेभान होऊन समीरला घट्ट मिठी मारली आणि आपली मुक संमती दर्शवली.

# साहिब, बीबी और गुलाम


■ क्लेमेंट डिमेलो, नंदाखाल, वसई.

छाती दडपून जाईल अशा एका मोठ्या हवेलीचा सांगाडा आपल्याला दिसतो आहे. पडझड झालेल्या त्या हवेलीचे उरलेले अवशेष पाडण्याचे काम सुरू आहे. कधीकाळी सुंदर असलेली स्त्री, चेहऱ्याची रया गेल्यावर दिसते तशी दिसणारी ही हवेली, जुन्या काळातल्या सरंजामशाहीची प्रतिक आहे. (जी सरंजामशाही, जमीनदारी पद्धती आता रद्द झाली आहे.) गोरगरिबांचे शाप, तळतळाट गिळून एखाद्या अजगरासारखी स्वस्थ पडून असलेली कधीकाळची ही हवेली — 'साहिब, बीबी और गुलाम ' ह्या चित्रपटातले एक पात्र आहे; जे संवाद बोलत नाही; परंतु न बोलताही तुम्हांला बरंच काही सांगून जाते.

या हवेलीचे उरलेसुरले अवशेषही आता थोड्यावेळात नामशेष होणार आहेत. हे सगळे भूतनाथच्या देखरेखेखाली सुरू आहे. कधीकाळी भूतनाथ ह्या हवेलीच्या आश्रयाला होता. त्या हवेलीकडे भूतनाथ अशा नजरेने पाहत आहे की, त्याचे काहीतरी त्या हवेलीत हरवले आहे. कोसळलेल्या घराच्या ढिगाऱ्यात आपले हरवलेले खेळणे कुठे सापडते आहे का? अशा नजरेने ज्या प्रमाणे एखाद्या बालकाने पहावे अगदी त्याचप्रकारे!

भूतनाथची नजर भिरभिरत त्या हवेलीतल्या जिन्याकडे जाते. तो यांत्रिकपणे त्या जिन्याच्या दिशेने जाऊ लागतो. अन मग त्याला ते विरहगीत ऐकू येते. खोल अंधाऱ्या विहिरीतून कोणीतरी गात असल्यासारखे. या जिन्यावरून तो अनेकदा छोट्या बहुच्या खोलीत गेला आहे. आताही त्याला ते विरह गीत ऐकू येते जे पूर्वी छोटी बहु त्या महालात गायची. ते गाणे आपल्या मनाचा ठाव घेते. मग गाण्यापाठोपाठ त्याला ऐकू येते छोट्या बहुची ती आर्त हाक. अन मग तिथेच बसून तो भूतकाळात हरवतो....

जीजाजीच्या ओळखीवरून तो ह्या हवेलीत राहायला येतो. ही प्रचंड हवेली व




त्या हवेलीची श्रीमंती पाहून त्याची तर छातीच दडपून जाते. त्याचे जीजाजी त्याला हवेलीचे नियम समजावून सांगतात. जर इथे राहायचे असेल तर इथल्या कुठल्याही गोष्टीत लुडबुड करायची नाही. तो ही ते मान्य करतो. अन मग एके रात्री त्याला  विरह गीत ऐकू येते. कुणाच्यातरी काळजाच्या खोल दरीतून आलेली विरहगीताच्या रुपातली ती आर्त हाक असते. भूतनाथची नजर त्या आवाजाचा शोध घेत असते. पण त्याला दिसते ती अंधारातली हवेली.

हवेली कसली ती! एक थडगेच आहे. सुशोभित केलेले थडगे. ज्यात हवेलीच्या ह्रदयाचे  कुजलेले प्रेत आहे.

भूतनाथला दुसऱ्यादिवशी त्या हवेलीच्या नोकराकडून कळते — रात्री विरह गीत गाणारी ती स्त्री म्हणजे दुसरी तिसरी कोणी नसून, त्या हवेलीची मालकीण 'छोटी बहुराणी' आहे. काय आहे ह्या छोट्या बहुराणीचे दुःख! ती त्या पक्ष्यासारखी आहे. ज्याच्या विषयी अशी अख्यायिका सांगितली जाते की, तो पक्षी आयुष्यात एकदाच गातो. स्वतःच्या हृदयाला काटा टोचून घेतो अन मग त्या रक्तबंबाळ हृदयातून विरहाच्या भवसागरात बुडवून काढलेले ते विरहगीत बाहेर पडते. पण इथे प्रकार वेगळा आहे. इथे  छोट्या बहुचे हृदय विदीर्ण झाले आहे. ते का? कशासाठी? तर त्या हवेलीच्या नोकराकडून कळते की, तिला तिच्या पतीचे प्रेम हवे आहे; परंतु ते तिला मिळत नाही.

ती अस्सल भारतीय संस्कृतीच्या मूशीतून घडलेली स्त्री आहे. जीची डोली उठताना तिच्या आईवडिलांनी तिला सांगितलेले असते की, "तुझा पती हाच  तुझा परमेश्वर आहे. त्याची सेवा कर." परंतु तिला हवेलीचे नियम माहीत नाहीत. ह्या हवेलीत तुमच्या भावनेला किंमत नाही. तिथे किंमत आहे ती फक्त आणि फक्त ओरबाडून घेतलेल्या भौतीक सुखांना! तिथे छोट्या बहुच्या बावनकशी प्रेमाला कवडीचीही किंमत नाही.

छोट्या बहुचा पती रंगीन मिजाज असलेला, दारूच्या नशेत धूत, नाचणारीच्या कोठीवर दिवसरात्र पडून असणारा जमीनदार आहे. छोटी बहु अहिल्येसारखी आहे. जिची काहीच चूक नसताना तिच्या नशीबी 'शीळा' होऊन एका जागी निपचित पडून राहणे आले आहे. घरात सुंदर, शुद्ध प्रेमाचा देव्हारा असताना, आपला पतीदेव त्या कलावंतीणीच्या नादात स्वतःला का विटाळून घेतो हेच तिला समजत नाही. अहिल्या वाट पाहते आहे, प्रभू रामाची. ज्याच्या पवित्र पदस्पर्शाने तिची सुटका होणार असते. तर इथे छोटी बहु वाट पाहते आहे. आपल्या पतीच्या स्नेहाळ मिठीची. पण हाय रे दैवा! प्रयत्नांची पराकाष्ठा करूनसुद्धा ते सुख तिच्या दृष्टीच्या टप्प्यातही येत नाही.

त्याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून ती एकेदिवशी आपल्या नोकराकरवी भूतनाथला तिच्या खोलीत बोलावते. भूतनाथ जरी त्या हवेलीत राहत असला तरी तो मोहिनीसिंदूर ह्या स्त्रियांच्या भाळी सौभाग्याची खुण म्हणून मिरवणाऱ्या सिंदुर बनवणाऱ्या कंपनीत काम करत असतो. छोट्या बहुराणीचे वेडे मन मोहिनी सिंदुरच्या त्या जाहिरातीला भुलते. ती भूतनाथकडून तो सिंदूर मागवते अन मग तो सिंदुर कपाळी लावून शृंगार करून पतीची वाट पाहत बसते. मोठ्या मिनतवारीने त्याला बोलावून तो येतो. पण तिच्याशी बोलताना तिच्याकडे ढुंकूनही पाहत नाही. ती त्याला फक्त एकदा तिच्याकडे पहायला सांगते. तिची मोहिनीसिंदूरभरी माँग पाहण्यासाठी! पण तो तिला "हे काय फालतू नाटक आहे." असे बोलून तिथून निघून जातो. अन जाता जाता त्याचा ढोपर लागून तिच्या कपाळीचे ते कुंकू पुसले जाते. ती वेडीपिशी होते. एकेदिवशी ती पतीला विचारते, त्या नाचणाऱ्या स्त्रीकडे अशी काय जादू आहे की, तुम्ही तिच्याकडे ओढले जाता?" तेव्हा तो कुचेष्टेने हसतो अन तिला म्हणतो, "ती नाचणारी बाई माझ्यासोबत रात्ररात्रभर दारू पिते. तुझी तयारी आहे का दारू प्यायची?" सहस्र

विंचवाच्या दंशाची वेदना उमटते तिच्या हृदयी. हे ऐकून ती हादरते. ज्या पतीसाठी पहिल्या रात्री दुधाचा प्याला भरून घेऊन आले तो पती तिला, हाती दारूचा प्याला घ्यायला सांगत होता. ती मन घट्ट करते. आपल्याला सावित्रीची आठवण येते. यमाकडे आपल्या पतीचा प्राण मागणारी सावित्री, जी पती हाच माझा प्राण आहे. त्याच्याशिवाय मी जीवंत राहूच शकत नाही! मग त्यासाठी वाट्टेल ते करेन! छोटी बहु दारूच्या रुपातला हा विषाचा प्याला प्राशन करायला तयार होते. अन भूतनाथला तिच्यासाठी दारू आणायला सांगते. तिच्या हुकूमाचे पालन करणारा तो 'ग़ुलाम' ह्या गोष्टीला मात्र विरोध करतो. पण शेवटी साहीबच्या बीबीच्या प्रेमापुढे त्याची हार होते.

छोटी बहु आपल्या पतीच्या आग्रहाखातर त्या रात्री दारू पिते. तिला वाटते आता तरी तो आपल्या प्रेमाला लाथाडणार नाही.

ती त्याच्यासोबत दारू पिते. त्याच्या विकृत वासनेला चाळवण्यासाठी ती कोठेवाली जो काय प्रकार करते ते सारे छोटी बहु करू पाहते. पण इतके सारे करूनसुद्धा त्याचा 'जी' भरत नाही. तो पुन्हा नाचणारीकडे जाऊ लागतो. तेव्हा ती त्याला प्रश्न विचारते, पण त्या प्रश्नाचे उत्तर द्यायला तो बांधील नसतो. तो फक्त तिला सांगतो की,"तुला कशाला हवा तुझा पती नजरेसमोर? तू तुझ्या जावांसारखी का राहत नाहीस?" ती विचारते, "म्हणजे कशी?" तो म्हणतो, "दागिने बनवायचे. मोडायचे. पुन्हा बनवायचे.. पुन्हा मोडायचे... कवड्यांचे खेळ खेळायचे..." ह्या त्याच्या उत्तराने ती पेटून उठते. कारण तिच्या जावांना भौतीक सुख हवे असते. जे त्या हवेलीत मिळते किंबहुना आपण ज्या हवेलीत नांदायला जात आहोत त्या हवेलीचे नियम त्या कोळून प्यालेल्या असतात. आपले पती जमीनदार आहेत. तेव्हा त्यांचे जीवन हे असेच रंगीन मिजाज असणार आहे. आपल्याला काय त्याचे? आपण मुलांना जन्म द्यायचा. उरलेला वेळ भौतीक सुखांना कवटाळायचे. इतके साधे, सोपे गणित असते त्यांचे. त्यांच्या हवेलीतल्या संसाराविषयीचे. "माझ्या प्रेमाची तुलना तुम्ही माझ्या जावांशी करता.... अन मग ती तिच्या मनातले सगळे दुःख त्याच्यासमोर उगाळते. अन शेवटी त्याच्या अहंकाराला डिवचते. "मी राहीन एकटी. मला एक बाळ द्या." खरं होतं तिचं. स्त्रीच्या अंतरी जेव्हा वात्सल्याचा पान्हा फुटतो. तेव्हा तिची अवस्था पान्हा

फुटलेल्या गोठ्यातल्या गाईसारखी होते. वात्सल्याच्या दुधाने भरलेले ते आचळ एकतर गोदोहन करून रिकामे केले पाहिजेत नाहीतर तिच्या वासराला तिच्या आचळाला लुचू दिले पाहिजे. त्याशिवाय तिला फुटलेला पान्हा तिला स्वस्थ बसू देत नाही. छोट्या बहुचा पती तिला मूल देऊ शकत नाही व तिच्यातली मायाही आपल्यावर रिक्त करू देत नाही. अशावेळेला तिने करायचं तरी काय? हे जीवन काय फक्त दागिने बनवण्यासाठी का खर्ची घालायचे आहे.

अहंकाराने डिवचलेला तिचा पती रागाच्या भरात, बग्गीला जुंपलेल्या घोड्यांच्या पाठीवर चाबूक ओढून नाचणारीकडे वाट वाकडी करतो. अन जेव्हा तो कोठीवर पोहचतो तेव्हा त्याला दिसते. त्याच्यासोबत दारू पिणारी, धिंगाना घालणारी अन नाचणारी ती कोठेवाली आज त्याच्या शत्रूसमोर नाचत असते. तो रागाने बेभान होतो. तिथे कज्जा होतो. अन त्यात तो जबर जखमी होऊन बेशुद्ध पडतो.

छोटी बहु आपल्या जखमी पतीची सेवा करू लागते. पण ती दारूच्या आहारी गेलेली असते. इतकी की, ती एकेदिवशी तिच्या हातातल्या सोन्याच्या बांगड्या भूतनाथकडे देऊन त्या बदल्यात ती त्याला दारू आणायला सांगते. ज्या सौभाग्यासाठी जीवाचे रान केले. त्या सौभाग्याची खुण म्हणून तिच्या मनगटातल्या बांगड्यादेखील ती विकायला मागे पुढे पाहत नाही. पण इतकी दारुच्या नशेत वाहत गेलेली छोटी बहु, जेव्हा तिचा नवरा तिला दारू सोडायला सांगतो तेव्हा एका क्षणात ती दारू सोडते. तिचा पती आता तिला परत मिळालेला असतो. हाय रे देवा. त्याग.. त्याग.... आणि त्याग...

आपला पती आता पूर्ण बरा व्हावा म्हणून औषध आणण्यासाठी, ती भूतनाथला घेऊन एका सिद्ध पुरुषाकडे जायला निघते. त्याचवेळेला तिचा थोरला दिर तिच्यामागोमाग मारेकरी पाठवतो. कारण भूतनाथचे तिच्यासोबत असण्याने त्याच्या मनात संशय निर्माण झालेला असतो. भूतनाथसोबत बसलेली छोटी बहु. रात्रीच्या शांततेत, निरव, निर्मनुष्य रस्त्यावरून अंधाराचे पांघरुण अंगावर घेऊन धावणारी ती घोडागाडी. त्या भयाण शांततेत ऐकू येणाऱ्या घोड्यांच्या टापांचा आवाज अन ह्या सर्व पार्श्वभूमीवर आता सगळे काही संपले आहे. अशा नजरेने शुन्यात पाहणारी

ती! भूतनाथ तिला विचारतो, "अब छोटे मालिक की तबियत कैसी है?" मग तिचे ते थांबत थांबत बोलणे. "उन्ही के लिए परेशान हूँ। भगवान करे..... मेरी उमर भी उन्हें लग जाएँ! अन मग भूतनाथकडे वळून पाहत बोलते, " जब मै मर जाऊँ, तब मुझे खूब सजाना। मेरी माँग में सिंदूर भरना, ताकी लोग बोल सके, सती लक्ष्मी चल बसी।" अन ही वाक्ये बोलताना तिने बंद केलेले डोळे, तिच्या चेहऱ्याचा तो क्लोजप...आपल्याला वाटते, तिचे प्रेतच बोलते आहे. जणू तिला कळालेले असते, आपल्या घोडागाडीपाठोपाठ आपला मृत्यू आपला पाठलाग करतोय..." अचानक घोडागाडीसमोर मारेकरी उभे ठाकतात. घोडे खिंकाळू लागतात. कोणीतरी तिचा हात ओढतो. तेव्हा मनगटाचा क्लोजअप दाखवला आहे. त्या मनगटात असलेली बांगडी आपल्याला दिसते. पाठोपाठ तिची किंकाळी....

भूतनाथ शुद्धीवर आल्यावर तिचा शोध घेऊ पाहतो. हवेलीचा इमानदार नोकर रुग्णालयात भूतनाथला भेटायला येतो. तेव्हा भूतनाथ त्याच्याकडे छोट्या बहुची चौकशी करतो. पण तो सांगतो. तिचा काहीच पत्ता नाही....

फ्लॅशबॅक संपतो.

एव्हाना हवेली जमीनदोस्त झालेली आहे. इतक्यात एक मजूर धावत येतो. हवेलीच्या तळघरात काहीतरी सापडल्याचे सांगतो. भूतनाथ त्याच्या मागोमाग धावत जातो. तळघरात एक सांगाडा सापडलेला असतो. भूतनाथला दिसते त्या सांगाड्याच्या मनगटात एक बांगडी आहे. तो ओळखतो हा सांगाडा छोट्या बहुचा आहे. त्याला तिची वाक्य आठवतात, "जब मै मर जाऊँगी, तब मुझे खूब सजाना!" तिचा तो सांगाडा अन भूतनाथला आठवत असलेली तिची ती मीनाकुमारीच्या दर्दभऱ्या आवाजात बोललेली वाक्ये, "जब मै मर जाऊँगी...." आपल्या काळजाचे पाणी पाणी होते. वाटते, काय हवं होतं तिला? फक्त पतीचं प्रेम. आणखी काय हवं होतं तिला? मृत्यूनंतर सजलेलं पार्थिव. तेही तिच्या नशीबात नसावं. ज्या बांगड्या शाबूत राहाव्यात त्यासाठी जिवाचा आटापिटा केला. त्या तिच्या बांगड्याच तिची ओळख पटवून देतात.

# निर्भेळ...

■ अॅलेक्स मच्याडो, नंदाखाल, वसई

ऑफीसमध्ये पाऊल ठेवताच मुग्धाला एकदम बरं वाटलं. एवढ्या गर्दीमधून हा ऊकाडा सहन करत ऑफीसमध्ये पोहोचेपर्यंत जीव नकोसा होऊन जाई. आता अेसीमध्ये किती छान वाटत होतं.

मुग्धाने हातातली बॅग टेबलावर ठेवली. खूर्चीत बसल्या बसल्याच तीने थोडं पुढे झुकत समोरचा कॉम्प्युटर ऑन केला आणि तो बुट होतोय तोवर आपल्या पर्समधून मोबाईल काढला. ही तिची नेहमीची सवय. सकाळी कामाला सुरूवात करण्यापूर्वी एकदा मॅसेजेस वगैरे काय असतील तर बघायचे. एकदा कामाला सुरूवात केली की संध्याकाळपर्यंत वेळच नसायचा.

पहिलंच नाव वाचून ती जरा चमकली. ऊर्मिला सरदेसाई. किती दिवसानंतर, नव्हे महिन्यानंतर तीचा मॅसेज आला होता... गेल्या सप्टेंबरमध्ये मुग्धाला बर्थडे विश करण्यासाठी तिने मॅसेज केला होता, तो शेवटचा. मुग्धाला जरा नवलच वाटलं. कारण एवढ्या वर्षात दिवाळी, नविन वर्ष किंवा वाढदिवसा व्यतिरीक्त ऊर्मिचा मॅसेज कधी आला नव्हता. आज काय झालं असावं अचानक?

समोरच्या कॉम्प्युटरच्या स्क्रिनवर सहज एक नजर टाकून मुग्धाने मोबाईलमधला मॅसेज ओपन केला.

"शेखर हॉस्पिटलमध्ये आहे. कंडीशन खूप क्रिटीकल आहे. ऊपचार सुरू आहेत, पण डॉक्टर्स तेवढे आशावादी नाहीयेत."

मॅसेज वाचून मुग्धाला काही सुचेनासं झालं. तिच्या हृदयाची घालमेल सुरू झाली. मन एकदम अस्वस्थ झालं. तिने क्षणभर आपले डोळे गच्च मिटून घेतले.

ऊर्मि, ऊर्मिला सरदेसाई, मुग्धाची कॉलेजमधील एकदम जिवलग मैत्रिण. शेखर तिचा भाऊ. वयाने तिच्याहून दोन वर्षांनी मोठा. तो देखिल त्याच कॉलेजमध्ये. त्यांना दोन वर्षांनी सिनीअर. ऊर्मिनेच तिची आणि शेखरची ओळख करून दिली होती एक दिवस. पहिल्या भेटीतच तिला शेखर आवडला होता. देखणा होता, हुशार होता, बोलघेवडा होता. त्याच्या सहवासात वेळ कसा मजेत जाई. शेखर कॉलेजच्या कल्चरल कमिटीचा प्रमुख होता. तो स्वतः नाटकामध्ये वगैरे कामं करायचा. मुग्धाला सुध्दा नाटकात काम करण्याची खूप हौस. दोघांची मस्त गट्टी जमली. एकमेकांच्या सहवासात त्यांचा वेळ मजेत जात होता. कधी एकत्र नाटकाला जाणे, पुस्तक प्रदर्शनाला भेट देणे, इंटर कॉलेज इव्हेंट्स अटेंड करणे असं चाललं होतं. कधी कधी ऊर्मी आणि इतर मित्र मैत्रिणीसुध्दा सोबत  असायचे. पण बऱ्याचशा वेळेला ते दोघेच एकत्र असायचे.

बघता बघता दोन वर्षे भुर्रकन ऊडून गेली. शेखरचं शेवटचं वर्ष संपलं. खूप चांगले मार्क्स मिळवून त्याने डिग्री मिळवली. रिझल्ट लागला त्याच दिवशी तो कॉलेजमध्ये आला होता. मुग्धाला भेटण्यासाठी. तिला सुध्दा खूप आनंद झाला होता. खूप दिवसानंतर दोघे एकत्र भेटले होते. दोघं संध्याकाळी बाहेरच जेवायला गेले. मस्त गप्पा मारत जेवण आटोपलं.  निरोप घेण्याच्या वेळेस शेखर मुग्धाला म्हणाला,

" मुग्धा एक विचारू?"

ती जरा गोंधळली. हा असा हडबडलाय कशासाठी ? असा काय विचारतोय हा ? किती मनमोकळेपणे आपण बोलतो नेहमी ? तिला जरा हसूच आलं.

"हो, विचार ना." त्याच्याकडे पाहात, स्मित करत ती म्हणाली.

तो थोडासा थांबला. बोलावं की बोलू नये ह्याचा जणू तो विचार करत होता. मनातल्या मनात शब्दांची जुळवाजुळव करत, तो तिच्या डोळ्यात पाहात  म्हणाला,

"मुग्धा तु मला आवडतेस. खूप आवडतेस." एक क्षण थांबून तो म्हणाला, "मुग्धा, माझ्याशी लग्न करशील ?"

मुग्धाला काय बोलावे सुचेना. तिला हे सगळं अनपेक्षित होतं. तिच्या मनात हा विचार कधी आलाच नव्हता. शेखर तिला आवडत होता किंबहुना कोणालाही

आवडावा असाच तो होता. त्याचा सहवास तिला खूप आवडायचा. पण त्याच्याबरोबर लग्न करून संपूर्ण जीवन घालविण्याची कल्पना तिने कधी केलीच नव्हती. तो तिच्याकडे अपेक्षेने बघत होता. त्याच्या डोळ्यात तिला आत्मविश्वास दिसत होता. त्याला दुखावणं तिच्या खूप जीवावर आलं.

"शेखर, तू मला आवडतोस. तुझी कंपनी मला खूप आवडते, एक मित्र म्हणून. आय एम सॉरी शेखर, पण तू म्हणतोस तसं... तसा विचार कधी आलाच नाही रे माझ्या मनात. मी तुझ्याकडे त्या दृष्टीने कधी पाहिलंच नाही."

शेखरच्या चेहऱ्याकडे पाहायची हिम्मत तिच्यात राहीली नव्हती. त्याच्या डोळ्यात जाणवलेली प्रचंड निराशा आणि त्याचा ऊदास चेहरा जणू तिचं काळीज चिरत गेला होता.

त्या प्रसंगानंतर शेखरने जणू काही तिच्या जीवनातून स्वतःला पूर्णपणे बाजूला केलं. ना भेट ना संपर्क. मुग्धाने शेखरला दिलेला नकार ऊर्मिच्या देखिल अगदी जिव्हारी लागला होता. तीने देखिल मुग्धाशी आता अगदी औपचारीक संबंध ठेवले होते.

कॉलेज संपलं. थोड्याच दिवसात मुग्धाचं लग्न झालं. राजन तीला मनापासून आवडला होता. जीवनाचा साथीदार म्हणून तीच्या मनात जी काही प्रतिमा होती अगदी तसाच. राजनचा जॉब बँगलोरला. मुग्धा सुध्दा त्याच्याबरोबर बँगलोरला शिफ्ट झाली. काही दिवसांनी तिला देखिल तेथे चांगला जॉब मिळाला. दोघं तेथे चांगलेच रूळले.

कधी कधी मुग्धाला शेखरची आठवण यायची. शेवटच्या भेटीतले त्याचे ते निराशेने भरलेले डोळे आणि ऊदासवाणा चेहरा आठवलला की ती अस्वस्थ व्हायची. आपणच ह्या सगळ्याला कारणीभूत आहोत अशी सल तिच्या मनाला खात राहायची.

आज मुग्धाचा सगळा उत्साहच संपला होता. काम सुरू करावंसंच वाटत नव्हतं. मनात एक बेचैनी, खिन्नता भरून राहीली होती. अशा वेळी तिला एकाच व्यक्तीचा आधार वाटायचा...

तिने टेबलावरील मोबाईल ऊचलला आणि एक ठराविक नंबर दाबून मोबाईल कानाजवळ धरला.

"हा, बोल मुग्धा" समोरून आश्वासक स्वर.

"राजन, आज जरा लवकर येशील घरी?"

"काय झालं मुग्धा ? आर यू ओ के ?" त्याच्या आवाजात काळजी होती.

"काही नाही रे. मला जरा बोलायचं होतं तुझ्याशी. महत्वाचं."

"कशाबद्दल?"

मुग्धाने क्षणभर विचार केला.

"शेखरबद्दल, शेखर सरदेसाई."

राजन एक क्षण काहीच बोलला नाही.

"ठिक आहे. हे बघ मुग्धा आता बारा वाजता माझी एक मिटींग आहे. दोनेक वाजेपर्यंत मी निघतो. ओ के ? टेक केअर."

मुग्धाने दुपारपर्यंत आपल्या टेबलावरचं काम पटापट आटपलं आणि अर्ध्या दिवसाची रजा टाकून ती दोनच्या सुमारास ऑफीसमधून बाहेर पडली.

..........

मुग्धाने दरवाजावर बसवलेल्या पितळी चौकटीमध्ये अडकवलेल्या कागदावरचं नांव वाचलं 'शेखर सरदेसाई'

पुन्हा एकदा त्या कागदी तुकड्याकडे पाहात ती क्षणभर थांबली आणि दरवाजावर हलकेच टकटक केलं. थोडा वेळ गेला आणि दरवाजा ऊघडला.

मुग्धाला पाहून ऊर्मिला एकदम आश्चर्यचकीत झाली. तीला क्षणभर काय बोलावं तेच सुचेना. मुग्धाची सुध्दा स्थिती तशीच झाली होती. किती वर्षानंतर तिच्या मैत्रिणीला ती पाहात होती. तिची दयनीय अवस्था बघून खूप दया आली तिला. मधला कटू काळ जणू वाहून गेला होता त्यांच्या ह्या भेटीने. मुग्धाने आवेगाने तिला मिठी मारली.

ऊर्मीदेखिल तिच्या कुशीत शिरून मुसमूसत रडायला लागली. मुग्धाच्या डोळ्यातून पाण्याच्या धारा लागल्या होत्या. मुग्धाची नजर कोपऱ्यातल्या बेडवर गेली. तिचा

स्वतःच्या डोळ्यावर विश्वास बसेना. हा शेखर असेल ? काय अवस्था झाली आहे त्याची. तिने हळूच ऊर्मिला आपल्या मिठीतून बाजूला केलं आणि कॉटजवळ गेली. अस्थिपंजर झालेला एक मानवी देह त्या बिछान्यात पडला होता. हाच का एकेकाळचा राजबिंडा शेखर. तीने डबडबल्या डोळ्यांनी ऊर्मिलाकडे पाहिलं.

"त्याचा जगण्यातला ऊत्साहच संपला होता. यांत्रिकपणे चाललं होतं त्याचं सगळं. स्वतःच्या तब्येतीकडे एकदम दुर्लक्ष. स्वतःला होणारा त्रास त्याने कधी सांगीतलाच नाही." तिचा स्वर रडवेला झाला होता.”

"माझ्या हे लक्षात आलं तेव्हा मी त्याला जबरदस्तीनेच डॉक्टरकडे घेऊन गेले. सगळ्या टेस्ट्स झाल्या. पण खूप ऊशीर झाला होता गं, मुग्धा."

ऊर्मिला हमसून हमसून रडू लागली. मुग्धाने तिच्या पाठीवर हात टाकून तिला जवळ घेतले.

बराच वेळ मुग्धा शेखरच्या बाजूला बसून राहीली. त्याच्या चेहऱ्याकडे पाहून तिला रडू येत होतं. त्याने एकदा आपल्याकडे पहावं, हसावं असं तिला वाटत होतं.

"तू निघ आता मुग्धा. तुला जायचं असेल ना परत. ऊशीर होईल."

मुग्धा ऊठून ऊभी राहीली. ऊर्मिचा हात हातात घेऊन जरासा दाबल्यासारखं केलं आणि काही न बोलता ती त्या खोलीतून बाहेर पडली.

दुसऱ्या दिवशी सकाळी मुग्धाला पुन्हा हॉस्पिटलमध्ये आलेली पाहून ऊर्मिला नवल वाटलं. ही गेली नाही परत ?

मुग्धा आतमध्ये येऊन सरळ शेखरच्या कॉटजवळ गेली. थोडा वेळ ती त्याच्या चेहऱ्याकडे बघत ऊभी राहीली. खाली वाकून तीने त्याच्या डोक्यावर हात ठेवला.

"शेखर बघ कोण आलंय तुला भेटायला. डोळे ऊघड शेखर. बघ मी काय घेऊन आलेय?"

तीने बरोबर आणलेल्या बॅगमधून एक अल्बम बाहेर काढला. एक एक फोटो पालटत ती स्वतःशीच बोलू लागली. मध्येच ती शेखरकडे पाहात होती.

"हा बघ आपल्या गॅदरिंगच्या वेळचा फोटो आणि हा आपल्या ॲन्युअल स्पोर्ट्सच्या वेळचा."

ऊर्मि गोंधळून तिच्याकडे बघत होती. ही असं काय करतेय?

"हा बघ आपल्या नाट्यस्पर्धेतला फोटो. आपण फायनल मारली होती, आठवतंय तुला? काय काम केलं होतंस तू शेखर? ते तुझं शेवटचं प्रदिर्घ स्वगत. मला अजून पाठ आहे ते."

एवढं बोलून तीने अल्बम बाजूला ठेवला, त्याच्या अगदी समोर ऊभी राहीली आणि डोळे बंद करून नाटकी हावभाव करत तीने ते स्वगत म्हणायला सुरुवात केली. ऊर्मी तिला थांबवण्यासाठी पुढे झाली. तेवढ्यात तिची नजर शेखरकडे गेली आणि ती खिळल्यासारखी जागच्या जागीच थांबली. शेखर डोळे ऊघडून एकटक मुग्धाकडे बघत होता. ऊर्मीच्या डोळ्यांतून घळाघळा पाणी वाहू लागले. आज किती दिवसानंतर तिच्या दादाने डोळे ऊघडले होते. तीने पुढे होऊन मुग्धाच्या खांद्याला हळूच स्पर्श केला. मुग्धाने डोळे ऊघडले. शेखर आपल्याकडे पाहतोय हे दिसताच तिला खूप आनंद झाला.  तीने तो अल्बम ऊचलला आणि त्याच्याजवळ जाऊन ऊभी राहीली. त्याच्यातला एकएक फोटो शेखरला दाखवू लागली. त्याच्या चेहेऱ्यावरचे भाव बदलत होते. ऊर्मिलासुध्दा बाजूला येऊन ऊभी राहीली. थोड्या वेळाने मुग्धाने अल्बम बाजूला ठेवला आणि ऊर्मिशी गप्पा मारायला सुरूवात केली. मुद्दामच कॉलेजच्या जीवनाच्या आठवणी काढत होती. शेखर कान देऊन ऐकतोय, त्याच्या डोळ्यात एक निराळीच चमक दिसतेय हे तिला जाणवत होतं. काही वेळाने शेखरला ग्लानी येऊ लागली. त्याचे डोळे पुन्हा बंद झाले. त्यादिवशी मुग्धा खूप वेळ थांबली हॉस्पिटलमध्ये. संध्याकाळी ती ऊर्मिचा निरोप घेऊन निघाली. ऊर्मिला तिच्याबरोबर दारापर्यंत आली. मुग्धाचा हात हलकेच हातात घेत म्हणाली,

"थँक्स". मुग्धा फक्त जराशी हसली.

" मुग्धा, तू आलीस मला खूप बरं वाटलं."

जरासं थांबून ती म्हणाली, "पण मला एक भिती वाटते गं."

मुग्धाने प्रश्नार्थक चेहर्याने तिच्याकडे पाहीले.

"लोक ऊगाच वाटेल ते..."

मुग्धाने हातानेच तिला थांबवलं.

"हे बघ ऊर्मी, शेखर माझा एकदम जिवलग मित्र. त्याने माझ्या जीवनात खूप आनंदाचे क्षण मला दिले. आज त्याला ह्या परिस्थितीत मी थोडे आनंदाचे क्षण देऊ शकत असेन तर तसं करणं हा गुन्हा आहे का?"

"तसं नाही गं. पण ऊद्या तुझ्या घरी समजलं..."

मुग्धाने तिला मध्येच थांबवून तिचा हात धरला आणि रूमच्या बाहेर आली. बाहेर पॅसेजमध्ये बसण्यासाठीं खूर्च्या ठेवलेल्या होत्या. मुग्धा एकदम कोपऱ्यातल्या खूर्चीजवळ जाऊन थांबली.

"राजन"

खूर्चीत पुस्तक डोळयांसमोर धरून बसलेल्या व्यक्तीने मान वर केली आणि मुग्धाला पाहून ऊभी राहीली.

"निघायचं?"

"राजन, ही ऊर्मिला. माझी फ्रेंड. शेखरची बहीण. ऊर्मि, हा राजन."

दोघांनी एकमेकांना हॅलो केलं.

"ऊर्मि, जेव्हा तुझा मॅसेज मिळाला तेव्हा मी राजनशी बोलले. शेखरविषयी लग्नापूर्वीच मी राजनला सगळी कल्पना दिली होती. ह्या स्थितीत मी शेखरजवळ असायला हवं असा त्याचाच आग्रह होता. एवढंच नव्हे तो स्वतः रजा टाकून माझ्या सोबत येथे, मुंबईत आला. मी मुद्दामच त्याला शेखरजवळ नेलं नाही."

ऊर्मिलाच्या तोंडातून शब्द फुटत नव्हता. तिचा निरोप घेऊन मुग्धा आणि राजन निघाले.

त्यानंतर मुग्धा आणि  राजन रोज हॉस्पिटलमध्ये येत होते. राजन मात्र बाहेरच थांबत होता. मुग्धा रोज दिवसभर ऊर्मिलाच्या बरोबर शेखरजवळ थांबत होती. शेखर सुध्दा तिच्या वाटेवर डोळे लावून बसायचा. दिवसेंदिवस त्याची तब्येत खालावत चालली. शरीराची सगळी हालचाल मंदावत चालली होती. डोळे फक्त हल्ली त्याचे ऊघडे असायचे. मुग्धा ऊर्मिलाशी बोलताना जुन्या आठवणींना ऊजाळा द्यायची. शेखरला ह्या आठवणी आवडतात, त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलतात हे तिने ओळखलं होतं.

आज शेवटचा दिवस होता मुग्धाचा. रजा संपली होती. संध्याकाळीच त्यांना निघायचं होतं. सकाळपासून तिला ऊदास वाटत होतं. ऊर्मिला सुध्दा ऊदास होती. मुग्धा बळेबळे जुन्या आठवणींवर गप्पा मारत शेखरला काही आनंदाचे क्षण देण्याचा प्रयत्न करीत होती.

जायची वेळ जवळ आली. मुग्धा रूमच्या बाहेर गेली. थोड्या वेळाने ती परत आली तेव्हा तिच्याबरोबर राजन देखिल होता. ती तशीच राजनला घेऊन शेखरच्या बेडजवळ गेली.

"शेखर, हा बघ. हा माझा राजन. शेखर आम्ही निघतोय आता." मुग्धाने मोठ्या कष्टाने आपलं रडू आवरून धरलं होतं.

शेखरने एकदा मुग्धाकडे आणि राजनकडे पाहिले. त्याच्या नजरेत कृतज्ञता आणि समाधान दिसत होतं. मोठ्या कष्टाने तो आपल्या ओठांची हालचाल करण्याचा प्रयत्न करत होता. जणू त्याला काहीतरी बोलायचं होतं.  पण त्याच्यात तेवढं देखिल त्राण नव्हतं.

मोठ्या कष्टाने त्याने आपला ऊजवा हात हळूहळू थोडा वर केला. राजनच्या आणि मुग्धाच्या दिशेने आपला हात हालवण्याचा मोठ्या कष्टाने तो प्रयत्न करत होता. जणू काही तो त्यांचा निरोप घेत होता. त्याच्या ओठांवर सौम्य हसू ऊमटले होते. त्याच्या दोन्ही डोळ्यांच्या दोन कोपऱ्यातून निघालेले अश्रूंचे थेंब त्याच्या कानापर्यंत पोहोचले

होते. मुग्धाला रडू आवरत नव्हते. राजन तिच्या खांद्यावर हलकेच हात ठेऊन तिला धीर देत होता. ऊर्मिला तोंडावर हात ठेऊन हुंदका दाबून ठेवायचा प्रयत्न करीत होती.

अचानक शेखरचा हात निर्जीवपणे खाली पडला. मान एका बाजूला कलली आणि डोळे निर्जीव झाले.. 'दादा' असा टाहो फोडत ऊर्मिला शेखरच्या निर्जीव देहावर कोसळली होती.

मुग्धा शेखरच्या खांद्यावर मान टाकून हुंदके देत होती. तीचा मित्र निघून गेला होता, कायमचा. पण जाताना काही आनंदाचे क्षण सोबत घेउन गेला होता.

एका निर्भेळ नात्याचा अंत झाला होता.......

# विस्थापित

■ अशोक बाप्टीस्टा डिब्रिटो, उंगणभाट, नंदाखाल

सर्व काही ठीकठाक चाललेलं असताना, आपण आहोत त्या ठिकाणी, आहोत त्या परिस्थितीत, आपल्या शेतीवाडीत आणि आपल्या नात्या-गोत्यात रमलेलो असताना,आपल्या स्वप्नातही कधी विचार केलेला नसताना, आतंकवाद, युध्द तथा राजकीय डावपेचामुळे, ज्यांना असुरक्षिततेच्या भावनेतून आपल्या भावना, आपले स्वप्न आणि आपलं सर्वस्व सोडून पलायन करावे लागते, त्यावेळी त्यांच्या जीवनाची घडी पूर्णपणे विस्कटून जाते व त्यांच्या कौटुंबिक, सामाजिक व आर्थिक स्वप्नांची राखरांगोळी होत असते.

धनदांडग्या उद्योजकांच्या प्रकल्पासाठी, मागचा पुढचा विचार न करता जबरदस्तीने हटविलेली वस्तीतील गरीब जनता असो, आतंकवादाने भयभीत होवून स्वताचे घरदार आणि शेतीवाडी सोडून जावे लागणारी लोकं असोत वा युध्दजन्य परिस्थितीत आण्विक अस्त्राच्या भितीने आपल्या मुलाबाळांसह सुरक्षित आश्रयासाठी पळणारी माणसं असोत, आपलं अस्तित्व गमावल्याचे दु:ख आणि वेदना त्यांच्या हृदयाला रक्तबंबाळ करत असतात. भावी आयुष्याची चिंता त्यांना अस्वस्थ करत असते आणि आपल्या मुलाबाळांच्या सुरक्षेची आणि आरोग्याची भिती त्यांना पोखरत असते. पुर्नप्रस्थापित होण्यासाठी असंख्य तडजोडीची अग्निदिव्ये पार करण्याची आव्हानं त्यांच्यापुढे उभी असतात. ते विस्थापित होत असल्याची खबर आपण पाहतो, ऐकतो मात्र त्यानंतर त्यांचे पुढे काय होते ? हा प्रश्न आपल्या व्यस्त जीवनात आपणास कधीच स्पर्श करीत नाही.

ज्ञानी आणि बुध्दीमान मानवाच्या जीवनातील ह्या अधपतनाला जबाबदार कोण ? त्याला ह्या सुजलाम सुफलाम वसुंधरेत पाठवणारा निर्माता की मानवाचा स्वार्थ आणि अहंकार ?

विधात्याने प्रत्येक जीवजंतुला आपले जीवन सुखी समाधानी आणि समृद्ध बनविण्यासाठी ही वसुंधरा सजवली फुलविली आहे, त्याला आपण देव म्हणून संबोधतो, त्या नावात प्रेम आहे, क्षमा, शांती आणि त्याग आहे, मात्र त्याच देवाला आपण गटागटाने वेगवेगळी नावं देवून त्याने निर्मिलेल्या माणसा माणसात भेदभाव निर्माण केला आणि वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या बहुसंख्य गटाने, अल्पसंख्य गटाच्या लोकांच्या जीवनात देव धर्माच्या नावाने अस्वस्थ आणि असुरक्षिततेची काडी पेटविली, त्या काडीने आज जगभर वणवा पेटविला आहे. त्यात लाखो निरपराध आणि निरागस सानथोरांच्या जीवाची राखरांगोळी होत आहे.

मानवाचा ह्या स्वार्थी आणि अहंकारी स्वभावाने केवळ मनुष्यप्राणीच नाही तर वसुंधरेतील असंख्य घटक प्रभावित झाले आहेत व वसुंधरेतील पशू पक्षी, आपल्या पाण्याचे स्त्रोत, हवामान, ऋतू आणि अगदी आपली आपसातील नाती आपणापासून दूर जात आहेत, आपल्या कर्मामुळे निर्सग घटकाचे आपण करत असलेलो हे विस्थापनचं आहे, त्याचे परिणामही आपण अनुभवत आहोत आणि ह्यासाठी कुठे ना कुठे आपण प्रत्येक जण जबाबदार आहोत.

आजच्या घडीला संपूर्ण जग वातावरणातील प्रतिकूल बदल अनुभवत आहे. ह्या बदलाच्या गंभीर परिणामास जग सामोरे जात आहे आणि ह्या समस्येची दखल घेवून सर्व राष्टातील प्रमुख गेली अनेक वर्षे ग्लोबल वॉर्मीगच्या नावाखाली चर्चासत्र घेत आहेत, मात्र त्यात ग्लोबल वॉर्मीगसाठी कारणीभूत ठरणारी जी कारणं अधोरेखीत होत आहेत आणि त्यावर ज्या उपाययोजना सुचविल्या जात आहेत, त्या उपाययोजना राबविण्यात अखिल मानव जात कमी पडत आहे. वेगवेगळ्या प्रकारचे प्रदूषण वाढविण्यात कुठे ना कुठे माझाही हातभार लागत आहे, मात्र माझ्या एका गोष्टीने काय फरक पडतो ? ह्या प्रश्नाने मी माझी जबाबदारी झटकत असतो.

आज विकासाच्या आणि आर्थिक प्रगतीच्या नावाने मोठमोठया जंगलाच्या मुळावर कुऱ्हाडी चालविल्या जात आहेत. गावागावातही आर्थिक लाभासाठी झाडांची कत्तल होवून टोलेजंग इमारती उभारल्या जात आहेत. आपल्या जीवाला प्राणवायू देणाऱ्या अशा झाडाझुडुपांनाच आपण संपवत आहोत, त्यावर बसणाऱ्या, चिऊ काऊचं

संगीत ऐकवणाऱ्या आणि आपल्या बाळगोपाळांना रमवणाऱ्या चिमण्या कावळ्यांना आपण आपल्या गावातून विस्थापित केलेलं आहे. यावर दुर्लक्ष होत आहे.

ज्या गोष्टीवरून तिसरे महायुद्ध भडकेल असे भाकीत केले गेले आहे, त्या पाण्याचा प्रचंड प्रमाणात अपव्यय होत आहे. आपणास पिण्याचे पाणी देणारे नैर्सगिक स्त्रोत नदी, नाले आणि बावखालं भरावाखाली गाडली जात आहेत. जी काही थोडीफार उरली आहेत, ती कचराकुंडी बनलेली आहेत.आपली तहान भागविणाऱ्या ह्या नैर्सगिक स्त्रोतांना आपल्या कर्माने विस्थापित करून आपण आपल्याच अडचणी वाढवत नाही का?जे निर्मळ पाणी आपणास निर्सग मुक्त हाताने देत होते,त्याच पाण्यासाठी आज आपल्याला वाट पहावी लागते तथा रांगा लावायला लागत आहेत.विधाता खुल्या हाताने आपणास देत गेला मात्र आपणास ते सांभाळता आले नाही.

स्वच्छ आणि सुंदर वातावरण,आपल्या प्रदूषणामुळे काळवंडले आहे.अनेक उद्योगधंदे सर्रासपणे पाण्यात आणि हवेत प्रदूषणाचे मोठमोठे गरळ ओकत आहेत. असंख्य जुन्या आणि जिर्ण गाड्या प्रदूषित धुरांचे जाळे वातावरणाचा श्वास कोंडत आहेत,मी सुध्दा माझ्या सण सभारंभात फटाक्याच्या आतषबाजीने वातावरणातील सुरक्षा कवचाला कुरतडत आहे. डी.जे. च्या कर्णकर्कश आवाजात दिवस रात्र ध्वनीप्रदूषणात भर टाकत आहे, मात्र ह्याच्या दूरगामी परिणामाकडे दुर्लक्ष करून चालेल का ?

आज सुलभ आर्थिक नियोजन करून, विनाकष्ट आणि जलद पैसा कमावण्याच्या नादात आपण सर्वच आपल्या शेतीवाडीच्या पोटात क्राँक्रीटचे विष पेरून भाड्याची घरं उभारत आहोत आणि आपल्या शेतीला, आपणास सकस अन्न देणाऱ्या काळ्या आईस विस्थापित करत आहोत आणि प्रदूषित व भेसळ अन्न आपल्या शरीराला पुरवत आहोत.

आज आपण विसाव्या शतकात घुसलेलो असताना कुत्रीम विकास आणि आर्थिक गणितं सोडवत असताना नकळत आपली कौटोंबिक नाती विस्थापित झालेली आहेत. आपण सुखसमृद्धी आणि भरभराटीच्या चक्रव्युहात वसुंधरेला ओरबाडत

आहोत आणि विसरत आहोत की हीच वसुंधरा आणि हा निर्सगचं खरा आनंद, स्वास्थ आणि मनशांतीचे उगमस्थान आहेत. करोनाने आपणास आपल्या जीवनाचे मूल्य दाखवून दिले आहे आणि  वातावरणातील बदल, सुनामी,ऐकामागून एक येत असलेली वादळं आणि अवकाळी पावसाचे अनिश्चित संकटं आपल्या मर्यादा स्पष्ट करत असताना,आपण वसुंधरेची हेळसांड थांबविली पाहीजे.ज्या  वसुंधरेने आपल्याला भरभरून दिलेले आहे,देत आहे तिच्याशी कृतज्ञ राहून तीला जपले पाहीजे,सबळ ठेवले पाहीजे नाहीतर ह्या वसुंधरेनेच आपणा सर्वांस विस्थापित करण्याचे ठरवले तर आपला विकास आणि आपली आर्थिक गणितं कामी येणार नाहीत.

# निर्णय

■ बॅप्टिस्ट एम वाझ. दारसेंग, गोम्सआळी
मो. 9970650757

एलीस आज खूप खुश होता. त्यांच्या डोक्यावरचं ओझं उतरलं होतं. खूप हलकं वाटतं होतं त्याला! त्याचं फार दिवसाचं स्वप्नं आज पुर्ण झालं होतं. खूप संघर्ष करुन, कष्ट उपसून त्यानं ते स्वप्नं सत्यात उतरवले होते. पण का कोण जाणे त्याला आज आईची राहुन राहुन आठवण होत होती. त्याचं एक मन सांगत होतं की आई आज आपल्यात असायला हवी होती. पण दुसरं मन सांगत होतं की आई आपल्याला सोडून पैलतीरी गेली हे चांगलेच झाले. नाही तर आई या नवीन घरात घुसमटली असती.

नव्या कोऱ्या घरात भिंतीवरील आईच्या तसबिरीकडे पाहून त्याचं मन गलबललं. आईच्या आठवणीने डोळे पाणावले. अश्रू गालांवर ओघळले. त्याला कौलारू घरातील आपले बालपणीचे दिवस आठवले. शेणाने लिंपलेली भिंत आठवली. सारवलेली जमीन आठवली. बाबांच्या मृत्यूनंतर आईचे कष्ट आठवले. स्वतःचा संघर्ष आठवला. बहिणींची लग्ने, मुलांचे संगोपन व शिक्षण यांत डोक्यावरचे केस पांढरे कधी झाले हे त्याला कळलेच नाही. एलीस जून्या आठवणीत रमून गेला. एखाद्या चित्रपटाप्रमाणे त्याचं आयुष्य त्याच्या डोळ्यासमोरून उलगडत गेलं. एलीस आपल्या दोन काकांसहीत एकाच घरात राहत होते. चुलत भाऊ-बहिणी बरोबरचे त्याचे संबंध खेळीमेळीचे होते. एलीसची आई घरातील मोठी सून असल्यामुळे सर्व घर तीच सांभाळत होती. काकांची मुलं एलीसच्या आईला मोठी आई म्हणत तीच्या अवतीभवती फिरत असत. आईसुद्धा त्यांना काय हवं नको ते पाहत असे. तीनं त्यांच्यावर पुत्रवत प्रेम केले. त्यामुळे घरात आईचा शब्द प्रमाण मानला जाई.

एलीसचे बाबा मुंबईत भाजीपाला घेऊन जात असे. दूर्दैवाने रस्ता क्रॉस करतांना बाबांचा अपघात झाला व त्यातच त्यांचा मृत्यू झाला. मग आईने आपलं सगळं आयुष्य सगळ्या कुटुंबासाठी खर्ची घातलं. काळ पुढे सरकत होता. मुले मोठी झाली. शिकली, सवरली, नोकरीला लागली. त्यांची लग्न झाली. त्यांनाही मुलं झाली. आईने सगळ्या सुनांची बाळंतपणे हौसेने पार पाडली. सगळ्या जावा, सुना, दीर, त्यांची मुलं, नातवंडे आईचा आदर राखत असत. आई खूश होती. त्यांच्या संसारात रमली होती.

त्यातच कुटुंब वाढत होते. जागा अपुरी पडू लागली. घरातील सोयीसुविधा कमी वाटू लागल्या. आधुनिक विचारांच्या मुलांना कुडाच्या घरात राहणे कमीपणाचे वाटू लागले. मोठ्या काकांच्या मुलांनी नवीन घर बांधण्यासाठी आपल्या वडिलांच्या मागे लकडा लावला. परंतु घर बांधण्यासाठी जागा पाहिजे होती. रस्तेच्या कडेला घर बांधण्याएवढी जागा होती. आईला कसं विचारावं या विवंचनेत काका पडले होते. शेवटी मनाचा हिय्या करून काका आईकडे गेले व मुलांची इच्छा बोलून दाखविली. आईने मोठ्या मनाने जागा देऊ केली परंतु नातवंडे आपल्या पासून दूरवणार हे जाणून आईला खूप वाईट वाटले. पुढे काकांचे घर पुर्ण झाले. गृह प्रवेशच्यावेळी आईच्या हस्ते फीत कापून नव्या घराचे उद्घाटन करण्यात आले.

गृह प्रवेशाचा कार्यक्रम आटपून आई आपल्या कुडाच्या घरी आली. आज मोठ्या दिराची मुलं आपल्या अवतीभवती नसल्यामुळे ती अस्वस्थ झाली होती. स्वतःची मुलं जवळ असुनही तिला पहिल्यांदा एकटेपणाची जाणीव झाली. दिवसामागून दिवस जात होते. तसतशी नातवंडे मोठी होत होती. वयाने आणि शिक्षणानेही. त्यांना परदेशात नोकरी करून तेथेच स्थायिक व्हायचे वेध लागले होते. कालांतराने लहान दिराची मुलंही नोकरी निमित्ताने परदेशात गेली व तेथे स्थायिक झाली. आता त्या मोठ्या घरात आईसोबत फक्त मुलगा एलीस व लहान दीर उरले. घरात शांतता पसरली होती, जणू घराने मौन धारण केले आहे असं वाटायला लागलं.

आणि तो दिवस उजाडला. पतीच्या निधनानंतरचा तो सर्वात काळा दिवस! त्याला कारणच तसं होतं. एलीस आपल्या काकासोबत आईकडे गेले व राहतं घर तोडून तेथे बंगलो वजा दोन वेगळी घरं बांधण्याचा प्रस्ताव ठेवला. तो प्रस्ताव ऐकून

आईच्या हातापायाला कंप सुटला. तिच्या डोळ्यांतून अश्रू ओघळू लागले. तोंडातून शब्द फुटेना. "आई काय होतं तूला? बरं वाटत नाही का तुला" एलीस बोलला. "पोरा, उद्या बुधवार सूकूर मावलीचा नोव्हेना. मी मिस्सा ऐकून आल्यावर माझा निर्णय तुम्हाला सांगते. आईने धापा टाकत कसे बसे शब्द उच्चारले व जड अंतःकरणाने हिंदोळ्यावरुन उठून ती आत गेली.

रात्री आईला झोप लागत नव्हती. ती या कूशीवरून त्या कूशीवर फिरत होती. पण निर्णय होत नव्हता. अखेर डोळे सताड उघडे ठेवून ती छताकडे पाहू लागली. तीला या घरातील जुने दिवस आठवू लागले. मुला-मुलींची लग्ने, मुलींना सासरी पाठवणी करताना दिलेला निरोप, मूलींची बाळंतपणं, नातवंडे परदेशी जाताना आपल्या अनावर झालेल्या भावना, आपल्या पतीला दिलेला अखेरचा निरोप या आठवणीत रमली असतांना हळूहळू तीच्या कानावर घर तोडायला आलेल्या मजूरांचा आवाज ऐकू येऊ लागला. घराच्या भिंती तोडताना तीच्या डोळ्यासमोर दिसू लागल्या. छतावरील कौलं खाली फेकतांना ती फूटल्यांचा व त्यांचे छिन्नविछिन्न तूकडे होतांना तीला दिसू लागले. कटवणीने घराचे वासे घरापासून अलग होतांना दिसू लागले. 'मेडी' कापताना करवतीचा आवाज ऐकून जणू करवत आपल्या शरीराचे अवयव कापून काढत असल्याचा तीला भास होऊ लागला व ती निग्रहाने मी असं नाही होऊ देणार असे बडबडू लागली.

सकाळी आई मिस्साला जाण्यासाठी का उठली नाही हे पाहण्यासाठी एलीस आईच्या खाटेजवळ गेला. त्याने आईला हाक दिली. परंतु आईने हाकेला प्रतिसाद दिला नाही. परंतु आईचे डोळे सताड उघडे होते जणू ती छताकडे डोळे भरून पाहत होती. त्याने तिचा हात हातात घेतला. तो थंडगार पडला होता. तो काय समजायचा तो समजला. दुःखातिरेकाने त्याने आई अशी हाक मारून टाहो फोडला. हे ऐकून काका धावून आले. दोघांच्या डोळ्यांतून अश्रू घळाघळा वाहत होते. भावना अनावर होऊन एलीसने भरल्या डोळ्यांनी काकांकडे पाहिले. त्यांना आईचा निर्णय कळला होता. पुढे होऊन काकांनी छताकडे पाहत असलेले आईचे डोळे विदीर्ण अंतःकरणाने मिटून टाकले....!

# पाने आठवणीची

■ बावतीस पेडीकर, नंदाखाल, वसई.

पवित्र आत्म्याचे चर्च (इस्प्री संताचे देऊळ) नंदाखाल, यंदा ४५० वर्षे (१५७३-२०२३ ) चतुर्थ शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करत आहेत. त्या निमित्ताने या आठवणी.

वसई धर्मप्रांतात नंदाखल हे मोठे धर्मग्राम. ५० वर्षांपूर्वी, उमराळे, नानभाट, बोळींज, विरार, राजोडी, हा सर्व विभाग यामध्ये सामील होता. करमाळे, वळंबाव, गुराडे, उकंदा, मानपे, विरार, बोळींज, जापके, नानभाट, नाला, राजोडी, साखरभाट, उंबरगोठणपर्यंत. केवळ जेलाडी, वटार, दोनतलाव, साखरभाट येथीलच नव्हे तर बोळींज, उमराळे, नानभाट येथील भाविक धार्मिक विधीसाठी पायी चालत नंदाखाली यायचे. (त्या काळात स्कूटरवगैरे नव्हत्या, पायी चालत आल्यामुळे व्यायाम व्हायचा व हवा, ध्वनी प्रदुषण मुक्त वातावरण होते व जाता येताना पुष्कळ गप्पा गोष्टी व्हायच्या.)

दुसरी व्हॅटिकन परिषद १९६२ साली झाली होती. त्यावेळी घेतलेले निर्णय १९६९ साली अस्तित्वात आले. लोकल भाषेत सर्व धार्मिक विधी प्रार्थना इ. शिवाय इतर अनेक बदल करण्यात आले आहेत.

त्या अगोदरच्या काळात मिसा लॅटिनमध्ये, वेदी समोर तोंड व लोकांकडे पाठमोरे, मिसा प्रवचने अशुद्ध मराठीत कारण धर्मगुरू गोव्याचे किंवा मंगलोरचे असायचे, गाळी शिव्या मारल्या किंवा भाजीसाठी केळी चोरली तरी कुमसार व्हायचे, त्यासाठी मोठमोठ्या रांगा लागायच्या, तीन तीन तास उपवास करून नंतरच कम्यूनियन घेतला जायचा, स्त्रिया डोक्यावर सफेद व्हेल (खोयारा) व मुली डोक्यावर जाळी घेऊन मगच देवळात प्रवेश करत असत. पुरुष डोक्यावर असलेली टोपी काढून ठेवत. लोकांच्या पायात चपला नसायच्या. सर्वजण खालीच बसून किंवा गुडघे टेकून

प्रार्थना करायची. आतासारखे बाक किंवा खुर्च्या त्यावेळी नव्हत्या. फक्त पाठीमागे एक-दोन बाक असायचे. कोणीही धक्क्यावर बसत नसत तशी कोणाला हिम्मतच होत नसे, कारण धर्मगुरूंचा तसा वचकच होता. धर्मगुरू सतत गावात फिरायचे, घरोघरी भेट द्यायचे त्यामुळे त्यांचा प्रत्येकाशी ओळख परिचय होता.

कोरिज्मामध्ये प्रत्येक रविवारी संध्याकाळचे पास असत त्याद्वारे प्रबोधन केले जाई. प्रत्येक शुक्रवारी उपवास करत, मोठा शुक्रवार गुड फ्रायडे, सर्वत्र दुःखाचा दिवस पाळला जाई. खूप सकाळी कृसाच्या वाटेची भक्ती केली जाई व दुपारी दोन वाजल्यापासून संध्याकाळी सात आठ वाजेपर्यंत दोन-दोन प्रवचने बंद, मेणबत्त्या पेटवून मोठी मिरवणूक, गंभीर वातावरण, सर्वत्र शांतता, माँ. वाझ यांचे "माझ्या देवा परमेश्वरा" हे गाणं सर्वांना भारावून टाकी. त्यादिवशी रात्री घरी गेल्यानंतर वालाच्या गोळे घालून केलेली रोटी, धापट्या, डेस्का व मासलीचे जेवण करत असत.

ख्रिस्ताचे सरदार शेव्हेलीयर मॅथ्यू कोरिया (लालोडी) व क्रिस्तवासी फादर फ्रँक लोबो हे उत्तर वसईतील नंदाखालचे प्रथम पेपल नाईट व पहिले धर्मगुरू.

संज्यावचा सण, सेंट जॉन द बाप्टिस्ट २४ जूनला असतो पण आदल्या रात्री गावात संजाव तयार करून होळीसारखं पेटवत असत. मोत माऊलीच्या सणाला रोज सकाळी फुले (गोंडाळे, तेरडे, कमळे, गुंजाळया, जास्वंदी, कनेरी, टेगरी, तेरी असे अनेक प्रकारची फुले) करंडीतून नेऊन देवळामध्ये गाणे म्हणत माऊलीपुढे अर्पण करीत. सणाला खाऊ वाटला जाई. प्रत्येक देवळाचा आदरेसाव वेगवेगळ्या रविवारी असायचा त्यावेळी इतर पॅरीश मधून लोक भक्तीसाठी येत किंवा तेथे जात. मोठी मिरवणूक काढली जाई.

लग्ने नाताळच्या सणाअगोदर, आगमन काळ व कोरेज्मामध्ये कधीच होत नसत तर नाताळ सणानंतर व भस्म चिंचेच्या बुधवारपर्यंत व नंतर ईस्टरनंतर मेच्या अखेरीपर्यंत होत असत, त्यामुळे लग्नाअगोदर फॉर्म भरण्यापूर्वी रोज धोत्रिन प्रार्थनेला जावे लागत असे तसेच वांद्रेला जाऊन रिट्रीट करावी लागे. आपल्या लोकांची लग्ने त्या काळात रविवारी न होता सोमवार मंगळवार किंवा गुरुवारी होत असत. मिसाचे वेळी

प्रत्येक जण कशीनमध्ये दीडकी, डब्बू, आणा, चवली, पावली अशी नाणी टाकत असत.

मयतासाठी आतासारख्या पेट्या नव्हत्या तर देवळात खास बनवलेली सार्वजनिक पेटी व त्यासोबत जावई व पाहुणे मंडळीच्या कोफराडी ओफ घालून ४ व्यक्ती, प्रेत देवळात पुरण्यासाठी घेऊन जात. प्रेत घरी लांब बाकावर ठेवीत असत आणि दोन्ही तिन्ही बाजूला महिला बायका, बसत, एकेक जोरजोराने रडून त्या मयत व्यक्तीना श्रध्दांजली, कथेतून वाहिली जात असे.

त्यावेळी घरी किंवा देवळात मयतासाठी मिसा होत नसे तर तिसरे पाचवें, सातवें, जावयाचे, महिन्याचे सहा महिन्याचे, वर्षाचे अशी पुष्कळ मिसा होत असत. मिसा देणाऱ्यांची नावे वाचली जात.  ज्यांच्या जास्त कोफरडी किंवा मिसा हे मोठेपणाची लक्षण असत.

मयताच्या  संबंधित जवळचे नातेवाईक सहा सहा महिने दुःख पाळीत  व त्यांना दुःखाचे बोलाविल्याशिवाय कुणाच्या घरी जात नसत. तसेच त्या सहा महिने किंवा वर्षात त्यांच्या घरी कुठलाही सण साजरा केला जात नसे. मग बाजूचे शेजारी किंवा नातेवाईक गोडधोड, पक्वाने करून त्यांच्या घरी पाठवून शेजार धर्म पाळीत असत.

**घरे.....**

मोठ्या प्रमाणात कौलारू लाकडी घरे, काहींच्या भिंतीसुद्धा लाकडी फळीची तर काहींची कारवीची कुड  शेणाने सारवलेली. समोरचा मुख्य दरवाजा नक्षीदार असायचाच, या अवाढव्य घराला खिडक्या किंवा खोल्या नसायच्या त्यामुळे प्रायव्हसीसाठी दोरीवर लुगडे टाकली की रात्रीची सोय होत असे. त्यामुळे नवरा बायको गुजगोष्टी वाडीत (भाटात) करायचे. जो कारभारी असेल त्याला लाकडी खाट व गोधडी व बाकीचे सर्व लहान-मोठे खाली जमिनीवर सतरंजी हात्री टाकून त्यावर वाकळ मांडूले चादर किंवा बायकांची जुनी लाल लुगडे टाकून झोपत. बऱ्याच ठिकाणी मोठ्या कुटुंबात जागेअभावी बरीच मंडळी खाटेखाली झोपत. प्रत्येकाच्या ओटीवर हिंदोळा नाही तर लाकडी माशी असायचीच. प्रत्येक घरात पोटमाळा असायचा, तिथे भाताची

कणगी, पराडे, चिंचेच्या मुंज्या, मसाल्याच्या लोणच्याच्या चिनीमातीच्या बरण्या, कुपे, पापड, सुकी मासली बरण्या, शिवाय पावसाळ्यासाठी लाकूड भरून ठेवीत. काही थोड्या लोकांचे पडाळी माजघर असायचे.

मौल्यवान वस्तू ठेवण्यासाठी किंवा नवीन कपडे ठेवण्यासाठी बायकांकडे खास एडवण पालघर येथे बनविलेल्या लाकडी पेट्या असत तर बरेच लोक ट्रंका वापरीत, नवीन नवरी प्रथम येताना ट्रंक घेऊन येई व पहिल्या बाळंतपणानंतरच माहेरून (सण पाळणा) पेटी घेऊन येत. ज्यांच्या घरी भाताची कणगी व शेण पाण्यासाठी गाई बैल किंवा म्हशी असेल ते प्रतिष्ठेचे मानले जाई. घरात जमीन ओटा सारवण्यासाठी व संबंध दिवस काम असावें व घरचे दूध असावे म्हणून प्रत्येक घरी म्हैस असायचीच व बायकांना त्यात मोठेपणा वाटायचा.

साधारण १९६० ते ७५ या काळात सर्वत्र घरोघरी वीजपुरवठा झाला. त्या अगोदर घरात रॉकेलचे लहान मोठे दिवे व कंदील प्रभाकर असायचा. संध्याकाळच्या वेळी दिवेलागण झाल्यावर प्रत्येक जण देवाचे नाव घेत व घरातला अंधार दिव्याच्या प्रकाशामुळे नाहीसा होई. सर्वच जण संध्याकाळीच आंघोळ करीत कदाचित संपूर्ण दिवस काबाडकष्ट करून घाम गाळलेला असल्यामुळे त्यासाठी गरम पाणी करण्यासाठी घराच्या बाहेर चुली पेटवल्या जायच्या. त्यासाठी माडाच्या पात्या, झावळ्या, खाकोटे, कोत्या शेणी, कुडा कचरा इत्यादी वापर करीत. घरात स्वयंपाकासाठी चांगले शिसव, साग, बाभूळ, कुडाव इत्यादी लाकुड वापरीत. हे वर्षभरात लाकूड पाच-सहा खंडी आणून पोटमाळ्यावर साठवून ठेवलेले असे. दिव्याच्या अंधुक प्रकाशात व धुराड्यामध्ये बायका जेवण बनवीत असत, बहुतेक भात, मासली, चिंचेची कालवण, बोंबलाचा आटवण सुके बोंबील, होडे, सुकट, मांदेली, खारा, घोळ व दाडा तसेच पापड लोणचे इत्यादी स्टॉक भरून ठेवला जाई.

**मटन**: वर्षांतून फक्त पाच-सहा वेळा ख्रिसमस, कोरेज्मा, उपवासाअगोदर, ईस्टर व देवळाचा सण आणि संज्यावचा सण, मोत माऊलीचा सण तेही अर्धा रत्तल, पावशेर, किलोला 2 शेर, या प्रमाणात त्यात बटाटे, बनकेळी किंवा दुधी सकेणीची भर.

त्याशिवाय  बाळटीम, लग्न किंवा मयताचा सातवा सारख्या प्रसंगी सुद्धा परंतु मटणाचे प्रमाण फारच कमी बटाटेच जास्त, वडीलधारी व पुरुष मंडळी प्रथम जेवत व त्यानंतर बायका जेवत. त्यामुळे त्यांना  उरलेली किंवा सुक्या बोंबिलावर भागवावे  लागे. वालाच्या शेंगा भाजी पाच-सहा महिने सकाळ संध्याकाळ असायचीच आणि जोडीला सुके बोंबील असायचे.

**पोशाख** : पुरुष धोतर व  सदरा व कब्जा (बाराबंदी)  डोक्यावर लाल टोपी व काही काळानंतर काळी टोपी, कानात  सोन्याची वळी, काहीकडे असल्यास पायात चप्पल, काही विशिष्ट मोठ्या घरच्या  लोकांच्या कमरेला चांदीचा गोफ व खिशात लटकवलेलं घड्याळ. तरुण शर्ट व हाफ पॅन्ट, काही तरुण काळी टोपी वापरत. स्त्रिया लाल लुगडे व लाल चोळी काही काळानंतर नऊवारी लुगडे, दोन्ही कानात पाचसहा सादया  व गुढाच्या वाळ्या व एक  केसाला लडकवलेलं पोवळ असलेलं सोन्याचं आकर्षक धरण. गळ्यात  सौभाग्याचे  लेणे, एक लहान व एक मोठे सोन्याचा वाळा व लाल पोवळी व मधोमध  सोन्याची पात्री त्यावर क्रॉस असलेली, त्याशिवाय इतर दागिने म्हणजे मोहनमाळ,  बोरमाळ  वाज्रठीक, पुतळ्याचा हार, दुलेडी, ठुशी, पाशीहार, गोप, कंठी हातात सोन्याचा स्क्रू असलेल्या पाटल्या, ते हिरव्या बांगड्यात शोभून दिसे शिवाय पायात चांदीचे वाळे.

विधवा बाया, वरील प्रमाणेच परंतु हिरव्या बांगड्या ऐवजी हातात चांदीची किंवा रुप्याची वाळे, तसेच गळ्यात दोन शिरण्याऐवजी बोरमाळ किंवा गोप कंठी व  काळ्या दोरात बांधलेला मोठा क्रॉस. तरुण मुली, पोलका + परकर व पोण्या (धोतर)  कोळणीसारखा कासोटा मारीत, नवरा नवरी लग्नाची दिवशी गळ्यात फुलाची मोठे  हार घालीत  व हातात फुलांचा गुच्छ असे.

**चालीरीती** : घरातील सर्व लहान मोठ्यांचा सांभाळ करणे ही कारभारीची जबाबदारी घरातील उपवर मुला-मुलीसाठी स्थळ पाहणे,  निरोप देणे, वर वधू ठरविणे हे सर्व कारभाऱ्याचं कारभारणीचं काम. त्यांनी ठरवलं की  नक्की.  मुला-मुलींना अजिबात विचारलं जात नसे. एवढेच नव्हे तर लग्नाच्या दिवसापर्यंत त्यांची एकमेकांची भेट सुद्धा होत नसे.  मुलीची वय साधारण १४-१५ व मुलाचे वय १६-१७ असताना

लग्न होत असत. पहिली तीन-चार वर्ष माहेरी जात. लग्न जमवताना अंडे (तातं) फार महत्त्वाचे मानले जाई. त्याचे तातं फोडून नातं केलं असं म्हटलं जायचं म्हणून खाताना विचार करावा लागे. त्याकाळी मुलीच्या बापाला रोख पैसे दिले जात. सोयरिक झाली की माणसे येत जात, जेवणावेळी उठत परंतु एक दोन किंवा तीन तेवढीच माणसं येणं जाणं. बायकांच्या पेठा, करंज्या, शिंगोळ्या, दोदाल, रेवाळा, लाडू रव्याच्या खपच्या सामट्या भाकर मोड इत्यादी घेऊन जात किंवा येत व गावोगाव तो प्रसाद वाटला जाई.

साखरपुडा किती तोळ्याचे दागिने करायची ते ठरविले जाई त्यावेळी सोनाराला देखील बोलाविले जाई. लग्नाची तारीख ठरवली जाई. बँड कंपनी क्वचित सगळीकडे बहुतेक वेळा मेळ वाजंत्री असायची.

त्या काळात लग्न पाच दिवस चालत असत, ह्यांज्या, मांडव, लग्नाचा दिवस व दोन दिवस सौदीया, दोन-तीन महिने अगोदर पासून तयारी, सांजवेळी किंवा रात्री झोपाळ्यावर बसून बायका गाणी म्हणत ती लग्नाची पूर्वसूचना सर्वांना मिळे. गावातील हौशी बायकासुद्धा गाणी गायला येत असत, तळण्यासाठी रोट्या फुगे हाहुऱ्यासाठी तांदूळ भिजविणे, सूकविणे, दळणे, पीठ तयार करून ठेवणे हा एक कार्यक्रमच असायचा. उडीद महत्वाचे, पिठात उडीदाचे पीठ आवश्यक, हरिजनाकडून टोपल्या तयार करून घेतल्या जात असत. पापड पपईचे आचार, लोणची हाकाळ्या निरनिराळ्या रंगात, फुग्यासाठी गव्हाचे पीठ, भातासाठी तांदूळ, चांन्ने, रोटया पोळे इत्यादीसाठी पीठ तयार करणे. गरम मसाला, तेलाचे डबे, बुढे उळक्या हंड्या नांदी तीजाली, हाथऱ्या, पांढरे हूडके, टॉवेल, दिवा, घासलेटचे दिवे, प्रभाकर कंदील, वाफीबत्त्या मेंटल, तळण्यासाठी खास मांडव, चुली. मोठ्या मांडवासाठी वळलेल्या झावळ्या, कारवी बांबू थादे, मटणासाठी मोठे मोठे टोप, शिजविण्यासाठी खास आचारी माणूस त्याला अगोदरच सांगून नक्की करून घ्यायचे. मानपानासाठी व घरातल्या लोकांसाठी कपडे, खरेदी अशी अनेक प्रकारे जोरदार तयारी करीत असत.

ओटीवर जेवणाऱ्याच्या मेजवानी उठत, जमिनीवर हाथऱ्या टाकून त्यावर केळीची पाने अंगाटे मग त्यावर चांन्ने, फुगे, रोट्या हाकळ्या पापड मटणाचे बोळ,

चमचे, भाताचे ताट इत्यादी मांडून झाल्यावर मग हातात तांब्या घेऊन ठराविक लोकांना टप्प्याटप्प्याने बोलाविली जाई.

एका वेळी ४०-५० लोकांची व्यवस्था केली जायची. नवरा मुलगा किंवा खास पावण्याला बसण्यासाठी पाठ पिंडा देत बाकीचे मांडी घालून बसून जेवत, नवरी मुलीला कधीच संधी नसे. केळीच्या कोवळ्या पानावर (खोले) जेवत, जेवताना दोन-तीन वेळा वडीलधाऱ्यांना लहान ग्लासात शाऊन गावठी दारू दिली जाईल. आताच्या सारखा बार तयार केला जायचा नाही. अशा चार-पाच मेजवान्या उठत. मोठ्या लोकांच्या घरी जास्त होत. बँडवाल्यांना सर्वात शेवटी बोलाविले जाई. गावकरी व घरातले तसेच सर्व वाढपी शेवटी जेवत. प्रत्येक जेवण झाल्यावर ते देऊस असे लॅटिन गायन म्हणून देवाचे आभार मानले जात.

त्या काळात दोन प्रकारचा आहेर स्वीकारला जायचा, एक मुठीतला अहेर, हा नवरा मुलाचा किंवा मुलीचा परंतु मंडपातला मांडवातला अहेर मात्र घरधन्याचा. दोन्ही अहेर लिहून ठेवला जात असे, त्याचा उपयोग ते सर्व प्रकारची बिले देण्यासाठी करीत असत, एक प्रकारे तो लग्न कार्यासाठी हातभारच असायचा. दागिने घेऊन जाणे, मोआ करणे यावेळी नुकतीच दाढी मिशा फुटलेली १६-१७ वर्षाचा तरुण प्रथम दाढी मानाने मामाच्या मांडीवर बसून करीत त्याला मोआ असे म्हटले जाई. त्या अगोदर साडीचोळी भाऊबीज मामाकडे वाजत गाजत जात व नाचत येत पाणी आणणे, हळद लावून आंघोळ करणे, मिनार बांगडीवाला येऊन वधूच्या हातात हिरव्या बांगड्या चुडी भरणे असे अनेक प्रकार तीन-चार दिवस चालत. संपूर्ण गावात मजा व हौशेचं वातावरण असे. सर्व गावकरी त्यांच्या लग्नामध्ये उत्साहाने भाग घेत, सर्व प्रकारची कामे करीत व एकत्रित खातपित एकत्र कुटुंबासारखे वागत तीच खरी मुलगामी. बऱ्याच वेळेला भांडण मारामारी रुसवा फुगवा विसरून एकत्र येत, नव्हे यावंच लागे. नाहीतर त्यांच्यावर एक प्रकारचा असहकार बहिष्कार असायचा. कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी सर्व गावकरी एकत्रित मयताचे वेळी तर सर्वच जण सात आठ दिवस मयताच्या घरी रात्रभर वस्ती करीत. पुरुष मंडळी कामानिमित्त दु:ख विसरत परंतु बायका सहा सहा महिने घराच्या बाहेर जात नसत काही बायका रडायला लागल्या तर ते इतिहास

कथन करीत व बाकीचे सर्वजण ऐकत बसत त्यावेळी जमलेले लोकांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहत असत. एक प्रकारची ती श्रद्धांजलीच. अशी दु:खी लोकांच्या घरी वर्ष सहा महिने कधी वर्षभर दु:ख पाळली जाई.

**सामाजिक** : कुठल्याही प्रकारची सुधारणा धर्मगुरूंच्या पुढाकाराने होई किंबहुना त्यांच्याशिवाय काहीच होत नसेल त्यामुळे समाजसेवा मंडळ उत्तर वसई, नंडाखाल स्पोर्ट्स क्लब, सहकारी सोसायटी संघ, उत्कर्ष मंडळ असे अनेक संस्था निघाल्या त्यातल्या काही बंद पडल्या तर काही मृत अवस्थेत आहेत कदाचित त्यामुळे राजकीय सामाजिक पुढारी नेतृत्व निर्माण झालेले नाही. ज्यांनी पुढाकार घेतला त्यांना लोकांचे सहकार्य  मिळाले नाही कदाचित आपण ब्रिटिश धार्जिणे असू व त्यांचेच राज्य आपल्या हिताचे  आहे असा कदाचित समज असावा परंतु राजकीयदृष्ट्या आपली पिछेहाट  आहे ही तितकंच खरं.

**शैक्षणिक** : तो काळ उत्तम शेती मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरीचा त्यामुळे सर्व लक्ष शेती बागायतीकडे केंद्रित तरीही काही गावातून  एक दोन मुले केजी हायस्कूल आगाशी किंवा वटार जिल्हा लोकल बोर्डाच्या शाळेत तर काही पापडीला टीबी हायस्कूलला तर काही मुंबईला जाऊन शिकली. तरीसुद्धा शिक्षणानंतर बरेच लोक धंदा करू लागली, केळ्याच्या वखारी चालवू लागली मात्र त्याच काळात क्रिस्तवासी माँ. मेंडीस, माँ. वाझ, फा. बर्नार्ड भंडारी, रॉस  फर्नांडिस, फा. सायमन डिसोझा अशा अनेक धर्मगुरूंच्या दूरदृष्टीमुळे व अथक प्रयत्नामुळे नंदाखाल येथे प्रायमरी शाळा सुरू झाली. क्रिस्तवासी मोत्या शेट  यांच्या कुटुंबाच्या उदार देणगीमुळे हायस्कूल सुरू झाले व आज  ज्युनिअर कॉलेजमध्ये रूपांतर झाले आहे,  सुरुवातीला काही मोजकीच मुले शाळेत येत त्यांच्याबरोबर दोन-चार मुली येत  पण लवकर लग्न झाल्यामुळे त्या मुली शाळा  सोडून संसार करीत. त्यावेळी मराठी माध्यमांतून शिक्षण दिलं गेले त्याऐवजी इंग्रजी माध्यमांतून दिलं गेलं असतं तर ! या जरतरच्या गोष्टी परंतु शिक्षणामुळे आपण आज इथपर्यंत मजल माजली आहे हेही तितकच सत्य आहे त्याचं श्रेय प्रथम धर्मगुरूकडे जाते.

**आरोग्य**: त्या काळात संसर्गजन्य रोग देवी, कांजण्या, गोवर, कावीळ, घटसर्प, वात फार प्रमाणात होते. चर्च होते तरीही भुताखेतावर विश्वास, अंधश्रद्धा पुष्कळजण भगताकडे जात. घरगुती गावठी उपचार करीत. त्याकाळी सोपाऱ्याला डॉक्टर सदू गाळवणकर, अर्नाळ्याला डॉक्टर नरू गाळवणकर, आगाशीला डॉक्टर पुरंदरे, जोगळेकर, कीर्तने, बोळींजला गोपी वैद्य, सत्पाळ्याला लक्षा वैद्य असे दोन-चारच डॉक्टर, वैदू. इतर कसल्याही सोयी सुविधा नव्हत्या.

परंतु १९४० नंतर आगाशीला सेन्ट तेरेसा कॉन्व्हेन्ट सुरू झाले आणि १९५०च्या दरम्यान मदर हेमाने तिथे हॉस्पिटल चालू केले, प्रसूतीगृह, बाळंत वॉर्ड व छोटा दवाखाना अशी सुरुवात झाली.

त्या काळात लग्न झालेल्या दाम्पत्यांना आठ-दहा मुले होत, काही बायका डझनभर बाळंतपणे करीत होती तीही सर्व घरच्या घरीच, गावातील एखादी अनुभवी बाई सुईणीचे काम करत असे. त्यावेळी बालमृत्यूचे प्रमाणसुद्धा पुष्कळ व कधीकधी मातासुद्धा त्या बाळंतपणामुळे दगावत, बालमृत्यू झाले तर गावच्या वेशीवर क्रॉसजवळ पुरले जायचं, त्या काळामध्ये बाळंतीण बायका आपल्या गावठी औषधाप्रमाणे वरकुट, टॉनिक समजून भरपूर खात असत. लांबवर आणि तेही उघड्यावर संडासला जात, पावसाळ्यात हाल विचारायला नको, दात घासण्यासाठी खराट्याची किंवा कडूलिंबाचे दातंन किंवा चुलीमधली राख वापरत. साबण किंवा टूथपेस्ट होतीच कुठे? डोक्याला लावण्यासाठी नारळाचे दूध (हिरा) वापरत म्हणून माडासाठी नेहमी भानगडी होत.

त्या काळात बारीक बारीक कारणावरून नेहमी भानगडी होत. मोठ्याने ओरडून शिव्या उणेदूने होई, मात्र दोन गावातील पंचमंडळी भानगडी मिटवीत व त्यांचे ऐकले जाई. कोणी पोलिसाकडे जात नसे. केवळ इर्षेने पेटलेले व इज्जतीचा टेंबा मिळवणारेच पोलिसाकडे जात मग कोर्ट कचेरी वसई ठाणे करत व नंतर हैराण होत व आपल्या जमिनी गहाण ठेवित किंवा विकत असत. संपूर्ण कुटुंबावर कारभाऱ्याचा वचक असे, काही नवरेसुद्धा बायकोवर होणाऱ्या अन्यायाबद्दल काही बोलू शकत नसत, त्यांची मुस्कटदाबी होई. त्यांना व्यक्तीस्वातंत्र्य नव्हते. परंतु एकत्र राहण्याने इतर अनेक फायदे होत असत.

त्या काळात फक्त मोत्याशेट कडेच  फोर व्हीलर गाडी, जीप होती तसेच गाडली, छोटी बैलगाडी व काही बामनाकडे गाडल्या होत्या, त्यामुळे गावात कोणी सायकल आणली तरीही मोठे कौतुक होई. १९५८ साली  वसईच्या पाली श्री, पी  ए कुटीनो व येथील  इतर कार्यकर्ते यांच्या पुढाकाराने आपल्या भागात एसटी सुरू झाली तरीपण बैलगाडीचा वापर जास्त प्रमाणात होत असे. सर्वत्र कच्चे रस्ते  होते परंतु काही अडचण वाटत नसे. आता सारखी धूळ उडत नव्हती किंवा धूरही नव्हता, त्यामुळे हवा प्रदूषण होत नसे.

बैलगाडीसाठी  किंवा इतर कामासाठी जेव्हा  नवीन  बैल  खरेदी करून आणले की पाहण्यासाठी गावकऱ्यांची गर्दी होत असे. बैलांच्या अंगावर झूल टाकत गळ्यात घंटा, पट्टा बांधत, गावढपट्टीला जाताना किंवा रात्रीच्या प्रवासात या घाटाचा  मंजुळ आवाज ऐकायला मजा येत असे. तसेच त्या काळात नंदीबैलाचे खेळ, डोंबारीचे खेळ नेहमी गावात येत असत.

सन १९७८ नंतर टी. वी. (दूरदर्शन) चे युग सुरू झाले. त्याअगोदर कुंभारवाडा आगाशी येथे भारत टॉकीज किंवा सोपारा येथे पिक्चर पाहायला जात असत. नंतर विरार येथे थिएटर सुरू झाले. १९२५ साली  विरार-चर्चगेट लोकल गाडी चालू झाली त्यावेळी सुरुवातीला दोन तीन तासावर एक गाडी सुटायची मग एक तासावर नंतर अर्ध्या तासावर तर आता काही मिनिटावर गाड्या सुटतात,  फर्स्ट क्लास मध्ये फक्त युरोपियन किंवा कलेक्टर वगैरे सारखे प्रवास करीत. विरारला  जाणं येणं  बरेच लोक पायी जात येत असत तर काही लोक टांग्यातून जात येत असत. नंतर एस टी बस, आज  रिक्षा टेम्पो स्कूटर कार डमडम इत्यादी वाहतुकीसाठी सर्रास वापर होत असला तरी हवा प्रदूषण आणि ध्वनी प्रदूषणाचे प्रमाण पुष्कळ वाढले आहे हे कोणी लक्षात घेत नाही.

आपले लोक मुंबईला केळी व भाजीपाला नेत असत त्यामुळे वसईची केळी व भाजीपाला फेमस होता. आज आपण नाशिक वरून येणाऱ्या भाजीपाला व जळगाव सुरत वरून येणारी केळी यावर अवलंबून आहोत.

विभक्त कुटुंब पद्धतीमुळे सर्वजण एकत्र राहत असत  ६०-७० ते १०० पर्यंत लोक एका कुटुंबात एकत्र राहत असत.  कारभारी व कारभारीन सर्व व्यवहार सांभाळीत.

सासू सासऱ्यानंतर भावला भावलणी (दिर-जाऊ) घर सांभाळीत, मुले सांभाळीत, नातवंडे सांभाळीत व त्यांचे सर्व काही करीत आतासारखी लहान मुले माहेरी पाठवायला लागत नसत व घराला कधीही कुलूप लावले जायचे नाही. मुलावरून भांडणे होण्याची भीती नसायची तसेच ते स्वयंपाक करणार आणि बाकीच्या मंडळींना वाडीमध्ये शेतातले कामे करण्यास पाठविण्यात येई. पुरुष मंडळी झोपाळ्यावर किंवा बाकावर बसत तर बायका जमिनीवर फडका (हुडका)टाकून त्यावर किंवा पिंड्यावर नाहीतर दरवाज्याच्या उतारावर बसत. पाहुण्यांना गुळ व पाणी किंवा गुळाचा चहा देत त्याकाळी उसाचा रस सर्वत्र उपलब्ध असायचा.

बायकांनी पहाटे लवकर उठून गावातील सार्वजनिक विहिरीवरून पाणी काढून डोक्यावरून घागर हंडी, तपेल्या तांब्या बादल्या इत्यादी एकावर एक ठेवून व काही कमरेवर धरून चार-पाच फेऱ्या मारून पाणी घरी आणायचं व पाणेरी (लाकडी) ठेवायची. त्याकाळी बोरिंग नव्हते की नळ नव्हते. दुपारचे जेवण झाल्यावर किंवा संध्याकाळी पुन्हा पाणी आणायचे, कपडे विहिरीवर किंवा दांडावर दगडावर धुवायची व पेंढ्यावर वाळत घालायची, त्याच विहिरीवर जगातल्या कानाकोपऱ्याच्या बातम्या वर चर्चा व्हायची व भांडणे सुद्धा व्हायची.

काही पुरुष विहिरीवर तर काही घरी मागीलधारी उघड्यावर आंघोळ करीत. त्याकाळी बाथरूम नव्हत्या, बायका रात्रीच्या वेळी, कधी दोन-तीन दिवसांनी आंघोळ करीत. जेवण बनविताना तिजेल हंडी नांद खापरी इत्यादी मातीचे वस्तू वापरल्या जात असत. कुटुंबातील कारभाऱ्याचा मोठा वचक असे, त्यामुळे कुठलाही व्यवहार लेखी न होता तोंडी होत असे व तसा एकमेकांवर विश्वास असायचा.

**रोजचा दिनक्रम :** बायका सकाळी पाणी भरणे, ओटीवर घरात व अंगणात झाडू मारणे, शेणपाणी करणे व चहा कणेरी घेऊन वाडी भाटात जायचं, दुपारी जेवायला यायचं व पुन्हा लगेच चहा घेऊन पुन्हा भाटात जायचं व सांजवेळी घरी परतायचं, केळी मुख्य धंदा, केळीचे मोठमोठे वाफे, त्यात इतर आळू तुळशी हळद राई कोनफाळे, दुधी सकेनी पपई वाल वांगी चवळी तांबडी भाजी इत्यादी भाजीपाला पिकवीत. त्याकाळी आतासारखे मोटरपंप नव्हते, रहाटाचे पाणी, रहाटाला, डोळ्याला डोपेना बांधलेला

बैल झुंपायचे, राहट्याच्या माळीला (लाकडी पट्ट्या घालून केळीच्या थाट्यापासून बनविलेली) बांड्या, मातीची मडकं बांधून चिमटे (माळ कमी जास्त लांब करण्यासाठी) बांधून सुरुवात करायची, ते पाणी दांडावाटे केळीच्या वाफ्यापर्यंत न्यायचं त्यासाठी दंडाची सफाई निंदानी बांधबंधिस्ती करावी लागे. केळीचे मोठमोठे वाफे १००-२०० केळीचे भाग सबंध दिवस राहट चालूच, आता तेच काम मोटर पंपाने एक दोन तासात होते.

**केळीच्या जाती :** बसऱ्यांच्या, तोकडी, लोखंडी, वेलची, आंबट वेलची, राजेळी, भुरकेळ, बनकेळ, तांबडी इ. व त्याची मशागतसुद्धा तशीच वर्षांतून एकदा पीक, तीन चार वेळा खत घालणे, बुडे बांधणे, कांडोळ्या दांड निंदणी आठवड्यातून शिपणे, थाटे बांधणे इत्यादी कामे सतत वर्षभर करावीच लागत. केळीचे थाटे वाक याचा वापर माळी साठी किंवा इतर काही बांधण्यासाठी करत लोद बुडे इत्यादी राबासाठी उपयोग होई.

**झाडे :** आंबा चिंच भेंड पांगारा वनाती लव खराटा करंज जलदारू माड ताड खजुरी पोपळी सुपारी कडुलिंब फणस चिकू पानवेल ऊस फुलझाडे बकुळी निमुळी गुंजाळ या काकडा मोगरा टेग्री जास्वंद.

**हत्यारे :** वेळोवेळी कोयती पावडा कुदळ पारय , कुऱ्हाड भाला बरची इत्यादी.

**शेती :** पावसाळ्या अगोदर जमीन फोडून सरळ व साफ करून त्यावर राब करायचा, त्यासाठी शेण, थाटे, लोद व इतर टाकाऊ कचरा, पेंढा तूच इत्यादी पेटवून राब तयार ठेवायचा. पाऊस पडला की पडला ताबडतोब भाताची पेरणी करून त्यावर अळी फिरवायची त्यासाठी बैलांची तातडीने गरज लागे. मग शेतात उखळनी नांगरणी. भरपूर पाऊस झाल्यावर साधारण पंधरा-वीस दिवसांनी चिखल नांगरणी करून अळी फिरवून सपाट करून त्यावर चार बोटे पाणी राहील याची व्यवस्था करायची त्यानंतर लावणी, आवणी एका ठिकाणाहून रोप काढून मूठ बांधायची ती धुवायची भारे बांधायचे व कधीकधी चार पाच मैल लांब डोक्यावरून शेतात न्यायचे व पडत्या पावसात भिजत भिजत उशीर झाला तरी ते सर्व मूठ लावल्याशिवाय शेतातून बाहेर पडायचे नाही, हे लावणीचे काम ठराविक वेळेत झालेच पाहिजे म्हणून तब्येत बरी नसली तरीही कामे करावी लागत. या पावसाळ्यात काम करताना काम्बळ धाबडी, इरला, दहा-बारा काड्यांच्या लाकडी छत्र्या वापरल्या जात.

लावणीचं काम झाल्यावर निंदनी खत पाणी वारंवार देखभाल इत्यादी करावी लागे. पीक तयार झाल्यावर शेतात असलेली पाणी फोडून बाहेर काढून नंतर सुकल्यावर कापणी करायची भारे बांधणी उंच जागेवर उडवी घालत मग सोयीनुसार खळ तयार करून झोडणी भात फुंकणे साफ करणे सुकवणे व कणग्यात साठवून ठेवणे, त्याच खळ्यात मधोमध खरमट लाकडी खांब बांधून त्याला ढोर भाकड म्हशी गाई बैल रेडे जुंफुन मळणी करायची व तो पेंढा गाई म्हशी बैलासाठी तयार करायचा. बहुतेक मळणीचं काम चांदण्या रात्रीचं करीत.

कणग्यात भरलेलं भात लागेल तेव्हा त्याप्रमाणे काढायचं, घरी ओटीवर जात्यावर भल्या पहाटे उठून दळायचं साफ करायचं उखळ्यात कुटायचं साफ करून घेणे तांदूळ तयार करायची वाटुळ या कणेरीसाठी वापरत अशा प्रकारे रात्रंदिवस कामे चालायची तरीही थोडा वेळ मिळाला तर बायका नारळाच्या साली (हाली) कुटायची पाण्यात भीजवायची मग पुन्हा कुटून काथा तयार करायची व लोळया वळायचे व त्यापासून सुंब तयार करून त्या गुंड्या विकायची व बरोजी करायची व त्या बारोजीचा खाजगी खर्चासाठी उपयोग करायचा.

सुनबाई सुना किंवा डेराण्या, धाकट्या जाऊ ओटीवर कधी यायचंच नाहीत कारभाऱ्यासमोर किंवा वडील पुरुषासमोर तर कधीच यायचे नाहीत. धाक होताच तसा, मान सुद्धा ठेवला जाई. काही ना काही काम सतत करत राहायचं आणि त्यामध्ये बायकांना अभिमान वाटायचा व अशांचं इतर बायका कौतुक करीत असत,

मोठं कुटुंब असल्यामुळे व पावसाळ्यात शेतीची व बागायतीची कामे आटोपल्यावर काही बायका आळीपाळीने भादव्याच्या माहेरी जात. भाद्रपद महिन्यात तसं काम कमी व त्याच वेळी बैल गावड्याला खारचनीला पाठविले जात, ते बैल महिना दीडमहिना खाऊनपिऊन व आराम करून धस्टपुष्ट झाल्यावर घरी आणले जात. त्याचप्रमाणे बायका घरून माहेरी आल्यावर पूर्ण विश्रांती आराम व पाहुण्याकडे जाणे येणे, त्यासाठी गोडधोड करीत. वर्षातून एकदा येत असल्यामुळे माहेरच्या लोकांना बरे वाटे, कारण आतासारखी माहेरच्या लोकांवर अवलंबून राहत नसत मग कितीही कष्ट पडू देत, त्रास होऊ दे, उपासतपास करू दे किंवा मारहाण सहन करून चांगला संसार करायचा असंच बाळकडू पाजले जाई.

माहेरी चांगला आराम करून मग घरी आल्यावर पुन्हा घाण्याला कामाला जुंपयाच, त्याशिवाय पहिले बाळंतपण तेही आईबापांनी करायचे रीत असल्यामुळे माहेरी येत असत, इतर त्यानंतरची बाळंतपणे घरीच केली जात, बऱ्याच वेळा सासू व सुना एकाच वेळी बाळंतपण होत असे परंतु माहेरी त्रास द्यायला जात नसत. लहान वयात नवरा मेला किंवा बायको मेली तर दुसरे लग्न केले जाई. त्याला पाठ लावणे असे म्हणत, बऱ्याच वेळा समदुखी दूजवर अशीच लग्न होत असतं व पहिल्या बायकोची मुले स्वतःच्या मुलाप्रमाणे सांभाळत असत. बांगड्या फुटल्या तर तसं न म्हणता त्या टिचल्या असं म्हटलं जाई. नवऱ्याचं नाव चुकून घेत नसत. मुला-मुलीवरून त्यांना हाक मारली जाई. तसेच एकेरी भाषा अजिबात वापरली जात नसे. पुरुष सुद्धा बायकांची नावे घेत नसत.

अशा प्रकारची ही जुनी परंपरा होती. त्याच्या आठवणी आताच्या काळात त्या सांगितल्याशिवाय माहिती होणार नाही. असो, काळ बदलला तसे चालीरिती रूढी परंपरात बदल होणे क्रमप्राप्त आहे.

# रंजलेल्यांचा रंजक नाताळ

■ बर्नंड लोपीस, सांबोडी, आगाशी

आजवर असंख्य नाताळ साजरे होत आले आहेत. ख्रिस्त जन्माला आला उपेक्षितांससाठी. पण एकूण ख्रिस्ती लोकांतील निष्ठूर व दांभिक प्रमाण पाहता ते किती खरे आहे यावरही शंका येते.

गंमत म्हणून एक विनोद आहे, वेलंकनीला जाणाऱ्या एका भाविकाला त्याच्या गरीब मित्राने अर्पणासाठी म्हणून शंभर रुपये दिले. त्या मित्राने जाता जाता देवळासमोरच्या भीक मागत बसलेल्यांना देत देत तीस रुपये संपवले. ऊरलेले सत्तर दानपेटीत टाकले. रात्री मावली त्याच्या स्वप्नात आली नि तीनं विचारले... तुला मित्राने अर्पणासाठी शंभर रुपये दिले होते ना ? मला फक्त तीसच रुपये मिळाले... सत्तर कुठे गेले ?

विनोद वगळता वस्तुस्थिती अशी आहे.

"जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधू ओळखावा देव तेथेचि जाणावा."

संत तुकाराम महाराज आपल्या अभंगात जे सांगून गेले. तेच "वैष्णव जन तो तेणे कहिये जे पीर पराई जाने रे, परदुखे उपकार करे तो मन अभिमान न आणे रे." असं महात्मा गांधीजी आपल्या भजनात म्हणत. ख्रिस्ती श्रद्धा बाळगणारा कुठलाही माणूस कितीही उच्चविद्याविभूषित असो, उच्चपदस्थ असो वा धनवान असो, त्याला परोपकारी वृत्ती व गोरगरीबांचा कळवळा नसेल तर तो फक्त नावालाच ख्रिस्ती ऊरतो. म्हणजे ख्रिस्ताच्याच शब्दात सांगायचे तर अशा वेळी तुमचा देवावरील विश्वास कितीही दृढ असला नि त्या विश्वासाला दयाकृतीची जोड नसली तर तुम्ही "फक्त झणझणणारी झांज किंवा शब्दाचे पोकळ बुडबुडे आहात"

कुठल्याही प्रापंचिकाने आपल्या शिक्षणाचा, वेळेचा, शक्तीचा व पैशाचा उपयोग करून गोरगरीबांना सहाय्य करण्यासाठी झटणे ही बाब जगातील कुठल्याही प्रार्थनेपेक्षा श्रेष्ठ होय. या पार्श्वभूमीवर मला आपल्या चर्चमधील विन्सेंट द पॉल संस्थेचे कार्य खूप खूप मोलाचे वाटते.

अगदी बालपणापासून मी आईसोबत चर्चला जात असे, आईसोबत जाऊन स्त्रियांची सोडालिटी, बंधूसोबत जाऊन, लिजन ऑफ मेरी व नंतर पुढे वेदीसेवक संघ, पास मंडळ, ज्येष्ठ नागरिक संघटना हे फक्त पहात  आलों आहे. तदनंतर मला स्वतःला युवासंघ, चर्च मालमत्ता समिती, पॅरिश कौन्सिल यातून कामही करायची संधी मिळाली. या सर्व चर्चसंलग्न संघटनेत, समाजातील दुर्बल घटकांना "प्रत्यक्ष मदत करणारी संस्था" म्हणून संत विन्सेंट द पॉल ही संस्था बालपणापासून माझ्या मनात आपुलकीचं स्थान मिळवून आहे.

या संस्थेचे संस्थापक असलेले विन्सेंट द पॉल हे मुळचे फ्रांसचे धर्मगुरू. देऊळमातेने मृत्यूनंतर संतपदाचा सन्मान दिलेले सेंट विन्सेंट द पॉल यांचा गरिबाविषयीचा अपार कळवळा व त्यासाठी आपल्या पदाचा वापर करून जवळपास साठ  वर्षाचे केलेले सेवाकार्यच आजच्या आपल्या सभासदांना प्रेरणादायी  ठरले आहे.

आजचे सुपरसॉनिक युग हे माहिती तंत्रज्ञानाचे, स्पर्धेचे व अतिशय वेगाने बदलणाऱ्या काळाचे आहे. अशा वेळी आपला प्रपंच सांभाळत, या संस्थेत आपला बहुमूल्य वेळ देणारे सर्वंच सभासद जसे लोकांच्या अभिनंदनासोबत देवाच्या कृपेसही पात्र आहेत. अंत्यत गरजू व गोरगरीबांना मदत करणे हे त्यांचे प्रमुख उद्दिष्ट असल्याने त्यांना सद्यस्थितीतील सेवेसाठी आव्हानेही कमी नाहीत.

परंतु आज गरीबीची व्याख्या ठरवणं अवघड काम आहे. वरवर सुखवस्तू भासणारी कित्येक मध्यमवर्गीय कुटुंबेही कोरोना काळात आतून कोसळली आहेत. त्यातही  नुकसानीत गेलेले व्यवसाय, सुटलेल्या नोकऱ्या, वाढती महागाई, सामाजिक असुरक्षितता यात मदतीची याचना करणारे व मदत करणारे अशा  सर्वांचेच जीवन होरपळून निघाले आहे.

विन्सेंट द पॉल संस्था ही केवळ दानशूर भाविकांच्या देणगीवर चालवली जाते आहे. त्यामुळे या संस्थेच्या मदतकार्याला आर्थिक मर्यादाही आहेतच. भाविकांकडून व चर्चकडूनही विन्सेंट द पॉल संस्थेला जास्त गांभीर्याने पाहण्याची जशी गरज आहे. तशीच विन्सेंट द पॉल साठी होणारे दुसरे कलेक्शन खरंच पुरेसे आहे का? यावरही फेरविचार करण्याची गरज आहे.

कोरोना काळात सर्व धर्मप्रांत चिडीचूप झाले होते. सरसकट रिपोर्ट पॉझिटिव्ह करणाऱ्या पेनांच्या शाईत आणि कंप्युटरच्या किबोर्डवर कोरोना बसला होता. व्हॉटसप नि टिव्हीवरील बातम्यांतून तो वहात होता. लोकांचा देवापेक्षा जास्त विश्वास व्हॅक्सीनवर बसला होता. रेमेडिसिवियर हाच सेव्हियर म्हणजे तारणहार वाटू लागला होता. "मृत्यू हा जीवनाचा शेवट नसून ती एका नवीन जीवनाची सुरुवात आहे" हे तत्वज्ञान पोकळ वाटावे अशी  भाविकांचीच नव्हे तर धर्मवरिष्ठांचीही अवस्था होती.... अशा आणीबाणीच्या वेळी काही कॉन्व्हेंटस व काही  ठिकाणी मात्र चर्चच्या सहकार्याने विन्सेंट द पॉल संस्था मात्र गोरगरीबांच्या पाठीशी आपल्या कुवतीनुसार उभ्या राहील्या होत्या.

आजवर विन्सेंट द पॉल संस्थेने कित्येक विद्यार्थ्यांना मदतीचा हात दिला असेल अशा लाभार्थ्यांनी आता आपला वेळ किंवा आर्थिक मदत देणे हे त्यांचे कर्तव्य आहे

तात्पर्य हेच की भाविकांनो, आपल्या गरजू बंधुभगिनींच्या  मदतसाठी आपल्यालाच पुढाकार घ्यावा लागेल. विन्सेंट द पॉल संस्थेचे हात मजबूत करण्यासाठी खूप काही करता येऊ शकते. चर्चमध्ये सणासुदीला स्टॉल लावणाऱ्या सगळ्या संस्थांनी आपलं नफा विन्सेंट द पॉल संस्थेला द्यायला हरकत नसावी. महिन्याकाठी लाखभर रुपयांची "कशीन" टाकणारे भाविक व चर्चच्या वेगवेगळ्या कामांसाठी व आपल्या वाढदिवशी, लग्न सोहळ्यात उदार हस्ते देणग्या देणारे दानशूर यांनी विन्सेंट द पॉल संस्थेला अग्रक्रम द्यायला हवा. कुठल्याही संघटनेत काम करणे म्हणजे लष्कराच्या भाकऱ्या भाजण्याची तयारी ठेवणे. विन्सेंट द पॉल संस्थेनेही आपल्या संस्थेसाठी आर्थिक आधार स्तंभ आता वेगळ्या पद्धतीने उभे करणं आवश्यक आहे

सध्या सगळीकडे विन्सेंट द पॉलची सभासद संख्या पाचपंचवीस सभासदांचीच दिसते. त्यांना मदत मागण्यासाठी घरोघरी फिरायला लागणे हा आपण ख्रिस्ती असण्याचा अपमान ठरणार आहे. जवळपास दोन डझन देवळं व एक लाखाहून अधिक संघटित लोकसंख्या असलेल्या ख्रिस्ती लोकांच्या संस्थेला मदतीसाठी कुठेही हात पसरावा लागू नये इतकी क्षमता आपल्यात नक्कीच आहे. आर्थिक स्थैर्यासाठी व गरजूंना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी अतिशय वेगवेगळ्या कल्पना राबविल्या जाऊ शकतात. मात्र यासाठीही चर्चने सहकार्य केले पाहिजे. चर्चची धोरणं लोकाभिमुखच हवीत.

ख्रिस्त म्हणाला होता "देवाचे ते देवाला द्या व कैसराचे कैसराला द्या. जर करशील जे गरिबांसाठी होईल ते माझ्यासाठी अशी खुद्द देवाचीच मागणी असेल तर गोरगरिबांसाठी झटणाऱ्या विन्सेंट द पॉलला मदत हीच खरी देवाला अर्पण केलेली प्रार्थना असणार आहे.

# लेखकाचा जन्म

■ दुर्गाप्रसाद खांडाळेकर, 99693 47106

रमेश व विनोद यांची सरस्वती विद्यालयातील जोडी प्रसिध्दच होती. थोडी मस्ती पण अभ्यासात हुशार असल्याने ते सर्व शिक्षकांचे आवडते होते. दोघेही उत्तम गुण मिळवून आठवीच्या वर्गात गेले होते. मे महिन्याची मोठी सुटी कशी घालवायची याचा दोघांनीही आपापल्या परीने बेत केला होता.

रमेशच्या बहिणीच्या लग्नाला अजून वर्ष देखील पुरे झाले नव्हते. तीचे सासर पुण्याचे असल्याने तीने आठवडाभर रमेशला आपल्याकडे आग्रहाने राहाण्यास बोलाविले होते. रमेशही ताईचे नवे घर पाहाण्यास उत्सुक होता. त्यामुळे रमेशचे पुण्याला जाण्याचे नक्की झाले होते.

विनोद दरवर्षी आजीकडे संगमेश्वरला जात असे. पण यावर्षी मे महिना संपत आला तरी बाबांना सुटी न मिळाल्याने विनोद मुंबईतच होता. आजी नातवाची आतुरतेने वाट बघत होती. विनूसाठी खास आंबे फणस बाजुला काढून ठेवले होते. गावाला कधी येणार याची विचारणा करणारे दोन तीन फोन देखील आजोबांनी विनूच्या आईला केले होते. विनूलाही आता अगदी धीर धरवत नव्हता. तो रोज बाबांना "तुमची रजा कधी पास होणार" असे विचारून सतावीत असे.

एके दिवशी बाबांनी रजा मंजूर झाल्याची त्याला खूश खबर दिली. अखेर मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आजीकडे संगमेश्वरला जाण्याचे नक्की झाले होते. शेवटी आईबाबांसह विनू संगमेश्वरला पोहोचला. आजी नातवाची वाट पहातच होती. आल्या आल्याच आजीने विनूला प्रेमाने जवळ घेतले व लटक्या रागाने लेकीला म्हणाली "त्याला काही करून घालतेस कि नाही ? पोरगा अगदी वाळून गेला आहे. आता या सुटीत त्याला खूप खायला घालून चांगला जाडजूड करून पाठवते."

थोड्याच वेळात घरापुढील अंगणात मामेभाऊ व इतर दोस्तांसह नवे खेळ खेळण्यात विनू रंगून गेला. कारण येथे शाळा व अभ्यासापासून सुटका होती. बाबांची रजा दहा दिवसांची होती. आठ दिवस कसे गेले ते विनूला कळलेच नाही. बाबांची दहा दिवसांची रजा संपत आली होती. जाण्याचा दिवस जवळ आला तसे विनूला खूप वाईट वाटू लागले. आणखी काही दिवस आजीकडे रहावे असे त्याला मनापासून वाटत होते.

विनूची ही इच्छा थोड्या वेगळ्याच कारणाने पुरी झाली. विनू मुंबईला निघण्याच्या आदल्या दिवशी आजीला ताप आला. त्यामुळे विनूच्या आईला तेथून निघवेना. त्यामुळे विनूच्या बाबानी आपली रजा आठ दिवसांनी वाढवण्याचा निर्णय घेतला. आजीला तापामुळे अशक्तपणा आला होता.

विनूच्या मामाने त्यांच्या जवळच्या फॅमिली डॉक्टरकडून आजीकरता औषध आणले. हवामानातील बदलांमुळे आलेला साधाच ताप असल्याने औषधाचे दोन डोस पोटात गेल्यावर आजीला जरा बरे वाटू लागले.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी जोरदार वारा सुटला. पालापाचोळा गिरगिरत आकाशात जाऊ लागला.आकाशात काळे ढग जमू लागले व टपटप पावसाचे थेंब जमिनीवर पडू लागले. विनू व त्याचे सगळे मित्र पहिल्या पावसात भिजण्यासाठी घरच्या अंगणात जमा झाले. त्यानी एकमेकांवर पाणी उडविले. अंगणात साचलेल्या पाण्यात खूप दंगामस्ती केली. कोकणातील पावसाचा विनूसाठी हा पहिलाच अनोखा अनुभव होता.

एखादी जादू व्हावी तसा घराबाहेरील देखावा बदलला होता. मातीच्या एका वेगळ्याच सुगंधाने आसमंत भारून गेला होता. असे वर्णन विनूने आतापर्यंत केवळ पुस्तकात वाचले होते त्याचा तो अनुभव घेत होता. आजुबाजुची झाडे आंघोळ केल्याप्रमाणे स्वच्छ झालेली दिसत होती व पावसाच्या स्वागतासाठी डुलत आहेत असे वाटत होते. प्रत्येक झाडाच्या हिरव्या रंगाच्या वेगवगळ्या छटा पावसाने अधिकच खुलुन आल्याने हिरव्या रंगाचे संम्मेलन भरल्या प्रमाणे वाटत होते. आकाशात मेघगर्जना होत होत्या व जोडीला विजाही चमकत होत्या तर जमिनीवर बेडूकरावांचे डरॉव डरॉव चालू

झाले होते. सगळेच जणू पाऊसराजाचे स्वागत करीत होते. केवळ रात्र पडल्यानेच विनूला घरी यावे लागले. दुसऱ्या दिवशी मात्र पावसाचा जोर कमी झाला होता. ढगाआडून सूर्य डोकावू लागला होता व विनूला आकाशात सुंदर इंद्रधनुष्य दिसले. जणू काही विनूला पावसाने दिलेली ती छान भेटच होती. घरातील सर्वांनाच विनू तो देखावा दाखवत सुटला. सायन्सच्या पुस्तकात वर्णन केलेले इंद्रधनुष्य विनूने प्रथमच आकाशात पाहिले होते. आजीच्या मागीलदारच्या शिवाराचा देखावाच बदलून गेला होता. तेथे अनेक छोटी रोपटी उगवली होती व त्यावर पिवळी, जांभळी फुले आली होती व त्यावर अनेक रंगीबेरंगी फूलपाखरे उडत होती. विनूने त्याना पकडायचा प्रयत्न केला व एकही त्याच्या हाती लागले नाही. एकंदरीत विनूने यावर्षी गावाकडच्या पावसाची खूपच मजा अनुभवली होती.

चार दिवसात आजीची प्रकृती देखील सुधारली होती व विनूलाही आता मुंबईचे वेध लागले होते. नवा वर्ग, नवे शिक्षक कसे असतील याचे विचार विनूच्या मनात येऊ लागले. अखेर जायचा दिवस आलाच. आजीने विनूला मायेने जवळ घेतले. घरचे आंबे दिलेच व फणस पोळीही दिली.

अखेर विनू मुंबईत पोहोचला. मुंबईत देखील पाऊस सुरू झाला होता. येथे सर्वत्र चिखल दिसत होता. रस्त्यात खड्डे पडले होते, तर ट्राफिक जाम झाला होता. विनूला गावचे स्वच्छंद जीवन आठवले.

दुसऱ्या दिवशी विनू शाळेत गेला. गावचा मुक्काम वाढल्याने विनूची २ दिवसाची शाळा बुडाली होती. मराठीच्या तासाला यावर्षी नव्यानेच रूजु झालेल्या रेगे मॅडम वर्गात आल्या. सुरवातीला ओळख गप्पागाणी वगैरे झाल्यावर बाईनी "पाऊस" या विषयावर २ दिवसात निबंध लिहून आणण्यास सांगितले. नव्या बाईना आवडेल असा निबंध कसा लिहावा याची विद्यार्थ्यांना थोडी काळजी वाटत होती. विनूच्या मित्रांनी आपापल्या ताई दादांना विचारून निबंध पूरा केला. पण विनूने मात्र कोणाचीही मदत न घेता नुकत्याच आजीकडे अनुभवलेल्या पावसाचे वर्णन आपल्या शब्दात मांडले होते.

दोन दिवसानी बाईनी सर्व मुलांच्या निबंधाच्या वह्या तपासणीसाठी मागितल्या. विनोदचा निबंध वाचून बाईनी त्याचे खूप कौतुक केले. मांडणीमधे थोड्या सुधारणा सुचविल्या व सर्व वर्गाला त्याचा निबंध वाचून दाखवला, कारण विनोद सोडून सर्व मुलांच्या निबंधात साधारणपणे सारखेच मुद्दे होते. विनोदचा निबंध मात्र इतर सर्वांपेक्षा वेगळा व उत्तम होता. आलेले अनुभव उत्तम रीतीने शब्दबध्द करण्याची कला त्याच्यापाशी होती.

बाईनी त्याला निबंध कोणाच्या मदतीने लिहीलास का? असे विचारल्यावर आजीच्या गावी अनुभवलेल्या पावसाचे वर्णन बाईना ऐकवले व आपण स्वतःच निबंध लिहील्याचे सांगितले. तेव्हा बाईना अधिकच आनंद झाला. बाई त्याला म्हणाल्या "तुझ्याकडे लेखनाची दैवजात कला आहे. उत्तम लेखनासाठी उत्तम साहित्य वाचनाची आवड जोपासली पाहिजे. वाचन लेखनाचा सराव चालू ठेव. भविष्यात तू मोठा लेखक होशील. लेखक आपल्या अनुभवांना किवा कल्पनेला शब्दरूप देतो."

विनोदने या सर्वांचा अशा दृष्टीने विचारच केला नव्हता. शिवाय बाईनी त्याला एक छान पेन व वही बक्षिस म्हणून दिली. शाळेतील मित्रांनीही त्याचे अभिनंदन केले. हे सर्व पाहून त्याला खूपच आनंद झाला व कधी एकदा घरी जाऊन आई बाबांना सांगतो असे झाले.

रमेशला मित्राच्या कौतुकाचा आनंद झाला पण त्याची दखल न घेतल्याचे थोडे वाईटही वाटले नंतर त्याबद्दल बाईना विचारल्यावर बाई त्यास म्हणाल्या तुला गणित विषयात गती आहे ती विनोदला नाही. प्रत्येकाला देवाने वेगवेगळे गुण दिलेले असतात त्याचा त्याने विकास करावयास हवा.

घरी आल्यावर आई बाबांनी त्याचे खूप कौतुक केले. त्याने मामा मामीलाही वॉटसअपवर लिहीलेला निबंध पाठवला त्यांचाही लगेच कौतुकाचा मेसेज त्याला मिळाला. सगळ्यांनाच आनंद झाला होता. पावसाचे पाणी धरतीवर पडले कि नवे पिक येते म्हणजेच नव निर्माण होते. मात्र गावाकडच्या पावसाने विनोद मधल्या लेखकाला जन्म दिला होता.

# जगाला कवेत घेणारा ख्रिस्त

■ फा. असिस रॉड्रिग्ज (जेज्वीट)

"आपण सारे बंधू-भगिनी" या विश्व परिपत्रकातील चौथ्या अध्यायात पोप फ्रान्सिस, जगाला कवेत घेणारे हृदय ह्या धड्यात स्थलांतर ह्या विषयावर आवाज उठवित आहेत / आपले विचार मांडत आहेत.

स्थलांतराच्या विषयावर "जगाला कवेत घेणारे हृदय" शिर्षक असलेल्या चौथ्या अध्यायात आपण पाहतो, ज्यांचे जीवन युद्ध, छळ, नैसर्गिक आपत्ती, मानवी तस्करी तसेच त्यांच्या मूळ वंशाच्या लोकांकडून ताटातूट झाल्याने "धोक्यात" आले आहे त्या स्थलांतरितांचे स्वागत, संरक्षण, समर्थन आणि समायोजन करणे आवश्यक आहे. migrants are to be welcomed, protected, supported and integrated. अनावश्यक स्थलांतर टाळण्यासाठी राष्ट्रांनी अशा लोकांना त्यांच्या मूळ देशांमध्ये सन्मानाने जगण्यासाठी सक्षम करण्याच्या संधी निर्माण करणे गरजेचे आहे. परंतु त्याच वेळी, इतरत्र उत्तम जीवन मिळवण्याच्या अधिकाराचा आपण आदर केला पाहिजे. स्थलांतरितांचे स्थलांतरित झालेल्या देशांमध्ये स्वागत, त्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि सहकार्याची हमी दिली जावी.

जेव्हा आपण आपले हृदय उघडे करतो तेव्हा आपली प्रत्येक कृती ही प्रेम बनते. कदाचित हे आपण लॉकडाऊनच्या काळात अनुभवले असेल. आपल्या अनेक संस्थांनी या काळात परराज्यांतून आपल्याकडे कामानिमित्त आलेल्या असंख्य स्थलांतरीतांना कोणताही विचार न करता फक्त प्रेमाची कृती म्हणून आवश्यक ती सर्व मदत दिली. इतकेच नव्हे तर आपल्या शाळा व संस्था त्यांच्यासाठी उघड्या केल्या. आपले हृदय मोठे केले आणि त्यात स्थलांतरितांचा समावेश केला. let your heart be as big as it can possibly be. आपले हृदय शक्य तितकी मोठी करा. त्याचे दरवाजे उघडा म्हणजे इतरांचे प्रश्न आपल्याला समजतील. अगदी सहजपणे आपण स्थलांतरित

लोकांचा द्वेष करतो. कदाचित काही चुकीच्या पूर्वग्रहामुळे हे असू शकते. परंतु जेव्हा आपण त्यांना हृदयापासून जाणतो तेव्हा आपल्याला त्यांच्या खऱ्या समस्या लक्षात येतात. त्यांच्या स्थलांतराचे मूळ कारण जाणून न घेता त्यांचा केलेला द्वेष नक्कीच असमर्थनीय आहे.

अनेक वेळा जीवन जगण्याच्या ईच्छेपायी स्थलांतर झालेले असते हे आपण जाणले पाहिजे. व त्यांच्या या साध्या इच्छेला आपण उभारी दिली पाहिजे. मूळ देशांमध्ये सन्मानाने जगण्याची ठोस संधी निर्माण करून अनावश्यक स्थलांतर टाळण्याची आवश्यकता आहे. जगाला स्थलांतरितांचा प्रश्न सोडविण्यासाठी एका जागतिक प्रशासन संस्थेची आवश्यकता आहे जे त्यांच्याबद्दल एक दीर्घकालीन नियोजन करू शकतात. पोप म्हणतात युद्धामुळे पळून जाणा-या स्थलांतरितांना आणि निर्वासितांना आपण केवळ नाईलाज म्हणून नव्हे तर त्याऐवजी "सुसंवादाची संस्कृती" म्हणून स्वीकारावे व त्यांना "समाधान आणि सहिष्णुतेने” परमेश्वराची मुले म्हणून ऐक्य आणि आदराने वागवावे. अनोळखी व्यक्तीचे स्वागत करण्याच्या येशूच्या आवाहनाला अनुसरून आपण परप्रांतीयांना भाऊ-बहिणी आणि परमेश्वराच्या कुटुंबाचे सदस्य म्हणून पाहिले पाहिजे.

बंधुत्वाविषयी कृतज्ञपणा नसलेले जीवन वेडेपणाने केलेला व्यवहार बनते, ज्यामध्ये आपण नेहमीच हिशोब करतो की आपण काय देतो आणि काय परत मिळवितो? परमेश्वर, दुसरीकडे, आपल्याला जे विश्वासघातकी आहेत त्यांनासुद्धा मोकळेपणाने मदत करण्यास सांगतो. तो “वाईटावर आणि चांगल्यावर आपला सूर्य उगवतो” (मत्तय ५:४५). येशूने आम्हाला असे का म्हटले आहे? त्याचे कारण की : “तू तर दानधर्म करतोस तेव्हा तुझा उजवा हात काय करतो ते तुझ्या डाव्या हाताला कळू नये. अशा हेतूने की तुझा दानधर्म गुप्तपणे व्हावा. (मत्तय ६३-४-४) आम्ही परमेश्वराकडून मुक्तपणे जीवन प्राप्त केले; आम्ही त्यासाठी काहीही मोबदला दिला नाही. परिणामी, आपण सर्व जण त्या बदल्यात कोणतीही अपेक्षा न ठेवता देण्यास आणि त्या बदल्यात आपल्याशी चांगले वागण्याची मागणी न करता इतरांचे कल्याण करण्यास बांधील आहोत. जसे येशू त्याच्या शिष्यांना म्हणाला: तुम्हाला फुकट

मिळाले, फुकट द्या (मत्तय१०:८). जेव्हा आपण आपले हृदय दुसऱ्यांसाठी उघडे करतो तेव्हा आपले जीवन अधिक आनंददायी बनते.

पोप आपल्याला “राष्ट्रवादाच्या अरुंद विचारसरणीविषयी” देखील चेतावणी देतात, परंतु त्यामुळे उपकार करण्याचा अर्थ समजण्यास आपण असमर्थ ठरू नये असाही संदेश देतात (१४४). आपल्या देशामध्ये, विविध धार्मिक विचारधारांनी प्रभावित लोक राष्ट्रीय ऐक्य व राष्ट्रीय रक्षणाच्या नावाखाली स्वतःच्या स्वार्थी विचारसरणीला उग्र रूप देत आहेत आणि त्यामुळे सामाजिक एकतेचे स्वप्न भंग पावत आहे. राष्ट्रद्रोही होण्यासाठी धर्मिक निकष लावले जात आहेत. तरीही धैर्याने आदिवांसीच्या हक्कासाठी लढणारे फा. स्टॅन आपणाला जगाला कवेत घेणाऱ्या हृदयाचे उत्तम उदाहरण आहेत. जर कोणतेही राज्य खासगी मालमत्तेचा वापर सामान्य जनतेच्या फायद्यासाठी न करता त्यावर नियंत्रण ठेवू इच्छीत असेल तर ते अस्वीकारनीय आहे, अशा शब्दात पोप हुकूशाहीवादी विचारसरणीचा निषेध करतात व सर्वांना समानतेने वागविन्याचे आवाहन करतात.

प्रेम आणि करुणा अत्यावश्यक गरजा आहेत ,सुखसोयी नाहीत. त्यांच्याशिवाय मानवता जगूच शकत नाही. प्रत्येक जण आयुष्यात इतरांच्या जीवनात काही न काही व कधी न कधी प्रभाव निर्माण करू शकतो. आपण आपले आयुष्य कसे जगतो यावर तो प्रभाव सकारात्मक आहे की नकारात्मक हे अवलंबून असते. जर आपल्याला एक चांगले आनंददायी जीवन जगायचे असेल आणि या जगास राहण्यास एक प्रेमळ, सुरक्षित आणि चांगले ठिकाण बनवायचे असेल तर या दोन घटकांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. प्रेम आणि करुणा असलेले जीवन प्रेरणेचा वारसा सांभाळते आणि एक सकारात्मक प्रभाव बनू शकते. ज्यात आपण सर्वांना बिनशर्त सामावून घेऊ शकतो. नाती रक्ताची नसतात तर ती प्रेमाच्या भावनांची असतात. भावना असतील तर एखादा अनोखा व्यक्तीही आपला वाटू शकतो, आणि जर भावनाच नसेल तर आपल्या व्यक्तीही परके वाटू शकतात. प्रीतीची भावना मनात ठेऊन जगाला कवेत घेणारे हृदय धारण करू या.

# गोर गरिबांची परिचारिका : सुजाता तुस्कानो

■ **मेल्सीना तुस्कानो परेरा, नंदाखाल**

**फोन - 9028606631**

विरारच्या नंदाखालच्या नंदनवनातील श्रीमती सुजाता तुस्कानो, पेशाने ANM परिचारिका (नर्स). वसईतील निर्मळ-भुईगाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील वरिष्ठ परिचारिका, मनाने व हृदयाने श्रीमंत असलेल्या ह्या नर्सला कोणी कधीही बोलवा ती आपल्या व्यापातून वेळ काढून आजारी माणसांना भेटण्यास जात असे.

वयाच्या २९व्या वर्षीच सुजातावर  दुःखाचा डोंगर कोसळला त्यांच्या पतीच्या अपघाती निधनाने.. रडत नको बसू, तर आयुष्याशी लढत बस, नशीबाशी दोन हात तर हे वाक्य मनात ठेवून तिने अपार कष्ट व स्वबळावर  तिच्या दोन्ही मुलांचे संगोपन करून त्यांना उच्च शिक्षण देऊन स्त्री ही एक अबला नारी नाही तर लढणारी नारी आहे हे समाजाला दाखवून दिले. त्यानंतर काही वर्षांपूर्वी त्यांना कर्करोग या  आजाराने पछाडले, पण न डगमगता, धैर्य खचू न देता मोठया हिमतीने ती ह्या आजाराला सामोरे गेली, ३० रेडिएशन, ६ केमोथेरेपी व अनेक औषधोपचार हे सर्व सुरू असतानाच ती तिच्या कार्याला सुद्धा चिटकून राहिली. गरजवंताना मदत, आजाऱ्याना तिने बरे केले. "मनात आदर, सकारात्मक विचार, आणि चेहऱ्यावर स्मित हास्य ह्या गोष्टीमुळे रुग्ण ८०% बरा होतो, फक्त २०% औषधोपचाराची गरज असते असे त्यांचे मत आहे"

तिचे जिद्दी मेहनती कार्य खरोखरच वाखाणण्याजोगी आहे. स्वभावाने खूप साध्या सरळ ह्या परिचारिकेचे दुसरे खरे कार्य करोना माहामारीत सर्वांना दिसून आले. आपण सर्व जण घरात बसून भिऊन होतो मात्र त्या वेळी ही भगिनी मात्र स्वतः च्या

जिवाची पर्वा न करता सतत करोना आजाराने ग्रासलेल्या पीडित लोकांच्या मदतीसाठी धावली. लस, इंजेक्शने, गोळ्या ह्याचे साचे तयार करून ज्यांना ज्यांना गरज होती त्या त्यांना तिने मदत केली. आणि ह्या गोष्टीची दखल तसेच ३५ वर्षांची त्यांची वैद्यकीय सेवेबद्दल असलेला प्रामाणिकपणा लक्षात घेऊन दिनांक २२.०६.२०२३ रोजी दिल्लीतील राष्ट्रपती भवनाने घेऊन परिचारिका सौ. सुजाता तुस्कानो ह्यांना आरोग्य क्षेत्रातील राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटेंगल  सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित केले गेले.

हा सन्मान म्हणजे समस्थ नंदाखाल, वसईच्या रहिवाश्यासाठी तो एक आनंदाचा क्षण होता. सुजाता मॅडम ह्यांनी जवळ जवळ १७००-१८०० बाळंतपण केले आहेत. आणि हे बाळंतपण करताना आजवर एकही आई किंवा बाळाचा मृत्यू झाला नाही.  ह्या आजवर च्या बाळंतपणात त्यांनी ३ पायाळू बाळंतपणे, आणि ३ जुळी प्रसूती यशस्वीरित्या केल्या आहेत.  तसेच चेना नदीतील बस अपघातात, रेल्वे बॉम्बस्फोट अपघातात मृत्युमुखी, जखमी झालेल्या प्रवाशांवर तातडीने उपचार सुरू करून त्यांनी आपल्या सेवाकार्याला प्रथमदर्शी ठेवले.  अनेक शाळांमध्ये जाऊन मुलींना मासिक पाळीचे शिक्षण देण्यासाठी मॅडमनी पुढाकार घेतला. त्यांनी अनेक हॉस्पिटलमध्ये कॅम्प आयोजित करून आरोग्य संदर्भात तपासण्या, चाचण्या केल्या आहेत. कॅन्सर व इतर आजारांवर प्रबोधने केली आहेत.

ज्या प्रमाणे मेणबत्ती स्वतः जळते आणि इतरांना प्रकाश देते त्यांचं प्रमाणे सुजाता मॅडम आज दुसऱ्यासाठी झटत आहेत, अंधार्या खोलीत ते प्रकाश आणण्याचा प्रयत्न करत आहेत.  दुसऱ्याची सेवा करणे, लोकांसाठी तत्काळ उपलब्ध राहणे हा त्यांचा निसर्गगुण मला खूपच भावून गेला.

मॅडमच्या ह्या अनेक निस्वार्थी कार्यांसाठी त्यांना अनेक असे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यात प्रामुख्याने विमलाताई आपटे पुरस्कार, कमला ताई हॉस्पेट पुरस्कार, सावित्रीबाई फुले पुरस्कार, राष्ट्रीय फ्लोरेन्स नायटिंगल पुरस्कार असे अनेक पुरस्कार त्यांच्या नावे आहेत.

देशाची दशा पाहूनी

हळहळला माझा

जीव मन आले भरुनी

सुजातारुपी देवी दिसूनी

खरोखरच, सुजाता मॅडमचा हा कार्याचा आढावा व लिखाण करताना ते माझ्यासाठी एक प्रेरणास्थान ठरल्या आहेत, मला वाटते आज प्रत्येक स्त्रीयांनी आपल्या आयुष्यातील थोडा वेळ असा आजारी, निराश्रित लोकांसाठी काढावा. आपल्या हातून जितकी मदत, सेवा होऊ शकते तितकी आपण करावी, ह्या पुण्य कर्माचे फळ नक्कीच आपल्याला मिळू शकेल.

जात पात न पाहता केली सेवा तुम्ही रुग्णांची

फुले केलीत तुम्ही डोळ्यातून आलेल्या अश्रूंची

समाजाची

जिच्या मुळे सेवा धर्म काय असतो, निस्वार्थी प्रेम कार्य कसे करतात हे समजले, त्या सुजाता मॅडमला माझा मानाचा मुजरा.

ह्यांच्या हातून हे देव कार्य असेच घडो, आणि त्यांना चांगले आरोग्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

# मी मुग्धा : बन्याची आई

■ भरत काशिनाथ वाळिंजकर
समेळपाडा, नालासोपारा (प)
फोन- 9869461011

काल दि. ०३ डिसेंबर २०२१, माझा बन्या वयाच्या ३५व्या वर्षी आम्हांस सोडून गेला. माझा ज्येष्ठ पुत्र. सुटला बिचारा असं एका आईला कसं म्हणता येईल. कदाचित इतरांच्या मनात त्या भावना उमटल्या ही असतील. आम्हीही सुटलो असंही ते म्हणतील. खूप केलं आईने म्हणून माझं कौतुकही करतील. त्यांच्यादृष्टीने त्यांचे विचार बरोबरही असतील, पण मी आई असा विचार करू शकते ?

१८ डिसेंबर १९८४, मी डॉ. प्रताप सरनाईक ह्यांच्याशी विवाहबद्ध झाले अन् मुंबईची मी नाशिकवाशी झाले. माझा डॉक्टरकीचा पेशा तिथे चालू झाला. घर भरलेलं, सासू-सासरे, दिर-जावा. साऱ्यांनी खूप समजून घेतलं. छान चाललं होतं.

वर्षभरातच मला दिवस गेले. सासर-माहेर दोघेही खूप जपत होते. डोहाळे जेवण अगदी हौसेत झाले. पहिलं बाळंतपण म्हणून एक महिना आधीच मी माहेरी आले. घराशेजारीच वाशी येथे नर्सरी होम होते. तेथेच चेकिंग व्हायचे. पण ह्यांच्या आग्रहाखातर मी ह्यांचे जवळचे मित्र डॉ. उपासनी ह्यांच्या कांदिवली खारघर येथील नर्सरी होम मध्ये मला डिलिव्हरीसाठी ॲडमिट करण्याचं ठरलं.

खरं म्हणजे नऊ महिने उलटून गेले होते. आठवडा झाला पण मला हव्या तश्या कळाच येत नव्हत्या. मन खूप बैचेन व्हायचं. मी स्वतः डॉक्टर असूनही असं का व्हावं ह्याचं उत्तर सापडत नव्हतं. आई-पप्पा, धाकट्या बहिणी, शिल्पा, शितल व चंदु भाऊही काळजीत पडले. अखेर मला १० फेब्रुवारी १९८६ रोजी ॲडमिट

केलं, इंजेक्शन दिले. पण अजूनही हव्या तश्या कळा येत नव्हत्या. वाट पाहण्याशिवाय गत्यंतर नव्हते. अखेर सिझरींग करण्याचं ठरलं. नर्सने मला तसं सूचित केलं आणि ती त्या तयारीसाठी निघून गेली. आता मी एकटेच होते. अन् अचानक मला जोराची कळ आली. मी जिवाच्या आकांताने ओरडले. मुलाचं डोकं बाहेर आलं होतं. नर्स धावत आली.

मला तसंच पलंगावर आडवं केलं, मूल बाहेर आलं होतं. नाळ कापली, पण मुलाचं रडणं कानावर आलं नाही. मूल चक्क हसत होतं. मला खूप टेन्शन आलं. निसर्ग नियमाप्रमाणे घडत नव्हतं. मी तसं डॉक्टरांना सांगितलं.

डॉक्टरांनी मला त्यांच्या परीने समजावण्याचा खूप प्रयत्न केला पण माझे समाधान झाले नाही. मी तुमच्यासमोर दहा लहान मुलांचे डॉक्टर आणतो, तुम्ही त्यांना विचारा. मी गप्प बसले.

मातृत्वाची सुरुवात अशी मोठ्या बैचेनीत झाली. दूधही बाळ हवं तसं ताकदीने घेत नव्हतं. आई-पप्पा, बहिण-भाऊ सारेजण आले. किती हसरा चेहरा आहे म्हणून बोलूनही दाखवत होते.

दोन महिने मी माहेरीच होते. आई खूप करायची, माझं अन् बाळाचं. पण बाळाची वाढ योग्यप्रकारे होत नव्हती. हे आता सर्वांच्याच लक्षात आले होते. मी नंतर सासरी आले. सासू-सासरे, सर्वांनीच छान स्वागत केले. बाळाचं खूप कौतुक व्हायचं. तीन महिने झाले तरी बाळ अजून मान धरत नव्हत. एव्हाना माझी ड्यूटी सुरु झाली होती. आता सर्व काही सासू-सासरेच बाळाचं पाहत होते.

आता बाळाला आठ महिने झाले आणि एका रात्री आम्हाला एक विचित्र आवाज ऐकू आला. आम्ही दोघेही दचकून जागे झालो. एव्हाना घरातील सर्व मंडळी उठली होती. आवाज बाळाचाच होता. त्याचं अंग भयंकर तापलं होते. ह्यांनी त्याला तसेच उचलले आणि पाहतो तर बाळाचं शरीर चक्क लोंबकळत होत. आम्ही अक्षरशः गर्भगळित झालो. भयंकर होतं ते.

रात्रीचे दोन वाजले होते. तसेच बाळाला घेवून लहान मुलांच्या डॉक्टरकडे गेलो. त्यांनी ॲडमिट करून घेतले. चार तासांनी बाळ पुन्हा नॉर्मल झाले. पण ताप एव्हाना डोक्यात गेला होता. आधीच तब्बेत ठिक नसताना हा मोठा घाव त्याच्यावर पडला. अन माझं बाळ मतिमंद होत गेलं. मला खूप रडू कोसळलं. हे सहन करणं खूप कठीण होते. आम्ही दोघंही खूप खचलो. सासर माहेर साऱ्यांनीच खूप समजूत घातली. त्याचं बारसं केलं, बबन नाव ठेवले. सासूबाई त्याला बन्याच म्हणत. दुसरा चान्स घ्यावा की नाही याचे  खूप टेन्शन आले, पण साऱ्यांनी धीर दिला. या काळात आम्ही स्टेशनजवळच नविन घर घेतले. ह्यांचा दवाखाना तिथेच चालू केला.

जानेवारी १९८८मध्ये मला पुन्हा दिवस गेले. यावेळेस आम्ही जरा जास्तच काळजी घेतली. वेळोवेळी सोनोग्राफी केली. इतरही आवश्यक टेस्ट करून घेतल्या. परमेश्वर कृपेने सारं काही व्यवस्थित होतं. पण तरीही मनाची घालमेल चालूच होती. त्याला काहीच उपाय नव्हता. सासर, माहेर ह्यांचीही मनस्थिती तीच होती. ह्या काळात ह्यांनी बन्याची खूप काळजी घेतली. दोघांच्या जॉबमुळे बन्याला सांभाळायला बाई ठेवली, कस्तूरबा. छान सांभाळायची. त्याचं खाणंपिणं वेगळंच होतं.

१४ सप्टेंबर १९८८. मी या वेळेस घराजवळच असलेल्या नर्सरी होममध्ये ॲडमिट झाले, नासिकलाच. अगदी वेळेवर कळा आल्या अन् सांज वेळेस मला कन्यारत्न झाले. तीच्या रडण्याचा आवाज ऐकून मला मातृत्वाचा सुखद अनुभव जाणवला. शरीर आनदांनं मोहरलं. मन शांत झालं. दादूला बहिण आली पण दादूला त्याच काहीच सोयरसुतक नव्हतं.

मुलीचं बारस थाटात केलं, मुक्ता. गौरीच्या सणाला आलेली माझी मुक्ता गोरीपान, देखणी. घरभर फिरायची, तीच्या आगमनाने घर कसं आनदांनं भरून गेलं.

अन् मग २० मार्च १९९२मध्ये प्रसाद झाला. दोन्हीही मुले छान शिकली. मुक्ता माझी अमेरिकेला गेली, उच्च शिक्षण घेतलं. लग्न झालं, दिपक पाटील बरोबर आता ठाण्याला राहते. माझा प्रसाद डॉक्टर झाला. त्याच्यासाठी मी एक वर्ष घाटकोपर मुंबई येथे राहिले, त्या वर्षभरात ह्यांनी बन्याला खूप छान सांभाळलं.

बन्या फक्त वयाने वाढत होता. अधे मधे त्याला फिटस् यायच्या. रात्री बराच वेळेस ओरडायचा. मी धावत जायची. त्याला जवळ घ्यायची. त्याला पुन्हा झोपवायची. कोणी पाहुणे आले की तो त्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करायचा. पाहुण्यांना ते कितपत आवडायचं कुणास ठाऊक. मग तो खिडकीत जावून बसायचा. वाकडाच चालायचा. जगाचं त्याला काहीच घेण देण नव्हतं आणि अर्थात त्याचं जगालाही.

सहा दिवसापूर्वी अचानक बेडवरून खाली पडला. कदाचित जरा जास्तच जोराने मोठ्याने ओरडला. मी धावतच गेले. त्याची शुद्ध हरपली होती. हेही मागोमाग आले. त्याला औषध पाजलं. बराच वेळ तेथेच बसले. तो शुन्यात बघत होता. मला खूप भरून आलं. डोळ्यात पाणी आलं. सकाळी मग त्याला अहमदनगर येथे मोठ्या दवाखानात नेले. तपासल्यावर समजलं त्याला ब्रेन हॅमरेज झालंय. लगेचच त्याला व्हेंटिलेटरवर ठेवलं. मुक्ता व प्रसादला कळवल्याबरोबर ते ठाणा व मुंबईहून लगेच आले. प्रसादने दादूच बरंच केलं. भावाचं कर्तव्य तो छान पार पाडत होता. चार दिवस होवूनही दादूच्या तब्येतीत काहीच सुधारणा दिसत नव्हती. अखेर आम्ही त्याला नासिकच्या दवाखान्यात दाखल केलं. रात्री त्याची तब्येत खूप खालावली. आम्ही जवळच्या नातेवाईकांना तसं कळवलं. अनू सकाळी सातच्या सुमारास दादू अनंतात विलिन झाला. आम्ही त्याचे नेत्र दान केले. जगाला त्याचा तेवढा तरी उपयोग. एक मानसिक रुमाधान...

# कविता /

# चारोळ्या /

# कलाकुसर

# तर

■ अक्षय शिंपी, मुंबई

नुकताच मी कणा
काढून फेकलाय
कोपरं, फासळ्या, कवटी,
मांड्यांची हाडं,
गुडघ्यांच्या वाट्या,
हाता-पायांच्या बोटांमधली हाडं,
अगदी दातसुद्धा
खेचून काढलेत
आणि
फेकाटून दिलेत दूरवर.

आता अगदी बोनलेस
झालोय मी.
बारीकसारीक हाडांचं
मनावर घेऊ नका.

आता तुम्हाला हवं तसं
मटण कापा,
खिमा करा किंवा नॉर्मलच शिजवा
पिस ठेवून.

मला विचाराल,
शेवटची इच्छा वगैरे औपचारिकता पाळून तर मी सुचवेन,
भेजा फ्राय करून खा
आणि सोबतीला रक्त उकळवून प्या
रगतीमुंडीसारखं-
अतीव आनंद मिळेल.
तसाही मेंदू फार तल्लख होता.
त्याच्यापायीच तर
बोनलेस व्हायची पाळी आली!
असो.

दात उपटून काढताना
जीभही उपटली गेली नकळत
आणि लिहून सांगण्याच्याही
प्रश्न नाही.
बोटं खिळखिळी झालीत.
हे सगळं वांझ आत्मनिवेदनच!

आणि हो,
महत्वाचं राहिलंच-
कलेजी रश्शात नका घालू,
तळा- कुरकुरीत चाखणा होईल.

डोळे-कान कापून बाजूला काढा.
त्याचा काही उपयोग नाही.
बाकी मटण कसं करायचं

ते तुमच्या हातात.

चांगलं शिजवा,
पोटभर खा,
आनंद घ्या.

फक्त, शक्य झालंच तर-
हाडं जतन करा
काय आहे,
माझं मटण खाऊन
तुमच्यात माझा संकर झाला-
तर माझ्याच हाडांच्या
कुबड्या तुम्हाला वापरणं
सोयीचं होईल,
इतकंच!

# कविते खूप बोलतेस

■ संगीता अरबुने, वसई

कविते खूप बोलतेस.
ऐकूणही घेतलं तुझं खूप
आनंदाचं साधन आहेस तू, मान्य
पण जगण्याचं साधन
नाही होऊ शकत तू
नाही थांबवू शकत तू
माझ्या अस्तित्वाची धूप
आणि  देऊही शकत नाहीस
प्रियकराच्या स्पर्शाचं सुख
नाही खेचू शकत तू
विश्वाच्या आदिम  बिंदूतून
माझ्या आयुष्याची तार

कविते, नाहीच जमणार तुला
आपलंच  गर्भाशय
आपल्याच हातांनी खरवडणं
 आणि मातृत्वाच्या दोरीवर
वेदनांची फडकी सुकत घालून
त्यातून स्वत:च ठिबकत राहणं

आणि तो इगोईस्टिक धूर!

नको असतानाही आत येऊन
थेट रक्तात मिसळलेला
कविते नाहीच जमणार तुला
जगण्याची चाळण होऊ न देणं
आणि न ठसकता समेवर येणं

संवेदनांचा उसळणारा लाव्हा
पिऊन टाकतेस तू,
नाही असं नाही
पण  आतला हा धगधगता ज्वालामुखी!
आणि त्याच्या तोंडावर वसलेलं हे आख्खं शहर!
त्याचं  नाही करता येणार तुला पुनर्वसन
कविते खूप बोलतेस.
ऐकूणही घेतलं तुझं खूप.

# ट्रॉमा

■ महेश लीलापंडित

स्टेटस् ऑनलाइन

|

हाय! कशी आहेस!
सो नाइस टू सी यु
वॉट्सअपवर
ओह्! सो ग्लॅड |

बॅकस्पेस
बॅकस्पेस
बॅकस्पेस
बॅकस्पेस

हाय! कशी आहेस!
सो नाइस टू सी यु
वॉट्सअपवर
ओह्! सो |

बॅकस्पेस
बॅकस्पेस

हाय! कशी आहेस!
सो नाइस टू सी यु
वॉट्सअपवर
ओह्! |

बॅकस्पेस
बॅकस्पेस
बॅकस्पेस

हाय! कशी आहेस!
सो नाइस टू सी यु
वॉट्सअपवर |

सेन्ट

१ मिनिट
२ मिनिट
टायपिंग ...
टायपिंग ...
टायपिंग ...
५ मिनिट
टायपिंग ...
टायपिंग ...
टायपिंग ...
टायपिंग ...
टायपिंग ...
टायपिंग ...
८ मिनिट
टायपिंग ...
टायपिंग ...
टायपिंग ...
टायपिंग ...
टायपिंग ...
टायपिंग ...
टायपिंग ...
टायपिंग ...

हाय!

# जलमाचा भिकारी......

■ अमोल विनायकराव देशमुख, महेंद्र नगर,परभणी
संपर्क - 7620949985

स्पीकरवर प्रल्हाद शिंदेचे भजनं
मृदुंग टाळ्याच्या नादगजरात
दर्शन घेणाऱ्याचा घनघन घंटानाद
कुठंतरी फजर
गायीच्या घंटीच्या आवाजात कालवण

आंगणात रांगोळी सड्याची रपरप
गोठ्यात चुळचुळ
गायीच्या स्तनांना लुचनारी कारवड
- चाटत गाय चटचट

दुष्काळाच्या नाकावर टिच्चून
झाड बहरलेय बांधून पावसाचे घरटे
त्याखाली थुईथुई नाचतोय फुलांचा मोर

झाडाच्या सळसळीवर
आनंदाच्या पाखरायचे कवीसंमेलन
हिरवीगार श्रावणाची गझलओवी

इवल्याशा गवतफुलांना सारून

चमकतात दवबिंदू
पाकुळीच्या आभाळपंखांची करत फडफड

मुंग्याच्या कानगोष्टी परस्परांना
जिद्दीच्या काहान्या रातंदिस
तोंडात इवलासा प्रचंड दाणा

गिरणीचा पट्टा करतोय घरघर
भुकेचा पट्टा करायला शांत
सकाळच्या चुलीतल्या धुराचा आसमंतात
गोतावळा
थपथप भाकरी थापत
किणकिणीसोबत

चांगईत म्हशकीने पाणी भरणाऱ्यांचा
गोंधळ घाई गडबड लगबग
गंग्याच्या दुकानावर गर्दीचा गोंगाट
चिमनचाऱ्या हातांचा इवलुसा मोठा बाजार

इथे मी पायऱ्यांवर ऐकत पृथ्वीनाद
घेतोय शाळत प्रार्थना
पाखरं गणवेशात ठेऊन उद्याची सावधानता
मिटून डोळे जोडून कोवळे हात
जणू बसलीयत पाखरं लाईनच्या तारंवर

" या प्रसन्न आवाजात मिसळू नये कोणतेच

वेडेवाकडे आवाज
सीमेवर उगवावी शांततेची हिरवळ
आमने सामने असलेल्यांना व्हावा
प्रेमाचा कावीळ
बॉम्बच्या कारखान्यावर पडावा फुलांच्या सुगंधाचा पाऊस
युद्धाची भाषा पावावी लोप
द्वेषाच्या हृदयाला होऊ नये रक्तपुरवठा
अन् मुर्खांच्या वस्तीला लागो भयंकर आग
एवढी एक प्रार्थना पूर्ण कर विधात्या
पक्कं सांगतो
तुझे गीत गाण्यासाठी शब्दांकडे अहोरात्र मागेल भिक होऊन जलमाचा भिकारी"

# कर्म

कधी हळुच,कूणाचा बांध फोडते
शेतावरचे दुधी,भोपळे,तोडते
वाटत फिरते,नाती जोडते
समोरच्याची मते तोडते

जुळत आलेली लग्न मोडते
जनसेवेची व्याख्याने झोडते
देशसेवेत कधी मी पडते
भ्रष्टाचारात मीच सडते

नेता म्हणून गावात फिरते
खुर्ची येता निती घसरते
मतदाना साठी हात पसरते
कर्तव्य येता दात्यास विसरते

दोन पिढ्यांची दौलत जमते
अहंकाराच्या अधीन मी होते
बेइमानी मी माणूसकी विकते
बुडबुडे जसे तशीच टिकते

कर्म फळांची कडवट गोळी
चाखत बसते रिकामी झोळी
कष्टाची मिठ भाकर पोळी
खरंच त्याची चव आगळी

कुणाची फूले,कूणाचा देव
भजत नाही,नसतो चेव
दिनरात भूमीची सेवा
नको मजला काही रे देवा

हिरवे रान माझा स्वर्ग
घामाचा मज आहे गर्व
पडता क्षणी झडती सर्व
मिटता डोळे दिसे स्वर्ग

## शेती गेली, भिंती आली

दिवाळीत ओटे पिकाने भरायचे
झोडणी,मळणीचे आवाज यायचे
कुटुंब सारं योगदान द्यायचे
गोणी भरताना आनंद लुटायचे
कष्टात सणाला न्हाऊन जायचे
करंजी लाडूचे डबे भरायचे
मनसोक्त खाण्यात दिवस सरायचे
आता म्हणे शेतात नाही मरायचे
वाडा तांदूळ घरात भरायचे

कष्टात लेफराइट वॉकिंग करायचे
पिझ्झा,बर्गरचे पाय धरायचे
शुगर,बी.पी.ने तारूण्यात मरायचे
गोडधोड सारं विसरायचं
आपल्याच कर्माने आपण घसरा
येतील सण दिवाळी दसरा
रेडिमेड सारेच,घरचं विसरा

■ **शकुंतला नारायण पाटील (नवाळे)**

# तुम्ही –आम्ही

■ संगीता वाझ, वसई.

तुम्ही तुपाशी
आम्ही सदा उपाशी
आम्ही समाधानी
तुम्ही कायम अधाशी
घरात तुमच्या शॉवर
आमचं गळकं छप्पर
आमची धडुतं लज्जेपुरती
तुम्ही लाजच सोडलेली
शंका येतेय म्हणून विचारतेय्...
तुमचा आमचा सूर्य एकच ना...?

तुमच्या महाली बारमाही दिवाळी
आमच्या भाळी फाटकीच झोळी
जगण्यापुरती खातो मीठभाकरी
पोटभर जेवून औषधं ढोसूनही
झुरता झोपेसाठी मऊ शय्येवरी
शंका येतेय म्हणून विचारतेय्...
तुमचा आमचा सूर्य एकच ना...?

तुम्ही जाल तेव्हा...
पोरं व्हिडिओकॉल करतील

आमची पोरं आज्जी हरवली म्हणून
हंबरत शोधत फिरतील
पोट आमचं हातावर
कमावतो कष्टाने खातो सुखाने
तुमची आयुष्यभराची कमाई
नेणार सोबत शवपेटीसह...?
शंका येतेय म्हणून विचारतेय्...
तुमचा आमचा सूर्य एकच ना...?

कोंबडं आरवती पक्षी गाती
फुटे तांबडं क्षितिजावरती
तुमचं उजाडणं डोअरबेलवरती
तुमचं आमचं घड्याळ वेगळं...
जगणं वेगळं...मरणं वेगळं...
शंका येतेय म्हणून विचारतेय्...
तुमचा आमचा सुर्य एकच ना...?

# इथे(एकत्र कुटुंब) तिथे (विभक्त कुटुंब) नि:शब्द एकाकी अश्रू

■ मेलवीन डाबरे- वसईकर, गिरीज- वसई

इथे दहा जणांचं  कुटुंब
तिथे तिघं वा चौघांचं  कुटुंब
नावं मात्र एकत्र नि विभक्त कुटुंब/१/

इथे वाढली एका पाठोपाठ दहा-बारा
तिथेही वाढली एक वा दोन
इथे संस्कार अनेकांचे
तिथे मात्र दोघांचेच/२/

इथे शेती-वाडी मोलमजुरी करून कुटुंब जोपासली
तिथेही कंपनी-व्यवसाय-ऑफिस करून कुटुंबं उभारली
इथे मनाने श्रीमंत तर
तिथे धन-संपत्तीने /३/

इथे घर जणू वाडा माणसांनी भरलेला
तिथे घर म्हणजे आलिशान बंगला
सुख-सुविधांनी सुसज्ज असा/४/

वाड्यातून पडले एकेक बाहेर
नाव मिळालं झाले विभक्त

मी आणि माझं कुटुंब
वाडा झाला पडका नि वाड्यातील परके/५/

आई एक महिना माझ्याकडे व बाबा तुझ्याकडे
झाल्या दोघांच्या वाटण्या
या, नाहीतर रहा एकाकी वाड्यात
काहींची रवानगी झाली वृद्धाश्रमात तर काहींची अंधा-या खोलीत /६/

'इथे'ला मिळाली तिलांजली
इच्छेविरुद्ध धावले तिथे मिळण्या सावली
पण पोटच्या गोळ्याने
जगण्याची हवाच काढली/७/

"करावे तसे भरावे' या उक्तीप्रमाणे
तिथेही दोन्ही मुलं झाली स्थाईक परदेशी
म्हणाली,ना करिअर वा ब्राईट फ्युचर स्वदेशी
सर्वकाही आहे ते विदेशी/८/

वाड्याप्रमाणे जमीन जुमला नि बंगला ही पडला ओस
कधी येणार,कधी येणार ही वाट पाहत
लागला त्यांना पाहण्याचा व नातवंडांना कुरवाळण्याचा सोस/९/

झालो बाळगी जाऊन वारंवार परदेशी
पण ओढ सदैव मनात
'गड्या अपुला देश बरा'
म्हणत परतले मायदेशी /१०/

इथेही नाहीत,तिथेही नाहीत
आहेत फक्त जुने क्षण
राहून राहून एवढंच आठवतं
ह्याचसाठी केला होता का अट्टाहास
पण नाही होत विस्मरण /११/

नाही जवळी कुणी समजून घेण्या, संवाद साधण्या
आहेत केवळ आठवणी आणि
ओघळणारे पण नि;शब्द एकाकी अश्रू/१२/

मी राहिलो ना माझा नि ना  झालो इतरांचा
माझे झाले परके ,विसरले नाते
अशा या कठिणप्रसंगी ,हे ईश्वरा केवळ नि केवळ
तुझीच आठवण येते रे देवा
तुझीच आठवण येते....../१३/

# शिक्षकहो भविष्य तुमच्या हाती...

ह्या गोजिरवाण्या हाताचे भविष्य तुमच्या हाती,
ओ शिक्षकहो भविष्य तुमच्या हाती...

नव्या पिढीचे, नव्या दिशेचे सुर हे गाती,
ओ शिक्षकहो भविष्य तुमच्या हाती...

नव्या आशा, नवीन योजना असेल त्यांच्या मनी,
ओ शिक्षकहो भविष्य तुमच्या हाती...

नवे विचार, नवीन आचार घेऊनी पुढे चालिती,
ओ शिक्षकहो भविष्य तुमच्या हाती...

नवे वागणे, नवे चालणे मनास नाही पटती,
बदल हा नवा पाया, म्हणुनी
ओ शिक्षकहो भविष्य तुमच्या हाती...

भाषा आणि गणित आहे पाया,
म्हणुनी झिजवू आपुली काया..
ओ शिक्षकहो भविष्य तुमच्या हाती...

घेऊनी हातात हात करूया राष्ट्राचा विकास,
आपण नमुया,भविष्य घडवूया...

**■ ब्रिनल क्रास्टो, नंदाखाल (परसाव)**

# आमची भारतीयता

असो धर्म कोणताही

हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन

भारतीय आहो आम्ही

करू देशाचे रक्षण

असो वर्ण कोणताही

क्षुद्र, क्षत्रिय,ब्राह्मण

हातात बांधले आम्ही

देशसेवेचे कंकण

असो वंश कोणताही

श्रेष्ठ, कनिष्ठ  श्रेणीचा

मानले ना भेद आम्ही

मानवतेचे पाईक

असो प्रांत कोणताही

संस्कृती, सभ्यता ,

केला ना फरक आम्ही

एक सारेच स्थायिक

असो भाषा कोणतीही

नांदती सुखाने इथे

विविधता जपू आम्ही

जागृत अस्मिता इथे

असो लिपी कोणतीही
द्रविडी, देवनागरी
केला तो सन्मान आम्ही
लागली ती धग जरी

# दुटप्पी जग

देवादेवात मी मानला नाही भेद कधी
असो येशू, अल्ला, साई नानक सत्यवादी

लोकालोकांत मग मानू कसा भेद सांगा
मुस्लिम ख्रिश्चन, हिंदू, शिख कशाला दंगा

माझ्यासाठी जगी मानवता अभेद आहे
कबीर साई चा मानवतेचा वेद आहे

नरनारी भेद निसर्गाचा एव्हढा आहे
रंग, वंश, धर्म मानवांनी मानला आहे

मनामनात का जाती भेदांच्या उभ्या भिंती
वरून हसरे मनात अमंगळ चिंती

**■ बाबू फिलीप डिसोजा, यमुनानगर, निगडी, पुणे**
**■मो. 9890567468**

# कलाकुसर :-

## रॉयल बॅप्तिस्ट रॉड्रिग्ज :-







## रॉबर्ट परेरा :-


होळी बाजार

## डॉ. रेबेका दोडती :-

